
मायबोली
हितगुज दिवाळी अंक २००५
शुभ
दिपावली

# ★ प्रतिबिंब ★

**नमस्कार!**
अवघा अंधार बाजूला सारुन
मंगल प्रकाश हातात घेऊन
ओठात प्रार्थना हृदयी आनंद
भवती उठती सुखद तरंग
विश्वात चैतन्य पेरित जाशी
दिव्यांचा उत्सव आश्विन मासी

आश्विन वद्य द्वादशी पासून कार्तिक शुध्द द्वितीयेपर्यंत चालणारा हा आगळा वेगळा दीपोत्सव . दीपोत्सव म्हणजे केवळ उत्सव आणि सजावट नाही . दिवा हेच मुळी प्रकाशाचं, ज्ञानाचं आणि विवेकाचं प्रतीक . अंधार दूर करण्यासाठी दिवा लावायचा . आपले डोळे अंधार निरखतांना त्यात हरवून न जाता प्रकाशाकडे लावणे हा आपला स्वभावधर्म असायला हवा म्हणून हा दीपोत्सव आपण साजरा करतो .

'दिवाळी आली' हे वाक्य नुसते उच्चारले तरी सळसळता उत्साह जाणवतो . रंगीबेरंगी, आकाश उजळवणारे फटाके, फराळाचे विविध पदार्थ, आकाशदिवे ह्याच बरोबर डोळे लागतात ते दिवाळी अंकाकडे .

आपण सर्वजण मिळून प्रसिद्ध करत असलेल्या मायबोली दिवाळी अंकाला दर्जेदार लेखनाच्या स्वरुपात आणि वाचकांच्या कौतुकाच्या रुपात मिळणारा प्रतिसाद दर वर्षी वाढत च आहे . या वर्षी मायबोलीच्या दिवाळी अंकाने वाचकांना थोडी जास्तच प्रतीक्षा करायला लावली हे खरंय, मात्र साहित्याचा दर्जा आणि वैविध्य कायम राखण्यात कुठेही कमतरता राहिली नाहिये हे वेगळे सांगायची गरज नसावी!


आपल्याला माहित च आहे की पंच महाभूतांपैकी, चार महाभूतांची दृष्टी वक्र असल्याने गत वर्षी सुनामी, मुसळधार पाऊस, वादळे आणि भूकंप ह्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले . ह्या आपत्तीतही जातीधर्माच्या भिंती ओलांडून जे मदतीचे हात, ओघ आले त्यातून घडलेले माणुसकीचे दर्शन ही जमेची बाजू निश्चित आहे . ह्या पार्श्वभूमीवर, आगामी वर्षातील दिवस शांतीचे, समृध्दीचे जावो ही ईश्वरचरणी मंगलमय प्रार्थना !

दिवाळी अंक हे कुणा एकट्या दुकट्याचे काम नव्हे . अनेकांनी त्यात लक्ष घातले, आपापल्या परीने हातभार लावला की हे आव्हान पेलणे शक्य होते . ह्या वर्षीचा अंक अधिकाधिक संवादी, आशयसंपन्न आणि देखणा व्हावा ह्या आमच्या उद्दीष्टात स्वयंसेवक म्हणून मायबोलीकर प्रिया, itsme , क्षिप्रा, चाफा, Svsameer ह्यांची आम्हांला बहुमूल्य मदत झाली . सूचना, शुभेच्छारुपाने तर अनेक जणांची मदत झाली . . ह्या सर्वांचे मन:पूर्वक आभार .

हा दीपोत्सव आपणा सर्वांना शुभंकर होवो !

सस्नेह,
**- संपादक मंडळ**

# ★ संपादक मंडळ ★


Asami
Milindaa
Paragkan
Upas
Maitreyee
Hava_Havai
Anilbhai
सजावटः ★ Mru
Illustrations : ★ Pha ★ Rachana_Barve
खास आभारः ★ Priya, Kshipra, Itsme, Svsameer, Chafa

# ★ स्पंदन ★

पाप - अजय

अहेव - हेम्स

परिपूर्ण - जयश्री अंबस्कर

खंडणी - राहुल फाटक

Covalent bond - सुभाष डिके -Cool

जाई - रचना बर्वे

चकवा - अनुपमा

मी, ती आणि सिगरेट - श्रद्धा कोतवाल

करणी - GS1

## पाप . . .

" आजी, किती दिसावर राहिली गं जत्रा? "
आजीचा एकुलता एक नातू, विजू, आज दिवसात तिसऱ्यांदा हेच विचारत होता .
" अरे, हायेत अजून दोन चार दिस . " अशी त्याची कशीबशी समजूत काढत आजींनी त्याला खेळायला पिटाळले . त्याच्या पुढच्या बालसुलभ प्रश्नांची उत्तरे त्यांना माहीत नव्हती असे नव्हते . पण उद्याच्या दु:खदायक उन्हाच्या चाहूलीने आजपासूनच का स्वत:ला अन त्याला पोळून घ्यायचे असा विचार त्यांनी कदाचित केला असावा .
विजू परत काहीवेळ बाहेर जावून येवून आजीला बिलगला .
" आजी, जत्रेला लय मजा येईल ना? मला फुगे, खेळणी, खाऊ, सगळं सगळं हवय . मला त्या फिरत्या चक्रात बसायचंय . आन् खूप पेढंबी खायचेत . " आपल्या मागण्या आठवून आठवून आपल्या लाडक्या आजीपुढे मांडण्यात ते इवलंसं निरागस पोर दमून गेलं . आजीने, " आरं, हो रं माज्या राजा . सगळं करू . " असे त्याला डोळ्यातले अश्रू सावरत सांगीतलं खरं पण तिच्या दृष्टीपटलासमोरुन एक काळाचा पट्टा क्षणात सरकून गेला . वयाने अन् अश्रूने दृष्टी धूसर झाली असली तरी ते कडू क्षण तिच्या नजरेसमोरून ठळकपणे तरळून गेले . चवी प्रमाणे आठवणीचेही शास्त्र असावे . जेव्हढी कडवट तेव्हढीच चिवट .

अगदी फार काही वर्षापूर्वी नाही पण तीन चार वर्षापूर्वीच राधाक्कांचं घर हसतंखेळतं होतं . एकुलत्या एक मुलाच्या पहिल्याच मुलाच्या , विजूच्या घरभर बागडण्याने घर उल्हासाने भारलेलंच असायचं . मुलगा तालुक्याच्या गावाला नोकरी करायचा . घरची थोडी शेती राधाक्कांचे पती गोपाळराव बघायचे . सुनेबरोबर, विजूचे हट्ट पुरवण्यात अन त्याचे कौतुक करण्यात राधाक्कांचा दिवस मावळायचा . असाच गावच्या जत्रेच्या अगोदरचा दिवस होता . त्याच्याच खरेदीसाठी मुलगा व सून तालुक्याच्या गावाला गेलेले . अन् तिथेच काळाने त्यांच्यावर घाला घातला . एक दोन आठवडे प्रयत्नांची अन औषधोपचाराची शर्थ करूनही त्यांचे प्राण त्या अपघाताने विदीर्ण झालेल्या शरीराला सोडून गेले . मागे राहीले ते फक्त ह्या आघाताने सैरभैर झालेले आजी - आजोबा अन् काय घडलंय हे फारसं न कळालेला त्यांचा चिमुकला नातू विजू . .

सुख असो वा दु:ख, भरभरूनच येतं . भरभरून देवून जातं किंवा निवडून निवडून सगळंच घेवून जातं . मुलाच्या रूग्णालयाचा खर्च भागवण्यासाठी घरातला होता नव्हता तो पैसा अडका गेला . जमीनही गेली . पैसा गेला म्हणून पत गेली अन् मग घरातली वर्दळही गेली . सुरूवातीला कोणी मदत करी . पण सरत्या काळाबरोबर अन् दुष्काळाच्या एक दोन फेऱ्यानंतर तो झराही आटला . नातेवाईकांनी तऱ्हेवाइकपणाचे एकेक नमुने दाखवत संबध तोडले . दुसऱ्यांच्या शेतात पडेल ती मोलमजुरीची कामे करीत, ते दोघं, विजूकडं पाहत दिवस ढकलत होते . विजू सुरुवातीला रडायचा . आईबाबा कुठे गेले, कधी येणार? अश्या प्रश्नांनी घर डोक्यावर घ्यायचा . नंतर त्यालाही 'ते देवाघरी गेले' ह्या उत्तराची सवय होवून गेली . माणसाच्या असण्याबरोबरच त्याच्या नसण्याचीही माणसाला सवय होवून जाते .

" आज्जे, तिकडं पेढ्याची दुकानं लागली बघ, आपण कधी जायचं " विजूच्या ह्या प्रश्नाला रोजच्या सारखेच त्यांनी आज पण उत्तर दिले, " हो, आणू रे " अन् नजर नुकत्याच बाहेरून आलेल्या आजोबांकडे वळवली, चेहरा सांगत होताच पण त्यांच्या झुकलेल्या नजरेत बराच अर्थ होता . ते आजपण रिकाम्या हातानेच आले होते . पावसाने सगळे पीकच वाहून गेल्यावर, कोण अन काय देणार ह्या म्हाताऱ्या जोडप्याला काम? अन् मग धान्यपैश्याविना कशी होणार विजूची जत्रा साजरी? ह्याच दिसात गेलेल्या पोराच्या आठवणी अन् त्याच्या एकुलत्या एका जित्या आठवणीचा हा जत्रा साजरा करण्याचा निरागस उत्साह अन कोपलेल्या निसर्गाने वाढून ठेवलेलं खडतर वास्तव , कशाचाच त्या साध्या जोडप्याला मेळ घालता येत नव्हता . पेढ्यांवरून आजीला आठवले, गावची जत्रा ही वेशीवरच्या मारूतीची . हा देव म्हणजे नवसाला एकदम पावणारा . लोक नवस बोलणार अन् गुण आला तर पेढे वाटून तो फेडणार . विजूही असाच नवसाचा . त्याच्या जन्मानंतर आलेल्या पहिल्या जत्रेला आजी आजोबांनी त्याच्या वजनाएवढे पेढे देवाला अर्पण करून तो नवस पूर्ण केला होता . नवस नाही पूर्ण केला तर हा देव कोपायचाही . त्यामुळे साहजिकच जत्रेला इतर खेळ व दुकानांबरोबरच पेढ्याचीही तात्पुरती दुकाने तळ ठोकून असायची . .

विजूच्या रोजच्या प्रश्नांना तीच तीच उत्तरे देता देता तो जत्रेचा उजेड उगवलाही . कुठे काही उधार मिळते का ते पहायला आजोबाही लवकर घराबाहेर पडले . का त्यांना आपल्या नातवाचा हिरमुसलेला चेहरा पाहणं चुकवायचं होतं कुणास ठाउक . . विजूच्या थयथयाटानेच दिवस उगवला व वर सरकला . आजीने, " तुझा आजोबा गेलाय त्याचीच जुळणी करायला " असे सांगून विजूचे रडे तात्पुरते थांबवले . त्याही एकदोन घरी जावून आल्या . 'घरात खायला मारामार, अन ह्यांना जत्रा करायचीय, पोराला जाऊन काल तीनच वर्ष झालीत अन आज हे खातायत पेढे .' असे उघड वा आडून शेरे ऐकून त्या भरल्या डोळ्यांनीच माघारी आल्या . काय करणार पण सगळीकडेच थोड्याफार फरकाने हीच परिस्थिती होती . निसर्गच कोपल्यावर, कोण कुणाला अन् काय मदत करणार? आडात नाही तर पोहऱ्यात तरी कुठून येणार . काही नोकरदार कुटुंबे सोडली तर सर्व घरे अशा व्यथा लपवून आपाआपल्या परीने वरवर जत्रा जगून मनातून मात्र झुरत होती . नुकताच विजू बाहेर गेला होता . आजोबाही थोड्याच वेळात तसेच परत आले . दोघांच्याही डोळ्यातले मुके अन असहाय भाव

वरेच बोलून गेले . तेव्हढ्यात विजू बाहेरून पळत आला, " आजी, आजी, हे बघ पेढं . " त्याच्या छोट्या मुठीत ते दोन चार पेढे अन डोळ्यात अपार प्राप्तीचे भाव होते . दु:खाने होरपळलेल्या आजींच्या मनाला हा एक वार सोसला नाही . नातवाला जवळ घेवून त्यांनी कळवळून विचारलं, " कुणी दिले हे पेढे? खरं सांग, कुठून आणले हे पेढं " आजीच्या कुशीत मुसमुसून रडत विजू उत्तरला, " सगळे मजा करतायत . तो शेजारचा सोनू मला टुकटुक करत पेढे खात होता . मी देवळात जावून पण लोकांना मागितले . पण कोणीच देले नाय . मग मी एका दुकानातून हळूच उचलले अन पळत सुटलो . तो मालक ओरडला पण मी त्याला सापडलोच नाही . " राधाक्कांनी तिरिमिरीतच विजूला दोन लगावून दिल्या . त्याच्या हातातले पेढे खाली पडले . ते दूरवर टाकून त्यांनी विजूला कुशीत घेतलं,
" अरे माज्या सोन्या, असे चोरून घेवू नये काही कुणाकडून . ते पेढे खराब आहेत, खाऊ नये असे . "
रडत्या सुरात तरीही विजूने विचारले, " काय झालंय त्याला? "
" अरे त्याला पाप चिकटलय, ते तुझ्या पोटात जाईल अन मग नंतर डोक्यात . मग ते कायमचे तिथेच बसेल . " आजी त्याला कसेबसे समजावत थोपटत राहिल्या .



आजोबा काहीच न सुचल्याने परत देवळाकडे निघाले . देवापुढे क्षणभर उभे राहीले . देव गुलालात अन हारात बुडून गेला होता . त्यामुळेच त्याचे लक्ष कदाचित ह्या गरीब जोडप्याकडे जात नसावे . देवापुढे गुलालात रंगलेला पेढ्यांचा खच पडलेला . त्याकडे बघत आजोबा मागे सरकले . तिथेच एका खांबाला टेकून विनवणी करू लागले . मधूनच ते देवापुढे सरकत दंडवत घालीत . मागे सरकत . देवळात भक्तांची बरीच वर्दळ होती . लोक दर्शन घेत होते . प्रत्येक जण आपल्या सुखात वा दु:खात रंगला होता अन् देव गुलालात . असे बरेच क्षण गेले . थोड्या वेळाने जराश्या गलक्याने त्यांचे डोळे उघडले . शहरगावातील काही तरूण पोरं दर्शनाला आली होती . इकडे तिकडे फोटो काढत होती . तेवढ्यात त्यातली एक ओरडली . " ये, ते आजोबा बघ ना, किती cute अगदी देसी . एक फोटो काढ ना . " दुसऱ्याने लगेच, मनोभावे देवाला भाकणाऱ्या आजोबांकडे कमेरा वळवला . भांबावलेले आजोबा एकदम नको नको म्हणू लागले . मागे सरकायला लागले . " बाबा, फक्त एकच फोटो . " मागे सरकणाऱ्या आजोबांना थांबवत पुढे म्हणाला , " पैसे देतो ना यार . " पैसा, मग तो बाजवीपेक्षा जास्त असो वा कमी, तो क्षणभर का होईना माणसातलं माणूसपण पसाभर कमी करतो . पैसा हा शब्द ऐकताच आजोबांचे डोळे लकाकले . जणू त्यांचा धावा देवाने ऐकला . ते तयार झाले . तो तरूण आपल्या मित्राकडे वळून म्हणाला " बघा, खेड्यातले लोकपण किती professional झालेत . " आजोबांचे दंडवत घालतानाचे वगैरे नीट फोटो घेवून एक रुपया आजोबांकडे भिरकावत ते टोळके जायला निघाले . 'फक्त एकच रुपया' हा आजोबांचा क्षीण आवाजातला प्रश्न 'एक रुपया नको, जास्त हवेत? स्वत:ला काय सोमणांचा मि . समजतो काय हा बाबा?' ह्या कुत्सित उत्तरात व त्यापाठोपाठ उठलेल्या हशात हरवून गेला . तोच एक रुपया निरखत आजोबा बाहेर आले , एका दुकानापुढे उभे राहत दुकानदारास त्याचे पेढे मागू लागले .

" चला व्हा बाजूला, एक रुपयाला पेढे मिळतात होय? एक रुपायचे पेढे मागणार अन लक्ष नाही बघून चार पळवणार . धंद्याच्या टायमाला खोट नको . चला जावा पुढे " . दुकानदाराच्या ह्या उत्तराने खजील झालेले आजोबा परत देवासमोर येवून बसले . अशाच काही घटका सरल्या . दुपारच्या उन्हाबरोबर गर्दीही कमी झाली . पुजारीही नैवेद्य दाखवून स्वत: उदरभरण करायला निघून गेला . देवळात परत दोघेच उरले . भरजरी ओझ्यात अन् लौकिकात गुदमरलेला, की ते ओझंही सुख म्हणून मिरवणारा देव, आणि नातवाच्या लौकिकार्थाने क्षुल्लक अशा अपेक्षांच्या ओझ्याने गुदमरलेले आजोबा .

बरेच लोक आले अन् गेले . जुनी बोली पूर्ण करून, नवी बोली लावून गेले . एकही जण, 'देवा आता तुम्ही विश्रांती घ्या, आमचे आम्ही बघतो' असे बोलून गेला नाही . कदाचित् कोणी तसे बोलले असते तर देव दुखावला गेला नसता कशावरून? देवळाबाहेरच थांबलेला एखादा नास्तिकही देवा तुझे अस्तित्व अन् प्रस्थ असेच टिकून राहू दे, म्हणजे आमचेही टिकेल . अशी बोली लावून गेला असेल . मध्येच कोणी पुढारी आले . कुठल्याश्या निवडणुकीतील जयाबद्दल देवाला पेढ्याचा हार वाहून गेले . आजोबांना एकदा वाटले की माझ्या नातवालाही सुखाने पेढे मिळोत असा नवस बोलावा का? पण त्यांच्याकडे ती पेढ्याची बोली लावायला हातात एकही पेढा नव्हता . अन् पुढारी व्यापारी ह्यांची मोठी कामे करताना देवाला असल्या छोट्या कामाला वेळ असेल का नाही हा प्रश्नही त्यांना अस्वस्थ करून गेला .

असे बरेच क्षण गेले . एकांतातलं आजोबांचं बोलणं देवाला आतातरी उमगत होतं की नाही कुणास ठाउक . की तोही आता अशा बोलण्याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष करायला शिकला होता कोण जाणे . आजोबा एकटक देवाकडे पाहत होते . त्यांच्या अन् देवांमध्ये ती पेढ्याची रास होती . गुलालाने माखलेली . अन् त्यांच्या अन् त्या पेढ्यांमध्ये अंतर होते, फक्त काही फुटांचे, का आयुष्यभर जपलेल्या संस्कारांचे, पाळलेल्या रुढींचे . अंतर होते माखलेले, 'पाप पुण्याच्या धूसर भ्रामक कल्पनांनी'

आजोबा पुढे झाले . देवाच्या हारा आडून ओझरत्या दिसणाऱ्या डोळ्यात डोळे रोखून बोलले . ' केवळ तुझ्यामुळे, तुझ्यासाठीच अन् म्हणूनच फक्त तुझ्यासमोरूनच हे पेढे उचलतोय . आयुष्यभर जपलेल्या तत्वांना तुझ्यासमोरच तिलांजली देतोय . तुझ्यामुळे अन् तुझ्या समोरच!!' काही पेढे उचलून ते तडक घराकडे वळले . आजीच्या कुशीत अर्धवट पेंगणाऱ्या विजूला उठवत ते म्हणाले, " हे घे पेढे, तुझ्या बाने देवाघरून पाठवलेत तुझ्यासाठी " . पेढ्यांना लागलेला गुलाल पुसल्याने रंगलेले आजोबांचे फाटके धोतर आजींचे काळीज विदीर्ण करून गेले . त्या पेढ्याला पाप चिकटले होते की नाही कुणास ठाउक . पण त्या चार सहा डोळ्यांतून वाहणाऱ्या गंगेत ते धुवून टाकण्याची ताकद नक्कीच होती . .

**- अजय**

## अहेव

" आता डावीकडे वळा आणि नव्या गेटातून आत घ्या सरळ ", रिक्षावाल्याला असा पत्ता सांगून झाल्यावर अनू स्वत:शीच हसली . **20** वर्ष तरी उलटली असतील आबांनी हे गेट करून घेतल्याला . पण त्याचं नाव मात्र आपल्या तोंडी नवं गेट असंच येतय ! लहानपणी ती यायची तेव्हा जसं गेट त्यांच्यासाठी आधीपासून उघडं ठेवलेलं असायचं तसंच आताही उघडं होतं . रिक्षा थांबली आणि आजी अंगण ओलांडून घाईघाईने येताना दिसली . स्वच्छ, सुती पांढरी - गुलाबी फुलांची नऊवार साडी , गोऱ्या चेहऱ्यावर उठून दिसणारी पिंजर , वय झालेलं असूनही अनूच्या ओढीनं झपाझप पडणारी आजीची पावलं दिसली आणि अनूच्या घशात हुंदका दाटला . साऱ्या प्रवासभर मनात रेंगाळणाऱ्या आजोळच्या आठवणींना जिवंत करत आसवं गालावर धावली -- आणि आजीच्या सुरकुतलेल्या कृश मिठीत अनू आवेगानं शिरली !
" खुळा माझा सोन्या तो ! चल आधी घरात " आजीच आधी भानावर येत म्हणाली . रिक्षातून सामान काढून अनूनं घराकडे बघितलं . कोकणातलं तिचं आजोळचं घर आता आजी - आबांसारखंच दिसत होतं -- थकलेलं आणि तिची वाट पाहणारं ! लहानपणी सुटीत आजोळी आलं की आलेल्या चुलत मावस भावंडांची स्पर्धा लागायची की सर्वात आधी अंगण ओलांडून , पायऱ्या चढून आत कोण जाणार . " अगो थांबा सोन्यांनो पायावर पाणी घालेपर्यंत तरी ," म्हणत आजी पायावर पाणी घालायची आणि प्रवासानं शिणलेल्या पायांना त्या थंड पाण्याच्या स्पर्शानं कसं उबदार वाटायचं !

आताही आजीनं तयार ठेवलेल्या पाण्याची ऊब घेतच अनू आत शिरली . डावीकडच्या आरामखुर्चीत बसलेले आबा हसत हसत उठले होते . अनूने पटकन त्यांच्या पायांना हात लावून नमस्कार केला . हाही नेहमीचाच शिरस्ता! घरात शिरल्याबरोबर आधी आजोबांच्या आणि मग आजीच्या पाया पडायचं . लहान असताना कधी घाईघाईत आजीच्या समोर वाकलं तर आजी दटावायची , अडवायची आणि आजोबांकडे बोट दाखवत म्हणायची " आधी त्यांना " . अनूला पावलोपावली हे सगळं आठवत होतं . किती वर्ष झाली या सगळ्याला! आठवी नववीपर्यंत दर वर्षी यायची ती . मग दहावी - बारावीचे, कॉलेजचे क्लास , अभ्यास , परीक्षा यात गुंतल्यामुळे आजोळी जाणं अनियमित होत गेलं . आता तर लग्नानंतर दोन वर्षांनी पहिल्यांदाच यायला मिळालं होत . अनू नवऱ्याबरोबर परदेशी जाणार होती म्हणून जाण्यापूर्वी आजी - आजोबांना भेटण्यासाठी मुद्दाम हा बेत आखला होता तिनं . राजेशचं येणं आयत्या वेळी उपटलेल्या कामामुळे रद्द झाल होतं . त्याला यायला जमलं नाही याचं एकीकडे अनूला वाईट वाटत होतं आणि असंही वाटत होतं की त्यामुळेच कदाचित आपल्याला भूतकाळात जास्त आसासून रंगता येईल ! आजीला आजकाल सारखं बरं नसायचं, ब्लडप्रेशर चढायचं , कापरं सुटायचं . अनूला आता परदेशी जायचं तर तिची एकदम काळजी वाटायला लागली . लहानपणी आजी आबांना आपल्या भावविश्वात केवढं स्थान असतं . किती ओढ वाटते आजोळची . हळूहळू हे बदलत जातं . नाईलाजाने म्हणा , आपसूक म्हणा आयुष्यं बदलत जातात . नव्या वेगळ्या वाटांवरती जीव गुंततो आणि हे होणंही स्वाभाविकच . पण हे ज्या सहजपणे आपण स्विकारतो तो सहजपणा आता तिला जरा बोचलाच ! आजीला बरं नसताना आजोबांची होणारी धावपळ कोरड्या वस्तुस्थितीसारखी मान्य असते आपल्याला . . अनूला एकदम भडभडून आलं .
" सांग ना आजी कशी आहेस " .
" आहे गो बरी . पेशर वाढतं पण त्याची सवय झालीये मला . तुझ्या आबांना मात्र शीक वाटतं सारखं . सहन नाही होत आजारपण

त्यांना . पण ते जाऊ दे ! तू आलीस म्हणजे दहा वर्षांनी तरुण झालो आम्ही ! चल आत आधी खाऊन घे , चहा देते तो घे ."
आजीनं मुद्दाम तिच्यासाठी गुलाबाच्या वासाची तिची ठेवणीतली चहापावडर वापरून चहा केला होता . लहानपणी खूप आवडायची तिला ती पावडर म्हणून आजीच्या कपातला एखादा घोट मिळायचा तिला . . तिच्या आताच्या सवयीहून निराळा, खूप साखरेचा, गुलाबी वास असलेला चहा आता खरं तर तिला मुळीच चालला नसता .. पण आत्ता तिच्या मनात वर्तमानकाळाला जागा नव्हतीच . भूतकाळातल्या जादूनं तिचं मन पूर्णपणे काबीज केलं होतं

चहा झाला , बरोबर आजीनं भरपूर खायला प्यायला दिलं , गप्पा तर अखंड चालूच होत्या पण एका हातानं आजीचं कामही सतत चाललेलं होतं . वालीची भाजी आणि पोळ्या , गोड्या मसाल्याची आमटी आणि भात . अनूला वाटलं आजीच्या हातच्या या जेवणापुढे जगातली सगळी पक्वान्नं कमी पडतील . पण आज मात्र तिला भूक अशी लागलीच नव्हती . आजोळी आली होती प्रत्यक्षात आणि आजोळीच्या लहानपणच्या आठवणींनी तिचं तोंड गोड केलं होतं . मनही भरून आलं होतं . इथे दोनच दिवस मिळणार आहेत, त्यातला प्रत्येक क्षण जगायचा असं तिनं ठरवलं होतं .

जेवण आटपल्यावर मात्र तिनं चार्ज घेतला . " आता तू इथे बस . मी आवरते सगळं " असं म्हणत तिनं स्वयंपाकघर घासून पुसून घेतलं . मग आजीचं अंथरूण घातलं . पाय चेपून घ्यायला मात्र आजी तयार नव्हती .
" त्यापेक्षा यांच्या गोळ्या दे त्यांना नेऊन " असं म्हणाली .
" हो हो ! देते की " म्हणत अनू तत्परतेने उठली .
मग आबांच्या जवळ बसून त्यांच्याशी बोलत राहिली . आबा आधीपासूनच कडक स्वभावाचे पण आता मात्र वारंवार हळवे होत होते . त्यांच्या डोळ्यातून पाणी येत नव्हतं इतकंच पण स्वर आणि मन सारखं कातर होत होतं . अनूला वाटलं , आपल्याला हे नाही सहन होणार . त्यापेक्षा आबांनी पूर्वीसारखं तापट वागावं . फार काय, लहानपणी आपल्याला वाटायचे तसे ते आताही स्वत:मधे मग्न वाटले तरी चालतील . पण आबा तर तिच्या परदेशी जाण्याविषयी काळजी व्यक्त करत राहिले आणि तिचा जीव थोडा थोडा होत गेला !

आजी आबांचा जरा डोळा लागला तशी अनू हळूच उठली . मागील दारी पायऱ्या उतरून पाठच्या अंगणात आली . अगदी सवयीनं खाली वाकली . तिथे जे किडे असत त्यांच्या मातीतल्या छोट्या छोट्या घरातून त्यांना शोधून काढायला . लहानपणी " भोवरा शोधूया " असं म्हणत सगळी भावंडं हाच उद्योग करत असत . आता खरं तर मागच्या अंगणात पायऱ्यांजवळ मातीचा मागमूसही नव्हता . तण उगवतात ते काढायला वेळेवर माणसं मिळत नाहीत म्हणून दोन - तीन वर्षांपूर्वीच आबांनी concrete बसवलं होतं पण अनूच्या मनातले आठवणींचे भोवरे मात्र त्याखाली गाडले जाणं शक्यच नव्हतं . मग ती हिंडत राहिली . ज्यांची पानं मधोमध थोडी फाडली की चिकात आभाळ दिसायचं ते झाड , तसचं ते एकुलतं एक पपईचं झाड , लहानपणी अनूला वेड लावणारी गोड पाण्याची विहीर , ब्रशसारखी वापरायची दातवणं देणारी कुंपणाकडेची झाडं ,... सारंच तर आता बदललं होतं . पण त्या परिसराची अनूला अल्लड बनवण्याची जादू मात्र बदलली नव्हती . अनू लहान मुलीसारखी सगळ्या गोष्टींना हात लावत फिरली . अगदी पेरूच्या झाडावर चढली आणि लाल मुंगळे चावल्यावर हायहुय करत उतरली पटकन उडी मारून . घरात जाताना तिला वाटलं आजोळची ही धावती भेट आजोळचा विरह अधिक ठळक करतेय . तशी अनू ही भडाभडा बोलून मोकळी होणाऱ्यातली नव्हेच . मनातील भावना गुपितासारख्या जपाव्यात ... त्यांचे तरल पदर मनातल्या मनातच हलक्या हाताने उकलावेत आणि आतला आपलेपणा मनातच दाटून घ्यावा असं मानणारी . आजी - आबा मात्र सारखेच बोलत होते . त्यांचं वाटणं सारखे शब्दांतून मांडत होते आणि तरी अनूला जड वाटलं नाही ते . रात्री आजीच्या शेजारी अंथरूण घातलं तिनं आणि आजीचा हात हातात घेऊन पडून राहिली, खूप वेळ ! झोप लागण्याचा प्रश्नच नव्हता . आठवणी आणि स्वप्न यांच्यामधला तो वर्तमानकाळाचा अंधूक धागा तिला जागेच ठेवत होता .

रात्री खूप उशीरा तिचा डोळा लागला . पहाटे जाग आली तेव्हा सुस्नात होऊन आजी आपली फणेरपेटी घेऊन बसलेली दिसली तिला . अनू खूप आनंदली . आजीला कुंकू लावताना बघता यावं म्हणून लहानपणीही ती लवकर उठायची ते आठवलं तिला . आता आजी फणेरपेटी उघडेल . वरच्या झाकणाच्या पाठीमागे असलेला आरसा सारखा करेल . मग वरच्या कप्प्यातून मेणाची पितळी डबी काढेल . त्यातलं मेण घेऊन बोटांनी कपाळावर सुबक गोल काढेल . मग आतली पिंजरेची डबी अलगद बाहेर काढून मेणाच्या गोलावर पिंजर चिकटवेल . . पिंजर लावलेला आजीचा चेहरा किती पवित्र दिसेल ! अनू बघतच राहिली . आजीचं लक्ष गेलं तशी आजी म्हणाली " उठलीस? झोप हवं तर घटकाभर अजून . एकदा तिकडे कुठे ती फारीनला गेलीस की नाही गो मिळायचं आराम झोपायला! "
" नाही ग ! उठतेच आता " असं म्हणत अनू उठली . " आज गप्पा मारायच्या आहेत तुझ्याशी . वेळ नको वाया जायला ".
दोघी मनमुराद हसल्या खऱ्या पण मग स्वयंपाक, आवरा आवर करण्यात आजी गुंतली आणि अनू आली हे कळल्यावर शेजारी पाजारी आले त्यांच्याशी बोलण्यात अनूचा सारा वेळ गेला, पार अगदी संध्याकाळपर्यंत .
संध्याकाळी देवाकडे दिवा लावून आजी डोळे मिटून बसली होती . अनू तिच्या शेजारी बसली . तिनेही हात जोडले, डोळे मिटले . काही क्षण गेले आणि तिला वाटलं आजी बरोबर असं मूकपणे बसण्यातही किती आनंद आहे! सकाळपासून ज्याची वाट बघत होती तो जिव्हाळ्याचा वेळ मिळाला असं वाटलं तिला . लहानपणी अनू अशीच तिच्या शेजारी बसायची आणि आजीची प्रार्थना संपून ती प्रसाद

केव्हा देतेय याची वाट बघायची . आजीची स्तोत्रं म्हणून झाली की आजी अशीच डोळे मिटायची आणि पुटपुटायची " अखंड सौभाग्य दे मला दत्तगुरू " आणि अनूच्या हातावर खडीसाखर पडायची .
आज आजीने डोळे उघडले आणि नंतरही तशीच बसून राहिली, देवाकडे एकटक बघत . अनू म्हणाली " आजी तुझं नेहेमीचं मागणं माग गं लवकर आणि प्रसाद दे की गं झटकन . " तिने हसून आजीकडे पाहिलं तर आजीच्या डोळ्यात पाणी होतं .
" मी काय मागते हल्ली माहीती आहे अनुबाळा .. मी म्हणते की देवा माझ्या आधी ह्यांना ने बाबा . अगो ते छोट्या छोट्या गोष्टीत माझ्यावर अवलंबून असतात . मी गेले आणि ते राहिले तर एकटे पडतील गो ते . सवय नाही त्यांना इतर कुणाकडून करून घेण्याची आणि स्वत: करण्याचीही . मग मिंधेपणा वाटेल आणि नाही सहन व्हायचं गो त्यांना ते . म्हणून म्हणते गो की देवा ने माझं सौभाग्य .. सुखरूप ठेव तुझ्याजवळ "!!
अनूच्या तोंडून शब्द फुटेना . ती बघतच राहिली . आतापर्यंत बघितलेल्या, दबून वागणाऱ्या , काळजी करणाऱ्या , कुंकू - मंगळसुत्र यातच सौख्य सामावलेल्या आजीचं हे नवं रुप . पण मग तिला वाटलं की यात नवं काहीच नाही . हीच आहे ती आपली , कुटुंब हेच सर्वस्व मानणारी , सोशिक , समंजस आणि पतिव्रता आजी . आपल्या आवडत्या कवितेतला गर्भितार्थ अचानक एखाद्या दिवशी गवसावा तशी आज अवचित गवसलेली .

मग अनूला एकदम नि:शंक वाटत राहिलं . कालपासून वाटणारं निसटत्या क्षणांचं दडपण अलगद दूर झालं . ती भरपूर जेवली . परतताना आजीकडून लोणच्याची बरणी नेणार असल्याचं जाहीर केलं , भाजणी , चटण्या भरून घेतल्या . अमेरिकेला गेल्यावर काय काय करणार ते बेत आजोबांना सांगितले . त्यांच्या कपाटातली जपून ठेवलेली सुवासिक सुपारी हळूच घेतलेली बघितल्यावर आजोबा न राहावून म्हणाले देखिल ," आता खरं वाटलं अनू घरी आल्यासारखं !" रात्री आजीचा हात हातात घेऊन अनू अगदी गाढ झोपली .

दुसऱ्या दिवशी पहाटेच निघायचं होतं . अनूचं आटपून ती माजघरात आली तेव्हा तिला आजी फणेरपेटी उघडून कुंकू लावताना दिसली . आजीचं ते रूप अनूनं डोळाभर साठवून घेतलं आणि बॅग हातात घेऊन ती निरोप घ्यायला तयार झाली .

**- हेम्स**

## परिपूर्ण

आयुष्य झरझर पुढे चाललंय . हातातला वेळ संपत चाललाय . पण या आयुष्यातल्या छोट्या छोट्या गोष्टीत जीव अजूनही अडकलाय . पाणीसुध्दा पुढे जाताना मागे आपली ओल ठेवतंच . बेफाम लाटासुध्दा उधळताना खडकावर जराशा रेंगाळतातच . ती ओल, तो लाटांचा फेस, जीवाच्या आकांताने ती जमीन आणि ते खडक जपायचा प्रयत्न करतात . आपल्या अस्तित्वाच्या खुणा अशाच आपल्या मागे जपणारं कुणी आहे ही भावना सुध्दा किती सुख देऊन जाते ना !

अनुरा विचार करत होती . संपूर्ण आयुष्याचा चित्रपट तिच्या डोळ्यांपुढे तरळून गेला . आपल्या आयुष्याची उणीपुरी **40** वर्ष आपण किती तृप्तीत घालवली, खरं तर घालवली म्हणायलाच नको, किती सुंदर उपभोगली . जीवनातल्या प्रत्येक क्षणाचा मनसोक्त आस्वाद घेतला . पण तो घेताना आजूबाजूच्या लोकांना सुध्दा जीवन जगायला शिकवलं . प्रत्येक वळणाच्या आधीचं प्रश्नचिन्ह आपण बेफिकीरीने धुडकावून लावलं . त्यामुळे पुढे काय हा प्रश्न आपल्याला कधीच पडला नाही . उलट जाऊ तिथलं वळण कसं सुंदर बनवता येईल याचाच विचार आपण केला . मग आताच हे प्रश्नचिन्ह का ?

आतापर्यंत कधीच न उगवलेली प्रश्नचिन्हं फेर धरुन डोक्यात पिंगा घालत होती . पण उत्तरंही शोधावीशी वाटत नव्हती . उलट हळूहळू एकेका प्रश्नाला पळवून लावायचा प्रयत्न नकळत सुरुही झाला होता तिचा .

एक अतिशय पारदर्शक आयुष्य ती जगली होती . आईवडील हौशी आणि प्रगत विचारांचे होते त्यामुळे तिचेही विचार आधुनिक . मनसुध्दा निरागस आणि निष्कपट . म्हणूनच कुणाशीही पटकन मैत्री व्हायची .

अशीच ऋत्विकशी पण तिची ओळख झाली . तो तिला बराच senior होता . पण तिचं व्यक्तिमत्वच असं होतं की प्रत्येकाला आपल्या friends' list मधे ती हवी असायची . अनुरा दिसायला देखणी नसली तरी कुछ बात थी उसमे . तिच्या चेहेऱ्यावरचा ऊतू जाणारा

उत्साह हा तिचा सर्वात मोठा plus point होता . तिला कोणीही कधीही शांत, थकलेली कधीच बघितली नाही . याच कारणामुळे ती शाळेत आणि नंतर कॉलेजमधे खूप लोकप्रिय होती .

एका फॅशन शो चं अतिशय उतकृष्ट संचालन झाल्यानंतर अभिनंदन करायला ऋत्विक आला आणि तिच्यात कायमचा अडकला . ऋत्विक एक खूप matured मुलगा . मुंबईत शिकायला आला आणि इतरांसारखा या नगरीच्या मायाजालात अडकला . तो मूळचा इंदूरचा . आईवडील लहानपणीच गेले म्हणून आजीआजोबांच्या छायेत वाढला . लहानपणापासून त्याला fashion designer बनायचं होतं . बघता बघता तो ड्रेसची सुरेख चित्र काढायचा . National Institute of Fashion Techology मधे त्याला अगदी सहज प्रवेश मिळाला आणि उत्तम मार्क्स मिळवून तो पासही झाला . Campus Interviews मधे त्याला बऱ्याच offers मिळाल्या . पण सुरवातीपासूनच त्याला फक्त स्वतच्या मर्जीनेच काम करायचं होतं . तो freelance designer बनला . मग हळूहळू fashion shows organize सुध्दा करायला लागला . अशाच एका मित्राच्या फॅशन शो ला तो आला होता . तेव्हा या अनुरा नावाच्या गोड आणि तडफदार मुलीशी त्याची ओळख झाली .

जेव्हा त्याला कळलं की अनुरा सुध्दा fashion industry मधे काम करतेय तेव्हा त्याच्या नकळत त्याला आनंद झाला होता . अशाच गाठीभेटी वाढत गेल्या आणि अचानक दोघांनाही जाणवलं की दोघंही एकमेकांना बऱ्याच बाबतीत चक्क गृहीत धरायला लागले आहेत आणि हा त्यांचा possessiveness जेव्हा त्यांना जाणवला तेव्हा मात्र दोघांनीही मोकळेपणाने कबूल केलं की आता एकमेकांशिवाय राहणं कठीणच नाही तर अशक्य आहे .

त्यांच्या busy schedule मधून त्यांना जो काही वेळ मिळायचा तो वेळ ती दोघेही आपल्या भावी आयुष्याची स्वप्नं रंगवण्यात घालवायची . अनुराच्या ममा पप्पांना पण ऋत्विक मनापासून आवडला होता . खरं तर त्यांना त्यांच्या ह्या मनस्वी मुलीच्या भविष्याची खूप काळजी वाटायची . कारण अनुरानं एखादी गोष्ट करायची ठरवली की साक्षात ब्रम्हदेवालाही तिच्या कामात ढवळाढवळ करता यायची नाही इतकी ती समरसून त्या कामात स्वतला झोकून द्यायची . आपल्या या ध्येयवेड्या मुलीला हा संयमी ऋत्विक नक्कीच चांगला सांभाळू शकेल याची त्यांना खात्री झाली आणि ते निश्चिंत झाले .

आता त्यांची स्वतची agency होती . नवीन designers आणि models ना त्यांची ही agency launch करायची . त्यांना नवा platform मिळवून द्यायची . त्यांच्या कल्पकतेमुळे त्या दोघांचंही या क्षेत्रात चांगलंच नाव गाजत होतं .

अशीच एकदा अनुरा नवीन models चे आलेले फोटो बघत होती . लंच टाइमला ऋत्विक तिला pick up करणार होता . अचानक एका अतिशय सुरेख प्रतिबिंबानं तिचं लक्ष वेधून घेतलं आणि मंत्रमुग्ध होऊन ती त्याच्याकडे बघतच राहिली . एका बावरलेल्या हरिणीसारखं ते बिंब हलत होतं . तेव्हा कुठे तिला जाणवलं की ती एक जिवंत व्यक्ती आहे . तिनं मागे वळून बघितलं तेव्हा तिला तिच्या ऑफिसच्या खिडकीच्या काचेत पडलेली एका मुलीची प्रतिमा दिसली . तिची ती अवस्था बघून तिनं बाहेर जाऊन तिला आत घेतलं . इतका वेळ स्वतला वाचवत पळत असल्यामुळे ती धापा टाकत होती . जेव्हा तिला आपल्या सुरक्षिततेची जाणीव झाली त्यावेळी मात्र तिचं सारं अवसान गळालं आणि तिची शुध्द हरपली . अनुरानं तिला कसंबसं सोफ्यावर झोपवलं आणि तिच्याकडे निरखून बघायला लागली .

आजवर इतक्या सुरेख मुली तिनं बघितल्या होत्या पण हिचं सौंदर्य काही वेगळंच होतं . तिच्या गोऱ्या गोऱ्या हातांवर " तरन्नुम " असं गोन्दलं होतं . तिच्याकडे अनुरा अगदी hypnotise झाल्यासारखी बघत होती . ऋत्विक तिच्या अगदी जवळ येऊन तिच्या कानात " हाय स्वीटी " असं जेव्हा कुजबुजला तेव्हा ती अक्षरश दचकली . तिचं हे असं दचकणं ऋत्विकला अगदीच नवीन होतं . कारण त्याची नूर ही कधीच बेसावध नसायची . कायम ती पुर्णपणे स्वतला स्वतच्या ताब्यात ठेवू शकायची . तोच खरा तर तिचा गुण त्याला सगळ्यात जास्त आवडायचा . मग आजच ही अशी का दचकली ? जेव्हा अनुरानं त्याला ती मुलगी दाखवली तेव्हा त्याचीही नजर त्या मुलीवर खिळून राहिली . खरंच एक अतिशय नितळ, सात्विक सौंदर्य होतं ते . त्याने नाव बघितलं " तरन्नुम " ! नाव उच्चारताच सुंदर लहरी झंकारल्यासारख्या वाटल्या त्याला .

" What a musical name Noor ! "
" अरे, मी सुध्दा अशीच थक्क झाले रे ! काय अलौकिक सौंदर्य आहे ना ? "
" She is terrific Noor ! आपण ह्या मुलीला प्रसिध्दीच्या अगदी शिखरावर पोहोचवायचं . "
" ऋतू, खरं सांगू, माझ्या मनातही अगदी हाच विचार आला . "
" Great people think alike sweetie ! "
" ऊं हूं, माझ्या मनातले रे . . . . सारे तुलाच कळते . " त्याच्या नाकाला नाक घासत अनुरा म्हणाली .
" Because you and me are not two dear ! एक जान है हम तुम ! "

" अच्छा जी . . . . ! आज एकदम मूड मधे आहे म्हणायची स्वारी ! "
" Yeah ! आज खरंच मस्त मूड आहे गं ! तुला एक जबरदस्त न्यूज द्यायचीये . "
" Really, अरे, मग सांग ना " आता अनुरालाही राहवेना .
" अगं ह्या वर्षाच्या Lakme Fashion Week मधे आपल्याला पहिलाच दिवस मिळालाय, आहेस कुठे? "
" WOW ! Rutu, Hearty Congrats ! "
" You deserve it too sweetie ! "
" ए ऋतू, आपण ह्या तरन्नुमला launch करायचं का रे ? "
" Yesss ! ह्या तरन्नुमला आपण launch करायचं . सगळीकडे फक्त हीच चर्चा राहिली पाहिजे . Noor, we will do it. "

अन मग खरोखरच त्यांनी तरन्नुमला अशा काही थाटात लोकांसमोर पेश केलं ना . . . . की सगळीकडे नुसती खळबळ उडाली . त्या दोघांच्या प्रयत्नांना तरन्नुमने पण तितकीच समरसून साथ दिली .

ह्या सगळ्या धावपळीत अनुरा आणि तरन्नुम मनाने फारच जवळ आल्या . एखाद्या अप्सरेसारखं सौंदर्य लाभूनसुध्दा ही तरन्नुम पूर्णपणे जमिनीवर होती किंबहुना तिला फक्त या जमिनीचाच आधार होता आणि आता अनुरा आणि ऋत्विकचा .

तिचं हे so called " अलौकिक " सौंदर्यच तिचा शत्रू बनलं होतं . सगळीकडे नुसती वखवखलेली श्वापदं! स्वतला एक अबला किती काळ वाचवू शकणार ! म्हणून जेव्हा तिला अब्रू वाचवण्यासाठी स्वतच्याच घरातून पळावं लागलं, तेव्हापासून तिचा जगातल्या चांगुलपणावरचा उरलासुरला विश्वाससुध्दा उडाला . आपल्यासमोर येणारा प्रत्येक जण आपला फक्त शारिरिक वापरच करणार असं तिचं ठाम मत बनलं होतं .

अनुरा मात्र तिला अगदी फुलाप्रमाणे जपत होती . तिला हवं नको ते जातीनं बघत होती . तिनं तिच्या मम्माला जेव्हा तरन्नुमला स्वतच्या घरी ठेवून घेण्याबद्दल विचारलं तेव्हा तिच्या मम्माला हो म्हणण्याशिवाय पर्यायच नव्हता . कारण एकतर नकार अनुरानं ऐकून घेतला नसता आणि आपली मुलगी काही वेडंवाकडं करणार नाही याबद्दल तिची खात्री होती . आपल्या संस्कारांवर विश्वासही होताच . शिवाय आता तिची काळजी घ्यायला ऋत्विक होताच .

तरन्नुमनं अनुराला तिचा भूतकाळ पूर्णपणे जरी सांगितला नव्ह्ता तरी ती कुठल्यातरी भयानक प्रसंगातून स्वतचा जीव वाचवून आली होती हे मात्र तिने ओळखलं होतं . उगाच तिच्या जखमेवरची खपली काढण्यात काही अर्थ नव्हता . वेळ आली की ती सांगेलच अशा विचारानं अनुरा हा अप्रिय विषय काढत नव्हती .

पण देवाच्या मनात काहीतरी वेगळंच होतं . आपण आपलं आयुष्य कितीही काटेकोर आखून घेतलं तरी दैवाचे कंगोरे स्वीकारावेच लागतात . समोर अगदी सरळ वाट दिसत असली तरी मधून येणाऱ्या एखाद्या पायवाटेवरुनच आपल्याला वाटचाल करावी लागते .

एक दिवस तरन्नुमचं फोटो सेशन सुरु असतानाच तिला चक्कर आली आणि आधीच नाजुक असलेली तरन्नुम जमिनीवर कोसळली . अनुराला कळल्यावर ती आणि ऋत्विक लगेच तिथं पोचले . जवळच्याच हॉस्पिटलमधे तिला घेऊन गेले . डॉक्टरांनी तिला तपासून काय झालं ते सांगेपर्यंत दोघांच्याही जीवात जीव नव्हता . इतक्या कमी दिवसात ती तिघेही एकमेकांच्यात फारच गुंतली होती . तरन्नुम म्हणजे अनुरा अन ऋत्विकसाठी त्यांची छोटी बहिणच होती . आपल्या लाडक्या तरन्नुमला काय झालं असेल या काळजीनं दोघेही व्याकुळ झाले होते .

तरन्नुमला तपासून डॉक्टर बाहेर आले तेव्हा दोघेही त्यांच्याकडे धावले . डॉक्टरांना पण त्यांची आपुलकी कळत होती . असंख्य प्रश्न नजरेत घेऊन ते जेव्हा डॉक्टरांच्या जवळ गेले तेव्हा डॉक्टरांनी त्यांना आपल्या आश्वासक शब्दांनी शांत केले .

" पण असं एकदम बेशुध्द का पडली असेल ती डॉक्टर ? " अनुराचा आतुर प्रश्न ऐकल्यावर डॉक्टरांनी शब्दांची जुळवाजुळव केली . ते म्हणाले, " सांगतो, सगळं सांगतो . फक्त तुम्ही शांतपणे ऐकून घ्या . Tarannum is pregnant . "
डॉक्टरांच्या या वाक्याने खोलीत अचानक शांतता पसरली . अनुरानं स्वत:वर संयम करत विचारलं, " किती दिवस झालेत डॉक्टर ? "
" almost 3 months "
" What ....... ? "
" Yes Anura, not only this .....She is very critical "
" What do you mean by that Doctor ? " आता मात्र अनुराचा स्वतवरचा ताबा सुटत चालला .
" Noor, control yourself Noor. Doctor, please काय झालंय ते नीट सांगा ना . Anuraa is very possessive

about Tarannum, Doctor "
" तरन्नुमचं uterus अतिशय नाजूक आणि weak आहे . मला वाटतं की 9 महिन्याच्या गर्भाचा भार ते पेलू शकणार नाही . त्यामुळे तिला आता complete bedrest घ्यावी लागेल आणि कदचित तिची premature delivery करावी लागेल . "

अनुरा आणि ऋत्विकला काहीच सुचेना . हा त्यांच्यासाठी जबरदस्त धक्का होता . तरन्नुमनं त्यांना अंधारात ठेवलं होतं .

" आम्ही तिला भेटू शकतो कां ? "
" Yes yes, you can "

दोघेही तरन्नुमच्या खोलीत शिरले . दोघांनाही बोलायला शब्द सुचेनात . तरन्नुमच्या शुध्दीवर येण्याची ते वाट पाहू लागले . ऋत्विकने अनुराला खांद्याला थोपटून धीर द्यायचा प्रयत्न केला पण तोही थोडा गोधळलेलाच होता .

स्वत:ला थोडं सावरल्यावर अनुरा तरन्नुमच्या जवळ बसली . तिनं प्रेमानं तिच्या डोक्यावरुन हात फिरवला . तिच्या मनात आलं, कुणाच्या अत्याचाराला बळी पडली असेल बिचारी . सगळं एकटीच सोसत बसली . आता मात्र ती एकटी नाही . आपण खंबीरपणे तिच्या पाठीशी उभं रहायचं . नकळत तिची नजर ऋतूकडे वळली तर तो जणू तिच्या मनातले विचार जाणून तिला संमती आणि आपला पाठिंबा देत होता . त्या परिस्थितीतही तिला आपल्या ऋत्विकचा अभिमान वाटला .

तिच्या प्रेमळ आणि आश्वासक स्पर्शानं तरन्नुमला शुध्द आली . तिच्या डोळ्यातले व्याकुळ भाव जणू तिला विचारत होते, नूर मुझे माफ करोगी ना ?

" तरन्नुम अभी कुछ भी मत बोलो . अभी आराम करो . बादमे ढेर सारी बाते करेंगे . अब तो मै मौसी बनने जा रही हूँ . "

तरन्नुमला तिच्याशी बोलल्यावर बरं वाटलं . तिच्या मनावरचा ताण जरा कमी झाला . पण आपण अनुरापासून सगळं लपवून ठेवलं तरीही तिचं आपल्याशी इतकं चांगलं वागणं बघून तिला भयंकर शरमल्यासारखं झालं . अनुरा खरंच मनानं किती चांगली आहे . . . . अन आपण किती क्षुद्र!

" तरन्नुम आता जास्त विचार करायचा नाही हं, आता तू फक्त हुकूम सोडायचा . काय काय खावंसं वाटतं ते सांगायचं . मी आणि मम्मा आहोत ना तुझे डोहाळे पुरवायला . "

तरन्नुमच्या डोळ्यातून पाणी वाहायला लागलं . ते बघून अनुरानं तिला जवळ घेतलं अन म्हणाली, " नाही हं , आता अजिबात रडायचं नाही नाहीतर बाळ रडकं होईल . आता तू आनंदी रहायला हवंस . "

तिच्या बोलण्यानं तरन्नुमला खूपच धीर आला आणि ती पुढे येणाऱ्या सगळ्या गोष्टींना तोंड द्यायला सज्ज झाली .

2, 3 दिवसात तिला discharge मिळाला . घरी आल्यावर मात्र अनुरानं तिचा ताबा घेतला . स्वत:चा सगळा व्याप सांभाळून ती तरन्नुमच्या बारीकसारीक गरजांकडे सुध्दा जातीनं लक्ष देत होती . रोज संध्याकाळी ऋत्विक आणि ती तरन्नुमला फिरायला घेऊन जायची . जास्तीत जास्त वेळ ती दोघं तिच्यासोबतच काढायची . तरन्नुम मात्र त्या सगळ्यांच्या प्रेमात अगदी न्हाऊन निघत होती . असा जिव्हाळा तिनं कधीच अनुभवला नव्हता . जेव्हा तिला आपल्यावरची आपल्या बापाची जबरदस्ती आठवायची तेव्हा तिला हे आयुष्यच नकोसं वाटायचं . गरोदरपणाच्या सुखद संवेदनाच करपून जायच्या . पण अनुरा, ऋत्विक, मम्मा पप्पांच्या प्रेमामुळे तिची जगण्याची उमेद हळूहळू वाढायला लागली . ती सुध्दा आता सगळ्यांसोबत उमलू लागली, फुलू लागली .

तिला सातवा महिना लागल्यावर अनुरानं थाटात तिचं डोहाळेजेवण केलं . नथ, बाजूबंद, फुलांचे दागिने घातलेली तरन्नुम अगदी दृष्ट लागण्यासारखी दिसत होती . अनुराच्या दबदब्यामुळे कोणाचीही काहीही वाकडं बोलायची हिम्मत नव्हती . जरी कोणी काही बोललं तरी अनुरा त्याला पुरुन उरणार होती .

आता मात्र तरन्नुमच्या हालचाली जडावल्या होत्या . चालही संथावली होती . सात महिने पूर्ण होताच त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने तिला हॉस्पीटलमधे दाखल केले . चांगलासा दिवस बघून ऑपरेशन करायचं ठरवलं . ऑपरेशन थिएटरमधे जाताना मात्र तरन्नुम भांबावली . अनुराचा हात ती सोडेना . शेवटी तिला ॲनास्थेशिया देईपर्यंत अनुराला आत येण्याची परवानगी डॉक्टरांनी दिली . तरन्नुमला डॉक्टरांच्या

आश्वस्त हातात सोपवून अनुरा बाहेर आली . मम्मा आणि पप्पांना मात्र आपल्या लेकीला कुठे ठेवू आणि कुठे नको असं झालं होतं . एखाद्या मोठ्या जवाबदार बहिणीप्रमाणे त्यांची लेक तरन्नुमची काळजी घेत होती . खूप खूप अभिमान वाटला त्यांना आपल्या अनुराचा .

बाहेर आल्यावर मात्र अनुरा आणि ऋत्विकच्या अस्वस्थ फेऱ्या सुरु झाल्या . ऑपरेशन थिएटरच्या बाहेर सगळ्यांची घालमेल होत होती . इतक्यात बाळाच्या रडण्याचा आवाज आला त्याबरोबर सगळ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला . डॉक्टर बाहेर आल्याबरोबर अनुरा त्यांच्याकडे धावली . त्यांच्या चेहेऱ्यावरचे गंभीर भाव बघून मनातून घाबरली . पण तसं न दाखवता हसून तिनं त्यांना विचारलं, " Doctor is everything fine ? "
" No "
" What do you mean doctor ? "
" I am sorry . मी तुमच्या तरन्नुमला नाही वाचवू शकलो . Baby is fit and fine . पण ऑपरेशनच्या वेळी अति रक्तस्त्रावामुळे तरन्नुमला आम्हाला वाचवता आलं नाही . I am extremely sorry ! "

अनुरा बघतच राहिली, बधिर झाल्यासारखी . ऋत्विकनं शेवटी तिला जोरात हलवलं .

" Noor, you have to be brave now. Come on, असं हात पाय गाळून कसं चालेल ? चल, आपण तरन्नुमला बघूया . " तो तिला बळेच आत घेऊन गेला .

पलंगावर तिची तरन्नुम अगदी शांत झोपल्यासारखी दिसत होती . जणू सगळी जबाबदारी अनुरावर सोपवून ती निर्धास्त झाली होती . अनुराला एकदम भरुन आलं आणि ती ओक्साबोक्शी रडायला लागली . आता तिला वास्तवाची जाणीव झाली होती . ऋत्विकनेही तिला जवळ घेऊन मनसोक्त रडू दिलं . नाही म्हटलं तरी अनुरा आणि तरन्नुमची मानसिक जवळीक फक्त तोच समजू शकत होता .

आता समोर खूप मोठं आव्हान होतं . एका लहानग्या जीवाला पूर्णपणे अनुराच्या हवाली करून तरन्नुम कायमची निघून गेली होती .

सुरवातीला जे काही घडलं ते स्वीकारणं अनुराला खूप कठीण गेलं . शिवाय एका चिमुकल्या जीवाची जबाबदारी तिच्यावर होती . पण ऋत्विक आणि मम्मा पप्पा ठामपणे तिच्यासोबत होते .

अनुरा समोर उभ्या ठाकलेल्या प्रश्नाची तोड शोधत होती . रात्रभर विचार करुन शेवटी ती एका निर्णयाला पोचली होती . सकाळी उठल्याबरोबर तिनं ऋत्विकला फोन करुन बोलावून घेतलं . तो आल्यावर तिनं मम्मा पप्पांना पण बोलावलं . सगळ्यांचे प्रश्नार्थक चेहरे बघून तिनं बोलायला सुरवात केली .

" ऋत्विक, तू माझ्याशी लग्न करणार आहेस ना ? "
" अगं असं काय विचारतेस ? offcourse yes "
" ऋतू, मग आपण लगेच लग्न करुया . "
" Thats fine sweetie ! पण हे अचानक सकाळी उठल्याबरोबर ठरवलंस ? Is everything ok ? तू नीट काय ते सांग बघू . "
" Rutuu, you got me right ! अजून एका गोष्टीसाठी मला तुझी परवानगी हवी आहे . लग्नानंतर आपण तरन्नुमच्या मुलीला दत्तक घ्यावं असं मला वाटतंय, तुला काय वाटतं ? "
" नूर, मी सुध्दा खूप विचार केला यावर . पण मला मार्ग सुचत नव्हता . तू मात्र अतिशय चांगला निर्णय घेतला आहेस . मला मान्य आहे तुझा निर्णय . मम्मा, पप्पांचं म्हणणं काय आहे ? "
" अरे, तुम्ही मुलांनी इतका सारासार विचार करुन सगळं ठरवलं आहे की आम्ही नाही म्हणायचा प्रश्नच नाही . आम्ही तुमच्या पाठीशी आहोत आणि आमचे आशीर्वादही तुमच्यासोबत आहेत . फक्त ऋत्विकच्या आजी आजोबांची परवानगी मात्र घ्यायला हवी . "
" ते नक्की तयार होतील पप्पा . मी आताच फोन करतो त्यांना . "

पहिलाच मुहूर्त धरुन अनुराचं अन ऋत्विकचं लग्न एकदम धडाक्यात पार पडलं . Fashion Industry ची झाडून सगळी माणसं उपस्थित होती समारंभाला . दोघांच्या कामाची ती एकप्रकारे पावतीच होती . लग्न समारंभ आटोपल्यावर मोजक्या लोकांच्या उपस्थितीत दत्तक सोहळा सुध्दा पार पडला . तरन्नुमची मुलगी आता ऋत्विक आणि अनुराची लेक बनली होती . अनुराने तिचं नाव ठेवलं, अंतरा . अनुरा आणि तरन्नुमची मुलगी अंतरा .

अनुरानं, ऋत्विकनं अंतराला कधीच जाणीव होऊ दिली नाही की ती त्यांची खरी मुलगी नाही . उलट स्वतला मूल न होऊ देण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला होता . आता अंतराच त्यांचं सर्व काही होती .

आज अंतरा उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेली होती . रोज चॅटवरुन ती अनुराला तिकडल्या गमती जमती कळवत होती . ऋत्विक आणि अनुरा आपल्या व्यवसायात मग्न होते . सगळं व्यवस्थित सुरु होतं .

पण नियतीच्या मनात काही वेगळंच होतं . एक दिवस अचानक अनुराला सकाळी उठल्यावर भोवळ येते काय अन तिला कॅन्सर detect होतो काय ! सगळंच कळण्याच्या आणि accept करण्याच्या पलीकडलं . कॅन्सर सुध्दा अगदी शेवटच्या stage ला पोचलेला .

ऋत्विकचं तर सगळं जगणंच थांबलं . पण अनुरा अतिशय शांत होती . अंतराला काहीही कळवू नको असं जेव्हा तिनं ऋत्विकला सांगितलं, तेव्हा त्याला आश्चर्य वाटलं .

" अरे, त्या पोरीला आता कुठे जगणं म्हणजे काय हे कळतंय, आताच तिला असं विझवू नकोस . तिच्याशी तिची ममा बनूनच चॅट करत जा . "

" असं निरवानिरवीचं बोलू नकोस गं ! अगं मी काय करु ? तुझ्यासोबत मी माझं अस्तित्वच विसरलोय गं . माझी ओळख फक्त तुझ्यासोबतच आहे गं नूर ! मला असं एकटं सोडून जाऊ नकोस ना . हा जीवन मार्ग फक्त तुझा हात हातात घेऊनच मी चाललोय गं आतापर्यंत . मधेच असा हात सोडून जाणार माझा ? " ऋत्विक पार कोलमडून गेला होता . मम्मा पप्पा तर सुन्न झाले होते .

अनुरा मात्र विचार करत होती आपल्या पुऱ्या आयुष्याचा आणि त्याच्या शेवटाचा . आपल्या मनस्वीपणानं ती संपूर्ण आयुष्य जगली होती . त्यात मम्मा, पप्पा, ऋत्विकची साथ तिनं गृहीतच धरली होती . तिच्या जगण्याच्या प्रामाणिक धडपडीत त्यांनीही तिला मनापासून साथ दिली होती .

आयुष्याचा शेवट जवळ येऊन ठेपला याची जेव्हा अनुराला जाणीव झाली, तेव्हा मात्र मनातल्या राहिलेल्या गोष्टी तिला पूर्ण कराव्याशा वाटल्या . मम्माच्या हातचे चिरोटे, खरवस, तिच्या हाताने केसांना तेल लावून घेणं, पप्पांच्या सोबत रमी, ऋत्विकसोबत मुद्दाम खोडसाळपणा, त्याच्या हातानं जेवण असे सगळे आपले हट्ट ती पुरवून घ्यायला लागली . खरं म्हणजे अनुरा म्हणजे घरातलं चैतन्य होती अन् आता तीच नसणार म्हणजे . . . . . ! सगळे जण अगदी कावरेबावरे झाले होते .

अनुरा बिछान्यात पडल्या पडल्या विचार करत होती . आता खरंच सगळे अध्याय संपले . आपली अंतरा मार्गी लागली आहे . मम्मा पप्पांना पण ऋत्विक सांभाळेलच . ऋत्विकला मात्र खूपच जड जाणार आहे आपलं नसणं, इतका तो आपल्यात समरस झालाय . पण त्याला इलाज नाही . कदाचित या जन्मी आपली साथ इतकीच होती . पुढच्या जन्मी मात्र आपण ऋत्विक व्हायचं आणि तो होणार अनुरा . मग त्याचे सगळे हट्ट पुरवीन मी .

विचार करता करताच तिचा डोळा लागला . जाग आली तेव्हा ऋत्विक तिच्याजवळ बसला होता आणि तिच्याकडे एकटक बघत होता .
" नको रे इतकं प्रेम करुस, तुलाच त्रास होईल रे राजा . खूप त्रास दिलाय ना मी ? "
ऋत्विकने तिला घट्ट हृदयाशी धरलं, " दे ना गं नूर मला त्रास . मला आवडतो गं तू दिलेला त्रास . मला सवय झालीये त्याची . त्याच्याशिवाय मला जगताच येणार नाही गं ! "

ऋत्विकच्या प्रेमळ मिठीतच आपल्या आयुष्याची पूर्णता आहे ह्याची जाणीव त्या क्षणी अनुराला झाली आणि त्या तृप्तीतच तिनं प्राण सोडला . एका अर्ध्या पण परिपूर्ण आयुष्याचा शेवट झाला होता . जणू ती सांगत होती, " मी तुझा प्रारंभ आहे, तूच माझी सांगता . . . . . . . ! "

**- जयश्री अंबस्कर**

## खंडणी

तो आला !

येणारच होता . . त्यानं सांगितलंच होतं की तो बरोबर चार दिवसानी येईल !

.....

बरोबर चार दिवसांपूर्वी तो मला पहिल्यांदा भेटला !

त्या रात्री . . . आठ साडेआठ झाले असतील . . . अशा वेळी मी स्टुडिओमधे एकटा असतो .

बाहेर तुफान पाऊस !

जवळजवळ तासभर बेफाम कोसळला होता अगोदरच . पण बहुतेक अजून त्याचं मन भरत नव्हतं . अशा वेळी मला पावसाकडे पहात रहावसं वाटतं . . . .

मी काम थांबवलं आणि आवडत्या खुर्चीत बसून खिडकीबाहेर पाहू लागलो . . .

हा माझा स्टुडिओ म्हणजे . . जुनं घरच होतं आधी ते . त्याची डागडुजी करुन त्याला जरा अद्ययावत रुप दिलं होतं ! बाहेर थोडी फुलझाडं नि छोटसं अंगण . तीन चार पायऱ्यांनंतर मग थोडी सिट आऊटसारखी जागा . तिथे दोन खुर्च्या, मोठी डोअर मॅट, काही कुंड्या वगैरे . . . मग मुख्य दरवाजा . आत ग्रील आणि दोन्ही बाजूने मधे मधे ग्लास पेंटींग असलेली दुधी काच . . तो मी आतून कधीच लॉक करत नाही म्हणून सदा कुरकुर करायचा . . . शहरापासून एव्हढ्या लांब स्टुडिओ ! फारसं कोणी येतच नसे, तर काय करायचंय दार लावून !

तो दुधी काचेचा दरवाजा उघडून आत आलं की सगळीकडे माझी पेंटिंग्ज . . उजव्या कोपऱ्यात माझं काम चालू असायचं नव्या पेंटिंगचं . . . बाकी सगळी पेंटिंग्ज जवळजवळ सगळ्या भिंतींवर ! फोकस लाईट्स नेमके वापरुन त्यावरोबर प्रकाशाच्या इतर गमती केलेल्या . . फर्निचर एकदम मोजकंच . माझी आवडती अँटिक खुर्ची आणि दोन तीन कंफर्टेबल सिंगल सोफाज .

मी गुंग होऊन पावसाचा उन्माद पहात होतो . . . पाऊस पुन्हा वाढला होता . . . नव्या जोमाने तो झेपावतच होता जमिनीकडे . चिंब भिजलेल्या प्रेयसीकडे एखादा चेतावलेला प्रियकर झेपावा तसा . . . तिला ओलेती असतानाच करकचून आवळायला ! पाऊसही असाच वेधुंद पडत होता . . ओल्या जमिनीला अजून हजारो थेंबांनी छेडण्यासाठी, आलिंगनं देण्यासाठी ! त्या कोसळण्यात एक अधीरता जाणवत होती . . . काहीशी अतृप्तीही ! मिळालंय त्यापेक्षा अजून काहीतरी हवंय त्याला . जे आत्तापर्यंत मिळालंय ते त्याची अतृप्तता वाढवतंय . . . काहीतरी अजून हवंय . . . अजून काहीतरी !

मीही बराचसा त्या पावसासारखाच ! आज एव्हढ्या लहान वयात एव्हढं यश मिळवलंय . .बंगला, गाड्या, हा स्टुडिओ . . पण अजून काहीतरी मिळवायचं राहून गेलंय असं वाटतंय . . . आजवर नुसतं स्टुडिओ, पेंटिंग्ज आणि प्रदर्शनं ह्याशिवाय विचार करायला मला वेळ कुठे होता ? पण नक्की काय हवंय मला ? प्रेम ? लग्न ? लग्नानंतरचं प्रेम ? की नुसतंच अजून काहीतरी ? एकटेपणाचा कंटाळा आलाय का? की काहीतरी हवंय पण बंधनं नकोयत ? जबाबदारी नकोय ?

छे ! कन्फ्युजन आहे !

पावसासारखंच मलाही झेपावसं वाटतंय का ? आपल्या आलिंगनासाठी उत्सुक असलेल्या कुठल्यातरी तिच्याकडे ? आपल्याला रोमान्स हवाय की शृंगार ?

आत्तापर्यंत मस्त एकटे जगलो . . . आता एकटंच जगायला सोबत हवीय ???

माहित नाही !

ही देहाची भूक लागली आहे आहे की मनाची तहान ? कन्फ्युजन आहे सॉलीड !

आणि मग मधेच विचार तुटले होते माझे कशामुळे तरी . . . कशामुळे ? वीज चमकली होती एकदम आणि . . .

कुणीतरी होतं बाहेर !

कोण असावं ? सदा तर झाडांना पाणी वगैरे घालून संध्याकाळीच निघून गेला नेहमीप्रमाणे . तो कशाला येईल पुन्हा? नाही . . . कोणीतरी दुसराच माणूस ! दुधी काचेच्या दारापलीकडून त्याची धिप्पाड आकृती अस्पष्ट दिसत होती .

आधी मला वाटलं की पावसामुळे आडोशाला वगैरे आला असेल कुणीतरी . . .

त्या माणसाने बहुतेक छत्री मिटून ठेवली बाहेर कोपऱ्यात . . आणि तो भसकन आतच आला . अंदाज न घेता, परवानगी न विचारता !

साधारण चाळीशीचा असावा . गुडघ्यापर्यंत चिखलाचे शिंतोडे उडालेली ढगळी मातकट रंगाची पॅंट आणि तसाच ढगळा राखाडी शर्ट त्याने घातला होता . . चेहरा अतिशय खरबरीत . . . निबर कातडीचा . जाड मिशा नि जोडलेल्या भुवया . त्याच्या लालसर डोळ्यात काहीशी गुर्मी . . . काहीशी बेफिकिरी . कपाळावर लालसर केशरी उभं गंध होतं आणि केस काहीतरी लावून चप्प उलटे फिरवले होते . दिसायला एकदम गुंड टाईप दिसत होता . . .

" नमस्कार सायेब . " अतिशय खोट्या अदबीने तो म्हणाला आणि धाडकन दरवाजाजवळच्या सोफ्यात बसला . . .

" कोण तुम्ही ? " मी नाराजी जाणवेल अशा सुरात विचारलं " हे असं एकदम ह्या वेळी . . . काय काम आहे ? "

" काम ??? हो काम . . काम ! . . " अतिशय नाटकी पद्धतीने आठवल्याचा अभिनय करत तो म्हणाला " . .तर कामावरच येउ आपन डायरेक्ट . काम तसं येगळं आहे पण मी तुम्हाला नीट समजावून दिलं म्हन्जे झालं काय ? काये की कोन पहिल्या टाईमालाच ऐकतो, कोन ऐकत नाय . . . तर काम म्हणाल तर तुमच्याबरोबर वर्षाचा करार करायचा आहे "

" कसला करार ? "

आता मात्र तो वेडसर किंवा बेवडा किंवा दोन्ही थोडा थोडा असावा अशी मला शंका आली . पावसाने मस्त हुरहुर लावली होती . . छे . . . ह्या माणसाने सगळा मूड घालवला . ह्याला घालवला तरी पण आज काही नवीन सुरु करु असं वाटत नाही आता .

" हेच ते . माझा नेहमीच वर्षाचा वायदा असतो ना . जास्त नाही . तुम्ही एकटे असता काय इथे . . . हे सगळं इथेच करता काय ?‘ तो सगळ्या भिंतींवरच्या पेंटिंग्जकडे पहात म्हणाला ’लई भारी भारी चित्र आहेत सगळी . हे एव्हढं सगळं हिथे . . . सांभाळून राहायला पाहिजे सायेब . आता परवाची गोष्ट नाही का ? शहराकडे जातो रस्ता तिथे उजव्या हाताला गोडाउन नाही का ? तिथे आग लागली नाही परवाच ? सिगरेट पीत नाही म्हणा तुम्ही . . . पण वेळ काय सांगून येते ? तर सांगत काय होतो तर करार . . "

" काय चालवलंय ? धमकी देतो काय मला ? उठ आणि चालायला लाग . . वाटेल ते बरळतोय . "

" धमकी नाही सायेब . खरी गोष्ट आहे . नाय सायेब . . . काय आहे की तुमच्या जगात तसा मी नवीन आहे ना . . आता दहा दिस झाले सुटलो ना आम्ही . तरी पण माझा चेहरा लक्षात ठेवायचा प्रयत्न नका करु फुका . . . माझा फोटू कोणच्याबी पोलीस स्टेशनला सापडणार नाही . . . "

माझा संताप वाढू लागला . . . पण त्याचा अंदाज घेणं महत्वाचं होतं . हा नुकताच तुरुंगातून सुटलाय म्हणतोय . . . वाटतच होता तसा तो . ‘आम्ही’ म्हणतोय म्हणजे ह्याचे साथीदारही . . काय हवंय ह्याला ? कुठलं हत्यार आहे का आत्ता त्याच्या ढगळ्या कपड्यात ? का नुसता चाचपायला आलाय ?

" करार कसला? "

" हां आता पॉईटचा प्रश्न इचारलात . हेच की . . . तुम्ही मला पन्नास हजार रुपये द्यायचे . क्याश . मग मी काही त्रास देनार नाय . . म्हन्जे ते आगीबिगीचं तसलं काही नाही करत आपन . . . ती निसती हुल दिली . . पन कसलाच त्रास होनार नाही मग . . . वर्षभर निवांत झोपा . नो टेन्शन . "

आता मात्र मला एकदम तिडीक गेली . हे अस काही व्हायची मला सवय नव्हती अजिबात . . . तो येतो काय, धमकी देतो काय, पन्नास हजाराची खंडणी मागतो काय !

" हे बघ . . असे धमकी देणारे खूप बघितलेत . उठायचं आणि चालू लागायचं . . . आत्ता मी एक फोन लावला ना . . "

" लावून बघा की . . "

म्हणजे ह्याच्याकडे आत्ता काहीतरी हत्यार आहे . . त्याशिवाय हा इतकी अरेरावी नाही करणार . .

पहिल्यांदाच शहरापासून एव्हढ्या दूर स्टुडिओ असल्याचा मला पश्चाताप झाला . इथे आरडाओरड करुन उपयोग नव्हता . तसा मीही तब्येतीने कमी नव्हतो पण हा फारच आडदांड होता . . शिवाय अशा गोष्टींना एकदम सराईत वाटत होता . एकच होतं . . इथे आत्ता पैसे नसणार होते हे त्यालाही माहित होतं ! पण मग . . . तरीही हा निवांत कसा ? पैसे घ्यायला आत्ताच नेणार काय मला गन पॉईटवर वगैरे ? आणि आता वेगळी काही वेळ ठरवली तर आपण ह्याला सापळा लावून पकडू हे ह्याच्या डोक्यात शिरलेलं नाहीये का? का स्वत:च्या दहशतीवर त्याचा एव्हढा विश्वास आहे की मागू ती खंडणी विनातक्रार मिळेलच म्हणून ?

" हे बघ . असं आहे की इथे पैसे नाहीत . . आणि जरी असते, तरी मी ते तुला दिले नसते असं मी म्हटलं तर ? "

त्याचा चेहरा खाडकन बदलला . . . अशा गोष्टीची त्याला सवय असावी आणि रागही . मोठ्या कष्टाने राग आवरून तो मला समजावणीच्या स्वरात तो म्हणाला " मला वाटलेलं का तुम्ही तरी लगेच तयार व्हाल . . . मग ? पैसे दिले नाहीत तर मी काय करीन हेच इचारताय ना तुम्ही ? "

" हो ! हेच विचारतोय ! " मी उसनं अवसान आणून म्हणालो . . तो नक्कीच नि:शस्त्र होता नाहीतर आत्तापर्यंत धमकावायला तरी त्याने काहीतरी बाहेर काढलं असतं .

मग थंडपणे तो म्हणाला " पैसे दिले नाहीत तर . . . . तर मी तुमच्या स्वप्नात येईन ! "

" काय??? " व्हॉट नॉनसेन्स !

तो काय म्हणाला हे कळायलाच मला काही सेकंद लागले . . . 'तुमच्या स्वप्नात येईन' . . म्हणजे काय ? ही काय धमकी आहे?

" मला कळलं नाही . "

" कसं कळणार . . मी अजून समजावून सांगितलं नाही ना . . . मला वाटलं तुम्ही तसेच घाबराल . . पण आता सगळी स्टोरी सांगावी लागणार . . . मी वरं का साहेब ! " अचानक त्याच्या बोलण्यातला बदल मला जाणवला . त्याचे उच्चार आता शुद्ध झाले होते . . त्यातला ग्राम्यपणा जाउन सफाई आली होती . मला लक्षात आल्याचं समजून तो हसला " तर साहेब मी . . . तुमच्या जगातला नाही ! म्हणजे काय की . . . लोकं झोपतात . मग बऱ्याच वेळेला त्यांना स्वप्नं पडतात . . ! कधी त्या स्वप्नांना अर्थ असतो तर कधी अगदी निरर्थक, असंबध्द असतात ती . . बरोबर ना ? "

मी नकळत मानेनेच त्याला संमती दर्शवली .

" बऱ्याच वेळेला त्यांच्या स्वप्नात येतात वेगवेगळी माणसं . . . मैत्रीतली, नात्यातली, नवीन ओळख झालेली, वर्षानुवर्ष न भेटलेली, त्या दिवशी ट्रेनमधे शेजारी बसलेली, टिव्हीवर पाहिलेली . . . कुठलीही वेगवेगळी माणसं . . . ! पण ह्या सगळ्याशिवाय अनोळखी माणसंही असतात की . . . कुठून येतात ती माणसं ? "

त्याने इतक्या अनपेक्षितपणे मला विचारलं की मी एखाद्या स्पर्धेत प्रश्न विचारला गेल्यासारखा विचार करु लागलो . . . आमच्यातला तणाव विसरुन !

मग तोच पुढे सांगू लागला " . . . ती माणसं येतात आमच्या जगातून !! म्हणजे माझ्या आधीच्या जगातून . आमचं काम हेच . . कुठल्या ना कुठल्या तरी माणसाच्या स्वप्नात जायचं ! कुणीतरी अनोळखी बनून जायचं . . झाडूवाला म्हणून . . व्हिलन म्हणून . . रस्त्यावरचा माणूस म्हणून . . असाच गर्दीतला एक कुणीतरी बिनचेहऱ्याचा बनून ! "
" मग त्या दिवशीच्या त्या स्वप्नासारखं वागायचं! स्वप्नाला काही अर्थ, काही गोष्ट असेल तर आपले संवाद चोख म्हणायचे . . नाहीतर काहीही . . . मनाला येईल ते बोलायचं वागायचं . . . पण . . . पण आता दहा दिवस झाले आम्ही काही जणांनी आमच्या जगातून सुटका करुन घेतली . . म्हणजे सुटका झाली आणि आम्ही परत गेलो नाही म्हणा ना . . . ज्याच्या स्वप्नात आम्ही सातआठ जण गेलो होतो त्याला स्वप्न पूर्ण होण्या आधीच झोपेतच हार्ट अॅटॅक आला आणि तो खपला . . . मग तिथून निसटता आलं आम्हाला . . . आमच्या जगासाठी आम्ही बेपत्ता आहोत ! पण चांगलंय त्या गुलामगिरीतून सुटका झाली ते ! . . . "
" पण आता . . . आता आम्हाला हवं तसं कुणाच्याही स्वप्नात जाता येतं . काहीही करता येतं . . .तुमचं स्वप्न मी ठरवू शकतो ! पण काय आहे ? तुमच्या जगात आलोय तर आम्हालाही तुमच्यासारख्याच गरजा आहेत . . . त्या तुमच्यासारख्याच वाढताहेत दिवसागणिक आणि वाढत जाणारेत! म्हणून मग ही कराराची आयडीया आली डोक्यात . . दहा दिवसात तुम्ही तिसरे . . . . "

" इनफ ! " मी जोरात ओरडलो . . " काय तमाशा लावला आहे ? हे बघ तू . . . काय तुझं नाव असेल ते "

" भीमा भोईर . . म्हणजे हे असचं एका स्वप्नामधे होतं नाव . . मला आवडलं तर ठेवून घेतलं ! मला ती गांवढळ भाषा पण आवडली म्हणून बऱ्याच वेळेला तसंच बोलतो ! " तो हसत म्हणाला .

" हे बघ भीमा . . . तू ही स्टोरी कुणाला तरी दुसऱ्याला सांग हां . . आज मी खूप दमलोय ऑलरेडी . आता जा तू . पोलिसाना बोलावून स्टेटमेंट देत बसण्याइतकं त्राण नाहीये आत्ता माझ्यात . . . तू जी बाष्कळ बडबड केलीस ना त्याच्यावर मी विश्वास ठेवीन असं जर . . . "
" नाही ठेवणार . आत्ता नाहीच ठेवणार . . मला माहीत आहे ! ठीक आहे . आता तुम्ही माझी वाट पहाल . . पण मी आता डायरेक्ट चार दिवसानी येईन . आधी नाही . पन्नास हजार त्या दिवशी तयार पाहिजेत ! "

" नाहीतर, तू माझ्या स्वप्नात येशील . . . . हाऽऽऽ " मला हसू आवरेना .

मी त्याला खंडणी द्यायची . . त्याची न्युईसंस व्हॅल्यु काय तर तो चक्क माझ्या स्वप्नात येईल !! व्हॉट रबीश !!'

मला हसताना पाहून तो ताडकन उठला . . आणि त्याने बाहेर ठेवलेली छत्री घेऊन चालत अंधारात नाहीसा झाला . . .

छे ! वैताग आला मला . . . काहीतरी नवीन पेंटींग सुरु करणे बाजूलाच राहिले . . वेळ गेला . . थोड्या वेळापुरतं का होईना टेन्शन आलं ते वेगळंच ! . . . त्यात मग घरी जाताना कार पंक्चर ! अंतर थोडंच राहिल होतं म्हणून मग कार तशीच लावून चालत घरी . . . भिजत ! आणखीन चिडचिड !

महाराजने गरम केलेले अन्न दोन घास पोटात ढकलले . . . झोपायला दीड वाजला!

..............

*नको नको ! नका टाकू मला पाण्यात . . . मास्तर ! अयाई . . . !*
*मास्तर ऐकत नाही ! मला पायाच्या साईडने धरलाय त्याने . . . डोक्याकडून अजून कोणीतरी पकडलंय . . . आणि माझ्या आडव्या शरीराला हवेत झोके देतायत . . ही गर्दी जमलीये . पण कोणी काही बोलत नाही . . तिकडे नजर फिरवली की नदीचा काळा डोह दिसतोय . . . 'नको मास्तर !!!' मी जीव खाउन ओरडतो 'फेकू नका पाण्यात' . . . एऽऽऽऽ . एऽऽऽ मेलोऽऽऽ . . . . ऊळूक वळ्ळ . . काळाशार अंधार . . . बर्फासारखं थंड पाणी . . . . नाकातोंडात जातंय . . आं हा . . . श्वास घ्यायचाय . . . डोळ्यासमोर काळं पाणी . . .*

*" तर मुलांनो, त्या काळ्या डोहात कालीया नावाच भयंकर सर्प रहात असे. एकदा काय झालं, नदीकाठी काही गोप खेळत होते " मी मरतोय आणि कोण गोष्ट सांगतंय रे मोठमोठ्यानं ?*

*. . . मी चुकलो मास्तर, पुन्हा करणार नाही . . . हे कोण लोकं हसतायत . . मला पाण्याच्या आतूनही दिसताहेत ! काठावर उभे असलेले! सर्वात पुढे मास्तर. ते हाताला धरुन वर काढतात नि . . . . पुन्हा पाण्यात फेकतात . . धडाम . . . " अरारा पार खाली गेला का . . " कुणीतरी जोरात ओरडत*
*" मध्यावर भोवरा आहे नदीच्या "*

*'मला रात्री काळ्या काळ्या पाण्याची भिती वाटते!' मी आटोकाट सांगायचा प्रयत्न करतो पण माझ्या नाकातोंडात पाणीच पाणी . . एव्हढ्यात माझ्या हाताला काहितरी गिळगिळीत लागतं . . . . कालिया ! सर्प ! पाण्यात . . . नको वर काढा मला . . . मी पाण्यावर डोकं काढतो . . . मास्तर जोरात हसतोय . . मास्तरचा चेहरा निबर. खरबरीत. आणि ते डोळे अजून लाल झालेले ! उभं गंध !*
............

मी खडबडून जागा झालो . . . . घामाने आंघोळ झालेली . . . काहीतरी फुटून बाहेर येईल असं छातीत जोरजोरात धडाडत होतं मोठ्याने . . .

वॉचमनसकट सगळे नोकर भोवताली जमा झालेले !

" साहेब, तुम्ही 'भीमाऽऽ' म्हणून ओरडलात जोरात . . . काही सपान पाहिलं का वाईट? "
............

पुढच्या तीन रात्री तीच तऱ्हा !!! पहिल्या स्वप्नापेक्षा कितीतरी जास्त भयाण स्वप्नं ! लागोपाठ ! फारच भयंकर ! वेगवेगळ्या प्रकारची अमंगल . . अभद्र . .भितीदायक . . विभत्स !

फक्त एकच समान सूत्र ! सगळ्या स्वप्नात भीमा भोईर कुठल्या ना कुठल्या रुपात . . . मला त्रास देतोय वेगवेगळ्या तऱ्हेने . . मी प्रत्येक वेळी असहाय्य ! काही करु शकत नाहीये . .

दिवस कसाही जाऊ देत . . . शांत सुंदर संध्याकाळ अनुभवून जरी झोपलो तरी रात्री लगेच तसेच स्वप्न ! दचकून उठल्यावर काही वेळाने झोपी गेलो कि पुन्हा नवे स्वप्न ! आधीच्या पेक्षा भयंकर !

नोकरांना वेड लागायची पाळी आली . . . कारण दरवेळी मी ओरडत उठायचो. त्याना नक्की वाटलं असणार की माझ्या डोक्यावर परिणाम झाला आहे . . . मी ओरडत उठलो की सगळे जमायचे. मग मला धीर देऊन पुन्हा झोपायला जायचे . . . मी झोपलो की पुन्हा काही वेळाने तेच. कधी दोन तासाने तर कधी दहा मिनिटातच . . .

चार रात्री एक मिनीटही शांत झोप नाही !

येस. भीमा भोईर बरोबर म्हणाला होता . . हि वॉज ॲब्सोल्युटली राईट ! मीच आता त्याची आतुरतेने वाट बघत होतो.

तो आला. येणारच होता !
त्यानंच सांगितल्यासारखा बरोबर चार दिवसानी आला . .

मी खुर्चीवर अतिशय दमून बसलो होतो स्टुडिओत. चार रात्रींचा असह्य शीण . . . माझे डोळे मधेच गपकन मिटत होते. भीमा येउन बसल्याचेही मला काही सेकंदानी कळलं.

बोलायची काही जरुर नव्हती. मी हातातले पाकीट त्याच्याकडे पुढे केलं . . .

" काय आहे सायेब " पाकिट आपल्या हातात घेत तो खोटं खोटं हसत म्हणाला " पोटासाठी करावं लागतं . . . असं कधी घडेल असं

स्वप्नात सुद्धा वाटलं नसेल ना तुम्हाला . . आता झोपा निवांत . वर्षभर ! नो टेन्शन . बरं येतो मी . " तो उठला . . त्याला पैसे मोजून बघायची सुद्धा आवश्यकता वाटली नसावी . काहीही चलाखी करण्याची माझी हिंमत होणार नाही हे त्याला माहिती होतं . . .

तो निघून गेल्याचही मला जवळजवळ कळलंच नाही! त्याने झोपायला सांगितलं तेव्हाच मी अर्धा झोपी गेलो होतो . . . मग किती वेळ झोपलो कुणास ठाऊक . . . एक नक्की . मला कुठलंही स्वप्न पडलं नाही !

नंतरच्या रात्रीसुद्धा मस्त झोप ! तान्ह्या बाळासारखा निवांत झोपलो मी . . . एकही स्वप्न नाही ! भीमा भोईरने शब्द पाळला होता !
.........

त्यानंतर एक आठवडा असाच गेला . . . !

मी एव्हाना बराच सावरलो होतो . . रोज रात्री शांत चित्ताने झोपत होतो . . नव्या प्रदर्शनासाठी काम करत होतो नव्या जोमानं . . .

मग एका रात्री पुन्हा मी स्टुडीओत उशीरा थांबलेलो असताना . . . तुफान पाऊस सुरु झाला ! अशी काही झपाट्याने सर आली की मला भीमा भोइर पहिल्यांदा आला ती रात्रच आठवली !!!

पण आज मस्त पेंटींग जमलं होतं . . . बऱ्याच दिवसांनी ! खुषीत येत मी हात स्वच्छ केले . . . आणि निवांत नेहमीच्या खुर्चीत पाऊस बघत बसलो . . . हवेतला गारवा आतही चांगलाच जाणवत होता . .

सेलिब्रेट करायला पाहिजे नवीन पेंटींग ! काय करावं ? वाईन ? वोडका ? की फ्रिजमधे बीयर आहे का बघावं ? . . . किंवा . . मस्त थंड हवा आहे . . . महाराजला फोन करुन सांगूयात . . . जाईपर्यंत मस्त गरम गरम सूप बनवून ठेवेल !

विचार पावसाच्या थेंबासारखे सपसप येत होते आणि . . .

दुधी काचेवर कुणाची तरी आकृती उमटली !

. . . माझ्या अंगात भीतीचा एक थंड शहारा उमटून गेला . . .

दरवाजा उघडला गेला . . . आणि तो उघडणारा एक नाजूक गोरापान हात दिसला . . नखांवर किंचीत भडक पण आकर्षक रंगाचं नेलपॉलीश मला दिसलं . मग हळुहळू त्या हाताची मालकीण आत येताना दिसली . . . मी बघतच राहिलो !

आत आलेली तरूणी अतिशय सुंदर होती . पण त्याहीपेक्षा ती अत्यंत आकर्षक होती . तिच्या अप्रतिम बांध्यात नेमक्या हव्या त्या ठिकाणी तिला घडवणाऱ्याकडून कांकणभर जास्तच माप पडल्यामुळे तिच्या कमनीय सौष्ठवाला वेगळाच उठाव आला होता !

मी सुंदर स्त्रिया कमी पाहिल्या होत्या असं नव्हे . . . जिथे माझी पेंटींग्ज सोन्याच्या भावाने विकत घेतली जायची त्या हाय सोसायटीत खऱ्या, खोट्या सौंदर्याने नटलेल्या स्त्रिया होत्याच की . . . माझ्याच पेंटिंग्जच्या जगात गुंग असल्याने त्यांच्यापैकी कुणाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संकेत मला समजला नसेल . . किंवा आपणहून काही पुढाकार घ्यावा हा विचार करायलाही मला वेळ नसेल कदाचित !

पण ही तरूणी वेगळीच होती ! माझी मती गुंग झाली होती ! एक गोष्ट मला अजून प्रकर्षाने जाणवली काही क्षणातच ! तिच्या सौंदर्यात सात्विक असं काही नव्हतंच . . सगळंच तामसी ! एक विलक्षण आकर्षण निर्माण करण्याची शक्ती तिच्यात होती ! तिच्या प्रत्येक गोष्टीत ! तिच्या नजरेत, तिच्या लहानशा हालचालीतही शेकडो आव्हानं होती . . . ती आत येताच कुठलातरी मंद सुगंध हवेत मिसळला आणी माझ्यासकट त्या खोलीतली प्रत्येक वस्तू जणू भारल्यासारखी झाली ! माझी विचारशक्ती जणू गोठली गेली!

. . आणि माझ्या नकळत मी तिला नजरेने मंद मंद पिऊ लागलो . . . व्हॉट अ वे टू सेलिब्रेट माय न्यू पेंटींग !

" मी बसू का ? " तिने तिच्याइतक्याच मादक आवाजात विचारलं !

" बसा ना . "

माझा चेहरा पाहून ती मिश्कील हसली आणि म्हणाली " मला भीमाने तुमचं नाव सांगितलं "

" काय ??? भीमा . . भोइर ? . . . "

" हो . . दहा दिवसांपूर्वी ज्या लोकांची सुटका झाली त्यात मीही होते ! आमच्या विशिष्ट शक्तीचा तुम्हाला अनुभव आलाच असेल ! "

" अं ? हो हो . . "

मी माझी दृष्टी हटवू शकत नव्हतो . . . माझ्या आतमधे एक प्रचंड उर्जेचा स्त्रोत निर्माण झाला आहे आणि तो माझ्यातून बाहेर पडून तिला सहस्त्र हातानी कवटाळू पहातोय असं मला वाटून गेलं .

" मलाही तुमच्याशी करार करायचा आहे . . . एका वर्षाचा ! अर्थात मी भीमासारखी जबरदस्तीने खंडणी घेत नाही . . . पण मला नाही वाटत तुम्ही नाही म्हणाल ! "

" म्हणजे? "

" म्हणजे . . . तुम्हाला स्वर्गीय सुखाचा अनुभव देणारी स्वप्नं पडू शकतात . . . . रोज . . . वेगवेगळी . . . नवीन ! त्या प्रत्येक स्वप्नात मी येऊ शकते . . प्रत्येक स्वप्नाची वेगळी गोष्ट . . . . आणि मी ? त्या गोष्टीत हव्या त्या नावाने, हव्या त्या भूमिकेत ! "

तिचं बोलणं माझ्या मनाचा पूर्ण तावा घेतं होतं . . .

" . . . त्या स्वप्नात काहीही होऊ शकतं . . . होऊ शकेल ! आणि हवं ते करता येईल . . . . . " क्षणभर थबकून तिने सूचक नजरेने वाक्य पूर्ण केलं " . . . तुम्हाला हवं ते !! "

. . . . .

दुसऱ्या दिवशी रात्री . . . .

हातातल्या पाकिटाशी चाळा करत मी स्टुडीओतल्या माझ्या खुर्चीवर बसलो होतो . . . आज पाऊस शांत झाला होता . . उगीच पडत होता भुरभुर . . .

ती वेळेवर यायला हवी !

कारण ती येऊन गेल्यावर घरी जाऊन . . . . मी घाईघाईने झोपी जाणार होतो !

**- राहुल फाटक**

## Covalent bond

"Covalent Bond : Any atom of a molecule forms a bond with another atom to complete its octate, this bond is known as Covalent Bond"

मी दहावीच्या वर्गात विज्ञान शिकवत होते . नुकतीच मी या छोट्याश्या शहरातील शाळेत विज्ञान शिक्षिका म्हणून रुजु झाले होते आणि मला दहावीचा वर्ग मिळाला होता . हळूहळू विद्यार्थ्यांशी ओळख व्हायला सुरुवात झाली होती .

" . . . . . तर अशा प्रकारे हा धडा संपला . कुणाला काही प्रश्न विचारायचे असल्यास विचारु शकता . उद्या येतांना व्यवस्थित अभ्यास करुन या . मी एक छोटीशी चाचणी घेणार आहे . "

वर्ग संपवून मी बाहेर आले आणि दुसऱ्या वर्गात निघाले तेवढ्यात मॅडम अशी हाक ऐकू आली . मी वळून बघितले तर मृण्मयी मला बोलवत होती .

" मॅडम, मला काहीतरी विचारायचं आहे तुम्हाला "

" काय गं मनु, काय प्रॉब्लेम आहे . विचार ना ! "

" मॅडम मला जरा नेत्रदान कसे करतात त्याविषयी माहिती हवी होती . "

मी कौतुक मिश्रित आश्चर्याने तिच्याकडे बघितलं .

" माहिती सांगते मी तुला पण मला एक सांग, तुझ्या मनात कसा काय आला हा विचार ? आणि तुला जरा जास्तच विचार करावा लागेल कारण तू अजून खूप लहान आहेस बाळ "

" खरं म्हणजे मी माझ्या डोळ्यांसाठी नाही विचारत, पण मला केवळ माहिती पाहीजे . माझ्या आईचे डोळे दान करायचे आहेत . "

" मग त्यासाठी तुझ्या आईची संमती हवी, तू एक काम कर, तुझ्या आईला किंवा बाबांना माझ्याकडे पाठवून दे . मग मी स्वत:च देईन त्यांना हवी ती माहिती . "

" नाही मॅडम तुम्ही मलाच सांगा . माझे बाबा माझ्या लहानपणीच वारले आणि आईला मी स्वत:च सांगणार आहे . "

तिच्या या वागणूकी बद्दल मला काहीच समजेना पण नाईलाजाने मी तिला सर्व माहिती सांगितली . " धन्यवाद ! " म्हणून ती पळाली . मी सुद्धा लगेचच पुढच्या वर्गावर जाण्यासाठी निघाले आणि माझ्या व्यस्त कार्यक्रमात पुन्हा अडकले . तिचा हा प्रश्न मी विसरुन सुद्धा गेले होते, एक दिवस अचानक ती परत माझ्याकडे आली .

" मॅडम मला जरा किडनी कशी दान करतात ते सांगाल काय . . "

आता मात्र मी उडालेच .

" काय ! किडनी दान, अगं वेडी बिडी झालीस काय तू, तू अजुन दहावीतच आहेस आणि कशाला हवी गं तुला ही सर्व माहीती . "

" मॅडम माझ्या आईची एक किडनी दान करायाची आहे . "

" तसं पहाता ही खूप चांगली गोष्ट आहे पण किडनी दान करण्याचा निर्णय तुझ्या आईने का व कशासाठी घेतला ते सांगू शकशील काय? "

" मॅडम तुम्ही फक्त मला माहिती सांगा . "

" ते काही नाही . तू मला अगोदर सांगितलेच पाहीजे कशासाठी सगळं विचारतेयस ते . "

" मॅडम तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा आणि मला सांगा . "

मी तिला परत सर्व माहिती सांगितली पण या वेळी माझं मन मला स्वस्थ बसू देईना . मी तिच्या आईची भेट घेण्याचं ठरवलं . पण विशेष गोष्ट म्हणजे हुशार आणि लोकप्रिय असलेल्या मृण्मयीचं घर मात्र कुणालाही ठाउक नव्हतं . मुलींच म्हणण होतं की तिने कधीही कुणाला तिच्या घराविषयी काही सुद्धा सांगितलं नव्हतं .

शेवटी मी शाळेच्या रजिस्टर मधे तिचा पता शोधायला घेतला आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला . मृण्मयीच्या नावापुढे स्थानिक पालक म्हणून दुसऱ्याच कुणाचं तरी नाव नोंदवण्यात आलं होतं . मला काहीच कळेना, मनु आपले वडिल वारले असं काय सांगतेय ? विचित्र प्रश्न काय विचारतेय . नुसता गोंधळ उडाला होता .

त्या पत्त्यावर मी जाऊन पोहोचले . मोठं प्रशस्त घर होत . मी जाताच एक चाळीशीतले गृहस्थ माझ्यासमोर आले . त्यांच नाव ऐकल्यावर मला कळलं की मनुचे स्थानिक पालक ते हेच .

" नमस्कार, मी तुमच्या मुलीची विज्ञान शिक्षिका . मला जरा तुम्हाला काही प्रश्न विचारायचे होते . "

" मॅडम मी प्रथम एक गोष्ट स्पष्ट करतो की मनु माझी मुलगी आहे पण ती माझी मुलगी नाही . गोधळलात ना . नीट सांगतो म्हणजे कळेल . मनु माझ्या मित्राची मुलगी . माझा जिवलग मित्र अजय आणि त्याची बायको यांची एकच आवड होती ती म्हणजे समाज सेवा . आणि याच आवडीपायी बाळंतपण शहरात करायचे सोडून ती दोघे एका खेड्यातील वृद्धाश्रमात गेले . अपुऱ्या वैद्यकीय सोयीमुळे मनुच्या जन्माच्या वेळी तिची आई हे जग सोडून गेली, पुढे अजय तिला घेउन परत आला आणि एकाच वर्षात तो सुद्धा गेला . दैवाचा खेळ बघा मरे पर्यंत समाजासाठी काम करणाऱ्या अजय च्या मुलीसाठी कुणीही नातेवाईक पुढे न आल्याने शेवटी मी तिला घेउन आलो, मनुच्या नावापुढे मी अजयच नाव ठेवलं . मनुला मी घेउन आलो तेंव्हा ती एक वर्षाची होती आणि माझं लग्न सुद्धा झालं नव्हतं म्हणून मी ऑफिसला जातांना मनुला बाजूच्या एका आश्रमात सोडून जात असे . अभिमन्यू आईच्या गर्भातच धनुर्विद्या शिकून आला होता म्हणे तशीच आमची मनु आपल्या आईबाबांकडुनच जणू त्या आश्रमासाठी जगण्याचं ठरवून आली होती . मनु आई बाबांप्रमाणे त्यांच्यात रमली . आजही ती घरात फक्त काही वेळच असते आणि इतर सर्व वेळ ती आश्रमातच असते . "

मनुचं मला कौतुक वाटलं .

" पण मी तुमच्या कडे आले ते एका वेगळ्या संदर्भाने . मनु मला काहीसे विचित्र प्रश्न विचारत असते . नेत्रदान, किडनीदान वैगरे . . "

" तुम्ही जरा माझ्या बरोबर चला . . म्हणजे तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळतील . "

मी त्यांच्यामागून निघाले . बाजूलाच एक आश्रम होता . तिथेच एका खोलीच्या दरवाज्याजवळ आम्ही दोघे थांबलो . खिडकीतुन आत डोकावले तर दिसले की मनु एका वृद्धेला मांडीवर घेउन काहीतरी समजावत होती .

" आजी तू घाबरू नकोस अगं उलट तुला आनंद व्हायला हवा, आज तुझ्या मुळे कुणाला तरी जीवन दान मिळणार आहे, तुला आठवतं की डॉक्टरांनी तुझ्या किडनीचं ऑपरेशन करावं लागेल असं सांगितलं होतं ते ऑपरेशन यशस्वी झालंय आणि तुझी एक किडनी काढून दान करण्यात आली . किडनी दान म्हणजे . . . . "

मनु मी सांगितलेला एक एक शब्द बोलत होती,

" बघितलंत मॅडम, खरं म्हणजे त्या आज्जींची एक किडनी निकामी झाल्यामुळे काढून टाकण्यात आली पण मनुने तिला असं सांगत समजावलय की तुझी किडनी दान केलेय म्हणून . मागे असेच एकदा एका आजोबांचा एक डोळा अचानक निकामी झाला, तर मनुने त्यांना नेत्रदाना विषयी माहीती सांगितली आणि त्यांच्या दु:खावर एक फुंकर मारली, कारण गेलेला डोळा परत तर मिळणार नव्हताच उलट आपण कुणाच्या तरी कामी येऊ शकलो अशी त्यांची भावना झाली आणि त्यांना परत त्यांच्या जीवनातला आनंद मिळाला . कदाचित मनुचं खोटं बोलण तुम्हाला खटकत असेल पण त्या बोलण्या मागे दुसऱ्यांना निखळ आनंद देणं एवढा एकच उद्देश असतो . आपण अगदीच निकामी

आहोत ही भावना त्यांच्या मनात निर्माणच न होऊ देणं, मला वाटतं हेच खरं मनुच्या कामाचं फलित . "


आतून दोघींच्या हसण्याचा आवाज आला आणि माझे डोळे नकळत पाणावले, Covalent Bond चा खरा अर्थ मला समजत होता . स्वत: साठी तर सगळेच जगतात पण दुसऱ्या साठी जगणं हेच खरं जीवन . आपल्या जीवनातील हिस्सा मनुने अशा प्रकारे दुसऱ्याबरोबर वाटून घेऊन जो बंध निर्माण केला होता तोच Covalent Bond!

**- सुभाष डिके**

## जाई

" अगं जाई तुझं लक्ष कुठे आहे . . ?? "
जाईने भानावर येऊन समोर बघितले . बाई तिच्याकडे रागारागाने बघत होत्या . दोन मिनिटं जाईला आपले काय चुकले कळलेच नाही . पण बाईंच्या हातातले इतिहासाचे पुस्तक बघितल्यावर तिला हसूच फुटले .
" बाई तुम्ही शिवाजी महाराजांची गोष्ट सांगत होतात ना तर बाहेर दोन खारुताई पळापळ करत होत्या . थोडेसे मी रागावले त्यांना तर म्हणाल्या की आज कोकीळेच्या बाळाचं बारसं आहे आणि लगबग करत होत्या . तर त्यांनी मला विचारले की प्यायला पऱ्हे ठेवायचे की सरबत . . "
वर्गात खुसखुस सुरु झाली . काही मुलं तर वेडी वेडी म्हणत जाईला चिडवायला लागली . जाई रडवेली झाली . . तिला आपले काय चुकले कळलेच नाही . खरंच तर त्या दोन्ही खारी तिच्याकडे अजूनही बघत होत्या . बाईंनी दोन मिनिटं जाईकडे बघितले आणि तिला खाली बसायला सांगितले . जाईचे डोळे भरून आले होते . आपले काय चुकले तेच तिला कळेना . सगळ्या वर्गातल्या मुली तिला हसायच्या आणि मुलं तर चक्क तिला वेडी म्हणूनच चिडवायची . जाईने दुर्लक्ष केले . त्या खिडकीतून वाट बघणाऱ्या खारूताईना साधा टाटा पण तिने आज केला नाही . त्या खारी हिरमुसल्या होऊन निघून गेल्या . .
मधली सुट्टी झाली तशी जाई हळूहळू उठली आणि तिच्या लाडक्या झाडाखाली जाऊन बसली . तिने गुडघ्यात डोके लपवले आणि रडायला सुरुवात केली . केसांवर कोणाचातरी मऊ हात फिरला आणि तिने वर बघितले . मराठीच्या बाई . . लताताई . . ती खुदकन हसली . लताताई तिला खूप आवडायच्या . त्या एकट्याच तिचं सगळं मन लावून ऐकायच्या आणि तिला गोष्टी देखील सांगायच्या पऱ्यांच्या, राजा राणीच्या , हरवलेल्या राजपुत्राच्या . . तिने लताताईंना घट्ट मिठी मारली .
" सांग ग जाई अशी एकटीच मुळुमुळु का रडत होतीस? कोणी काही बोललं का? "
" नाही पण आज त्या खारुताई मला आमंत्रण द्यायला आल्या होत्या कोकिळेच्या बाळाच्या बारशाचं . मी फक्त इतिहासाच्या बाईंना ते सांगत होते तर सगळी मुलं मला वेडी वेडी म्हणून चिडवायला लागली . लताताई तूच सांग, असं का ग करतात ही मुलं? "
लताताई हसली . पर्समधून गुलाबाचा सुवास असलेला चिमुकला पांढरा शुभ्र रुमाल काढून तिचे डोळे स्वच्छ पुसले .
" जाई हे बघ माझ्याकडे काय आहे तुझ्यासाठी . . " आणि लताताईने तिला एक छोटेसे पुस्तक काढून दिले .
" अय्या जादूची अंगठी " जाईची कळी खुलली होती .
" आता रडायचं नाही आणि हे पुस्तक पुरवून पुरवून वाचायचं . चांगलं आठ दिवस पुरलं पाहिजे मग तुला दुसरं आणून देईन मी पुस्तक . आणि हे बघ हा खाऊ खाऊन घे . आणि न रडता वर्गात जायचं . गुणाची पोर माझी!! "
जाईने मान डोलावली . लताताईने आणलेल्या बेसनाच्या लाडवावरचा पिस्ता तोंडात टाकत तिने पुस्तक उघडले . बघता बघता ती पुस्तकात रमली . इतकी की एक चिमुकले पिवळे धमक फुलपाखरु तिला खेळायला बोलवत होते त्याकडे पण तिने चक्क दुर्लक्ष केले . एक कावळा मान तिरकी करून तिच्याकडे बराच वेळ रोखून बघत होता . इतर वेळ असती तर तिने त्या राक्षसाला पळवून लावले असते . कोकिळेला शोधून तिने सांगितलं असतं 'बाई ग जपून नाहीतर तो कावळा तुझ्या पिल्लाला घेऊन जाईल .' पण आज मात्र ती गोष्टीतच रंगली होती . गोष्टीतल्या मुलाच्या हातातली अंगठी होती जादूची आणि त्याने खूप काही चांगले काम केले की अंगठीचा खडा चमचम करायचा आणि खोटं बोलला, किंवा वाईट वागला की तो खडा गायबच व्हायचा . . . .
जाला मधली सुट्टी संपल्याचे लक्षात देखील आले नाही . ती भानावर आली ती मोठ्या बाईंच्या ओरडण्यानेच . तिने वर बघितले तर मोठ्या बाई तिच्याशी काहीतरी बोलत होत्या . तिला ऐकू जाईना म्हणून तिने हातानेच काय आहे म्हणून खूण केली . मोठ्या बाईंनी तिचा दंड खेचून तिला उभे केले आणी सणकन कानाखाली वाजवली . . . जाईच्या डोळ्यासमोर क्षणभर काळोख पसरला . कान गरम झाले . . गाल पण गरम झाला त्याहीपेक्षा कढत अश्रू तिच्या गालांवरून ओघळू लागले . आता मात्र बाई काय म्हणत होत्या तिला चांगलंच ऐकू

जायला लागले .
" वर्ग सुरु होऊन चांगला अर्धा तास झाला . इथे काय करत होतीस . . "
जाई काहीच बोलली नाही . तिचा कान पकडून मोठ्या बाईंनी तिला teachers' room मध्ये नेले .
" ऊभी रहा इथे चांगले दोन तास . कुठे जायचं नाही . "
" पण बा . . " कसे बसे जाईने बोलायचा प्रयत्न केला . पण त्यांनी काही ऐकले नाही . मोठ्या बाई तिथून निघून गेल्या . जाईला आपण बुरूजात अडकलेली लांब केसांची राजकन्या आहोत असेच वाटायला लागले आणि मोठ्या बाई लांब नाकाची चेटकीण . आता कोणत्याही क्षणी राजपुत्राची हाक येईल आणि आपण केस सोडू खिडकीबाहेर मग तो वर येईल आणि आपल्याला सोडवून घेऊन जाईल . कल्पनेनेच जाई खूष झाली . तिने आपले केस सोडून मोकळे केले, ती आतुरतेने राजपुत्राची वाट बघू लागली . . .



" बाई बाई शर्थ आहे ह्या पोरीची . . किती कोडगी आहे "
" हो ना इतकी शिक्षा झाली पण आहे का काही . हसते आहे नुसती . कसं होणार . तिच्या आई बाबांचे कसे होणार काळजी लागली आहे मला . "
आपल्या विषयी बोलणे चालले आहे हे जाईने ओळखले . तिने कान देऊन ऐकायला सुरुवात केली . इतिहासाच्या बाईंचा आवाज देखील तिने ओळखला पण दुसरा आवाज तिला ओळखू येईना .
" अहो आई बाप नाहीत तिला . मामाकडे वाढली म्हणे . आता होस्टेलवर रहाते . अशीच थेरं केली असतील मामाकडे . . दिली हाकलून . . "
" हो का? बिचारी "
" अहो काही बिचारी नाही . . किती जाण असते आई वेगळ्या मुलांना पण हिला काही नाहीच त्याचं . . "
जाईला आपले कान परत गरम झाले आहेत असा भास व्हायला लागला . ती कपाटामागून पुढे आली . . आणि तिने किंचाळून सांगितले " आई आहे माझी . ती परी झाली आहे . रोज रात्री येते ती माझ्याकडे आणि मला थोपटून झोपवते . आणि हो गोष्टी पण सांगते . ती मेली नाहीये . माणसं मेली की भूत होतात . राजू म्हणत होता तसं . पण माझी आई परी आहे . तिला दूर देशाच्या राजाने कैद करून ठेवले आहे . मी मोठी झाले की तिला सोडवणार आहे . " जाईचा आवाज चिरकायला लागला पण ती तशीच नेटाने ओरडत होती . त्या बाईना आपला आवाज नीट कळत नसावा म्हणून जाईने खुर्च्या हाताने बाजूला फेकल्या आणि टेबलवर चढून त्यांना परत नीट सांगायचा प्रयत्न केला तर त्या बाई ओरडायलाच लागल्या . ह्या अशा काय करतायत जाईला समजेना . तिने त्या बाईंची वेणी ओढून त्यांना 'खाली व्हा' म्हणून सांगायचा प्रयत्न केला . तर त्या बाई अजूनच घाबरून ओरडायला लागल्या . बाहेरून रामू शिपाई धावत आला त्याने जाईचे दोन्ही हात घट्ट धरून ठेवले . जाईने चिडून हात पाय झाडायला सुरुवात केली . आणि ती रामूच्या हाताला करकचून चावली . रामू हा राक्षसांच्या टोळीचा प्रमुख आहे ह्याची जाईला खात्री होती . तिने जमेल तसे त्याला मारायला आणि ओरबाडायला सुरुवात केली . आवाज ऐकून लताताई धावत आली . तिने रामूला दटावून जाईला जवळ घेतले . तिच्या मिठीत जाई हळूहळू शांत झाली . तिला लताताईचा आवाज येत होता पण तो थोडावेळच . तिचा मऊ आवाज जाईला शांत करत गेला . तिचे कोरडे संतापाचे हुंदके थांबले .
" शांत हो बघू तू जाई . हे काय वेड्यासारखं? आज माझ्या घरी येतेस का? उद्या रविवार आहे ना? सुट्टी!! तू आणि मी खूप मजा करु "
जाईने हसून मान डोलावली .
" पण लताताई तो राजपुत्र आला तर? तो येईल ना कधी पण मला सोडवायला? "
लताताई हसली . " अग वेडे तो राजपुत्र आहे ना? मग तो तुला शोधेलच की . . कुठेही असलीस तरीही "
हो की . . जाई हसली . . खरंच की . आपण वेड्याच आहोत . . . . . . . . . .

लताताईच्या घरी जाई नेहमी भरपूर मजा करायची . आणि घरी ती लताताईला लताताई न म्हणता 'ए ताईच' हाक मारायची आणि लताताई ला पण ते खूप आवडायचं . ताईच्या घरी एक छानशी डोळे मिचकावणारी सोनेरी केसांची बाहुली होती . ती तिच्या बाबांनी ती लहान असताना सिंगापूरहून आणली होती म्हणे . सिंगापूर नावाचा एक भारतासारखाच देश आहे असे तिला ताईने सांगितले होते . तो देश म्हणजे सोनेरी केसांच्या निळ्या निळ्या बाहुल्यांचा आणि शूर वीर राजपुत्रांचाच असावा अशी तिची खात्री होती . आणि शिवाय ताईची ट्रंकभरून पुस्तकं लहानपणापासूनची जमवून ठेवलेली . . . . त्यातच एक जपून ठेवलेला अमूल्य खजिना, झुलती पिसं, अभ्रक, तुटक्या झुंबरांचे लोलक, टिकल्या, चांदण्या . . आणि ताईने बनवलेली लुसलुशीत साबुदाण्याची खिचडी . जाई मग सगळं विसरायची . शाळेतली ती खोडकर मुलं . . आई बापाविना पोरगी म्हणत केलेली विचारपूस इतकंच काय मोठ्या बाईंनी मारलेली थोबाडीत सुद्धा ती विसरून गेली . .

त्या रात्री ताईने तिचे डोके मांडीवर घेऊन हळुहळू तिच्या केसांमधून हात फ़िरवायला सुरुवात केली .
" कसं होणार गं जाई तुझं? कधी होणार तू मोठी . खूप काळजी वाटते बघ तुझी . " तिचा जाईसारखाच मऊ आवाज जाईच्या कानात झिरपत होता . तिला कस शांत शांत वाटत होतं . तिच्या मनात एकदम एक कल्पना आली . तिने उठून ताईला विचारले " ताई तू माझी आई होशील? आपण मग एकत्रच राहू, खूप खूप मजा करू "
हे ऐकल्यावर ताईच्या डोळ्यात पाणी का आले जाईला समजले नाही . पण हिरमुसून ती तशीच ताईच्या मांडीवर डोके ठेवून पडून राहिली .

नेहमीप्रमाणे जाईने सगळे तास संपल्यावर फळा स्वच्छ पुसला आणि ती डस्टर, खडू ठेवायला टीचर्स रुम मध्ये आली . ताईचा आवाज ऐकून ती थबकली . मोठ्या बाईकडे ताई काय करते आहे . ?
मोठ्या बाई तिला पण ओरडत असतील . एका फुंकरीत आपल्याला मोठ्या बाईना उडवून लावता आले तर काय मज्जा येईल, किंवा तो ताईकडे बघितलेला सापांचा पिक्चर! त्यात ती बाई साप असते आणि तिची फुंकर विषारी असते, जाईला पण आपली फुंकर विषारी आहे असे वाटायला लागले . ती दबकत दारामागे येऊन उभी राहिली . मोठ्या बाईवर फुंकर मारणार इतक्यात तिला आपले नाव ऐकू आले म्हणून कुतुहलाने तिने ऐकायला सुरुवात केली .
" लताबाई तुम्ही म्हणता ते चाइल्ड सायकोलॉजी वगैरे सगळं ठीक पण शाळेचे नियम पाळायलाच पाहिजेत . "
" हो पण मुलांचे कोवळे मन जपणे तितकेच आवश्यक असते "
" हे बघा तुमचा रीसर्च वगैरे सगळा त्या परदेशात जाऊन करा . आम्हाला शाळा चालवायची आहे . ह्या अशा गोष्टी तिच्या बघून इतरही मुलं करायला लागतील . तुम्ही अजून काही दिवसच शाळेत आहात . आम्ही शाळा गेले **35** वर्ष चालवतो आहोत . "
कुठे जाणार आहे ताई? जाई घाबरी घुबरी झाली . .
" हो तुम्ही म्हणता ते सगळं ठीक आहे . . पण तरीही . . "
" त्या जाईबद्दल तुम्ही काही सांगू नका हो . तुम्हीच तिला पाठीशी घालत आला आहात . तुम्ही जर नसता तर चांगली अक्कल ठिकाणावर आली असती तिची आत्तापर्यंत "
ताई काहीच बोलली नाही . निमूटपणे खुर्ची बाजूला सारून ती बाहेर आली .
" जाई तू? "
" तू पण जाणारेस ना मला एकटीला सोडून? सगळे जा तुम्ही मला एकटीला राहूदेत . सगळ खोटं आहे . माझी आई परी नाही . . मेली ती . बाबा पण मेले . कोणी नाही मला . तू पण जाणार मला सोडून . . "
हुंदके देत जाई धावत सुटली . ताई मागून 'अगं अग' करत धावतेय त्याची पर्वा न करता . त्या रस्त्यातल्या खारूताई एरवी मध्ये आल्या असत्या तर जाईने थांबून चौकशी केली असती पण आज मात्र तिने कोणाकडेच लक्ष दिले नाही . दूरवर एक रस्ता तिला दिसत होता . त्या रस्त्यावरून स्कूटरवरुन जाताना तिचे आई बाबा देवाकडे गेले होते . त्याच रस्त्यावरून आपणही देवाकडे जायचं ह्या एकाच विचाराने ती धावत सुटली . रस्त्यावरून धावताना तिला दोन लालभडक डोळे आपल्याकडे येत आहेत असा भास झाला . तो राक्षस तिच्याकडे धाव करून येत होता . जाई थबकली . तिला कुठे जावे कळेना . मागून तो रामू शिपाई . त्यानेच राक्षसाला ये म्हणून सांगितले असणार . . जाई ने डोळे मिटून त्या राक्षसासमोर उडी मारली 'खा मला . नाहीतरी मला मरून जायचे आहे .'

पुढचे काहीच जाईला कळले नाही . तिने डोळे उघडले तेंव्हा तिचे डोके ताईच्या मांडीवर होते .

" अहो पोरीचे नशीब जोरावर . ट्रकवाला थांबला नाहीतर गेलीच असती ती "
" हो ना . . काय बाई आजकालची पोरं . . . "
जाईने ताईच्या चेहऱ्याकडे बघितले " ताई का गं रडतेस? "
" शूऽऽ बोलू नकोस . चल घरी जाऊया आपण " जाईने आपले हात ताईच्या गळ्यात टाकले . ताईने तिला अलगद उचलले आणि रिक्षातून घरी आणले . जाईला थोडेसेच लागले होते . पण ताईने तिला हळूवार मलम लावले आणि ते लावताना स्वत : च रडत होती . जाई मात्र शूर वीर राजपुत्रासारखं दात ओठ खाऊन सहन करत होती . दोन दिवस जाईची नुसती चंगळ चालली होती . ती म्हणेल ते खाऊ, खेळणी ताई आणून देत होती . म्हणेल तितक्या गोष्टी तिला सांगत होती .
पण न राहवून जाईने शेवटी ताईला विचारलेच " ताई तू मला सोडून जाणार का गं? "
" नाही गं वेडाबाई . अशी कशी सोडून जाईन तुला? फक्त दोनच तर वर्षांचा प्रश्न आहे . . आणि मी येताना मोठी बाहुली पण आणणार आहे तुला . "
" नको मला बाहूली . तू का चाललीस मला सोडून? माझे पाय पांढरे आहेत का गं? "
ताईला संदर्भ लागेना . . " कोण म्हणालं तुला असं जाई? "
" त्या इतिहासाच्या बाई म्हणत होत्या पोरगी पांढऱ्या पायाची . . कोणतीही चांगली गोष्ट हिच्याजवळ रहाणार नाही . . तू इतकी छान आहेस ना म्हणूनच देव तुला घेऊन जात असणार लांब माझ्यापासून . मी वाईट्ट आहे . . "

ताईने चटकन तिला मिठीत घेतले . " अगं नाही गं वेडाबाई . आणि तू काळजी करू नकोस . मी तू बरी झालीस ना की तुला माझ्या आई कडे घेऊन जाणार आहे . दूर गावाकडे . तिथे छोटीशी नदी आहे . नदीच्या काठी आमचे कौलारू घर आहे . तिथे रहाशील का गं तू? आई माझ्यापेक्षा छान मऊसुत पोळ्या करते घडीच्या . त्यावर तूप ओतून तुला पोळ्या मिळतील रोज . . तुझे खूप लाड करेल आई . पण आईला त्रास नाही हं द्यायचा . वेड्यासारखं पळायचं नाही . तिला नीट दिसत नाही ना म्हणून . मदत करशील तू तिला? " ताईचा आवाज दाटून आला होता .
" आणि मग मी आले ना की आपण सगळ्यांनी एकत्र रहायचं . तू मला तुझ्या पऱ्यांना भेटव मग . . कोणाची लग्नं झाली, कोण अजून चेटकीणीच्या कडेच अडकले आहे सगळ सांगायचं . "
जाई मानेनेच हो हो म्हणत होती . तिचे हुंदके थांबले होते . तिला दूरवर एक लहानशी नदी दिसत होती आणी चमचमणाऱ्या कौलांचे घर . तिला नक्की खात्री होती की त्या नदीत एक जलपरी रहात असणार . तिला आपण सांगायचे ताईला लवकर परत आण . .
" हो ताई मी नक्की तुझ्या आईची काळजी घेईन आणि त्या नदीतल्या जलपरीला पण सांगेन . आणि मग उडत्या घोड्यावरून मी तुला रोज भेटायला येईन . "
जाई उत्साहाने सांगत होती . ताईने हसता हसता कवटाळले तिला . . का ते जाईला समजले नाही पण चिमुकल्या हातांनी तिने आनंदाने ताईला मिठी मारली . . अगदी घट्ट . . .

**- रचना बर्वे**

## चकवा

अविची गाडी गॅरेज मधे शिरली तेव्हा माधुरी पोर्च मधे अस्वस्थ येरझारा घालत होती . अविनी गाडीचा हॉर्न दिला तशी ती धावतच त्याला सामोरी गेली .
" अवि , अरे गावाहून फोन आला होता . तात्यांची तब्येत बरी नाही . आपल्याला गेलं पाहिजे . " माधुरी एका दमात बोलून गेली .
" अग हो हो . . जरा नीट सांग मला काय ते . जाऊ आपण . "
" अरे, तासापूर्वी गावाहून फ़ोन आला होता . तात्यांना ॲडमिट केलंय . काय ते फ़ोनवर सांगू शकला नाही तो . पण लवकर या म्हणाला . आपण अस करू, मुलांना आज दामले काकूंकडे ठेवू . काय कशी परिस्थिती आहे बघू, मग ठरवू काय ते . "
" मलाही हे ठीक वाटतय . अत्ता उगाच मुलांना न्यायला नको . तू असं कर, तयारी कर , तो पर्यंत मी ही जरा आवरून घेतो . "
" ठीक आहे " म्हणत माधुरी आत गेली .
अविनाश आणि माधुरी भराभर तयार झाले .
तात्यांची एकुलती एक मुलगी म्हणून फार लाडात वाढली होती माधुरी . तात्यांचा फार जीव होता तिच्यावर . आईविना पोर म्हणून खूप जपायचे तिला . तात्यांच्या विचारांनी तिचं चित्त थाऱ्यावर नव्हतं . कसेबसे तिने मुलांचे आणि त्यांचे दोघांचे चार दिवसांचे कपडे भरले . सारखे तिचे डोळे भरून येत होते . अविच्या नजरेतून ते सुटलं नाही .
" माधु, अग सगळ ठीक होईल . तू काळजी नको करूस . " अविने तिला हलकेच जवळ घेतलं तेव्हा तिने डोळ्यांतील पाण्याला मोकळी वाट करून दिली . तिचे डोळे पुसत अविने तिला धीर दिला खरा , पण मनातून तोही अस्वस्थ झाला होता .
तात्यांची तब्येत आताशा बरी नसते हे तो जाणून होता . शंकेची पाल त्याच्याही मनात चुकचुकली, पण तो काही न बोलता माधुरीला धीर देत राहिला .
आत्ता निघालो तर कुठे 9 . 30 - 10 पर्यंत पोहचू . जवळपास 3 तासांचं अंतर होतं गाडीने . थंडी वाढतेय . रात्री चांगलंच गार होतं म्हणून त्यानी माधुरीला गरम कपडे घेण्याची आठवण केली .
" तुम्ही आशू मिनूची अजिबात काळजी करू नका . अगदी निश्चिंत जा . मी आहे इथे त्यांची काळजी घ्यायला . " दामलेकाकूंनी सांगितल .
अविनी गाडी गावाच्या दिशेनी काढली . माधुरीला तर कधी एकदा तात्यांना बघते असं झालं होतं . ती काहीच न बोलता बाहेर बघत बसली होती . जरा वेळानी शहराची रहदारी मागे पडली आणि गाडीनी जरा वेग पकडला .
एरव्ही तिने हा drive मस्त enjoy केला असता . शहर सोडून स्वच्छ मोकळ्या हवेत तिचं मन नेहमीच रमायचं . तिचं सार बालपण गावातच गेल होत . तात्यांचा शेतीवाडीचा केव्हढातरी पसारा होता . गाव म्हणजे काही अगदीच खेडेगाव नव्हतं, पण तिच्या लहानपणी गावात नुकतीच वीज आली होती . हळुहळू सुधारणा होत होत्या . तिला मात्र शिकायला हायस्कूलला तात्यांनी पुण्याला मावशीकडे पाठवलं होत . पण तिची गावाची ओढ मात्र कधीच कमी झाली नव्हती . तिच्या सगळ्या बाल मैत्रिणी गावातच होत्या . नाही म्हणायला काही जणी

तिच्या सारख्याच शिकायला शहरात गेल्या होत्या , पण त्या तुरळकच . गावात दिवसभर मनसोक्त बागडायचं, अगदी अंधार पडेपर्यंत . मग तात्या भिकाला पाठवायचे तिला शोधायला . ती आपली कुणाकडेतरी पिठलं भाकरी खाऊन तृप्त होत असायची . तात्या ओरडले कि अक्का माधुला पाठीशी घालत . " कशाला उगाच ओरडता तिला तात्यासाहेब , तुमची मुलगी तशी आमची पण आहेच की . " मग काय माधुला आणखीन मुठभर मांस चढायचं आणि अक्काच्या कमळी बरोबर दुसऱ्यादिवशीचे बेत आखत ती तात्यांच्या तावडीतून पसार झालेली असायची . पण हायस्कूलला पुण्याला गेल्यापासून तिच्या उनाडक्या कमी झाल्या होत्या .
अचानक गाडी थांबल्याने माधुरी भानावर आली .
" काय झाल अवि, गाडी का थांबवलीस? "
" अग काही नाही . जरा 10 मिनिट थांबू . थकल्यामुळे जरा पेंग आल्यासारखं होतय . मी तोंडावर पाणी मारून येतो . तू काही खातेस का तोवर? "
" अरे हो, तूही आलास तसाच निघालास . जेमतेम चहा घेतलास मघाशी . चल काहीतरी खाऊन घेऊ . अजून दीड तास तरी अंतर राहिलंय, नाही? " माधुरीला अगदीच अपराध्यासारखं वाटलं . इतकी कशी मी बावळट . बिचाऱ्याला काही खायला प्यायलाही न घालता तसचं बाहेर काढलं .
अविने एका रस्त्यावरच्या हॉटेलशी गाडी थांबवली होती . तो म्हणाला तू ऑर्डर दे, मी आलोच तोंड धुवून . तिने गाडीतून शाल काढली . थंडी चांगलीच वाढली होती . इतक्या गडबडीत अवि मात्र एकदम शांत वाटत होता . तसा तो नेहमीच संयमी आणि शांत असायचा . क्रायसेस मधे तू इतका balanced कसा असतोस, माधुरी नेहमी त्याला आश्चर्यानी विचारायची .
ती एका टेबलाशी जाऊन बसली आणि वेटरला ऑर्डर दिली . अगदीच तुरळक लोक होते . थंडीचा कडाका वाढू लागला होता त्यामुळे तसेही फार कमी लोक दिसतात रात्रीचे बाहेर आणि इथे हाय वे वर कोण असणार आत्ता?
अवि फ्रेश होऊन आला आणि दोघांनी खाऊन घेतलं .
" अवि तू बिल देऊन ये तो पर्यंत मी ही जरा तोंड धुवून येते . . " म्हणून ती बाथरूम कडे वळली .
बाहेर आली तर अवि हॉटेलच्या मालकाशी बोलत होता .
" चल, निघायच? "
" बाईसाहेब , कस निघायचं . . गाडी पंक्चर आहे! "
" काय? अरे देवा, हे काय आणखीन? अरे पण आपण आता आलो तोपर्यंत तर व्यवस्थित होती . अशी कशी पंक्चर झाली ? "
" अग तेच तर कळत नाही . कुणीतरी टायरला अगदी ब्लेड मारल्या सारखं दिसतंय . तेच विचारत होतो यांना, कुणाला पाहिलं का गाडीशी खेळ करताना . पण थंडीमुळे सगळेच आत बसलेत . बाहेर लक्षच नाही कुणाचं . "
" आता काय करायचं? " माधुरी काकुळतीला आली होती .
" तू थांब इथेच . हे मालक म्हणाले इथे आहे एक दुकान मेकॅनिकचं बाजूलाच . मी बघून येतो . "
माधुरी तिथेच थांबली तिच्या जिवाची नुसती घालमेल चालली होती . आता हे काय नवीन? घड्याळात पाहिलं तर 8 .30 झाले होते . आता किती उशीर होतोय अजून कुणास ठाऊक . . . .
" इथे फोन आहे का हो? " तिने हॉटेलच्या मालकाला विचारलं .
" लोकल असेल तर कर इथूनच , नाहीतर तो तिथे पब्लिक फोन आहे . "
" लोकल नाही, मी करते तिथून . "
तिने नंबर फिरवला . . . . " इस रूट की सभी लाईने व्यस्त हैं , कृपया थोडी देर बाद डायल करें . . "
चार वेळा तेच एकल्यावर तिने नाद सोडला . इतक्यात अवि आला .
" चल, शोधून आणलं त्या मेकॅनिकला . करतोय तो रिपेयर . . . लागला का फोन? "
" नाही नं . . "
गाडी दुरुस्त होईपर्यंत दोघे मेकॅनिकच्या गॅरेजमधेच बसले .
" साब , इतना लंबा जानेका तो स्टेपनी रखना मांगता . अभी देखो, कितना टाईम का खोटी हुआ . " पैसे घेत तो बोलला .
" ठीक है , ठीक है . . " म्हणत अविने गाडी स्टार्ट केली .
माधुरीनी सुटकेचा निश्वास टाकला . थोड पुढे गेल्यावर अचानक म्हणाली . . " त्याला रे कसं माहीत आपण लांब जातोय का जवळ . . . ? "
" अग अंदाजे म्हणाला असेल तो . . नाहीतर आपलं बोलणं ऐकलं असेल . तू उगाच भलत्या गोष्टींचा विचार करू नकोस . झोप जरा वेळ, पुन्हा तिथे जाऊन झोपायला मिळालं नाही तर त्रास होईल . "
माधुरी मागे उशीवर डोकं टेकून झोपण्याचा प्रयत्न करत होती .

ग़ारठा फारच वाढला तश्या अविने खिडक्या लावून घेतल्या . बाजूला माधुरीच्या अंगावर त्याने एका हाताने शाल सारखी केली . बाहेर काळोख गडद होत चालला होता . रस्त्यानी त्याची एकच गाडी चालली होती . गाडीच्या हेडलाइट शिवाय कुठलाच उजेड नव्हता . अविला जरा थकल्यासारखंच झाल होत . दिवसभर ऑफिसमधेही कामाचा व्याप खूप होता आज . खर म्हणजे सतीशला तरी फोन करून

कळवायला हवं होतं उद्या येणार नाही ते . पण माधुरीची अवस्था बघितली आणि काही सुचलंच नाही . तात्या म्हणजे तिचा नेहमीच वीक पॉईट . त्यांना जरा खुट्ट झालं तरी ही धावणार .
दामलेकाकू आहेत म्हणून मुलांची तरी काळजी नाही .
अविच्या डोक्यात विचारांची चक्रे सुरू होती . कितीतरी वेळ तो एका संथ लयीत गाडी चालवत राहिला . अधुन मधून एखादी तुरळक गाडी नाहीतर ट्रक जात होता . घड्याळ्यात बघितल तर **10 . 15** झाले होते .
" बापरे . . . इतका वेळ झाला, अजून कसा आला नाही फाटा? चुकलो की काय आपण? "
माधुरीही इतका वेळ अगदी शांत झोपली होती .
" माधु . . " अविने हाक मारली तशी ती गाढ झोपेतून एकदम दचकून उठली .
" काय झाल? आलो का आपण? किती वाजलेत? "
" अग दचकलीस का? **10 . 15** झाले , अजून फाटा कसा आला नाही? चुकलो का रस्ता? "
माधुरी ओळखीच्या खुणा शोधु लागली . हा रस्ता तिचा नेहमीचाच होता . बाजूनी शेत मळे आणि बंद पडलेली केमिकल फॅक्ट्री .
" अरे नाही , बरोबर आहे . पाच मिनिटात आलाच बघ फाटा . "
पाच मिनिटात फाटा दिसल्यावर अविला हायस वाटल . फाट्यावर वळण घेऊन गाडी गावाच्या दिशेला निघाली . आता बस **3 - 4** किलोमीटर ही शेती संपली की वस्ती लागेल .

गाडीनी मैलाचा दगड पार केला आणि एक हिसका देऊन थांबली . काही सेकंद एकदम शांतता पसरली . दोघांच्या चेहेऱ्यावर . . आता काय? . . . पसरलं . अविने पुन्हा एक दोनदा गाडी सुरू करण्याचा प्रयत्न केला, पण गाडी काही दाद देईना .
माधुरी नुसती सुन्न बसून होती . अवि खाली उतरला आणी त्यानी बॉनेट वर करून काय झालय बघण्याचा प्रयत्न केला . पण एक नाही दोन नाही, गाडी नुसती घू ऽऽ घू ऽऽ घू ऽऽ असा काहीसा आवाज करत राहिली .
माधुरी गाडीतून उतरली तशी एकदम थंडी झोंबली तिला . तिने शाल अंगाभोवती अधिकच घट्ट लपेटून घेतली .
" आता काय रे करायचं? "
" बघ ना . दुष्काळात तेरावा महिना . वस्ती किती दूर आहे अजून? कुणी मिळेल का इथे मदतीला? "
" अरे हे पाटीलकाकांचं शेत सुरू झालंय . म्हणजे आपण तीनएक किलोमीटर आहोत वस्ती पासून . इथे काही मिळणार नाही . चल अस करू, गाडी राहू दे इथेच . उद्या आणता येईल . असं पाटील काकांच्या शेतातून चालत जाऊ . रस्त्यानी जायला वेळ लागेल . "
अविचा नाइलाज होता . इथे वेळ फुकट घालवण्यात अर्थ नव्हता . माधुरीचे डोळे घरच्या वाटेकडे लागले होते . तीनच का, आत्ता **10** किलोमीटर चालावं लागलं असतं तरी तिची तयारी होती .
अविने गाडी बंद केली . गाडीतून टॉर्च , स्वेटर घेतला आणि माधुरीच्या पाठोपाठ चालायला लागला . तिला सगळे रस्ते माहीत होते , त्यामुळे तो तिच्या मागूनच चालत होता .
हवेत एव्हाना चांगलाच गारठा होता . माधुरीची पावले झपाझप पडत होती . रस्त्याला वळसा घालून ती एके ठिकाणी शेतात शिरली . पायवाट तेव्हढी दिसत होती बाकी मिट्ट काळोख होता . अवि मागून टॉर्चचा प्रकाश दाखवत होता, त्यातून मार्ग काढत माधुरी चालली होती . दोघेही न बोलता चालले होते . बोलण्यासारखं काही नव्हतहीं . दोघांची पावल एका लयीत झपाझप पडत होती . खाली बघून चालणं क्रमप्राप्त होतं . वाटेशिवाय फारसं काही दिसतही नव्हतं . पाऊलवाट अधिकच निमुळती होत गेली . खाच खळगे बघून दोघांचे मार्गक्रमण चालू होते .
माधुरीच्या डोक्यात पुन्हा विचारांनी पिंगा घालायला सुरवात केली . आता मात्र तात्यांना घरी घेऊन जाणार . काही ऐकायची नाही मी यावेळी त्यांचं . असा जीव टांगणीला लावतात नुसता . सध्या भिका करतो सगळं म्हणून ठीक आहे . पण तोही म्हातारा झालाय आता . बाजूचं शेत आता चांगल पुरूषभर उंचीचं झालं होतं . तिने एकदा टाचा ऊंचावून बघण्याचा प्रयत्न केला, पण काही दिसेना . अवि आपला निमूटपणे तिच्या मागून चालला होता . पुरूषभर उंचीचं शेत संपून पुन्हा लहान होत चाललं होतं . ती आता नुसतीच चालत होती . निर्वि कारपणे . आता पाटीलकाकांच्या शेतातलं छोटसं घर लागेल .
तितक्यात तिच्या खांद्यावर थंडगार स्पर्श झाला आणि ती जवळजवळ ओरडलीच . तो अविचा गार पडलेला हात होता . दुसऱ्या हातानी तो खूण करत होता . त्याच्या बोटांच्या दिशेने बघितलं तर माधुरी गार पडली . समोर त्यांची गाडी उभी होती .
" हे कसं शक्य आहे? परत तिथेच कसे आलो आपण? "
" माधु, अग झालं असेल चुकून . तुझी मनस्थिती आधीच ठीक नाही . विचारांच्या नादात चुकला असेल रस्ता . आपण रस्त्यानेच जाऊयात का? "
हे कसं झालं ते माधुरीला कळेना . इतके वर्ष पायाखालचा रस्ता . डोळे झाकूनही जाता आलं असतं . आणि मग कसे काय चुकलो आपण? पण पुन्हा वेळ घालवण्यात अर्थ नव्हता . कदाचित रस्त्याने गेलो तर एखादं वाहन मिळेल . आता दोघे हमरस्त्याने चालू लागले . माधुरी जरा जरा वेळानी मागून एखादं वाहन येतंय का बघत होती . खरंच पाय दुखायला लागले होते . थंडीही बोचत होती . कुणी भेटलं तर किती बरं होईल! वस्ती काही फार दूर नाही . दम लागला होता चालून . कधी एकदा घर येतंय असं झालं होतं .
एका ठिकाणी रस्त्याने वळण घेतलं आणि दोघे गोठून जागच्या जागी उभे राहिले . . . समोर त्यांची गाडी होती .

आता मात्र माधुरी चांगलीच घाबरली . तिच्या पायातून त्राण निघून गेल्यासारखं वाटलं तिला . अविही सुन्न झाला होता . काय चाललंय याचा काही पत्ता लागत नव्हता . पुन्हा गाडीपाशी कसे आलो???

" हे कसं झालं अवि, आपण सरळ रस्त्याने निघालो . वाटेत वळलोही नाही कुठे . दुसरा कुठला रस्ताही नव्हता . अवि, मला तर काही सुचत नाही, काय चाललय हे? "

माधुरी रडकुंडीला आली .

अविला तरी कुठे कळत होतं . . . पण तिला धीर द्यायला म्हणून उसनं अवसान आणून म्हणाला . .

" हे बघ असा धीर सोडू नकोस . आपण शेतातून जाऊयात का परत? नीट लक्ष देऊन चल म्हणजे चुकणार नाही . "

नाईलाज होता . जाणं तर भाग होतं . असं रस्त्यात बसून चालणार नव्हतं .

अविने घड्याळात बघितलं . रात्रीचे **12 . 30** वाजले होते . आजूबाजूला मिट्ट काळोख . माधुरीला आता अंधाराची भीती वाटायला लागली होती . दोघांच्या मनातले मघाचे विचार कुठल्याकुठे गेले होते . आता फक्त रस्ता सापडवायचा होता . थंडी मी म्हणत होती . पण आता तर थंडीही वाजत नव्हती .

दोघांना भीतीने आणि चालून घाम फुटला होता .

एक एक पाऊल जपून टाकत दोघे एकमेकांच्या आधाराने चालत होते . चालत होते हे कदाचित त्यांना कळतही नव्हत . एखाद्या यंत्रा सारखे पाय पडत होते . किती वेळ झाला होता चालून कुणास ठाऊक . परत पुरूषभर उंचीच्या शेतात शिरले दोघे . माधुरीला तर आपला श्वास किती जलद होतोय हेही कळत नव्हतं .

पुरूषभर उंचीचं शेत संपलं आणि माधुरीच्या हातापायाला घाम फुटला . तिने हळूच घावरत घावरत समोर बघितलं . मघासारखं नाही नं झालं परत? समोर मोकळ शेत दिसल्यावर तिने सुटकेचा निश्वास सोडला . चला म्हणजे बरोबर रस्त्यावर आलो एकदाचे . पण माधुरीला ओळखीच्या खुणा दिसेनात . पाटीलकाकांची पंप बसवलेली विहिर, त्याला लागून असलेलं कौलारू घर . . पण ती न बोलता चालत राहिली . तिला अविला अजून घाबरवायचं नव्हतं .

जरा पुढे गेल्यावर समोरून कुणीतरी चालत येत आहे अस वाटत होत . दोघं एकमेकांकडे बघून समाधानाचं हसले . पटपट पावले उचलीत ते येणाऱ्या व्यक्तिपर्यंत पोहोचले .

एक म्हातारा माणूस अंगावर डोक्यापर्यंत घोंगडं लपेटून काठी टेकत चालला होता . एवढ्या रात्री हा एकटा कुठे चाललाय हा विचार तरी कशाला त्यांच्या मनाला शिवेल . . . तो तर जणू देवदूतच वाटला त्यांना .

" आजोबा, जरा रस्ता हरवलोय . वस्तीकडे जाणारी वाट कुठली? तुम्ही तिकडूनच येताय ना? " अविनी विचारलं .

" व्हय जी, गावाकडनंच आयलोय . आस या अंगानी , शेताच्या कडंकडनं जा, एक इहिर लागल . तेच्या उजव्या अंगान सरल जत न्हाय ,गावाकडंच जातं ती वाट . " आजोबांनी सांगितलं .

" आजोबा, किती दूर आहे अजून ? " माधुरीनं विचारलं .

" आलंच , जास्त दूर न्हाय जी . लई उशीर झालाय बाबांनो . जपून जाय . "

थरथत्या आवाजातील हे वाक्य ऐकून काय वरं वाटलं दोघांना . .

बराय . . . म्हणून तो चालायला लागला .

उशीर झालाय म्हटल्यावर अविनी घड्याळ्यात बघितल . **1 . 30** वाजला होता . चला आता काय सापडलीच वाट म्हणून पाय दुखत होते तरी नवीन उत्साहानी दोघे चालायला लागले . माधुरीने मागे वळून बघितलं . आजोबा कधीच गेले होते निघून . शेतातून गेले वाटतं, म्हणत तिने समोरची वाट धरली .

मघाशी काय झालं कुणास ठाऊक , पण चला, आता आलंच म्हणत दोघे चालत राहिले .

जवळपास अर्धा तास चालल्यावर विहिर लागली तेव्हा दोघांच्या जिवात जीव आला . अजून किती जायचंय माहीत नव्हतं . आजोबा म्हणाले होते, हे आलंच . पण या गावातल्या लोकांना काय सवयच असते . कितीही लांब असलं तरी हे आलंच . .

आजोबांनी सांगितल्याप्रमाणे दोघे उजव्याबाजूनी निघाले . आता मात्र पायाचे तुकडे पडायची वेळ आली होती . चालून चालून घश्याला कोरड पडली होती . पाणी गाडीत राहिलं होत . जवळपास **11 . 30** पासून चालत होते दोघं . आता **2 . 30** वाजायला आले होते . तसेच रेटत दोघे चालत राहिले . कदाचित अर्धा पाऊण तास तरी चालले असावेत पुढे .

समोर जे दिसलं ते बघून माधुरीला भोवळ यायची बाकी राहिली . ती मटकन खाली बसली . तिलाच काय अविला देखील रडू फुटलं . समोरच्या बाजूने पायवाट वळत होती . . . आणि . . . समोर उभी होती त्यांची गाडी . . . .

कसबस माधुरीला उचलून अविनी गाडीपाशी आणल . तो पर्यंत माधुरी ओक्साबोक्शी रडत होती .

" अवि . . . हे काय चाललंय? "

" माधु . . . माझी बुद्धीच काम करत नाहीये . हे काय चाललंय ते मला तरी कुठे कळतंय . पण तू अशी रडू नकोस . आवर स्वत:ला . आपण काहीतरी उपाय शोधू . हे बघ, आपल्याच गावात आपण असे हरवू का? तू शांत हो पाहू आधी . "

अविला देखील काही सुचत नव्हतं . हे कसं शक्य आहे??? हाच प्रश्न राहून राहून येत होता . प्रश्नांचा गुंता वाढत होता . त्याने गाडीतून पाण्याची बाटली काढून माधुरीला दिली . घड्याळात पाहिलं तर **3 . 45** झाले होते .

" हे बघ, मी पुन्हा गाडी चालू करण्याचा प्रयत्न करतो . तू बस गाडीत . दमली आहेस . नाहीतर बघ , **3 .45** झालेत . पहाट होईल इतक्यात . नक्की इथून वाहनं जातील . आपल्याला कुणीही लिफ्ट देईल . "
खर म्हणजे अविला एक पाऊलही टाकवत नव्हत पुढे . कशीबशी माधुरीची समजूत घालून तिला गाडीत बसवलं आणि तो गाडी सुरू करण्याचा प्रयत्न करू लागला . बराच प्रयत्न करूनही गाडी काही दाद देईना .
शेवटी थकून तो ही गाडीत जाऊन बसला . कुणाची तरी वाट बघण्याशिवाय गत्यंतर नव्हतं . वाट पुन्हा शोधण्याचा प्रश्नच नव्हता .

" अवि, तात्या ठीक असतील ना? " बऱ्याच वेळानी माधुरीनी प्रश्न विचारला . मागच्या **4 - 5** तासात ती हा विचार करायचाही विसरली होती .
" तू काळजी करू नकोस . तात्यांना काही होणार नाही . " तिचा हात हलकेच हातात घेत अवि म्हणाला . मागच्या काही तासांच्या घटनांनंतर तिला हा स्पर्श बराच धीर देऊन गेला .
जवळपास पाऊण तास दोघे तसेच बसले होते . मन झालेल्या घटना मानायला तयार नव्हतं . आणि तात्यांच्या आठवणीनी अधिकच व्याकूळ झाल होतं . काही मिनिटावर होते तात्या, पण जाता येत नव्हतं . . कसली ही अगतिकता . .
हळूहळू अंधार जाऊन झुंजूमुंजू व्हायला लागलं . पक्ष्यांचा आवाज ऐकू येऊ लागला . इतक्या वेळाच्या अंधारानंतर हा उजेड किती हवाहवासा होता .
मागून गाडीचा आवाज आला तेव्हा दोघांच्या जिवात जीव आला . आपण अजून माणसात आहोत . . .
गाडी जवळ येऊन थांबली तशी त्यातील माणसाने दोघांना ओळखलं .
" अरे, माधुरी . . जावईबापू . . . काय झालं ? गाडी बंद पडली वाटतं? कधीपासून थांबला आहात इथे? "
आबा पाटलांना बघून दोघांना खूप हायस वाटल .
काय सांगणार आता . .
" झाला थोडा वेळ . बर झालं आबा तुम्ही भेटलात . घरी सोडाल आता आम्हाला? "
" अग हे काय विचारणं झालं? चला बसा, बसा गाडीत दोघेही . तुमची गाडी आणू मागून . "
अविनी बॅगा ठेवल्या आणि दोघे आबा पाटलांच्या गाडीत बसले .
" अरे पोरांनो, गाडी बंद पडली तर ठेवायची तिथेच आणि हे काय पुढच्या वळणावर आपलं घर आहे . तिथे यायचं ना . रस्त्यात कशाला थांबलात? "
या प्रश्नाच दोघांकडेही उत्तर नव्हतं . . .
तात्या कसे आहेत हे विचारायचं देखील भान राहिल नाही .
तात्यांच्या घरासमोर गाडी उभी करत आबा पाटलांनी खणखणीत आवाजात आरोळी ठोकली . .
" तात्या, अरे बघ कोणाला घेऊन आलोय . . "
" म्हणजे , तात्या घरीच आहेत? " माधुरीला एव्हढा आनंद झाला की ती पळतच घरात शिरली .
आबा मात्र, " म्हणजे, आणि कुठे असणार? " म्हणत आत आले .
आबांच्या आरोळीने आत्ता पर्यंत तात्या आणि भिका, दोघेही बाहेर आले होते . तात्यांना धडधाकट समोर उभं बघून अविला एकदम हायसं वाटलं . तात्या सुखरूप अहेत म्हणून त्यानी मनातल्या मनात देवाचे आभार मानले .
माधूरी मात्र पळत जाऊन तात्यांना बिलगून हमसून हमसून रडायला लागली . सगळे नुसते अचंबित होऊन बघत राहिले .
" काय हो जावईबापू, असे अचानक कसे आलात ? आणि आमच्या बयाबाईला काय झालं? अशी रडतेय का ती? " तात्यांनी माधुरीला प्रेमानी जवळ घेत विचारल .
" तात्या काल रात्रीपासूनच साचलंय, रडून घेऊ द्या तिला . सगळं सांगतो . " अविने सांगितलं .
माधुरी शांत होईपर्यंत भिकाने सर्वांसाठी गरमागरम चहा आणला . चहाचा घोट पोटात गेल्यावर बरं वाटलं .
त्यानंतर माधुरी आणि अविने सगळी घडलेली हकीकत सांगितली .
" अस काय झालं असेल हो तात्या? " माधुरीनी विचारल .
" चकवा झाला बेटा . आपली सगळी बुद्धी शाबूत असून आपण चकव्याला फसतो . मला सांग, फोन कुणी केला हेही तुला सांगता येत नाही, मला काय झालंय हेही त्या व्यक्तिला सांगता आलं नाही, मग तू काय म्हणून विश्वास ठेवलास त्याच्यावर ?"
" खरंच की तात्या . तुमचं नाव ऐकलं तस मी बाकीचा विचारच केला नाही . तुम्हाला फोन केला तोही लागला नाही . "
" आणि आम्ही जे रस्ता चुकलो त्याच काय? " अविनी विचारल .
" तोच चकवा . कधी कधी अगदी नेहमीच्या रस्त्यावरही चुकतो आपण . की कोण चुकायला लावतो कुणास ठाऊक? असं होतं खर, पण का? याचं उत्तर माझ्या कडेही नाही . काही गोष्टी आपल्या समजण्यापलीकडे असतात . बरं, आता पोरांना कळवा आधी सगळ ठीक आहे म्हणून . "
सगळ्याच प्रश्नांची उत्तर मिळाली असं नाही . पण काही गोष्टींना खरंच स्पष्टीकरण नसत . हेच ते अनाकलनीय, गूढ . सगळेच धडपडत असतो याची उत्तर शोधण्यासाठी, मिळतातच असं नाही . . . .

दुपारीच दोघे परत जायला निघाले . दिवसा उजेडी . . पुन्हा रात्रभर शेतात फिरायचं नव्हतं नां!!!!!

**- अनुपमा**

**टीप** - ही कथा लिहिताना मला अनेक अडचणी आल्या . कथेचा कागद **3** वेळा हरवला . लिहिलेली कथा **2** वेळा डिलीट झाली . कथा लिहायला सुरुवात केली आणि **2** दिवस 'मायबोली' उघडेना . टाईप करताना माझ्या कंप्यूटरनी बराच त्रास दिला . **2** वेळा संपादकांना पाठवलेली कथा मिळाली नाही . पण या 'चकव्याला ' चकवून मी शेवटच्या दिवशी ही कथा पूर्ण केलीच .
असे अनुभव वाचकांना आल्यास लेखिका जबाबदार नाही . प्रत्येकाने आपापल्या जबाबदारीवर ही कथा वाचावी . . . परंतु असे अनुभव आल्यास जरूर कळवावे ही विनंती . ... **अनुपमा**

## मी, ती आणि सिगरेट

लालबागच्या मेन गेटमधून आत घेऊन मी पार्किंगमध्ये गाडी वळवली तेव्हा तिथे फ़ारसं कुणी नव्हतं . एवढ्या लवकर पार्कमध्ये कोण कशाला मरायला येईल? तेही एप्रिलच्या रखरखाटात . . . . जवळपास साडेचार वाजले होते तरी ऊन चटके देत होतं . लालबागच्या मेन गेटमधून आत शिरल्यावर एक लहान टेकडीसारखा भाग आहे . पार्किंगमध्ये गाडी नीट पार्क करून मी त्या टेकडीवर चढून गेलो .



" वैताग . . . . सालं आयुष्य एक वैताग आहे नुसता . " मला मोठ्यांदा ओरडावसं वाटलं . खिशातून पाकीट काढून मी एक सिगरेट पेटवली आणि सवयीप्रमाणे मिंट आहे का ते पाहण्यासाठी हात शर्टाच्या खिशाकडे गेला . मी स्वत:शीच चरफ़डलो . हवीये कशाला मिंट? नाहीतरी अश्विनी थोडीच आहे इथे . . . . "sumit, if you forget to have mint on that, I am gonna throw you out of my house!" Her house? Her house? God!!! स्पष्टच बोलायचं तर **75** % डिपॉझिट मी भरलंय घराचं! Whose house is it then? लग्न करू नये माणसाने! बॅचलर राहावं, ऐश करावी . . . . मजा होती लग्नापूर्वी . . . दोन बेडरूमचा प्रशस्त फ़्लॅट घेऊन एकटा राहत होतो . वीकेंडला किंवा लहर लागेल तेव्हा उनाडक्या करायला समानशील मित्रांचा ग्रुप होता . . . . अनिल, सॅम, लकी (साला हा अजूनही लकीच आहे, लग्न न करता ऐश करतोय girlfriend बरोबर) आम्हीच अडकलो . प्रेमात पडणं ऐन हिवाळ्यातल्या पहाटेसारखं असतं . डोळ्यांसमोर नुसतं धुकं असतं आणि चार हातांसमोरचं सत्य दिसेनासं होतं मग . . . . श्या, काहीतरी भिकार उपमा वगैरे भाषेत बोलायला लागलो का काय मी? पुस्तकी किडा अश्विनी आहे; मी नव्हे . रात्रीबेरात्री बेडलॅंप लावून पुस्तकं वाचत बसायचं . . . . वैताग!

मी सिगरेट ओढतो हे काय तिला माहीत नव्हतं? दिवसाला किमान पाच सहा तरी!! माहीत नव्हतं का तिला? कशाला हो म्हटलं तिने मग? आधी एका प्रोजेक्टमध्ये असताना माझ्यासोबत गप्पा मारता याव्यात म्हणून ती माझ्यासोबत स्मोकिंग झोनमध्ये यायची . . . . तेव्हा तिला नाही एवढा त्रास झाला ते? की तेव्हा ती मनात म्हणत असेल " आत्ता हव्या तेवढ्या सिगरेट्स स्मोक करून घे . लग्नानंतर दाखवते तुला! " करेक्ट . . तसंच असणार . वाट बघत असणार अश्विनी मी कधी तावडीत सापडतोय सुधरवायला ते! सगळ्या मुली अशाच असतात

का हिटलरछाप? अश्विनी तर आहेच . . . शंकाच नको! देवाने सगळे सद्गुण हिच्यात ओतलेत म्हटल्यावर तिला जगाला शहाणं करायलाच हवं . आता कशीबशी तिने मला दिवसाला तीन सिगरेटची परवानगी दिलीय . साली ती काय फ़ॅमिली प्लॅनिंगची कन्सेप्ट आहे का सिगरेट्स म्हणजे? दो या तीन . . . बस?

. . . . . . . सिगरेट संपवून मी घड्याळ बघितलं . चार - पन्नास!! वेळही जाता जात नाहीय . खरं तर मला वेळ का घालवायचा आहे तेही कळत नाहीये . फ़क्त आज काहीही करून घरी जायचं नाहीये, तेवढं कळतंय . इथे बसेन अख्खा वेळ किंवा भटकेन असाच निरुद्देश कुठेतरी . . . . Anyways, she does not need me!

वर्षभरापूर्वी अश्विनी माझ्या प्रोजेक्टमध्ये पहिल्यांदा आली तो दिवस मला अजूनही आठवतो . PM म्हणून माझा तो पहिलाच प्रोजेक्ट . . . . माझ्या प्रोजेक्टच्या PL ची मी वाट पाहत होतो . तिच्या आधीच्या कंपनीमध्ये रिलीज फ़ॉर्मॅलिटीज मध्ये काहीतरी प्रॉब्लेम झाल्याने तिचं येणं बऱ्यापैकी लांबणीवर पडलं होतं . आणि माझ्या कंपनीने तिच्यात एवढी सवलत देण्यासारखं काय पाहिलं असावं, हा प्रश्न मला पडला होता . त्याचं उत्तर मला ती जॉइन झाल्यानंतरच्या एक दोन महिन्यांतच मिळालं . खरोखर इतकी exceptionally talented व्यक्ती मी अजून बघितली नव्हती . She was efficiency personified!

तेव्हाच कधीतरी मी तिच्या प्रेमात पडलो असेन . Actually न पडतो तर नवल! ती सुंदर होती, professionally perfect होती, पेंटिंग करायची, कविता लिहायची, झपाटल्यासारखी वाचन करायची, त्यावर भरभरून बोलायची, गाणी म्हणायची . . . मला तर वाटतं असली कुठली गोष्टच नव्हती जी तिला जमली नसती! तिने माझ्यात काय पाहिलं देव जाणे? (अनिलची कमेंट : She must have fallen for your body, pal! Your daily workouts have paid off!! यावर नंतर सॅम आणि लकी वाह्यात सुटले होते!) माझी technology आणि जिम यापलिकडे जायची मला खरंच कधी आवश्यकता वाटली नव्हती . घरात technology वगैरे व्यतिरिक्त पुस्तकं आली ती अश्विनीबरोबर . . . . मला वाचायचा जाम कंटाळा होता . पहिली ओळ जेमतेम वाचताना माझे डोळे मिटायचे . अश्विनी मात्र मूड असेल तेव्हा उशाशी बेडलॅंप लावून तासंतास वाचत बसायची . . . . .

प्रोजेक्टच्या RS phase मध्ये माझं आणि अश्विनीचं रूटीन बरंच hectic झालं . रात्री साडे नऊला वगैरे देखील client meetings सुरु होत असत . मीटिंग आटपून घरी जायला निघेपर्यंत बारा वाजत आलेले असायचे . मला असल्या वेळांची सवय होती पण अश्विनीला त्याचा प्रॉब्लेम होत असावा . पहिले पहिले ' जाईल की ती कॅबने! ' असा विचार करून निघून जाणारा मी तिला आपणहून विचारून घरी सोडायला लागलो . माझ्या घराच्या थोड्या अलिकडे असणाऱ्या अपार्टमेंट मध्ये ती राहत होती . तिच्या एका मैत्रिणीबरोबर . . . . . " मी एकटी राहू शकत नाही . मला अंधाराची फ़ार भीती वाटते . " एकदा बोलता बोलता तिने सांगितलं होतं . मला तेव्हा खरोखर गंमत वाटली होती . " अंधाराची भीती? काहीही . . . . " मी कसाबसा हसू दाबत उद्गारलो . " सुमित, तुला हसू येतंय या गोष्टीचं? " तिचा काहीसा दुखावलेला आवाज ऐकून मी एकदम चपापलो आणि एकदम विषय बदलला .

. . . . . बंगलोरच्या वेळी अवेळी पडणाऱ्या पावसाचा मी शतश: ऋणी आहे . अशाच एका पावसाळी रात्री मी आशूला तिच्यावरच्या माझ्या प्रेमाची कबुली दिली होती . मेमधला एक प्रखर ऊन असलेला दिवस होता तो! दिवसभर उकाडा जास्तच जाणवत होता तेव्हा कळलं नाही पण संध्याकाळपर्यंत चांगलंच आभाळ भरून आलं आणि सहा साडे सहाला भयंकर पाऊस कोसळू लागला . नेहमीप्रमाणे client meeting आटपून निघताना आम्हाला आठ वाजले . एरवी आशू ऑटोने गेली असती; पण त्यादिवशी पावसाचा एकंदर नूर बघून मी तिला माझ्यासोबत चलायला सांगितलं . तिच्या अपार्टमेंटपाशी आलो तेव्हा तो पूर्ण भाग अंधारात बुडालेला होता .
" मेमसाब, वो बडा फ़ॉल्ट हो गया बारिश की वजह से . . . . . बिजली देर रात तक नही आयेगी . " रखवालदारानं धावत येऊन आशूला सांगितलं . ती का कोण जाणे, प्रचंड अस्वस्थ झालेली दिसली .
" अश्विनी काय झालं? "
" सुमित, माझी रूमी गावाला गेलीय एक आठवड्यासाठी . . . म . . मला एकटं राहण्याचं काही नाही पण आज लाईट देखील नाहीयेत . . . . आणि एकटं राहायचं म्हणजे . . . म्हणजे . . . " मी चटकन मनाशी काहीतरी विचार केला .
" मी थांबतो लाईट येईपर्यंत . . . . . . " ती पटकन अगदी निर्धास्त झाल्यासारखी निरागस हसली .

. . . . तिच्या डायनिंग टेबलवर लावलेल्या दहा बारा मेणबत्त्यांच्या उजेडात चक्क फ़िल्मी स्टाईलने गुडघ्यांवर बसून मी तिला त्याच वेळी माझ्या प्रेमाची कबुली दिली . For me, that is one memorable day! Thanks to those rains of Bangalore!!!

नंतरच्या सगळ्या घटना स्वप्नात घडाव्यात तशा भराभर घडत गेल्या आणि सहा महिन्यांपूर्वी आम्ही लग्न केलं . माझ्या घरचे आशूवर अतिशय खूश होते . माझ्या आईने तर आशूसारखी बायको मिळाल्याबद्दल मला मी अतिशय लकी असल्याचं सर्टिफ़िकेट देऊन टाकलं आणि आशूला मला सुधारण्याबद्दल बजावलं .

अश्विनीने आईचा सल्ला दुर्दैवाने फ़ारच मनावर घेतला. बाकी बाबतीत तिची फ़ारशी तक्रार नव्हती. Her major concern was my smoking! And god..... I hated that nagging!!! Engineering ला होस्टेलवर गेल्यानंतर कधीतरी लागलेली ती सवय! त्याच्याशी जोडल्या गेलेल्या असंख्य आठवणी आहेत.... कॉलेजच्या, अभ्यासाच्या आणि आत्ता माझ्यापासून दूर गेलेल्या गुपच्या.... PLs मध्ये अभ्यास करून वैतागलो की आम्ही तिघं रूमीज रात्री बारा साडेबाराला " चल यार एक सुट्टा मारके आते है! " म्हणून बाहेर पडायचो. दिवसा रहदारीने गजबजलेल्या पण आता अगदी शांत झालेल्या त्या रस्त्यांवरून फ़िरताना अगदी वेगळंच फ़ीलिंग यायचं. आणि कॉर्नरवरच्या एकमेव उघड्या टपरीवरून चहा आणि सिगरेट मारून आम्ही गप्पा मारत मारत पुन्हा रूमकडे परतायचो.

यातलं काहीही अश्विनीला समजत नाही. किंवा समजून घ्यावंसं वाटत नाही. तिच्यामते सिगरेट पिणं ही एक वाईट सवय आहे आणि त्याने तिलापण त्रास होऊ शकतो. झालंच तर आमच्या होणाऱ्या मुलांना.... लग्नाआधी या anti smoking campaign चा एक भाग म्हणून तिने मला एक गोष्ट वाचून दाखवली होती. एकमेकांवर निरतिशय प्रेम करणाऱ्या एका जोडप्याची ... तो नवरा स्मोकर असतो आणि त्याच्या बायकोला शेवटी लंग कॅन्सर होतो, वगैरे वगैरे.... साले लग्नाआधीचे दिवस ते... आशूबद्दलचं प्रेम उतू चाललं होतं तेव्हा.... त्या भरातच मी तिला प्रॉमिस केलं होतं.... "I will stop smoking Ashoo. If I want that badly, I will smoke occasionally. But never in front of you!!!"

.... प्रोजेक्ट आणखीच stressful झाला तसं माझ्याकडून ते प्रॉमिस मोडलं गेलंच.... मरू दे.. मी काय हरिश्चंद्र होतो का? तो म्हणे स्वप्नात कोणाला काय प्रॉमिस करून बसला. " पण तू तेव्हा चांगलाच शुद्धीवर होतास नं? मग? तू कसं प्रॉमिस मोडलंस? " अश्विनीचा आवाज धारदार होता. " शुद्धीवर नव्हतो म्हणूनच.... " माझ्या तोंडून फटकन शब्द निघून गेले. बाप रे!! तिला पुन्हा बोलतं करायला मला पूर्ण आठवडा खर्ची घालावा लागला.

तेवढं सोडलं तर आमचा एक सुखी संसार होता... आहे... होता... God only knows! आशू एक परफ़ेक्ट सहचारिणी आहे. मला आठवतो आमच्या लग्नानंतरचा माझा वाढदिवस... त्यादिवशी ती ऑफ़िसला आली नव्हती. संध्याकाळी घरी आलो तेव्हा मला आनंदाश्चर्याचा धक्काच बसला. तिने पूर्ण घर सजवलं होतं फ़ुलांच्या माळांनी आणि मला चक्क दारातच ओवाळलं होतं.... तिला असं काही काही भन्नाट सुचायचं. आणि तेव्हा तेव्हा मी तिच्या अधिकच प्रेमात पडत जायचो. मला कधीच सालं असलं काही सुचत नाही... तिच्याइतकं डोकं नाहीये ना माझ्यापाशी!

ती सर्वांची लाडकी तर आहेच! सगळ्यांशी तिचं छान जुळतं. तिच्या प्रत्येक गोष्टीचं फ़क्त कौतुकच होतं. ती लोकांचं गरज पडेल तेव्हा (आणि माझं गरज नसताना) counselling देखील करते आणि लोक तिचं ऐकतात... बिनतक्रार... हर प्रॉब्लेम का सोल्युशन है उसके पास भई! हर प्रॉब्लेम का सोल्युशन? मग मी तिला सांगितलं की तुझं हे वेळी अवेळी मला ' स्मोकिंग सोड ' सांगणं हा माझ्यासाठी प्रॉब्लेम आहे तर देईल का ती सोल्युशन? देईल का? अरे ठीक आहे यार, मानलं She is the best and I am not!!! May be it is the only mistake of hers to marry me. इतका टाकाऊ आहे माझ्या ' भयंकर वाईट ' सवयीमुळे तर द्यायचा होता ना नकार! अरे नाही मग तिचं कौतुक कसं झालं असतं? की पहा बुवा किती ग्रेट मुलगी आहे... स्वत: एवढी गुणवान असून या असल्या मुलाला तिने ' हो ' म्हटलं. बिच्चारी... आटोकाट प्रयत्न करतेय त्याला स्मोकिंगच्या वाईट सवयीपासून सोडवायचा पण तो कसला.....? श्या ... तिचे गुण, तिचं टॅलेंट, तिचं यश, तिचं वागणं, तिचा स्वभाव, तिचं घर.... अरे मी काय इतकी टाकाऊ व्यक्ती आहे का?

.... साडेसात झाले होते मी पुन्हा घड्याळ बघितलं तेव्हा. बागेत चांगलाच अंधार पडला होता. मी जीन्स झटकत उठलो. गाडीकडे चालू लागलो... कुठे जावं? घरी? नाय... नो... नेव्हर.... तिला माझी काहीच गरज नाहीये. माझ्यापाशी तिच्याइतकं टॅलेंट नाही. असलीच तर ही एक स्मोकिंगची न सुटणारी सवय.... तिला त्रास होतो त्याचा! आज नाही का म्हणाली ती "Sumit... I will throw you out of my house!" Then may be out of her life? मला गळून गेल्यासारखं झालं. मी गाडी काढली आणि मन मानेल तसा भटकत राहिलो.

.... रात्री साडेअकराला इनर रिंगरोडच्या जवळ गाडी थांबवून मी पाकिटातली शेवटची सिगरेट पेटवली.. आणि मला अशूची एकदम तीव्रतेने आठवण आली. कामामध्ये स्वत:ला झोकून देणारी, मला आवडते म्हणून दर वीकेंडला बिर्याणी बनवणारी, मला वीकेंडला हट्टाने कुठेतरी बाहेर लॉंग ड्राईव्हला वगैरे न्यायला सांगून माझ्या खांद्यावर काही न बोलता डोकं टेकून डोळे मिटून गाणी ऐकणारी, तिच्यासोबत पहिल्यांदा एका पार्टीहून रात्री उशिरा परतताना ऐकलेलं " क्या यही प्यार है? " , तेव्हा तीच अतिशय हळुवारपणे पुटपुटली होती...

" दिल तेरे बिन कही लगता नही, वक्त गुजरता नही "

. . . . माझी आशू . . . . अंधाराला घाबरणारी . . . हा विचार आला मात्र - मी अर्धी सिगरेट फ़ेकून देऊन गाडी स्टार्ट केली .

आमच्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्स मध्ये शिरलो तेव्हा रात्रीचे बारा वाजून गेले होते .
" क्या हुआ चौकीदार? "
" मालूम नही साब . . . पर कोई मेजर फ़ाल्ट लगता है . चार घंटेसे बिजली नही है . " चार तास? Oh my god! तीन पायऱ्यांची एक पायरी करत मी आमच्या तिसऱ्या मजल्यावर चढून गेलो . दरवाजा वाजवला . दरवाजा उघडण्याची वाट पाहत असताना चटकन लक्षात आलं . शेवटच्या सिगरेटचा वास अजून माझ्या भोवती रेंगाळत होता . . . . भरीस भर म्हणून आज संध्याकाळच्या चार पाच सिगरेट्सवर मी एकही मिंट खाल्ली नव्हती . पण ती जे काही बोलेल ते ऐकून घ्यायची तयारी केली मी . . . .
" कोण? " आतून आशूचा भेदरलेला आवाज आला .
" आशू . . . मी आहे . "
तिने चटकन दरवाजा उघडला आणि त्या सर्व सिगरेट्स च्या वासाची पर्वा न करता ती मला बिलगली .
" कुठे गेला होतास? सेल फोनदेखील बंद होता तुझा . . . . चार तास झाले रे लाईट नाहीयेत . मला इतकी भीती वाटत होती . . . इतकी भीती वाटत होती . . . . " ती कशीबशी म्हणाली . सकाळच्या प्रचंड वादावादीतलं तिला काही आठवत नव्हतं जणू! या क्षणी मी तिला माझ्या स्मोकिंगच्या सवयीसकटदेखील हवा होतो . मला क्षणभर संध्याकाळच्या माझ्या विचारांचं वाईट वाटलं . . . . But then it may be one part of married life! अजून काही वेळ लागेल एकमेकांना पूर्णपणे ॲक्सेप्ट करायला . . . . एकमेकांच्या भल्याबुऱ्या सवयींसकट . . . . आत्ता या क्षणी तरी आम्ही हवे आहोत एकमेकांना . . . . वादावादीचं मग सावकाश बघता येईल .

**- श्रद्धा कोतवाल**

## करणी

दिवस : वाईट, वेळ : नंतरची, ठिकाण : तेच .

" खच्च, फस . . फस " , आवाज करत फावडी आणि घमेली अथक चालू आहेत . दहा बारा जणांची ही टोळी माझ्या उरावर त्वेषाने भसाभस दगड, धोंडे, माती लोटत मला कायमचा गाडू पहात आहे .

टोळीचा प्रमुख असावा असे वाटणारा एक बाप्या माझ्याजवळ येतो, रोखून बघतो, माझ्या अस्तित्वाच्या साऱ्या खाणाखुणा मिटल्या आहेत ना याची खात्री करतो . " आता तू कोणाचाच बळी घेऊ शकणार नाहीस ! " , माझ्यावर पचकन थुंकत टोळीप्रमुख त्वेषाने म्हणतो . टोळी पुढे निघते .

मी फक्त विकट हसतो . मी संपलो आहे, पण जिंकलो आहे . माझ्या ओठांना लागलेले रक्त अजून ताजे आहे आणि माझ्या वीतभर जन्मकहाणीतला प्रत्येक तुकडा माझ्या डोळ्यासमोर स्पष्ट दिसतो आहे .

दिवस : वाईट, वेळ : अवेळ , ठिकाण : नेहेमीचेच .

" काय ठरला मग तुमचा ? " , तुपट चेहेऱ्याचा ढेरपोट्या नल्लीशेठ दातकोरणे चघळत पुन्हा एकदा विचारतो . चोरगेसाहेब वीअरच्या अर्ध्या भरलेल्या ग्लासातल्या बुडबुड्यात नजर बुडवून बसलेले . काळाकभिन्न कार्पोरेटर कोद्रे अंधारात इतका मिसळलेला की अंधार कुठे संपतो आणि कोद्रे कुठे सुरू होतो हेही कळेनासे झालेले . सर्व्हिस गर्ल्सवर खिळलेले त्याचे डोळे मधूनच झुंबरातल्या लोलकावर प्रकाश पडावा तसे लालसेने लकाकतायत . वीअर बारच्या त्या कुंद वातावरणात पोरगेलेसा इंजिनीअर छत्रे जरा बुजलेला . नल्लीशेठला कोणीच उत्तर देत नाही .

" मोठा पॉवरबाज तांत्रिक आहे, एकदा अनुभव घेऊन तर बघा . " त्याचे आपले पुढे सुरूच .

" एकदा जाऊन बघायला काय हरकत आहे ? चांगला अनुभव आल्याचं हा शेठ छातीठोकपणे सांगतो आहे तर . " चोरगेसाहेब विचार करतात .
असं काही असू शकतं, आणि इतकं सरळधोपटपणे घडू शकतं हे काही छत्रेच्या तर्काला पटत नाही .
" हां, आणि दुसऱ्यांसारखा भोंदू नाही हा तंत्रभैरव, गुप्तधन स्पेशॅलिस्ट म्हणजे फक्त गुप्तधन स्पेशॅलिस्ट, बाकी कुठल्याही कामाला हात पण नाही लावणार . तुम्ही आयुष्यभर नोकरी बिजनेस करून काय कमावणार ते एका फटक्यात काम होऊन जाते बघा . . "
" पण तुम्ही आम्हाला एवढा आग्रह का करता आहात . . " , छत्रे अखेर विचारतोच .
" अरे तुम्ही सगळे आपले बिजनेसमुळे का होईना, पण दोस्तलोग . गव्हर्मेंट नोकरीत मर मर सडते ते चांगले नाही वाटत ना आपल्याला . " , नल्लीशेठ ग्लास रिकामा करतो आणि पुढे सांगू लागतो, " आणि अजून एक कारण म्हणजे . . . " , शेठ जरा घुटमळतो .
सगळेच थोडे सावध होतात . कोद्रे कष्टपूर्वक स्वत : चे लक्ष शेठकडे वळवतो, चोरगेसाहेब ग्लास खाली ठेवतो, छत्रे तर केंव्हाचा श्वास रोखून बसलेला . आता खरे कारण बाहेर पडेल तोंडातून या हराम्याच्या .

नल्लीशेठ खांदे झुकवून डोके खाली घेतो . दबक्या आवाजात सांगू लागतो, " त्याचं काय आहे, एक करणी विधी करावा लागतो तंत्रभैरव सांगेल तसा . त्याला जोडीदार लागतो . पण घरचा, नात्यातला चालत नाही . अर्थात एकाच करणीक्रियेमध्ये फायदा दोघांचाही होतो आपोआप, ज्याच्या कुंडलीत जेवढा असेल तेवढा . . "

" तुम्ही हे आधीही केले असेल ना ? " , छत्रेला काहीतरी खटकते, " पण मग तुमचे आधीचे जोडीदार . . . . . ? "
" हे इंजिनिअर लोग फार प्रश्न विचारते रे बाबा " , शेठजी डोळे बारीक करतो .
" अरे बाबा, दर वेळेला तुमची आणि त्याच जोडीदाराची कुंडली जुळेलच असे नाही, वेळेला महत्व आहे बघा . त्या वेळेला ज्याच्याशी बेष्ट कुंडली जुळेल तो पार्टनर घेतला की झालं . "

" पण हे असलं बाहेरचं करण्यात काही रिस्क . . . " , कोद्रे अडखळत विचारू पहातो .

" काय पण डेंजर नाही . करणी करणाऱ्याला तर नाहीच नाही . एकदा माझ्याबरोबर फक्त या तर . दहा वर्षापूर्वी स्कूटर होती आपली, आता तीन मर्सिडिज आहेत, आणि मी पण तब्येतीत धडधाकट तुमच्या समोरच आहे . अजून काय प्रुफ पायजे बोला ? "

कोद्रे अन चोरगेसाहेब भलतेच उत्तेजित झालेले . छत्रेला खर तर सगळं पटतंय, पण तरी पटत नाहिये . कुठेतरी काहीतरी चुकतंय असं वाटतंय . शेठ बोलत राहतो . कोद्रे, छत्रे, चोरगे ऐकतात, बीअरचे प्याले भरले जातात, रिकामे होतात, पुन्हा भरले जातात . अखेर माना डोलावून काहीतरी ठरते, आणि इथेच माझ्या जन्माचे बीज रुजते .

दिवस : वाईट, वेळ : अजून नाही, ठिकाण : भलतेच .

" सगळं जुळतंय, पुढेही जुळत राहिलं तर मोठा गुप्तधनलाभयोग आहे " , तंत्रभैरव त्यांच्याकडे एकटक पहात म्हणतो .

कुठल्यातरी मिणमिणत्या प्रकाशात नल्लीशेठ, चोरगेसाहेब, छत्रे आणि कोद्रे तंत्रभैरवाभोवती कोंडाळे करून बसले आहेत . कुठली जागा आहे ? इथे कुठे, कधी आणि कसे आलो याचे कुणालाही भान नाही . जागे आहोत की झोपलो आहोत हेही कळेनासे झालेले . जाणीव आहे ती फक्त एकच, जिथे फक्त तंत्रभैरवाची सत्ता चालते अशा कुठल्यातरी अज्ञात प्रदेशात पाउल टाकल्याची जाणीव .

" तुमच्या भाग्याप्रमाणे कुणाला एकदम मोठे घबाड मिळेल तर कुणाला रोजच पावला पावलाला एखादी सोन्याची मोहर, पण जो या करणीत भाग घेणार त्याचा लाभ ठरलेला आहे . . " , तंत्रभैरव निर्विकारपणे म्हणतो .

छत्रेच्या चेहेऱ्यावर चलबिचल . तंत्रभैरव त्याच्याकडे रोखून बघतो . " तुझा विचार बरोबर आहे, कुठलीच गोष्ट कधी फुकट मिळत नसते . त्याची किंमत तर मोजावीच लागते . "

छत्रे मुळासकट हादरतो . तंत्रभैरव त्याच्याकडे एकटक पहात पुढे बोलू लागतो, " या गुप्तधनाचीही किंमत द्यावी लागणार . पण तुम्हाला नाही तर दुसऱ्याच कुणाला तरी . गुप्तधनाचा लाभ तर तुम्हाला होईल पण त्याची किंमत कोणीतरी दुसरेच चुकवेल, कोणी धनाच्या रुपाने, कोणी रक्तामांसाच्या रुपाने तर कोणी जीवाच्या रुपाने . . "

थंडपणे म्हटलेल्या त्या शेवटच्या वाक्याने त्या तिघांच्याही काळजाचा थरकाप उडाला . शेठ तर असे काही म्हणाला नव्हता .

" अमावस्येच्या रात्री नदीपल्याडच्या स्मशानात यायचे आणि एका अर्भकाचा बळी द्यायचा असले काही अघोरी प्रकार नाही सांगत आहे मी . " , तंत्रभैरव त्यांना जरा शांत करतो .

" आपली पद्धत जरा वेगळी आहे . आधी बळी आणि मग धनप्राप्ती असले काही नाही त्यात . "

" खर तर तुम्ही काही करायचे नाहीच . तुम्हाला गुप्तधनाचा लाभ व्हावा म्हणून फक्त एक छोटा करणी विधी करायचा . इथेच आणि आत्ताच . विधीसुद्धा सोपा आहे . तुम्ही एकमेकांचे हात हातात घेऊन फक्त " होय मला मान्य आहे " असे तीनवेळा म्हणा . एवढे म्हणालात की तुमचे धनप्राप्तीचे चक्र सुरू होईल, आणि त्याच वेळेला किंवा मग कधीतरी आणि कुठेतरी या धनप्राप्तीसाठी लागणाऱ्या बळीची पूर्तता करण्यासाठी एक बळीयंत्र आकारास येईल . योग्य वेळ येताच ते त्याचा बळी मिळवेल, आणि त्याचे काम संपले की मग कधीतरी त्याचे अस्तित्वही संपून जाईल . "

" चला तर मग, बळीयंत्र सूक्ष्मावस्थेत सिद्ध आहेच . तुमच्या मान्यतेने त्याच्यात प्राण फुंकले जातील "

सहजपणे म्हटलेल्या त्या वाक्यावाक्याला छत्रेच्या डोक्यातून ठिणग्या उडू लागतात . " नाही . मी असल्या कृत्यात कदापी सहभागी होऊ शकणार नाही . " , छत्रे ताडकन उठून जाऊ पहातो .

" ठीक आहे . पण या करणीला विरोध करून तुझ्या साहेबांच्या मार्गात तू अडथळा आणू इच्छिणार नाहीस, नाही का ? " तंत्रभैरव विलक्षण प्रेमाने विचारतो .

" नाही, तुम्ही काहीही करा . मी या भानगडीतच पडू इच्छित नाही . माझा विरोध नाही . पण मला सोडा . . . " , छत्रे कसावसा पुटपुटतो .

" अवश्य . तुझ्याशी आमचे काही वैर नाही . जो करणीला विरोध करत नाही तो मदतच करत असतो . " , छत्रे दिसेनासा झाल्यावर तंत्रभैरव उरलेल्या तिघांकडे वळतो, " तुम्ही करणी क्रियेला तयार आहात तर . . . "
नल्लीशेठ, चोरगेसाहेब आणि कोद्रेच्या मुंड्या हलतात . थोड्याच वेळात " हो मला मान्य आहे " चे ध्वनी - प्रतिध्वनी त्या पोकळीत घुमू लागतात . पुन्हा पुन्हा घुमतात . गुप्तधनाचे चक्र चालू होते आणि माझ्या बळीकर्माचे सुद्धा . . .

दिवस : वाईट, वेळ : आली, ठिकाण : ठरलेले .

" कोण हे काही महत्वाचे नाही, केव्हा हा एकच प्रश्न आहे . वेळ महत्वाची आहे . " असे मी ऐकत आलो आहे . माझी वेळ आता आली आहे . हजार लसलसत्या जिभांनी मी आ वासून ज्याची वाट बघत होतो तो माझा बळी घेण्याची वेळ आता आली आहे .

आता पुढची काही मिनिटेच मी या सुनसान अंधाऱ्या रस्त्यावर पडून रहाणार आहे आणि माझ्या बळीची वाट पहाणार आहे .

कोट्यावधींच्या मानवजमातीतल्या क्षुल्लक तीन चार जीवांचे बळी घेऊन माझेही अस्तित्व संपणार .

पण माझा बळी कोणता ? हा प्रश्न अजूनही अनुत्तरितच . " कोण हे काही महत्वाचे नाही, केव्हा हा एकच प्रश्न आहे . वेळ महत्वाची आहे . " असे तंत्रभैरवाने म्हटल्याचे स्मरते . मी एकटा नाही, अशी लाखो बळीयंत्रे हा तंत्रभैरव रोज जन्माला घालतो आहे . कुणी डोळे फोडणारे, कुणी पाय कापणारे, कुणी शरीर तर कुणी मन पोखरणारे . वनस्पती, पशू, मानव, रक्त, मांस . . . ज्याच्या भाग्यात जे जे असेल ते ते त्याला मिळो . माझ्या भाग्यात काय आहे . . ?

तर ते कळायची वेळ आता आली आहे . या अंधाऱ्या रस्त्यावर मी दबा धरून बसलो आहे . समोरून दुचाकीचा क्षीण प्रकाशझोत, चोरगेसाहेबाची मुलगीच येतेय . योगायोग म्हणायचा, दुसरं काय . तेवढ्यात तिला मागे टाकून दुसरी एक मोटरसायकल थेट माझ्या पुढ्यात येते एकदम वेगात . आणि मी समोर हा एवढा मोठा आ वासून उभा . रस्त्यातून अचानक उगवलेल्या मला साक्षात पुढ्यात बघून मोटरसायकल चालवणाऱ्या छत्रेच्या डोळ्यात भयाण मरणभीती उभी राहते . त्याचे पिल्लू त्याला मागे कवटाळून बसलेले . मी त्याच्याकडे

वघून अक्राळविक्राळ हसतो, त्याच्या बाईकचे हँडल उचकटतो, पुढचे अख्खे चाकच कचकन पिरगाळतो आणि मुंडी धरून त्याला त्याच्या बाईक आणि पिल्लासकट समोरून रोंरावत येणाऱ्या ट्रकखाली चेंदामेंदा करण्यासाठी भिरकावून देतो . माझ्या तृषार्त घशात त्यांच्या रक्ताचे काही ओघळ झिरपतात .

थोड्याच वेळात लोक जमतात . मला गर्दीने घेरलेले . चोरगेच्या पोरीने तर माझे सर्व बळीकर्म स्वत : च पाहिलेले . सर्वांच्या संतप्त नजरा माझ्याकडे . " आता सुटका नाही " , मला उमगते . माझ्या विनाशासाठी एक माणसांची टोळी तावडतोब हजर .

दिवस : वाईट, वेळ : नंतरची, ठिकाण : तेच .

. . . जेमतेम चार तुकड्यांची माझी कहाणी इथेच संपते . मला गाडून पुढे गेलेली टोळी मला संपवल्याच्या आनंदात आहे . पण माझा आनंद यात आहे की अशीच कुणाच्या तरी करणीने तयार झालेली लाखो मायावी बळीयंत्रे कधी औषधाच्या बाटल्यांमध्ये लपून, कधी रेलवे रुळात, कधी एखाद्या पुलामध्ये घुसून तर कधी कुणा नल्लीशेठ - चोरगे - कोद्रेच्या करणीने माझ्याप्रमाणे रस्त्यातल्या एखाद्या जीवघेण्या खड्ड्याच्या रुपाने छत्रेसारख्या आत्मवंचकांचे बळी घेत राहतील . तुम्हीही भेटालच . . !

**- GS1**

# उन्मेष


दिवाळी - नलिनी

वब्वलगम - संदीप खरे

आठवण येते - संकेत अधिकारी

असे असावे - आरती

ओली संध्याकाळ - वैभव जोशी

कट्टा - संकेत अधिकारी

कविता तुझी माझी - अल्पना शिरगांवकर

कसे व्हायचे? - क्षिप्रा

कोर - वी

देहवोली - पेशवा

दवबिंदू - प्रसाद मोकाशी

दिवस अन् रात्र - वैभव जोशी

धुके - गिरीश सोनार

पिसे - क्षिप्रा

फेरा - संघमित्रा

भयव्याकूळ - अनुपमा

मोहनकिमया - सुमती वानखेडे

मन - अमृता वाखारकर

मी कोण - अनुपमा

वेताळ - प्रसाद शिरगांवकर

शीव - सोमनाथ अहिरराव

हरवलेला मी - जयश्री अंवस्कर

हे असं होतं म्हणून - संघमित्रा

कोजागिरी - प्रसाद मोकाशी

नव्या मनूची दिवाळी - पेशवा

## दिवाळी

दसऱ्यापाठी आली दिवाळी
दिव्या दिव्यांनी सजली आळी
दारोदारी रेखाटली रांगोळी
सणाची ह्या मजाच निराळी

चकल्या, चिवडा, शंकरपाळी
झाली गणती यांची फराळी
अनारसे जिव्हेवर विरघळली
या सगळ्यांची लज्जतच आगळी

आतिषबाजी भिडली आभाळी
नक्षत्रांनीही रंग उधळली
शृंगारल्या हो पोरीबाळी
मेहंदीची ही रंगतच निराळी

नारळ, सुपारी, करदोरे काळी
भाऊबीजेची सजली थाळी
गंध सजला भाऊरायाच्या भाळी
मिळते नेहमी प्रेमाचीच ओवाळी

होते साजरी अशी ही दिवाळी

**- नलिनी**

## बब्बलगम

बब्बलगम तू बब्बलगम . . .

तोंडामध्ये कधीचे नाव
चघळत बसणे हाच स्वभाव
विश्रामाला नाही वाव
दात सांगती - 'चलो, चबाव !'
किती चावले तरी नरम
सरली चव अन् उरला गम . . . बब्बलगम तू बब्बलगम !

तोंडी फुटतो स्वप्नफुगा
पुन्हा राहणे उगामुगा
अन् जर ओठांवर फुटला
आयुष्यातून तो उठला !
त्वचा बोलते 'हाय करम!'
शिक्षा सुंदर सनम सनम . . . बब्बलगम तू बब्बलगम !

तोंड सुगंधी जरी होते
कंटाळ्याची चव येते
थुंकुन द्यावे ना वाटे
गिळणेदेखील ना जमते
अशी अवस्था ! असा जुलम !
दमवून टाकी हा हमदम . . . बब्बलगम तू बब्बलगम !

चावत बसता काळ सरे
म्हणे बत्तीशी 'पुरे ! पुरे !'
उष्ण शहारे हात गरम
डोळेदेखील झाले नम
एकाहून हा एक सितम
रोना जादा ! हसना कम !. . . बब्बलगम तू बब्बलगम !

**- संदीप खरे**

## आठवण येते . . . !

डबक्यामध्ये थेंबांनी
धरलेल्या फ़ेराची !
ओलं होऊन फ़ुगलेल्या
घट्ट बसल्या दाराची !

स्वच्छ धुतल्या पानांच्या
हिरव्यागार आंब्याची !
सकाळच्या आंघोळीच्या
पहिल्या गरम तांब्याची !

लांब लांब काळ्या निळ्या
धुरकटल्या डोंगरांची !
पडून फ़ुटून लाल पिवळा
चिखल झाल्या उंबरांची !

डोक्यावरच्या फ़ुटलेल्या
गडगडत्या आभाळाची !
धावत पळत सुटलेल्या
धडपडत्या ओहळाची !

भिरभिरत्या डोळ्यांच्या
भरकटल्या पाखरांची !
हिरवळल्या अंगाच्या
थंडगार शिखरांची !

दरीत अडकून बसल्या
पांढऱ्या शुभ्र ढगांची !
काळ्या दगडांवरुन वाहत्या
चंदेरी रेघांची !

कुंपणावरच्या कुडकुडत्या
चिमणीच्या पिसांची !
आत बाहेर भरुन वाहिल्या
भिजलेल्या वासांची !

. . . आठवण येते पावसाची . . . !

**- संकेत**

## असे असावे

रंग नवे जीवनाचे पहावे
चालता पुढे क्षण मागे रमावे

शुभ्र पहाटे अलवार झुलावे
सोनसकाळी उमलुन यावे
तप्त धरेच्या कुशीत शिरावे
नारिंगी संध्येस बिलगावे

रात्र रुपेरी मन फुलवावे
सुन्न काळोखी दीप उजळावे
निळ्या हासऱ्या नभाने झरावे
झाकोळल्या ढगांनी बरसावे

लेऊन सारे रंग सजावे
इंद्रधनुषी जीवन जगावे

**- आरती**

## ओली संध्याकाळ . . .

नजर झुकलेली
ओठ मिटलेले
निर्व्याज भावनांना
कोंब फुटलेले . .

चिंब ओलेती
लाजून उभी
वीज कशास्तव
चमकते नभी . .

हातात माझ्या
थरथरता हात
सप्तपदी चालती
दिवस अन् रात . .

अंगभर श्रावण
लक्ष जलधारा
पदराशी झोंबतो
प्रणयातुर वारा . .

ओढ विलक्षण
दोन जीवांची
बोल बोलते
भाषा स्पर्शाची . .

नवेच तेज
माझिया डोळ्यांत
उजळते तुझे
माझ्या सोहळ्यात . .

मेघ पांगले
निरभ्र आकाश
मंद हालचाली
आश्वस्त बाहुपाश . .

पुन्हा भेटायचे
वचन आसवांचे
तृष्णा वाढविती
ओघळ पावसाचे . . .

**- वैभव जोशी**

## कट्टा

आज मीच पहिला...!
जरा लवकरच जाऊन बसलो होतो...
नेहमीच्या कट्ट्यावर !
...क्षितिजाच्या !
एकामागे एक हळूहळू सगळेच जमले...
...चंद्र... वारा... रात्र...!
चंद्र थोडा उशीराच आला...!
आजही विषय तिचाच होता...
मी उतावीळ...
म्हटलं आलात का रे जाऊन ? कशी आहे ती ?
आणि कित्येक प्रश्न... नेहमीचेच...
मग बोलत बसलो ...खूप वेळ... तिच्याचबद्दल...
...बहुतेक... आज जरा जास्तच वेळ...
चंद्र मध्येच म्हणाला...
...चल रे निघायला पाहिजे उशीर होईल... !
...म्हटलं थांबा रे... थोडाच वेळ...
म्हणाले नको...
...वाट पहात असेल तीसुद्धा...
...तिथे दुसऱ्या बाजूला... कट्ट्यावर !

**- संकेत**

## कविता - तुझी माझी

तुझ्या बांधेसूद कवितेपुढे
माझी कविता तशी बेढबच!

छंद, अलंकार . . . कशा कशाचा
सोसच नाही तिला
कुठल्याशा एका चाकोरीत रहाणं
जमतच नाही तिला . . .

खूपदा वाटतं
तुझ्या कविते सारखं तिनंही
उंच आकाशात उडावं . . .
टाळ्यांच्या कडकडाटात
स्वत:च अस्तित्व जपावं . . .

पण तिला पसंत आहे
तुझ्या कवितेची दोर घट्ट पकडून
जमिनीवरच रहाणं
आणि तुला उंच आकाशात उडताना
आनंदानी पहाणं

कदाचित,
काहींनी फक्त उडायचं असतं मनमुराद
आणि काहींनी फक्त दुरून न्याहाळायचं
स्वच्छंद मोकळं आयुष्य!

**- अल्पना**

## कसे व्हायचे?

दिशांचे पहारे असे जीवघेणे
कसे व्हायचे सांग भेटीस येणे

सुनी सांजवेळा जराशी उदाशी
मुक्या आठवांची सरेना असोशी
उराशी पुन्हा तेच गाणे विराणे

जुने सूर ओढाळ आता कशाला
जपावे किती मोह होई मनाला
कुणी सोडवावे खुळे हे उखाणे

धुक्याच्या प्रवाही उभा एकटा मी
तुझा गंध दाटून ये रोमरोमी
वळावे कसे पाय झाले दिवाणे

**- क्षिप्रा**

## देहबोली

तू माझ्या शेजारी आणि घननीळ फुलोरा आहे
स्वप्नवेड केसात माळताना स्पर्शाची रेशीमधग
वाहुतल्या ह्या घुसमटण्याचे हे शब्द नृत्य आहे
जिथे भेटलो शरीरद्वीपाला कुठल्याश्या तुफानासम
कोसळलो मीच माझ्यात माझी नाव तिथेच उलटली आहे . . .
भरून येता आभाळ चांदण्याने
डोळ्यांचे तुझ्या अद्‌भुतसे नक्षत्र
खोल गात्रवेडांचे निळे आकाश कसे फेसाळते आहे!
जुळताना ओठांचे दुवे विरघळते अंतरात काही
स्पर्शाच्या आरशात बघ सखे एक जीव दुसऱ्यास न्याहाळत आहे . . .
दंग गुंफण्यात क्षेत्रे आत्म्याची ही " देहबोली "
हुंकार गर्द श्वासांचे हे वेद पारदर्शक भोगवेळी
ही ' झदम अदम ' वृत्ते मीलनाच्या लयीतली
द्वैताच्या ह्या शरीरकिनारी गीत अद्वैती कोण गात आहे . . .
अनावृत्त सखे हाक हळुवार प्राजक्ताच्या सफेद कळ्यांची
विजेस वेड लागे अंतरात धामीण सळसळणारी
अमर्याद काही दिले घेतले दोन देहांच्या एक ओंजळी
तुझे सर्व माझ्याकडे अन् मीच तुझ्या दारी भिकारी

**- पेशवा**

## कोर

चंद्राचा नितकोर चेहरा
तर कधी चतकोर
पाहतो केविलवाण्या नजरेने
गावभरातील चंद्रमौळी झोपड्यांकडे

त्याच्याच उजेडात जळत असते
तीन दगडांची चूल
अन् भाजली जात असते
मूठभर पिठाची भाकरी

भाकरीलाही असतात
मागून पुढून डाग
तीही विभागली जाणार असते
चतकोर नाहीतर नितकोर

हिरमुसलेली चंद्रकोर मात्र
उगा क्षितिजाआड दडते
अगणित नक्षत्रांनी दिपलेल्या
आकाशाचे वैभव सोडून . .

**- बी**

## दवबिंदू



झाडं झोपली होती
आणि
काळोखाच्या पांघरुणाखाली
पहाट अजून चुळबुळत होती . . .
अशावेळी
सूर्योदय पाहण्यासाठी
एका गवतपात्याच्या अगदी टोकावर चढून बसला होता
एक इवला दवबिंदू !

अंधाराची चादर
कुणीतरी हलकेच काढून घेतली,
आकाशाचे रंग हळूहळू बदलत गेले,
एक किरणशलाका अंधाराचे उरले सुरले कणही
वेचत वेचत आली . . . .

दवबिंदू हे सारं कौतुकानं पाहात होता . . .

पहिल्या सूर्यकिरणाचं तेज
आपल्या पाणीदार डोळ्यात
साठवून ठेवण्यासाठी
त्याची चाललेली धडपड पाहून
उनाड पहाटवाऱ्याला उगाच गंमत कराविशी वाटली . . .

वाऱ्याच्या झुळुकीने एक टिचकी दिली
आणि
पात्यावरून घरंगळत बिचारा दवबिंदू
खाली ओघळून मातीत मिसळला . . . . .
घसरगुंडीवरून घसरत जाऊन
आईच्या मिठीत शिरणाऱ्या बाळासारखा . . . . .

वाऱ्याच्या खोडीनं हिरमुसलेल्या दवबिंदूला
कुशीत घेत काळी माती म्हणाली . . .

" वेड्या, सूर्योदय झाल्यावर दवबिंदूंनी लपायचंच असतं ......"

**- प्रसाद मोकाशी**

## दिवस अन् रात्र . . .

रोज दोनच क्षण भेटतात ती दोघे . . .

ती ओच्यात घेवून येते लाखो तारकांचे उजळणे
तरीही त्याहून उजळ भासते . .
तिला त्याचे मावळणे . .

तोही रोजच आणतो
तिच्यासाठी . .
सहस्त्र किरणांचा रथ
तिने नकार देताना
खिन्न हलते, अस्त झालेली
चंद्रकोरी नथ . . .

रोज दोनच क्षण मिळतात त्यांना . .
एक संधिप्रकाश . .
एक पहाट . .

अन् त्या क्षणभंगुर भेटींची वाट पहात . .

चालत राहते जगरहाटी . .

रात्रंदिवस . .



**- वैभव जोशी**

## धुके

धुक्यात हरवला गाव
घनदाट धुक्याचा भाव
धडधडत्या काळजाचा
मजलाच लागेना ठाव .

धुक्यात बोलती पक्षी
सजवून ध्वनींची नक्षी
मी उगम ध्वनीचा शोधू
की साठवू धुके हे अक्षी ?

धुक्यात थरथरे रान
शिरताच मरूत् बेभान
अवचित् थबकला तोही
धुक्यास तुकवुनी मान .

धुक्यात बरसले थेंब
मनास भिजवुनी चिंब
या गूढ अनंत धुक्याचे
उमटले अंतरी प्रतिबिंब

**- गिरीश सोनार**

## पिसे

मन माझे झुरुमुरु सख्या कुठेच लागेना
असे कसे तुझे पिसे मज काहीच कळेना

मुकेपणी हळूहळू नको आतून बोलूस
डोळियात वेडेपिसे नको आभाळ तोलूस
शब्द ओठी घुटमळे वाट मिळता मिळेना

दिले निर्व्याज नाजुक सूर काही ओंजळीत
हरवले सारे काही माझे तिथेच . . . तिथेच
गवसले का रे तुला मला खरंच सांग ना

उरामध्ये पालवले काही बहर ओलेसे
येऊ नकोस जवळी ठेव अंतर साजेसे
नको घालूस मजला अवघडसा उखाणा

नाही जाग पुरतीही नाही नीज डोळियात
वाटे जपून ठेवावे तुज खोल हृदयात
आसवात ओघळली याद मिटता मिटेना

**- क्षिप्रा**



## फेरा

त्यानंच हे असलं खूळ
माझ्या डोक्यात भरवलं,
आणि तेच आयुष्य मी
नव्यानं जगायचं ठरवलं . .

तेच चिरंतन हसू त्याने
चेहऱ्यावर आणले,
आणि त्याच शांतपणाने
देवमहाराज म्हणाले . .

तीच वळणं तीच माणसं
प्रसंगही सारे तेच,
आखायचेत तुला फक्त
काही नवे डावपेच . .

सगळं झाल्यावर वाटायचं
हे जर बदलता आलं असतं,
अशी जर वागले नसते
तर किती बरं झालं असतं . .

चला घेऊन टाकू संधी
मनाची करून तयारी,
पंख पसरून आयुष्याकडे
मारावी नवी भरारी .

एक लक्षात ठेव मुली
विसरून जाशील आधीचं सगळं .
आधीच ठरवून ठेव नीट
काय करणार आहेस वेगळं?

असे कसे विसरेन मी
पक्के लक्षात आहे माझ्या
आत्ता तर घडल्यासारख्या
सगळ्या घटना ताज्या ताज्या . . .

.
.
.
.

सगळं जगून झाल्यावर वाटलं
हे जर बदलता आलं असतं,
अशी जर वागले नसते तर
कित्ती बरं झालं असतं . .

हवीय का सांग परत संधी
तो म्हणाला उदारपणे,
उत्साहाने तयार झाले
तेच आयुष्य जगायला . . . . नव्याने .

**- संघमित्रा**

## भयव्याकूळ . .

जीर्ण झालेल्या भिंतीवर,
कपारीकपारीतून,
आत झिरपत येतो -
थंड गार ओलावा .
त्या कोंदट गाभारी,
मंद समईचा चिकट पिवळा प्रकाश,
अन त्याहून दाट . .
माझा घुसमटलेला श्वास .
कुठल्याश्या दगडाला शेंदूर फासलेला,
बटबटीत डोळ्यांचा तो देव,
बघतोय माझ्याकडे एकटक .
हात जोडू की नको विचार करत,
माझ्या कुंद मनाच्या आढ्याकडे बघत,
मीही बसलोय समोर - भयव्याकूळ .

**- अनुपमा**



## मोहनकिमया

खुणावती का मला अवेळी तुझ्या घराच्या वाटा
उफाळती का पुन्हा पुन्हा अन खोल तळाशी लाटा
झंकारून अवघी काया
वावरता संध्याछाया

ओढ अनावर तुझीच कैसी दाटून येते उरी
का मोहवती मला अवेळी पिठूर चांदणसरी
हा तुफानलेला वारा
गंधाळून देहही सारा

तव श्वासाची अशी कशी ही भूल कोवळी पडते
अन विश्वाच्या कणाकणातून प्रेम तुझे पाझरते
अधरवीणा रुणझुणली
विल्लोरही ती किणकिणली

हाकारत ये पुन्हा पुन्हा मज सांजसावळी गहिरी
वहरून येते तन मन सजणा व्याकुळलेल्या प्रहरी
कधी घडेल मोहनकिमया
कधी परतून तू येशील सखया !

**- सुमती वानखेडे**

## मन

मन धावतं, कधी वेभान होतं
माझ्यापासून पळतं तुलाच तुला शोधतं
वाटतं तेव्हा स्वत:ला विसरावं
तुझ्यात विरघळावं . . . .
कधी शांत शांत होतं, मन खोल खोल रुततं
तेव्हाही ते जपत असतं तुझाच पायरव
मनही माझ्यासोबत विचार करतं
हर क्षणात, विचारचक्रात तुला वांधतं ते माझ्यासोबत . .
मी झोपले तरी मन मात्र जागतं
स्वप्ने रचतं, तुला पहातं
कधी रडत, कधी हसत, कधी गुणगुणत ते तुला मागतं . .
आठवतं कधी आपलं समीप असणं
कधी एकांतात ढळतं
तू समीप हवा होतास म्हणून तरसतं . . .
कधी लीन होतं - शांत गंभीर
अन लागतं वाहू संथ नदीसारखं
. . तुझ्याच विचारांच्या प्रवाहात,
कधी आक्रोश करतं, आकांत करतं
सारं वळ एकवटून उफ़ाळतं एखाद्या सागरासारखं
तुझ्या अन तुझ्याच आभासाच्या चक्रीवादळात . .
. . तुझ्या अन केवळ तुझ्याच विचारांत . . . !!!

**- अमृता वाखारकर**

## मी कोण . . ?

श्वासातल्या लयीचे,
गीत एक झाले,
वेलीवरी कळीचे,
उमलून फूल झाले .
अवघ्या समर्पणानी, मी एकरूप झाले,
पण - मी कोण? सांग ना रे . .

आसुसल्या धारेला,
वरसून चिंब केले,
रंध्रात गंध भरला,
मी पल्लवीत झाले .
गाभुळल्या शिवारी, कोंबात अर्थ सारे,
पण - मी कोण? सांग ना रे . .

हातात हात होते,
स्वप्ने किती विलोरी,
आभाळ पेलताना,
जखमा किती जिव्हारी .
कुंपणातले घरटे, मी जपले तरी सुखाने,
पण - मी कोण? सांग ना रे . .

कातर या संधिकाली,
अडखळले पाऊल माझे,
कोणास काय ठावे,
मी एकटी जळाले .
सरल्या आयुष्याचे, सार्थक असेल झाले,
पण - मी कोण? सांग ना रे . .

**- अनुपमा**

## वेताळ

शकले होऊनही डोक्याची
पाठ सोडली नाही
मी कधीच वेताळाची

पाठपुरावा सदाच केला
त्या प्रश्नांचा
ज्या प्रश्नांना नव्हते उत्तर
वा असुनी जे
माझ्यापासून दूर ठेवले होते
नियतीच्या या वेताळाने
अन जेंव्हा मी
त्या प्रश्नांची नवी उत्तरे
मागत गेलो पुन्हा पुन्हासा
शकले केली या डोक्याची
वेताळाने

तेंव्हापासून असा वागतो
मी कोणाला प्रश्न कोणता
सांगत नाही
अन शोधत जातो
त्या प्रश्नांची सदा उत्तरे
माझ्यापुरती
अन मिळणारे उत्तरही
कोणास कधीही
सांगत नाही

असेच असता सुरू कधीचे
कालच थोडी गंमत झाली . . .
नुकते एका प्रश्नाचे मी
मला गवसले उत्तर माझ्या
हृदयामध्ये ठेवत असता
दारावरती टकटक झाली
अन दारावर थांबून होता
कालचाच वेताळ विचारा
जो हलक्या शब्दांत
स्वत:च्या प्रश्नांसाठी मागत होता
उत्तर माझे!

**- प्रसाद शिरगांवकर**

## शीव

कशी ओलांडू गावाची शीव
सारखा येथे घुटमळतो जीव

काळी माती हिरवे रान
हाती नांगर करती गुजराण

मन माझे वळूनी पाहे
खेळी पाण्यात जशी लव्हाळे

तटावरी काळ्या पाषाणमंदिरी
तपस्वी मुद्रेने बसले शिव - हरी

ढवळलेल्या पाण्यात तरंगे शेवाळी
धुण्याचे गासोडे खडकावरी आदळी

चावडीशेजारी विशाल वड
सुरपारंब्या खेळती लहान थोर धड

आरशात पाहुनी झुंजे चिमणी
तोरा पाहुनी झुले शेजारणी

शाळेत शिकल्या अनेक छकुल्या
नाठाळ पोरं करीत राहीले वाकुल्या

सुख - दु:खाशी जोडती गावकरी नातं
न्यायनिवाडा करती आजही पंचायत

माझं गाव दाही दिशांना ठाव
येथे गुंफतात स्नेहाचे भाव

सांगा . . . कशी ओलांडू गावाची शीव
सारखा येथे घुटमळतो जीव .

**- सोमनाथ अहिरराव**

## हरवलेला मी

स्वप्नील डोळ्यांची उघडझाप करत
जेव्हा तू बोलायचीस माझ्याशी
कान माझे चक्क फितुरी करायचे
मात्र डोळे होते प्रामाणिक माझ्याशी

अखंड उत्साही बडबड तुझी
कानावरुन जायची वाहून
पण निरागस आविर्भाव चेहेऱ्यावरचा
न्यायचा माझं मी पण पळवून

असा काय रे बघतोस हरवल्यासारखा . . . . .
तू म्हणायचीस नेहेमी
अगं, मलाच शोधतोय तुझ्या डोळ्यात
सारखा हरवतो माझा मी

तुझं आपलं काहीतरीच . . . . .
तू टिंगल करायचीस माझी
पण ते लाजरं खळीतलं हसू तुझं
खरं खरं बोलायचं माझ्याशी

सूर्याचं अस्ताला घाईघाईनं जाणं
अन तुझं गडबडीनं उठणं
रेंगाळलेली किरणं गोळा करत
माझं उद्याची वाट पहाणं


'येते रे' म्हणतानाची तुझी व्याकूळ नजर
ओढाळ पावलं अन ओली पापण्यांची झालर
पाठमोरी डोळ्यात साठवलेली तू
अन् अजूनही हरवलेला मी
अन् अजूनही हरवलेला मी

**- जयश्री अंबस्कर**

## हे असं होतं म्हणून . . .

मी इतका वेळ स्वत:ला कधीच देत नाही .
जराशी जरी फुरसत मिळाली की ते विचार . . .
तेच . . तुझेच . .
रोज नेमानं पाणी घालूनही
निगुतीनं लावलेल्या एकुलत्या गुलाबाच्या रोपाला
एक हिरवं पान फुटू नये
आणि आजूबाजूला
मात्र पोपटी तरारून यावीत
गवताची पाती
तसे ते विचार . . .
टाचणीचाही आवाज नको असं वाटत असताना
एखादी फटाक्यांची माळ लागावी
आणि आता ही शंभराची असेल की हजाराची
असले आडाखे बांधत ते आघात सहन करत रहावं
तसे ते विचार . . .
बुधवारी गर्दी नसते म्हणून
निवांत देवळात जावून बसावं
आणि कसल्या तरी त्रिपुरी पौर्णिमेसाठी
धक्काबुक्की होईल इतकी गर्दी असावी
तसे . . .
नको नको असणारे . . .
घुसमटवून टाकणारे . .
तुझे विचार . . .
येणारे, येतच रहाणारे . . .
म्हणून,
म्हणून मी इतका वेळ स्वत:ला कधी देत नाही .

**- संघमित्रा**



## कोजागिरी

पौर्णिमेची रात आहे
चंद्रिकेची साथ आहे

कंकणांशी बोलतो मी
आज ती मौनात आहे

माळ माझा गंध राणी
मी तुझ्या गजऱ्यात आहे

स्पर्शतो अंगास माझ्या
काय " ती " वाऱ्यात आहे ?

वाढवे आयुष्य रेखा
श्वास जो श्वासात आहे

रंगलेले ओठ माझे
कोणता हा कात आहे ?

तप्त देहाच्या रणावर
चुंबनी बरसात आहे

चंद्र झाला चषक आणि
चांदणे ओठात आहे

मद्यपी नाही मुळी मी
वारूणी दुग्धात आहे

**- प्रसाद मोकाशी**

## नव्या मनूची दिवाळी

चेतवा दिव्यांच्या ज्योती
वृत्तीच्या पिळून वाती
दिवाळीची रात्र जोडते
अकल्पितांशी नाती . . .

प्रकाशाचा न केवळ उत्सव
हा शोध काळगर्भाचा असे
घन अंधारात उजेड मिसळता
आत्मतत्वाचा रंग दिसे . . .

आकाशाला लावुन कंदिल
करा तयारी यात्रेची
खगोलातल्या वाटांवरती
तीर्थक्षेत्रे नवधर्माची . . .

अंधाराच्या गर्भात नांदतो
नव्या युगाचा सूर्य पहा
दिवा लावुनी दारापाशी
त्या मायलेकरां फूल वहा . . .

**- पेशवा**

# ★ हसरे कवडसे ★


- गाढवा - मिल्या
- पाहता पाहता पुरेवाट - राहुल फाटक
- कहाणी डायट देवाची - अनुपमा
- क्रिकेटवीर आणि दादा कोंडके ... - प्रसाद शिरगांवकर
- मामा, मला सोडा - परागकण
- एका पी . एच . डी डिफेन्सची कहाणी ... - गौतम पंगू
- मूर्खता - एक अभ्यास ... - प्रसाद शिरगांवकर
- थकले गे, विल आता, थकले गे ... - सुवर्णमयी
- व्यंगचित्रे - अजय पाटील

**गाढवा**

चाल : गारवा

विषय : उन्हे वर आली तरी लोळणारा नवरा आणि त्याच्यावर खेकसणारी कजाग बायको

पिऊन जरा जास्तच झालीय दर सकाळी वाटते
भल्या पहाटे डोके दुखून थकल्यासारखे वाटते
तरीही नशा चढत जाते झोप लागत नाही
आळसाशिवाय शरीरामध्ये कुणीच बोलत नाही

एवढ्यात कुठून एक हाक कानावरती येते
खोलीच नाही तर सारे घर डोक्यावरती घेते
पारा उनाड झुल्यासारखा वर वर चढत जातो
वायकोचा आवाज खोलीमध्ये पुन्हा पुन्हा घुमत रहातो
आवाज सरुन लाथा बुक्क्यांचा सुरु होतो पुन्हा खेळ
झाडू मागून लाटणेही पाठीत बसायची येते वेळ
चक्क तिच्या डोळ्यांसमोर मी कूस बदलून घेतो
उठता उठता परत मी, का वरे आडवा होतो?

गाढवा
गादीवर लोळतोय उभा आडवा
प्रिये . . . . ह्याला जरा बडवा . . . पुन्हा पुन्हा

गाढवा ||

अंथरुणात शहाणे लोळतायत कधीचे
मळके किनारे मळक्या उशीचे
घोरतोय असा घुमतोय जणू पारवा
नवा नवा

गाढवा ||

अंगात साऱ्या भरलेय वारे
हातात लाटणे, चिमटे नि झारे
अंगभर फ़ार फ़ार फ़ार थकवा, नवा नवा

गाढवा ||

-------------------

चाल : झाडाखाली बसलेले कोणी कोठे रुसलेले

विषय : बायकोला आहे गाडी(कार)चा ध्यास तर नवरा गाडीबाबत फ़ारच उदास

त्याला गाडी आवडत नाही तिला गाडी आवडते
गाडीचा विषय निघाला की, ती त्याच्यावर उखडते
मी तुला आवडते पण गाडी आवडत नाही
असलं तुझे गणित खरंच मला कळत नाही

गाडी म्हणजे ट्रॅफ़िक जॅम, गाडी म्हणजे मरगळ
गाडी म्हणजे गार वारा, गाडी म्हणजे चंगळ

गाडी म्हणजे खर्च फ़ार, खूप पेट्रोल खाई
गाडी म्हणजे सुखाचा प्रवास, गाडी आरामदायी

गाडी रेंगाळलेली कामे, गाडी म्हणजे पार्कींग चा त्रास
गाडीत बसून सहलीला जाण्यात वेगळी मजा येते खास

दरदिवशी गाडीत बसतात, दरदिवशी असं होतं
गाडीवरुन भांडण होऊन, रस्त्यामध्ये हसं होतं

गाडी आवडत नसली तरी, ती त्याला आवडते
गाडीसकट आवडावी ती, म्हणून ती ही झगडते

रुसून मग ती निघून जाते, बसुन रहाते गाडीत
त्याचे तिचे भांडण असे गाडीतल्या गाडीत

. . . . .

गाडीमध्ये बसलेले कोणी कोठे रुसलेले
बोम्ब मारी आज पुन्हा, आठवुनी ब्रेक जुना, कोणी करकरले

होन्डातूनी, सॅन्ट्रोतूनी, स्कोडातूनी फ़िरली
गाडी अशी, माझी तुझी, आता कळी खुलली
रस्ते असे खड्डे जणू, होऊनिया चंद्र जणू, आता चकचकले

गाडीचा आरसा, झाला वेडापिसा, बघूनी काळ जुना
खूप जुन्या आज पुन्हा डोळ्यांना दिसती लूना
चालूनिया मंद खरे, आज पुन्हा चाक फ़िरे, येथे अवतरले

काही स्कूट्या, काही स्प्लेंडर, काही पल्सर हलल्या
काही टगे, काही बघे, काही मुली पडल्या
घसरुनी आज कुणी, बावरुनी आज कुणी, येथे धडपडले

गाडीमध्ये बसलेले कोणी कोठे रुसलेले

----------------

चाल : पाउस दाटलेला

विषय : दोन जिवलग मित्र. कॉलेज, हॉस्टेल लाइफ़ एकत्र अनुभवलेले. एक स्वदेशी तर एक आता दूरदेशी
दूरदेशीच्या मित्राने आपल्या मित्राला घातलेली ही आठवणींची साद

रस्त्यावरील मुलगी . . .
खिडकीत उभा राहून पहा . . .
बघ माझी आठवण येते का?

कंगवा काढ, केस नीटनेटके कर
छोटीशी शीळ घाल.
बघ माझी आठवण येते का? . . .

वाऱ्यावर उडणारे तीचे केस डोळे भरुन पहा
डोळे मिटून घे. तल्लीन हो.
नाहीच जाणवले काही तर पाय मोकळे कर.
कट्ट्यावर ये
तो भरलेला असेलच
तोन्डात सिगारेट धरुन उभा रहा
बघ माझी आठवण येते का?

मग चालू लाग
मुलींच्या अगणित नजरा टोचून घे
चालत रहा कॉलेजची इमारत येईपर्यंत
ती बंद असेल.
शेवटी घरी ये.
कपडे बदलु नकोस
केस विस्कटू नकोस
पुन्हा त्याच खिडकीत ये.
आता बायकोची वाट बघ
बघ माझी आठवण येते का?

दारावर बेल वाजेल.
दार उघड. बायको असेल.
तिच्या हातातील पिशवी घे
भाजी ती स्वत:च काढेल
ती विचारेल तुझ्या नटण्याचे कारण
तू म्हण मन विटलेय
मग ती चहा करेल
तूही घे
ती उठून जगजीतसिंग लावेल
तू बंद कर
ब्रायन ॲडम्स चे everything I do लाव
बघ माझी आठवण येते का?

मग रात्र होईल
ती खोलीत जाउन निजेल
म्हणेल मला झोप येतीय
मग तूही तसेच म्हण
बांगड्यांचा किणकिणाट होईल
घोरण्याचा घरघराट होईल
ती त्या कुशीवर वळेल
तिच्या पाठमोऱ्या शरीराकडे बघ
बघ माझी आठवण येते का?

यानंतर सताड डोळ्यांनी टीव्ही पहायला विसरू नकोस.
यानंतर एम टीव्ही नुसता ऐकण्याच्या प्रयत्न कर.
यानंतर डोक्याखाली सु.शि. घे
झोपी जाण्याचा प्रयत्न कर.
येत्या उन्हाळ्यात . . . .
एक दिवस तरी . . .
बघ, माझी आठवण येते का?
. . . . .

अंधार दाटलेला माझ्या मनावरी हा
कानास भास आता, कर्कश्श त्या शीळांचा

रस्त्यात मित्र सारे, आडवेच टाकलेले
सगळेच पेटलेले, अड्डा जमेल आता, वात्रट कारट्यांचा

रस्त्यावरुन 'पक्षी', सारे पळून गेले
जेव्हा पडून गेला, कानात नाद त्यांच्या, हळूवार त्या शीळांचा

नाक्यावरील टपरी, सारी भरून गेली
विसरून तीच गेली, हिशेब प्यायलेल्या, पेले आणि कपांचा
-------------

चाल : पुन्हा पावसालाच सांगायचे

विषय : नटलेल्या बायका (टिकलीसकट), सिनेनट्ट्या तोंडात बोट घालतील अशी लफ़डी, भरपूर इमोशनल डोस आणि अश्रूपात असलेल्या बालाजी टेलीफ़िल्मस् च्या मालिका . . . . . . हे कधी बदलणार?

पुन्हा मालिका चालू होतात
पुन्हा अश्रू गळू लागतात
खुर्च्या, कोच, गालीचे घरातले
सारेच कसे भिजून जातात

पुन्हा सासू खाष्ट खाष्ट
पुन्हा जाऊ खूप दुष्ट
सुनेला त्या छळून छळून
करतात आमचे डोळे भ्रष्ट

पुन्हा मालिका अंत पहातात
पुन्हा मालिका जीव घेतात
त्यांच्यामधल्या लफ़ड्यांवर
बायका परत जीव टाकतात

पुन्हा एकताला मागतो मी
पुन्हा एकताशी भांडतो मी
मालिकांपासून ह्या सुटका कर
पुन्हा एकतालाच सांगतो मी

. . . .

पुन्हा एकतालाच सांगायचे
कुणाला किती थेंब रडवायचे
कुणाला किती थेंब रडवायचे

पुन्हा एकतालाच सांगायचे

दिखाऊ लफ़ड्यांनी मने गोठली
लोकांना किती काळ छळायचे?

लोकांना किती काळ छळायचे?
पुन्हा एकतालाच सांगायचे

टी. व्ही. आसवे पाझरु लागता
खऱ्या बायकांनी कुठे जायचे?

खऱ्या बायकांनी कुठे जायचे?
पुन्हा एकतालाच सांगायचे

रिमोटने मला आज समजावले
फ़िरुनी दूरदर्शन लावायचे

फ़िरुनी दूरदर्शन लावायचे
पुन्हा एकतालाच सांगायचे

---------------

चाल : रिमझिम धून

विषय : पहिले प्रेम, पहिला प्याला . . .

पहिला पेग पहिली आठवण
पहिला वार, पहिलं जागरण

पहिले व्यसन, पहिली नशा
पहिल्या मनाची, पहिलीच दशा

पहिली चव, पहिलाच घोट
पहिल्या प्याल्याला, पहिलेच ओठ

पहिलं प्रेम, पहिलाच शेवट
पहिल्या थेंबाशी, पहिलीच घसट

पहिला पेग पहिली आठवण
पहिल्या बारमधील, पहिलंच जागरण

. . . .

हळुवार धून, बाटली भरुन
हरवले मन, पिणार हे कोण?

दुखः सर्यींचा थवा, अश्रू हा नवा नवा
झुरतो ज़ीव जेव्हा, जुन्यात हरवून

कळा मनीच्या मनाला, विसरुनी त्या क्षणाला
लागावे का प्यावे मला, उगाच तिलाच आठवून

पेल्यात थेंब कुणाचे, थेंबात बिंब मनाचे
मन गाभाऱ्यात आता , पुजेन तिला मी सजवून

-----------------

चाल : गार वारा हा भरारा

विषय : आला दिवाळी फ़राळ, झाली बायकोची चंगळ
शरीर फ़ुगत चालले, जाडी वाढली बक्कळ

जाडी वाढत चालली, सारे कपडे दाटले
बायकोने हत्तीणीला, आज मापात गाठले

जाडी वाढत चालली, इंच इंचांच्या मापात
तरी आईसक्रीमच्या आधी, जाई मिसळ चापत

जाडी वाढत चालली, कशी सारखे चरती
लाडू पेढ्यांची तवके, रोज रिकामे करती

जाडी वाढत चालली, किती भार हा भुईस
आता धडगत नाही, आले दिवाळीचे दीस

. . . . . .

लाडू चिवडा हा फ़राळ, शेव तिखट तिखट
चकली लोणी, पानोपानी, मन हावरट हावरट

पेढे कंदी गोल गोल, पाणी सुटले तोंडास
बर्फ़ीवर चमचमे, वर्ख चांदीचा झकास

तुपातला हा चिरोटा, किती मिठास मिठास
दहा दिसात वाढले, वजन पन्नास पन्नास

ताट मोकळे मोकळे, बघे तिची ही मिजास
त्याला विसळा विसळा, खाउन अखेरचा घास

**- मिल्या**

## ‘पाहता पाहता पुरेवाट !’

‘वाट’ बघण्याशिवाय दुसरा ‘मार्ग’ च नसतो तेव्हा प्रसंग मोठा बाका असतो !

‘हो, देतोय तो पैसे परत . . वाट बघ !’ अशासारख्या उद्गारांमागे बोलणाऱ्याचे ‘वाट बघायला लागण्याचे’ करूणरसप्रधान अनुभवच असतात . त्यामुळेच त्या ‘वाट बघ’ पुढे ‘कायमची !’ हे अदृश्यपणे लटकत असते !

सर्वात त्रासदायक प्रकार म्हणजे येऊ घातलेल्या व्यक्तीची वाट बघणे . अशी वाट बघायला लागणे हे थोडे ( आपली आपणच ) वाट लागताना बघण्यासारखे ! तेव्हा ‘वाट बघणे’ आणि ‘वाट लागणे’ ह्यातील सीमारेषा फार अस्पष्ट असल्याचे ठळकपणे जाणवू लागते !!




‘आत्ता येईलच तो पाच मिनिटात’ वगैरे वाक्यं ऐकली की माझ्या पोटात गोळा येतो . कारण सूर्यमालेतल्या इतर ग्रहांवर ‘दिवस’ कसा आपल्या **24** तासापेक्षा मोठा किंवा लहान असतो, तशीच ही पाच मिनिटेही आपल्याला माहीत असलेल्या पृथ्वीवरच्या कालमापनानुसार नसतात ! सार्वजनिक ठिकाणी कुणाची तरी वाट बघताना नेहमी नशीब साथ देतं असं नव्हे . पण दीड दोन सेकंद एका छान स्वप्नदृश्याची कल्पना करा . . म्हणजे तुम्ही ठरलेल्या जागी वाट बघत उभे आहात . . रस्त्यावर अत्यंत प्रेक्षणीय वर्दळ चालू आहे . . . तुमच्या डोक्यावरच दागिन्यांच्या जाहिरातीचा बोर्ड असल्याने त्या वर्दळीतले बरेचसे मोहक चेहरे तुमच्या दिशेने पहात आहेत आणि ‘आपण आज फारच रुबाबदार नि राजबिंडे इत्यादी दिसतोय’ अशी तुमची शेवटपर्यंत न भंगणारी गोऽऽड़ गैरसमजूत होते आहे . . . समोरच्याच फूटपाथवर त्रिभुवनात प्रसिद्ध असा भेळवाला आहे आणि ह्या क्षणी त्याच्याकडे अजिबात गर्दी नाहीये . . . आपल्या मागेच पुस्तक प्रदर्शनाचा प्रवेश आहे आणि तिथे कधीपासून घ्यायचे असलेले महागडे पुस्तक 50% सवलतीत मिळत आहे . . त्याच्या शेजारच्या सेंटच्या दुकानातून दार उघडलं की एसीच्या थंड झुळकीत मिसळलेले उन्मादक सुवास येत आहेत !!!

आता अश्या वेळी येणारा किती का उशीरा येईना !

पण . . ! बऱ्याच वेळा वास्तवामधे ह्यातली एकही गोष्ट हजर नसते !

उलट दुकानासमोर गाडी लावू नका म्हणून खेकसणारा खडबडीत चेहऱ्याचा दुकानदार पहिला भेटतो ! तुम्ही रोल्स रॉयस जरी पार्क करण्याचा प्रयत्न केला असतात तरी तो असाच खेकसला असता असे त्याच्याकडे पाहून वाटते . तुम्ही लांऽऽब कुठेतरी गाडी लावून येता . . तेव्हढ्यात भेटायला येणारा माणूस निघून तर गेला नाही ना अशी हुरहुर तुम्हाला नंतर लागून रहाते ! तुम्ही रागाने त्या दुकानदाराकडे बघता . तो फळकुटं उघडून चार गोळ्यांच्या बरण्यांमागे, गिऱ्हाईक येण्याची सुतराम शक्यता नसल्याने शांतपणे पेपर वगैरे चाळत असतो! . . . मध्यवर्ती ठिकाणी असलात तरी नेमकी तेव्हा मोबाईलची रेंज अनाकलनीय कारणाने अशक्त होते . . . आदल्या दिवशी चार्ज करुनही आयत्या वेळेला बॅटरी आचके देऊ लागते ! . . . भेटीच्या ठरलेल्या ठिकाणच्या आजूबाजूला नेमकी कचरापेटी असते आणि आदल्या दिवशी सफाई कामगारांचा संप झालेला असतो ! . . . एखाद्या ‘दत्तवाडी रिक शा चालक वेश्विक संघटणे’ च्या ‘सार्वजनिक सत्यनारायणा’ चा लाऊड स्पिकर तुमच्या कानापासून एकदोन फुटावरच असतो . . . .

तरीसुद्धा ! तरीसुद्धा, सार्वजनिक ठिकाणी वाट बघताना समस्येवर काहीतरी मार्ग निघू शकतो . निदान आपल्याला फूटपाथ बदलता येतो .

जवळच्या हॉटेलमधे दहा पंधरा मिनिटं कॉफीवर काढता येतात. एक चक्कर मारुन गोल फिरत पुन्हा त्या जागी येता येते...

पण वाट पहाणे ह्या प्रकारात त्यापेक्षाही भीषण प्रकार म्हणजे कुठल्यातरी अनोळखी घरात बसून त्या घरातल्या कुणाची तरी वाट बघायला लागणे! ज्या प्राण्याला भेटायचे असते तो 'अगदी पाच मिंटात येईलच' अशी खात्री आपल्याला दिलेली असते. (वर आपल्याला ऐकू येईल अशी 'कुठे गेलाय कुणास ठाउक. आजकाल विचारायची सोय..' वगैरे वाक्यांची जोडही असते.) साधारण काही मिनिटे गेल्यावर 'अं.. खरं अर्ध्या तासात येईन म्हणाला होता' हे वाक्य कानी पडते आणि आपला धीर खचू लागतो. मग हे असं सांगून तो अर्ध्या तासापूर्वी घराबाहेर पडला असावा असा सोयीस्कर अंदाज आपण करतो.

पण कधी कधी आपलेच काम असल्याने वाट पहाण्याशिवाय गत्यंतर नसते! अशा घरातले वातावरण हे खास वाट बघणाऱ्याला असह्य वाटावे असेच नेमके असते!

असाच मी एका घरात बसलो होतो. का कोण जाणे अशा घरातले वातावरण अत्यंत गूढ असते असा माझा अनुभव आहे.

मला कुठल्याश्या चॅरिटीसाठीच्या नाटकाची तिकिटं खपवायची होती आमच्या कॉलेजतर्फे. अत्यंत कंजूष म्हणून प्रसिद्ध असलेला दिवाकर उर्फ 'दिवा' ह्याने त्याच्या घरी खूप तिकीटं खपतील असं ठोकून दिलं होतनं. 'आमची खूप मोठी जॉईंट फॅमिली आहे रे.. म्हणजे एकदम कंबाईंड! तू ये उद्या सकाळी ये चाळीस पन्नास तिकिटं घेउन!' दिव्याने चक्क असं सांगितल्यावर मला जरा आश्चर्यच वाटलं होतं. पण तरिही मी मोठ्या आशेने गेलो होतो ... आणि दिवा मला बोलावून स्वत: गायब होता!

अश्या वाट पहायला लागणाऱ्या घरातली आसनव्यवस्था हा अजून एक वैताग असतो. दिव्याचं घरही तसलंच निघालं! बसलो होतो त्या पत्र्याच्या खुर्चीचा मी श्वास घेतला तरी करकर आवाज येत होता. अशा खुर्च्यांचे चारही पाय कधीच एका वेळी जमिनीला टेकत नाहीत. एक पाय सदैव टांग्याच्या घोड्याच्या मुडपलेल्या पायासारखा हवेत! त्यामुळे एका बाजूला कलले तर खुर्ची खाली जायची आणि पडलो पडलो असे वाटत असतानाच एकदम खाली टेकायची!!

एकतर सकाळी सकाळी बाहेर एकदम मळभ दाटून आलं होतं. त्यामुळे की काय घर 'दिव्या' चं असलं तरी दिवाणखान्यात गडद अंधार होता. त्या खुर्चीच्या करकरीमुळे त्या अंधाऱ्या दिवाणखान्याच्या गूढगंभीर वातावरणात भरच पडत होती. घरातल्या मंडळींची एकंदरच भरपूर प्रकाश वगैरे गोष्टींवर श्रध्दा नसावी. आता कधीही, कोणीतरी आतमधून हातात मेणबत्ती घेऊन पिक्चरमधे दाखवतात तसं पाय न हलवता उभ्या उभ्याच चाकं लावल्यासारखं सरकत बाहेर येईल असं वाटत होतं.

समोर कुठल्यातरी आजोबांचा एक फोटो अमानुष धूळ बसलेला खोट्या फुलांचा हार घेउन लटकत होता. धूळ साठून साठून ती फ्रेम, फोटो, हार सगळं एकाच प्रतलावर असल्याचा भास होत होता. त्यामुळे आजोबाना आधी हार घालून मग त्यांचा फोटो काढल्यासारखं वाटत होतं! ह्या मंडळीना ह्याहून बरा फोटो मिळाला नसावा का असा प्रश्न पडत असतानाच कदाचित हाच त्यातल्या त्यात 'प्रेमळ' फोटो असावा असाही विचार शिवून गेला.

ते आजोबा फोटोतून माझ्याकडे कावून बघत होते. इतके की एखादे आजोबा त्यांच्या कॉलेजमधल्या नातीचा विनयभंग करणाऱ्याकडे बघतील (किंवा पुण्यातले आजोबा पूर्ण बहरलेल्या झाडाची एकदोन फुलं तोडणाऱ्याकडे बघतील) तस्सेच रागावून!! ... कदाचित त्यावेळी फोटोग्राफरने काहितरी आगाऊपणा केलाही असेल.

बराच वेळ पत्र्याच्या खुर्चीत बसून मीही कावलो होतो. त्यामुळे आता एक पाय उचलून साने गुरुजींसारखी पोझ घ्यावी असे वाटू लागले होते. ज्या किरट्या पोराने मला दार उघडलं त्याने 'दिवा दादा येईल पाच मिंटात' (देवाऽऽऽ!) असा संदेशही लगेचच आतून आणला होता आणि नंतर तो जो काही गायब झाला तेव्हापासून आजुबाजूला मनुष्य वस्तीची कुठलीही चिन्हं मला दिसत नव्हती.

मला उगाचच तळघरातून पियानोचा आवाज वगैरे येतो तसं काहीतरी संगीत ऐकू यायला लागलं. खुर्ची होतीच... आता एखाद्या प्रेतात्म्याबरोबर 'संगीत खुर्ची' नाही खेळायला लागलं म्हणजे मिळवलं!

असाच काही वेळ गेला. अजून दिवा 'उगवायची' काही चिन्हं नव्हतीच!

काही वेळाने अंधाऱ्या पॅसेजमधून सावकाश पावलं ऐकू आली! आतून एक आजोबा सावकाश चालत आले. सुदैवाने त्यांचे पाय हलत होते!! ते इंजीन आणि म्हातारी माणसं ह्या दोन पदार्थांतूनच येऊ शकणारा 'खुइशऽऽ' (ह्यातला 'इ' अर्धा किंवा सायलेंट आहे!)

अशासारखा आवाज काढत फोटोखालच्या आरामखुर्चीत बसले . त्यांचा चेहरा पाहिल्यावर मी एक सेकंद उडालोच ! कारण ते बरेचसे वरच्या फोटोतल्या रागावलेल्या आजोबांसारखेच दिसत होते . कदाचित 'घराणं' तेच असल्यानं दोघांच्या चेहऱ्यावरचा 'राग' ही सारखा असावा .

आधी काही वेळ माझ्या अस्तित्वाची त्यानी मुळीच दखल घेतली नाही . काही वेळ 'खुइशऽऽऽ' असा आवाज करुन झाल्यावर मग त्यांनी एकदम झटका आल्यासारखा प्रश्न केला : " काय नाव म्हणालात ? "

एकदम प्रश्न आल्याने मी दचकलो . आधी 'खालचे'च आजोबा बोलले ना ह्याची खात्री केली नि म्हणालो : " जिवू ! "
" जिवू ??? जरा विचित्रच नाव आहे नाटकासाठी ! "
" नाही जिवू म्हणजे माझं नाव आहे . नाटकाचं नाव वेगळंच आहे . "
" जिवू ?? " अजून आजोबांना नावाला ओलांडून जाता आलेलं नव्हतं .
" म्हणजे माझं खरं नाव दिग्विजय आहे . पण मित्र जिवू म्हणतात . "
" छान ! दिग्विजयचं जिवू ? बरं . नाटकाचं नाव काय ? "
" डोक्यावर पाल आहे! "
" कायऽऽ ?? " आजोबांची आरामखुर्ची हलायची थांबली !
" नाही तुमच्या डोक्यावर . . म्हणजे डोक्यामागच्या भिंतीवर पाल आहे, ती पडेल म्हणून लगेच सांगितलं "
" असू देत ! ती नेह्मी येते . तुम्ही नाटकाचं नाव सोडून सगळं बोलता आहात . . "
" नाव चली रे ! "
" हे तरी नाटकाचं नाव आहे का ? "
" हो ! "
" हे काय नाव आहे का ? नाटक मराठी आहे ना ? "
" हो, आजकाल ती फॅशन आहे . मराठी नाटकसिनेमाला हिंदी किंवा इंग्लिश नावं ठेवायची . . त्याशिवाय मराठी लोकं फिरकत नाहीत !
" छान ! "
आजोबा फक्त 'काय' आणि 'छान' हे दोनच शब्द म्हणत असावेत .

" बर कशावर आहे ते ? 'स्टेजवर !' अस काहीतरी सांगून पांचट विनोद करू नका . " आजोबा आधीच कावले " कशावर म्हणजे कुठल्या विषयावर आहे ? "

" नाही एक विषय असा नाही! "

" विषय नाही ? शाळेत निबंध लिहिला होतात ना कधी? "
" हो "
" मग निबंध विषयाशिवायच लिहायचात का ? "
" नाटक म्हणजे निबंध नाही . "
" अस्सं . निदान सामाजिक आहे का ऐतिहासिक असं काहीतरी तरी सांगाल? "
( आजोबा तिकिटं किती घेताय बोला . . . नाहीतर आराम खुर्चीत आराम करा . . दिवा येईपर्यंत काही खरं नाही ! )

मी पण मग वैतागलो . " तसं नक्की सांगता यायचं नाही ! पण आपल्या समाजाच्या इतिहासाचं रहस्य उलगडून दाखवणारी कौटुंबिक संगितिका आहे असं ढोबळमानाने म्हणता येईल !!! "

आता आजोबांची खुर्ची पुन्हा थांबली . मग बराच वेळ विचार करुन ते म्हणाले :
" हं असं करा, अर्ध तिकिटं द्या ! "
" अर्ध ? " आता माझीही खुर्ची करकरायची थांबली (कारण माझा श्वास अडकला होता . ) दिव्याने घरी चाळीस पन्नास तिकिटं आण सांगितलं होतं आणि हे आजोबा संपूर्ण अर्ध तिकीट मागत होते !

. . त्यापुढची करुण कथा मला सांगवत नाहीये !!

कारण पुढे त्यांच्या बोलण्यातून हे अर्ध तिकिटंही त्यांचा कोकणातून आलेला गडी 'दत्तू' ह्याच्यासाठी मागितल्याचं कळलं .

'काय आहे, दत्तूला सहा महिन्यातून एकदा आम्ही नाटक किंवा सिनेमा दाखवतो. आता वीस वर्षांच्या कोवळ्या मुलाचं पूर्ण तिकिट थोडीच लावणार तुम्ही लोक ?'

आजोबांचं बोलणं ऐकून मी त्याना शांतपणे अर्धी किंमत घेउन एक तिकिट दिलं नि बाहेर पडलो ! दिव्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवल्याबद्दल उरलेले अर्धे पैसे भरण्याची शिक्षा मी मला ठोठावली होती !

पण हा दिव्याचा सूड होता हे मला नंतर कळलं... दिवाने एकतर्फी गळ टाकला आहे ती शीतल शेजवलकर कुणाला 'हाय' म्हणाली तरी दिवा पेटतो ! मला तर तिने दोन दिवसांपूर्वी लिफ्ट मागितली होती तेही सगळ्या गँगसमोर ! आता ह्यानंतर तर त्याचे 'दिवा जळू दे सारी रात' झाले आणि सूड म्हणून त्याने घरी बोलावून त्या भीषण वातावरणात मला वाट पहायला लावली होती !

...

माझ्यावर असे एकदम काळजाला हात घालणारे प्रसंग खूप आलेत.. असाच एक भावनेचा बांध तोडणारा एक प्रसंग मला आठवतोय.

अशीच 'पाच मिन्टे' 'पाच मिन्टे' करत करत मी चांगला पाऊण तास बसलेलो होतो त्या बंगलीत !

झालं काय होतं की दोन दिवसांपूर्वी आमच्या क्लासमधल्या रिसबूडला मी ह्या साईडला येणार आहे हे अनवधानाने बोललो. एरवी रिसबूड अत्यंत अजागळ आहे आणि अर्ध्या वेळेला तंद्रीत असतो. पण तेव्हा मात्र त्याने 'एव्हढ्या लांब जातोयस तर माझ्या मित्राकडून एक पुस्तक आणशील का?' म्हणून तत्परतेने विचारलं. एव्हढ्या मस्त संध्याकाळी रिसबुडचे काम कोण करत बसणार ? मी त्याला उडवून लावणार होतो पण तेव्हा अचानक आठवलं, त्याच्या शेजारी प्रियंवदा प्रधान रहाते, त्यामुळे त्याला पुस्तक द्यायच्या निमित्ताने त्याच्या इमारतीत जाता आले असते. म्हणून लगेच तयार झालो...

..हे सर्व आठवत आठवत बसलो होतो. रिसबूडचा मित्र 'पाच मिन्टासाठी' कुठेतरी बाहेर गेला होता.. कुठले काय पुस्तक वगैरे घरी काही माहीत नव्हते. त्या मित्राची आई म्हणजे त्या बंगल्याच्या मालकीणबाई मला बसवून गायब झाल्या होत्या. मधेच डोकावून मी आहे की नाही पहायच्या, जणु काही मी हवेत अत्तरासारखा उडूनच जाणार होतो. मी जायचा विषय काढला तर मात्र 'अरे येईलच एव्हढ्यात' अशा भावार्थाचं काहीतरी बोलायच्या.

एकंदर दिवाणखान्यातल्या भीषण रंगसंगतीने मला गरगरल्यासारखे व्हायला लागलं. तिथे दुर्लक्ष करुन मी आपला स्वप्नदृश्याची जुळवाजुळव करत होतो. म्हणजे रिसबूडकडे जाताना प्रियंवदा जिन्यात भेटली आहे आणि मला पाहून 'आयला तु इथे कुठे' असे म्हणते आहे आणि नेहमीप्रमाणे उजव्या हाताच्या अनामिकेने बट मागे सारते आहे (ही 'आयला' ची सवय सोडली तर मुलगी शालीन आहे आणि त्याहूनही महत्वाचे म्हणजे अत्यंत कंडा आहे). मग नेहमीसारखी घशाला कोरड न पडता मी तिला चतुर उत्तर देतो आहे आणि मग ... पण समोरच्या पुस्तकांच्या कपाटावर ठेवलेल्या निवडुंगाच्या कुंडीकडे लक्ष गेलं की काटा लागून माझ्या स्वप्नाचा फुगा फुटत होता.

दिवाण किंवा तत्सम आसनप्रकारावर मी पाय अर्धवट खाली सोडून बेसावधपणे बसलेलो होतो. ह्या अशा विचित्र उंचीच्या आसनांचा मला तिटकारा आहे. धड आपले पाय खाली टेकत नसतात आणि विचित्र अँगलने पाय तरंगत सोडल्याने लगेच रग लागते. बरं त्या घरी विशेष ओळख नसल्याने मांडी वगैरे ठोकुनही बसता येत नव्हते. त्यामुळे 'बसायचे कसे' ह्या प्रश्नावर कुठला 'स्टँड' घ्यावा ह्या विचारात मी पडलो होतो.

काही वेळाने मालकीणबाई बाहेर आल्या आणि माझ्यासमोर बशीत घातलेला एक लाडू ठेवला आणि दर वेळेसारखं 'येईल हा तो एव्हढ्यात.' म्हणून गायब झाल्या. तो लाडू ठेवल्यापासून हळूहळू मान टाकत टाकत बशीशी समांतर होऊ लागला. अजून जरा पातळ असता तर बहुतेक त्यानी ग्लासमधूनच दिला असता.. त्यामुळे त्याच्याकडे मी 'खाऊ का गिळू' अशा नजरेने पाहू लागलो !!!

पुन्हा काही क्षण गेले. अचानक ! माझे पाय ढकलून दिवाणाखालून 'काहीतरी' बाहेर आलं ! दोन एक सेकंद कुठलातरी 'अमानवी' ऐवज माझ्या पायाचा अडसर दूर करुन दिवाणाखालून निघत आहे एव्हढेच लक्षात आलं. आता ज्याची वाट बघत आहोत तो दिवाणाखाली लपून बसण्याचा 'प्रॅक्टिकल जोक' करणार नाही एव्हढी माफक अपेक्षा मी ठेवून होतो! त्या स्पर्शाने जणू काही त्या घराच्या मालकिणीने अंधारात हनुवटीखाली टॉर्च धरून माझ्याकडे बघितल्यासारखे मी दचकलो. मग पूर्ण धूड दिसल्यावर लक्षात आले की ते आयरिश वूल्फहाऊन्ड किंवा तत्सम अजस्त्र जमातीचे भटके श्वापद आहे. आता मात्र मी अर्धवट खाली सोडलेले पाय वर घेऊन मांडी घालून प्राणायाम कसा करायचा ते आठवू लागलो.. श्वास अगोदरच अडकलेला होता.

एव्हाना ते श्वापद बाहेर आल्याचा गुप्त संदेश मिळाल्यासारख्या स्वत: मालकीणबाई टुणकन् बाहेर आल्या आणि त्या चार पायांच्या सैतानाला पाहून त्यांच्या चेहऱ्यावर कौतुक ओसंडून वहायला लागले . तो वासराएव्हढा कुत्रा माझ्याकडे भुकेल्या नजरेने पहात होता . मी शक्य तेव्हढे सालस भाव चेहऱ्यावर आणण्याचा प्रयत्न केला . . माझी ती एकंदर तारांबळ पाहून मालकीणबाईंनी एक भूतदयेने भरलेला कटाक्ष माझ्याकडे टाकला आणि त्या एक वैश्विक सत्य सांगितल्याच्या थाटात म्हणाल्या : "अरे, तो काही करत नाही !"

'अंऽऽऽ ??? . . . तो काही करत नाही ???' मी मनात म्हणालो . इथे माणसांचा भरवसा नसताना माणसं कुत्र्याबद्दल एव्हढ्या आत्मविश्वासाने का बोलतात ? त्याने आजच 'काही करायला' सुरुवात केली म्हणजे ? चौदा इंजक्शने काय ह्या घरचे आपापसात वाटणार आहेत का ? मी बाहेर पडायचे काही संकटकालीन मार्ग वगैरे दिसतात का ते शोधू लागलो .

मग मालकीणबाई आम्हा दोघांशी एकदम संवाद साधू लागल्या . त्यातली माझ्याकरता असलेली वाक्य शोधताना माझ्या तोंडाला त्या कुत्र्यापेक्षा जास्त फेस आला : 'शेपटी कोण हलवतोय लब्बाड . लाडू नाही घेतलास? हो हो हो . कोण एव्हढी शेपटी हलवून सांगतंय ? हो न्यायच हं शोन्याला बाहेर आता .'

अच्छा असं आहे तर ! बाहेर जाण्याचा संकेत म्हणजे शेपूट हलवायची काय ? मला कधी एकदा तिथून बाहेर पडता येईल असे झाले होते त्यामुळे मी नेहमीपेक्षा बराच जलद विचार करु लागलो . . . आणि प्रथमच मनुष्यजमातीत जन्माला आल्याची मला खिन्नता वाटली . . साधे 'मला इथून लवकर बाहेर पडायचे आहे' हे सांगण्यासाठी आपल्याला वेगळा अवयव नसावा ? इतक्या आणीबाणीच्या क्षणीही ? 'मानव हा निसर्गाचा अर्धवट यशस्वी प्रयोग आहे'' असे कुठेतरी वाचल्याचे मला आठवलं !

पण आता त्या निकराच्या क्षणी शेपूट घालणे मला योग्य वाटेना !

" मी निघू का आता " माझ्या स्वरात 'आता कैसे जाणे झाले' ची आर्तता होती .

" लाडू खा की तेव्हढा . . उड्या मारल्यास तर पट्टा बांधेन हा आता " मालकीणबाई कुत्र्याशी जास्त माणुसकीने बोलत होत्या .

त्यानंतरचा अर्धा तास मला अत्यंत दारुण अवस्थेत काढावा लागला . त्यानंतरही त्यांचा सुपुत्र उगवला नाहीच . माझं अगदी 'वाट पाहूनी जीव शिणला' झालं होतं .

एव्हढ्या वेळात, आयष्यात प्रथमच आपले पाय चाटले जात असताना लाडू कसा घ्यावा हे मी शिकलो होतो . . . मालकीणबाईंची टकळी चालूच होती . आता त्या त्यांच्या मुलाचं कौतुक सांगायला लागल्या होत्या . . तान्हा असल्या पासून 'कुंजविहारी' किती हुशार आहे, समजूतदार आहे, अगदी त्यांच्या आज्ञेत आहे, झालंच तर त्याला गुरुवारी सांज्याचीच पोळी लागते वगैरे वगैरे . मला असं लटकवून तो कुंजविहारी कुठे उंडारत होता कुणास ठाउक . बरं ते पुस्तक कुठे ठेवलं आहे ते तरी सांगून जायचं ना ?

मालकीणबाईंच अजूनही चालूच होतं: " कधी कधी मात्र डोकं फिरल्यासारखा वागतो, नाही असं नाही . . कालच समोरच्या भांबुर्डेकरांच्या नवीन सुनेचे गाल चाटले . . . उडी घेउन ! "

माझ्या हातातून लाडवाची बशी निसटली !!!
तेव्हा कुठे डोक्यात प्रकाश पडला की हे 'कुंजविहारी' प्रकरण म्हणजे त्यांचे सुपुत्र नसून माझ्या पायांचा वॅनिला कोनसारखा वापर करणारं हे भीषण कुत्रं आहे !

त्या मालकीणबाईंच्या दोन आणि त्या कुत्र्याच्या चारी पायांना नमस्कार करुन मी एकदाचा बाहेर पडलो .

निदान काम न झाल्याचा निरोप तरी रिसबूडला सांगावा ह्या निमित्ताने तडक त्याच्याकडे गेलो . निघताना दारात गप्पा मारताना माझं लक्ष प्रियंवदाच्या बंद दाराकडे होतं पण बराच वेळ काही घडेना . ते पाहून नेहमी अजागळ बोलणारा रिसबूड घोगऱ्या आवाजात चाणाक्षपणे कुजबुजला:
" अरेऽऽ ती ह्याच वेळेला येते रोज बाहेरुन . . गाण्याच्या क्लासमधून ! वाट बघ पाच मिन्टं !!!! "

**- राहुल फाटक**

## कहाणी डायट देवाची

ऐका डायटदेवा, तुमची कहाणी . आटपाट नगर होत . तिथे अनेक साळकाया माळकाया होत्या . त्या रोज नित्यनेमाने लोकल गाडीचा प्रवास करून ऑफिसला जात असत . जाताना येताना खूप चकाट्या पिटत . चुगल्या कागाळ्या करत . एकमेकांना टोमणे मारत .
एके दिवशी काय झाल? एक साळकाया माळकायाला म्हणाली, " अग, अग, माळकाया, गोष्ट ऐक . माझी एक शेजारीण आहे . ती खूप जाड होती . वजन सारख वाढत होत . दुखणी लागत होती . ती एकदम बारीक झाली . खूप छान दिसू लागली . जीन्स पॅन्ट घालू लागली . "
तिचे हे बोल माळकआयाने एकले . ती म्हणाली,
" अग, अग ,साळकाया मला तिचा पत्ता दे . मलाही वजनाचा खूप त्रास होतो . मी तिला विचारीन काय केल ते . "
दुसरे दिवशी माळकाया शेजारणीकडे गेली . ती उकडलेल जेवत होती , लिंबूपाणी पीत होती . माळकायानी विचारल,
" अग, अग, शेजारणी, तू कोणता वसा वसलीस? तो मला सांग . "
त्यावर शेजारणी म्हणाली, " मी डायटदेवाचा वसा वसले . व्रत फार कडक आहे . तुला ग वसा कशाला हवा? उतशील मातशील , घेतला वसा टाकून देशील! "
माळकाया म्हणाली, " उतणार नाही , मातणार नाही , घेतला वसा टाकणार नाही . "
तेव्हा शेजारणीनी व्रताच विधी सांगितला, " कुठलाही दिवस निवड . सकाळी उठून लिंबूपाणी पी . फक्त skim milk वापर . तेलकट तुपकट खाऊ नकोस . भरपूर पाणी पी . रोज नियमित व्यायाम कर . व्रत कधी संपवू नये . नेहमीच चालू ठेवाव . "
माळकायान नेम घरला . डायटदेवाच व्रत चालू केल . तिला हळुहळू फरक दिसू लागला . लोकलमधल्या मैत्रिणी हेवा करू लागल्या . तिला सगळे जुने dresses पुन्हा बसू लागले . अंगात उत्साह आला . नवऱ्याच प्रेम अधिक वाढल .
हिला बघून सगळ्या शांता कांतांनी विचारल, " हे व्रत कस कराव? "
तस तिने व्रताचा सगळा विधी सांगितला . सगळ्या आया - बहिणी डायटदेवाच व्रत करू लागल्या . बघता बघता चमत्कार झाला . सगळ्यांची वजन कमी झाली . धापा टाकायच्या त्यांना धाप लागेनाशी झाली . निरुत्साही होत्या त्यांना उत्साह आला . फळ भाज्यांचे भाव वाढले . समोसा , कचोरीला कुणी विचारेनास झाल . गटागटानी नवीन डायट recipes ची चर्चा होऊ लागली . एकमेकांच्या वजनांची विचारपूस होऊ लागली . एकमेकांच तोंड न पाहणाऱ्या शेजारणी , डायट dishes अदलाबदल करू लागल्या . खायला कमी असल्यामुळे ऑफिसात lunch time कमी होऊ लागला . काम झटपट होऊ लागली .
घरी रोज उकडलेल , वाफवलेल शिजू लागल . झटपट स्वयंपाक झाल्यामुळे टी . व्ही साठी भरपूर वेळ मिळू लागला . सगळ्या 'क'मालिका झाडून बघू लागल्या . त्यामुळे नव नवीन चर्चेचे विषय मिळू लागले . मालिका वाल्यां मधे चढाओढ लागली . नवनवीन साड्या, दागिने, टिकल्या बनवायला त्यांनाही आव्हानात्मक होत गेल .
घरी उकडलेल , वाफवलेल शिजू लागल . नवऱ्यांचे हाल होत गेले . डब्यातही वाफवलेल्या भाज्या मिळू लागल्या . घरी चहा बिनसाखरेचा आणि skim milk चा मिळू लागला . मग नवऱ्यांने काय केल? हॉटेलात खायला सुरू केल . हॉटेलचा धंदा खूप वाढला .
ऐके दिवशी काय झाल? डायट देवाने पाहुण्याच रूप धारण केले आणि ते शेजारणी कडे गेले . शेजारणीला म्हणाले, " मी आठवडाभर मुक्काम करणार आहे . जिवाच 'आटपाट नगर' करणार आहे . मला चांगल चुंगल खाऊ पिऊ घाल . "
शेजारणीनी नेम मोडला नाही . उकडलेल , वाफवलेल खाऊ घातल . बिनसाखरेचा skim milk चा चहा दिला . आठ दिवस मनोभावे आदरातिथ्य केल .
डायटदेव प्रसन्ना झाले . तिला हवा तो वर माग म्हणाले . शेजारणीला आनंद झाला .
" माझ डायट कधी मोडू देऊ नका . मला नेहमी बारीकच ठेवा . " असा वर मागितला .
डायटदेव, " तथास्तु " म्हणाले . पुढे म्हणाले, " मी तुझ्यावर प्रसन्ना आहे . पाहुण्यांसाठीही तू काही वेगळ बनवल नाहीस . त्यांनाही डायटवर ठेवलस . हे पुस्तक घे, 'How to get slim in 30 days.' गरजवंताला ओटीत घाल . तुझ्या मैत्रिणी तुझा हेवा करतील . तुझ्यावर जळतील . तेव्हा तू चांगलाच भाव खा . "
एव्हढ म्हणून डायटदेव अंतर्धान पावले .
इकडे काय झाल? दिवाळीचा सण आला . घरोघरी फराळ बनू लागला . लाडू , चिवडा, चकली, अनारसे यांचा घमघमाट यायला लागला . श्रीखंड , बासुंदी, पुरणपोळी यांचे बेत बनू लागले . मित्र मंडळीत पार्ट्या झडू लागल्या . तळलेल, पोळलेल सर्वांनी भरपूर खाल्ल . व्यायामाला सुट्टी दिली . सुट्टीची मौज मजा केली . कुठे कुठे ट्रिपा काढल्या . काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंत सगळीकडे फिरून आले . या सगळ्या गडबडीत माळकायाला डायट करायला वेळच मिळाला नाही . डायटदेव कोपले . वजन पुन्हा वाढू लागल . कपडे सगळे घट्ट होऊ लागले . माळकाया टम्म फुगली . लोकल मधल्या मैत्रिणी हसू लागल्या . नवरा टोमणे मारू लागला . मुल चिडवू लागली . तिला लाज वाटू लागली . हे अस कशाने झाल?
मग काय झाल? ऐके दिवशी शेजारीण दिसली . ती मात्र तशीच बारीक होती . सुंदर दिसत होती . ती माळकायाला घरी घेऊन गेली . बसायला डायनिंग टेबलवर दिल . स्वयंपाक केला . उकडलेल वाफवलेल जेवायला वाढल . जाताना ' How to get slim in 30 days' पुस्तकानी ओटी भरली .

माळकायानी विचारल, " माझ हे अस कशानी झाल? "
तशी शेजारणी म्हणाली, " तू उतलीस , मातलीस , घेतला वसा टाकून दिलास . डायटदेव कोप पावले . "
" देवान दिल , कर्मान नेल . यावर उपाय काय? "
" वसा पुन्हा चालू कर . पहिले crash डायट कर . मग हळूहळू उकडलेल वाफवलेल खायला लाग . न चुकता व्यायाम कर . हे पुस्तक वाचून त्या प्रमाणे recipes बनव . "
माळकायान तिचे आभार मानले . ती घरी गेली आणि पुन्हा व्रत चालू केले . मनोभावे डायटदेवाची प्रार्थना केली .
वाढलेल वजन पुन्हा कमी होऊ लगल . मैत्रिणी पुन्हा हेवा करू लागल्या . ती पुन्हा dresses मधे बसू लागली . डायटदेव प्रसन्ना झाले .
माळकायाला जसा डायटदेवाचा कोप झाला तसा कुणाला होवू नये .
शेजारणीला जसा डायटदेव प्रसन्ना झाला तसा तुम्हा आम्हां होवो!
ही साठां उत्तरांची कहाणी पाचां उत्तरी सुफळ संपूर्ण .

**- अनुपमा**

## क्रिकेटवीर आणि दादा कोंडके!

जर आपले क्रिकेटवीर (त्यांच्या कोचसह) जर दादा कोंडक्यांच्या सिनेमांमधली पात्रं असती (नाहीतरी ते तसंच विनोदी वागत असतात!) आणि त्यांचे एकमेकांशी असलेले संवाद जर गाण्याच्या रूपात झाले असते तर अशी गाणी झाली असती

**गीत 1**

चाल - माळ्याच्या मळ्यामधे कोण गं उभी

क्रिकेटच्या मळ्यामधे कुस्ती खुली
राखण करतोय ह्यो गांगुली
ग्रेगजी, मेल नका धाडुजी
फोडल कुणीतरी!

**गीत - 2**
चाल - हिल हिल पोरी हिला

(ग्रेग उवाच)
आरं हाल, हाल गांगुल्या
तुझ्या नावावरती फुल्या
तुझ्या नावावरती फुल्या
की धावा काढ जरा गांगुल्या

(गांगुली उवाच)
आरं जा, जा चॅपेला
का सतावितोय मला
का सतावितोय मला
की जाउन सांगीन मी डालम्याला!



**गीत 3**

चाल - मी तर भोळी अडाणी सखू

मी तर भोळा अडाणी भज्जू
तुमच्या गटाला कसा मी त्यजू
मी बोलल्यालं चालन का?
बाई बाई स्पिनिंग बॉलर मी
'दुसरा' टाकलेला चालन का?

**गीत 4**

ही सगळी भांडणं सुरू असताना, प्रत्यक्ष मैदानावर दादा गांगुलीची अवस्था कशी आहे?

चाल - पाणी थेंब थेंब गळं

जनु पोटात येतिया कळं
दादा धपधप पळं!

आरं पिचावर जाउन
येतोया नाचून
बॉलर देतोया ताल
अन काय बी करून
कसं बी करून
बॅटीला लागंना बॉल!
त्याची बसतिया रं दातखिळं
दादा धपधप पळं!

## - प्रसाद शिरगांवकर

## मामा मला सोडा

मी इथे हे जे काही लिहिणार आहे ना ते 'साहित्याच्या' कुठल्या प्रकारात मोडतं हा वादाचा मुद्दा होवू शकतो. काही भोचक टीकाकार 'मुळात हे साहित्य या प्रकारात मोडतं का?' असा प्राथमिक मुद्दा उपस्थित करतील (आणि कुणी उत्तर देत नाही हे पाहून मनातल्या मनात 'मिशी असती तर' अशा विचारात नाक आणि ओठ यांच्या मधल्या भागातल्या हवेला पीळ द्यायला लागतील). पण त्यांच्याकडे मी (नेहमीप्रमाणेच) पूर्णपणे दुर्लक्ष्य करुन हे लिहिणार आहे. कुणी त्याला (ओढून ताणून) विनोदी लेखन म्हणेल, कुणी त्याला प्रवासवर्णन म्हणेल, कुणी न - प्रवासवर्णन म्हणेल आणि ज्याला नक्की काय म्हणावं सुचाणार नाही तो 'ललित लेखन' म्हणून रिकामा होईल. माझी एक विनंती आहे - काहीही म्हणा पण ते 'ललित' म्हणू नका बुवा पण. नाही म्हणजे माझ्या डोक्यात आपलं 'लोळत लोळत करायचं लिखाण ते ललित लिखाण' असं समीकरण पक्कं झालेलं आहे. माझा तसा काही दावा वगैरे नाही, पण तरीही तेवढं सोडून बोला.

पण अगदी खरं सांगू का? मी हे जे काही लिहितो आहे ते निदान माझ्या लेखी तरी 'स्वप्रमादप्रसिद्धीपरायण' व्यक्तीने 'स्वान्तसुखाय' केलेलं लेखन आहे. तर ते असो. यावरची सांगोपांग चर्चा तुमच्यासाठी खुली ठेवलेली बरी. म्हणजे बघा लेखक आणि वाचक यांच्यात एक प्रकारची सक्रीय देवाणघेवाण की कायसं म्हणतात ते साधलं जाईल. इथे मला माझ्या स्वयंघोषित साहित्यिक टीकाकार (याचा अर्थ 'साहित्यिकांवर टीका करणारा' असा होतो अशी मौलिक माहिती अलिकडेच मला समजली) मित्राचा उपदेश आठवतो. 'लेखक आणि

वाचक यांच्यात सक्रीय देवाण घेवाण होत असेल तरच ते श्रेष्ठ साहित्य.' (सुजाण वाचकांच्या लक्षात आलं असेलच की मी या एका वाक्यात अनेक टीकाकार . . पक्षी . . . मारले आहेत.)

तर . . जून महिन्यातला कुठलासा शुक्रवार. संध्याकाळी मित्राशी फोनवर बोलत होतो. तो दोन दिवसासाठी अलाबामा राज्यातल्या टस्कालूसा गावी त्याच्या भावाकडे येणार होता. टस्कालूसा माझ्यापासून गाडीने साधारण तीन साडेतीन तासाच्या अंतरावर. बरेच दिवस मित्राची, जयदीपची, भेट झाली नव्हतीच. अनायासे तो इतक्या जवळ येत होता. मला शनिवार रविवार काही काम नव्हतं. माझे दोन्ही रुममेट्स driving trip ला जाणार होते. त्यामुळे मी घरी एकटाच असणार होतो. बेत ठरला. टस्कालूसात भेटायचं. शनिवारी सक्काळी सक्काळी . . खरंतर पहाटे . . निघायचं असं मी ठरवलं.

आणि अहो आश्चर्यम्! सूर्याचं भाग्य एवढं जबरदस्त की त्याला उगवताना आमचं जागृत दर्शन झालं. तांबडं फुटायच्या सुमाराला सामान गाडीत भरलं. दीड दिवसासाठी सामान तरी किती लागणार? एक कपड्याचा जोड, दाढीचा पाउच, टॉवेल, झालंच तर अशाच काही सटर फटर गोष्टी.
गाडीत बसलो. गाडीत पेट्रोल तसं कमीच होतं पण लगोलग भरायची गरज नव्हती. त्यामुळे जाताजाता तास दीड तासानी रस्त्यावरच्या एका gas station वर थांबून गाडीचा आणि स्वत:चा खुराक घ्यावा असा विचार केला. निघण्यापूर्वी सगळ्या आवश्यक वस्तू घेतल्याची खातरजमा करून घेतली आणि गाडीतल्या गंपती बाप्पाला मोर्या करुन गाडीला चावी मारली. शनिवारची सकाळ, त्यामुळे रस्ते अर्थातच मोकळे होते. सकाळची अनोळखी वेळ. नेहमीपेक्षा वेगळं, प्रसन्न वाटत होतं. भीमसेनजींच्या पहाडी आवाजात माझा दगडी आवाज मिसळून मी संतांची वाणी उजळायला लागलो. एकटाच असल्यामुळे 'ध्वनी प्रदूषणामुळे इतरांना होणाऱ्या त्रासाची' चिंता करायची गरज नव्हती. जसजशी गाडी वेगात येत होती तसतसा माझा घसाही तापत होता.
तासाभरात उन्हं तापू लागली. थोड्याच वेळात मी मिसिसिपी मधून अलाबामात प्रवेश केला. मार्गाला लागून सधारण दीड तास झाला. अधून मधून माझी नजर पेट्रोलच्या indicator वर जात होती. त्या रस्त्यावर पुढे साधारण तीस चाळीस मैलाचा एक अत्यंत उजाड भाग होता. त्या भागात एकही सकृत्दर्शनी चांगलं किंवा सुरक्षित gas station नाहीये हे मला पूर्वानुभवावरून माहीत होतं. त्यामुळे त्यापूर्वी च गाडीचं दाणापाणी करणं आवश्यक होतं. रात्रभराचा उपास मोडायची वेळही होत आली होती. त्यामुळे उदरस्थ ग्रंथी स्त्रवू लागल्या होत्या. असा सर्व विचार करून पुढच्याच gas station वर थांबायचं ठरवलं.

गाडी गॅस स्टेशनमध्ये घातली. पेट्रोलची किंमत आमच्या गावापेक्षा पाच पैसे कमी असल्याचं बघून मनातल्या मनात स्वारी खूष झाली. ते 'पाच पैसे' वाचून असे गोंधळून जाऊ नकात. अमेरिकेत येऊन पाच वर्ष झाली तरी अजून रुपया पैशाचं नातं आम्ही तोडलेलं नाही. किंबहुना बहुतांश मराठी, निदान विद्यार्थी तरी, डॉलर - सेंट पेक्षा रुपया - पैशाशीच जवळीक ठेवून असतात. ('न जाणो कधी सेंट सोडून खरोखर पैशात व्यवहार करावे लागतील . . सवय असावी' असं ते 'मिशी असती तर . . .' वाले लोक म्हणतील पण तिकडे नेहमीप्रमाणे दुर्लक्ष्य करा.) तर सांगत हे होतो की . . . स्वस्तात पेट्रोल मिळालं या आनंदात खाली उतरलो. Credit card काढायला खिशात हात घातला मात्र . . . . . .

धडधड धडधड . .
सूर्य आणखी तापला . .
अचानक उष्म्याची लाट आली . .
घाम फुटला . .
dehydration ची भावना होऊ लागली . .
हातापायातलं त्राण झरझर ओसरू लागलं . .
वरचा श्वास वर . . . खालचा खाली
धडधड धडधड . .

'हे काय झालं? कसं झालं? निघताना इतकं सगळं पुन्हा पुन्हा बघत होतो . . पाकीटच कसं बघितलं नाही? कुठे ठेवलं होतं? गडीतच कुठे पडलं असेल का? छ्या . . गाडी तीनदा आतून बाहेरून धुंडाळून झाली . . गाडीत नाहिये . . बॅगेतले कपडेही उचकटून पाहिले . . त्यातही नाहिये . . नक्की घरी राहिलं असणार . . घरी तरी असेल का? . . की वाटेत कुठे? . . पण वाटेत कुठे गाडीतून उतरलोच नाही . . घरीच असणार . . पण कशावरून? खात्री कशी करुन घेणार? . . यतिन आणि संजू दोघे North Dakota ला पोहोचले असतील एव्हाना . . बाकी कुणाला फोन करता येईल? . . काय उपयोग म्हणा . . घराची चावी कुणाकडेच नसणार . . XXXXXXXXXXXXXXXX . .'

'शांत हो पराग शांत हो . . गाडीतलं पेट्रोल संपलं तर जयदीपला फोन करुन काहीतरी मार्ग काढता येईल. किंवा ती AAA ची

membership घेऊन ठेवली आहे ती कधी कामी येणार? हुश्श् . . . '

AAA? memberhip? membership card? बोंबला . . . ते तरी कुठे आहे? . . तेही पाकिटात . . . . . आणि . . . म्हणजे . . घाऽऽऽत झाला . . . . . . . . लायसन नाहियेऽऽऽ . . . . . .

धंदडान तत्तडान धंदडान तत्तडान . . .
कर्म . . . बोंबाबोंब . .
मामा आला? . . कुठे आहे? . . भास झाला वाटतं . . .
आता काय करायचं?
परत फिरलं पाहिजे . .
घरी गेलं पाहिजे . .
धंदडान तत्तडान धंदडान तत्तडान . . .

अचानक कुठूनसा आवाज ऐकू येतो आहे असं वाटलं. 'शांत अनुज शांत' . . मी चपापलो. मग लक्षात आलं आवाज 'असमादिकातूनच' येत होता. मी शिल्लक असलेलं धैर्य गोळा करुन ऐकू लागलो.
'लेका असं काय करतोस? इथून घरी जायचं तर जवळ जवळ **120** मैल आणि टस्कालूसा आहे **60 - 70** मैल. गाडीत पेट्रोल आहे फारतर **50 - 60** मैल जाता येईल एवढंच. घरी जाता जाता हमखास संपणार. मग कोण येणार आहे मदतीला? रुममेट्स गेलेत गावाला. गाडी पडली बंद आणि आला मामा . . आणि मागितलं लायसन . . आली का कंबख्ती? त्यापेक्षा असाच पुढे जात रहा. गरज पडली तर जयदीप आहे मदतीला.'

क्षणभर सुन्न होऊन गाडीत बसून राहिलो. मग हळूच इकडं पाहिलं . . तिकडं पाहिलं. गाडी सुरु केली आणि पुढच्या रस्त्याला लागलो. आत पुढच्या प्रवासात डोक्यात फक्त दोनच विचारांना वाव होता. पेट्रोल वाचविणे आणि मामा थांबवेल अशी 'भाचेगिरी' न करणे. सर्वात आधी गाडीतल्या सगळ्या अनावश्यक गोष्टी बंद केल्या. जूनचा महिना असला तरी अर्वप्रथम A/C बंद. CD player बंद. गाडी वेगमर्यादेपेक्षा दोन मैल कमी वेगात . . ती ही cruise वर. नजर अगदी ससासारखी चौफेर भिरभिरत होती. कुठे दूरवरची एखादी गाडी 'मामाची असेल' या भीतीने कपाळावरचा घाम मी फुटण्यापूर्वीच पुसत होतो.

आता त्या रस्त्यावरच्या निर्जन पल्ल्यात प्रवेश केला होता. अक्षरश: उजाड रस्ता. इथे तर cell phone वरच्या दांड्याही सारख्या गुल होत होत्या. दुसरीकडे इंधन परिस्थिती विकट होत चालली होती. त्या निर्जन रस्त्यावर मी ताशी **55** मैलाच्या वेगानी चाललो होतो आणि इतर गाडीवाले खुशाल मला ओलांडून **70 - 80** च्या वेगाने जात होते. प्रत्येक वेळी ओलांडून जाणाऱ्या गाडीचा चालक (स्त्री असेल तर 'चालिका' म्हणतात का ते मला माहीत नाही) मला दात विचकून हसत आहेत असं वाटत होतं. माझा एक डोळा पेट्रोलच्या indicator वर आणि दुसरा 'मामाच्या गाडीची' चाहूल घेण्यात गुंतला होता. मी मनोमन प्रार्थना करत होतो . . 'देवा, टस्कालूसाच्या वेशीपर्यंत गाडी जाउ देत रे बाबा. एकदा तिथे पोहोचलो की हुश्श . . .'

आली . . प्रार्थना फळास आली. टस्कालूसा लांबवर दिसू लागताच मी नि:श्वास सोडला आणि त्यासरशी पेट्रोलचा indicator जिवंत झाला. आता? अजून किती जायचं आहे? शेवटी थोडंसंच लांडं पडणार का? योगायोगाने एव्हाना फोनच्या दांड्या पुन्हा अवतीर्ण झाल्या होत्या. जयदीपला फोन केला. जिथे होतो तिथून घरापर्यंत अंतर किती आहे हे विचारून घेतलं. आणि एकदाचा शेवटाला पोहोचलो. माझ्या म्हातारीनं . . . रामप्यारीनम रस्त्यात आचका न देता मुक्कामाला पोहोचवलं.

घरात गेलो. गेल्या गेल्या आमच्या या अभूतपूर्व स्वारीची हकीकत कथन केली. माझ्या प्राध्यापक वनण्याच्या भविष्यातील योजनेची माहिती असल्याने म्हणा किंवा माझ्या बरोबर अडीच वर्ष राहिल्यामुळे म्हणा पण जयदीपला 'मी पाकीट विसरलो' याचं फारसं आश्चर्य वाटलं नाही. घरातल्या इतरांनाही 'असं होऊ शकतं' हे मान्य झालं असं दिसलं.
थोड्या वेळाने मृणालने, जयदीपच्या वहिनीने, अत्यंत निरागसपणे बाउन्सर टाकला,
" मग तुझ्या लक्षात आल्यावर तू घरी जाउन पाकीट घेऊन आलास ना? "

मी लायसन विसरलो आणि तसाच पुढे आलो हे काही तिच्या पचनी पडत नव्हतं. तिने संध्याकाळी पुन्हा एकदा हळूच चौकशी केली " तू खरच लायसन न घेता आला आहेस? "

मी मुळात सडाफटींग आणि त्यात पाकीट नसल्यामुळे आणखीनच चेव आलेला. तिथे ते भाउ भाउ restaurant चं बिल देण्यावरुन 'तू

तू - मी मी' (म्हणजे आधी 'तू तू' आणि नंतर 'मी – मी') करत होते आणि मी मात्र आपण त्या गावचेच नाही अशा आविर्भावात समोर येईल त्या पदार्थावर उभे आडवे हात मारत होतो. आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास की काहीतरी म्हणतात बहुदा याला.

दुसऱ्या दिवशी दुपारी परतीचा प्रवास होता. तत्पूर्वी इंधनाची सोय करणं आवश्यक होतं. जयदीपकडून गाडीत पेट्रोल भरून घेतलं. एवढंच नव्हे 'वर खर्चाला' म्हणून त्याच्याकडूनच पैसे घेतले. परतीचा प्रवासही पुन्हा तसाच . . . वेगमर्यादेपेक्षा ताशी 2 मैल कमी. कायम cruise . पण आता मात्र A/C च्या थंड हवेत किशोरच्या नखरेल आवाजात माझा खरखरेल आवाज मिसळत.

तर अश्या या माझ्या 'प्रवासाची' ही अशी 'कथा', आणि ती ही लळत लोंबत लिहिलेली. आता कशाचीही मोडतोड न करता ठरवा पाहू . . . साहित्याच्या कोणत्या प्रकारात मोडते ते.

**- परागकण**

## एका पी. एच. डी डिफेन्सची कहाणी

जून महिन्यातली एक दुपार. . . नुकताच युनिव्हर्सिटीच्या कॅफेटेरियामधून लंच करून लॅबमध्ये परत आलो होतो.
मित्रांबरोबर लंच करताना पी. एच. डी म्हणजे कशी गुलामगिरी असते, बिचाऱ्या स्टुडंटला कसा त्रास सहन करावा लागतो, गाईडच्या हातात सगळी सूत्रं कशी असतात, तो मनात आणलं तर स्टुडंटला कसा रखडवू शकतो या जिव्हाळ्याच्या विषयांवर चर्चा करण्यात तासभर घालवला होता. आता परत येउन गाईडनं दिलेला एक रिसर्च पेपर वाचायचा
प्रयत्न करत होतो, पण बाहेरचं मस्त ऊन, लॅबमधला कधी नव्हे ते छान काम करणारा ए.सी.,नुकत्याच खाल्लेल्या फ्रेंच फ्राईज आणि समोरच्या पेपरमधली किचकट इक्वेशन्स यांच्या एकत्रित परिणामामुळं मस्तपैकी झोप येत होती. डोळे उघडे ठेवायचा कसून प्रयत्न सुरू होता. . .

इतक्यात लॅबच्या दारावर टकटक झाली. पाहिलं तर दारात कॅपुचिनो! कॅपुचिनो ही अमच्या डिपार्टमेंटमधली एक चायनीज मुलगी, तिचं खरं नाव Waipai Xingqing की असंच कायसं आहे, पण तिनं स्वत:चं 'कॅपुचिनो' असं सुटसुटीत नामकरण केलंय. पुढची पाचसात मिनिटं कॅपुचिनो दर वीस सेकंदाला एक शब्द या गतीनं काही इंग्रजीसारखी दिसणारी वाक्यं बोलली. त्यातून मला इतकाच अर्थबोध झाला की कॉन्फरन्स रूम मध्ये एक पी. एच. डी डिफेन्स होणार आहे आणि we are "highly encouraged" to attend it. Highly encouraged या शब्दांमागचा गर्भितार्थ मला चांगलाच माहिती होता, म्हणून मी कॉफीचा कप भरुन घेतला आणि निमूटपणानं कॉन्फरन्स रूममध्ये गेलो.

कॉन्फरन्स रूममध्ये चार म्हातारे प्रोफेसर्स बसले होते. त्यांना याआधी डिपार्टमेंटमध्ये पाहिलं नव्हतं, बहुतेक दुसऱ्या डिपार्टमेंटमधले असावेत असा समज मी करुन घेतला. प्रोजेक्टर लावला होता आणि एक तिशीच्या सुमाराचा माणूस लॅपटॉपशेजारी उभा होता. तो सुद्धा माझ्या ओळखीचा नव्हता. बहुदा याचाच डिफेन्स असावा असा विचार करून मी पहिल्या
स्लाईडवरचं नाव वाचलं, पीटर ग्लास. रूममध्ये अजून आठदहा लोक होते, ते बहुतेक पीटरच्या परिवारापैकी असावेत असं मला वाटलं.

मी पीटरच्या चेहऱ्याकडं पाहिलं. हा दिवस ग्रॅज्युएट स्टुडंटसाठी किती महत्वाचा असतो! पाच (गाईडच्या कृपेनं कधीकधी त्यापेक्षाही जास्त) वर्षांची मेहनत या दिवशी सत्कारणी लागते! पी.एचडी. चं प्रेझेंटशन आणि त्यानंतरचे कमिटीचे प्रश्न यातून पार पडणं हे कधीकधी मोठं दिव्य ठरू शकतं, कमिटीमधल्या प्रोफेसर्सनी मनात आणलं तर ते स्टुडंटला बराच त्रास देऊ शकतात. पण पीटरच्या चेहऱ्यावर कसलाच तणाव किंवा अस्वस्थता दिसत नव्हती. समोरचे प्रोफेसर्ससुद्धा अगदी कंटाळलेल्या चेहऱ्यानं बसले होते. सर्कशीतून रिटायर होऊन जंगलात शांतपणे राहणाऱ्या एखाद्या वाघाला उगीचच जबरदस्तीनं पकडून खेळ करण्यासाठी आणलं तर त्याच्या चेहऱ्यावर जसे भाव उमटतील तसे काहीसे भाव त्यांच्या चेहऱ्यावर होते.

काहीवेळानं त्यांच्यापैकी एक प्रोफेसर पीटरला म्हणाला, " यू मे स्टार्ट नाऊ. " पीटरनं प्रेझेंटेशन द्यायला सुरुवात केली. मी सावरून बसलो. पण पुन्हा तेच! ना त्यानं
स्लाइडस व्यवस्थित बनवल्या होत्या, ना तो प्रेझेंटेशन उत्साहानं देत होता. आपण इतकी वर्ष केलेल्या कामाबद्दल त्याला कसलीच

आत्मियता दिसत नव्हती. अतिशय रटाळपणे एक अबाबदारी उरकावी अशा प्रकारे तो बोलत होता, आणि समोरचे प्रोफेसर्ससुद्धा तो काय बोलतोय हे ऐकण्याऐवजी चक्क डुलक्या घेत होते. हा डिफेन्स अगदीच कंटाळवाणा होत होता. पहायला जावं श्रीकांतची बॅटींग आणि खेळत असावा रवी शास्त्री असं काहीसं झालं होतं. सुमारे पंधरावीस मिनिटं गेली आणि एकदाचा पीटर बोलायचा थांबला. आता त्याचा कमिटीबरोबरचा प्रायव्हेट सेशन चालू होणार म्हणून मी उठलो, तेवढ्यात त्या चारपैकी सर्वात वयस्कर प्रोफेसर उठला आणि म्हणाला, " वी डिक्लेअर दॅट पीटर हॅज पास्ड हीज डिफेन्स अँड ही इज डॉक्टर पीटर ग्लास नाऊ. " यावर जर टाळ्या वाजवायला पैसे पडले असते तर ज्या कंजूषीनं टाळ्या वाजवल्या गेल्या असत्या, तशाप्रकारे काही टाळ्या वाजल्या. त्या प्रोफेसर्सनी एखाद्या दीर्घकालीन दुखण्यातून मुक्तता झाल्यासारखे सुटकेचे निश्वास टाकले. खुद्द पीटरच्या चेहऱ्यावर सुद्धा कसलीच खुशी दिसत नव्हती. निर्विकारपणे तो लॅपटॉप कव्हरमध्ये घालत होता.

मी उठून त्याच्यापाशी गेलो आणि हात पुढं करत त्याला म्हणालो, " काँग्रॅचुलेशन्स, यू डिड इट. आज तुम्ही डॉक्टर झालात "
तसा तो मला म्हणाला, " तुमचा गैरसमज होतोय. मी पीटर नाही, मी त्याचा लेटेस्ट गाईड आहे. "
मला काही समजलं नाही, म्हणून मी विचारलं, " मग पीटर कुठे आहे? आणि लेटेस्ट गाईड म्हणजे काय? "
तो थोडा गंभीर होऊन म्हणाला, " पीटर काल मरण पावला " .
मी हादरलोच. " काय म्हणता? इतक्या तरुण वयात? काय झालं त्याला? "
" अं, पीटर फारसा तरूण नव्हता. मरतेसमयी त्याचं वय **80** वर्ष होतं. "
" काय? **80** वर्ष? पण मग तुम्ही त्याचे गाईड कसे? "
" मी त्याचा सर्वात नवा गाईड. आत्तापर्यंत त्याचे एकूण **8** गाईड झाले. "
मला काहीच समजत नव्हतं. " आठ गाईड? म्हणजे तो नक्की किती वर्ष पी.एचडी करत होता? "
" गेली पंचावन्न वर्ष. "
" **55**? पण इतकी वर्ष कशी काय लागली त्याला पी.एचडी करायला? "
" अं...मृताबद्दल असं बोलू नये, पण पीटर थोडा स्लो होता, काम करण्यामध्ये, विचार करण्यामध्ये, किंवा एखादी गोष्ट समजून घेण्यामध्ये...त्यामुळं त्याला इतका वेळ लागला. "
" **55** वर्ष? बाप रे! पण इतकी सगळी वर्ष त्याला स्टायपेंड मिळत होता युनिवर्सिटीकडून? "
" नाही, त्याला स्टायपेंड मिळणं केव्हाच बंद झालं होतं. पण त्याला त्याची गरजच नव्हती. पीटरच्या वडिलांची आयडाहोला बटाट्याची भरपूर शेतं आहेत. फार श्रीमंत परिवार आहे तो, सो ही वॉज सेल्फ सपोर्टेड थ्रूआउट. त्याच्या डोक्यात एकच वेड होतं आणि ते म्हणजे पी. एच. डी करायचं, आणि तो त्यासाठी त्याच्या गतीनं गेली पंचावन्न वर्ष काम करत होता. "
" मग त्याचे आठ गाइड कसे काय झाले? "
" मी आत्ताच सांगितलं ना, की त्याचा विचार करण्याचा, काम करण्याचा वेग थोडा...बराच कमी होता. इतक्या साऱ्या वर्षातसुद्धा तो पी. एच. डी मिळवण्यासाठी पुरेसं काम करू शकला नाही. पण त्याचे गाइड तरी बिचारे पीटरची पी. एच. डी व्हावी म्हणून किती वर्ष थांबणार? ते एकामागोमाग एक म्हातारे झाले आणि रिटायर झाले. आत्ता इथं बसले होते ना, ते त्या आठपैकी चार गाईड होते. "
" आणि बाकीचे चार? "
" मी त्याचा आठवा गाईड. त्याच्या एका गाईडना पीटर त्यांच्या हाताखाली काम करायला लागल्यापासून एका वर्षात प्रचंड फ्रस्ट्रेशन येऊन आत्महत्या केली. एका गाईडला पीटरबरोबर काही काळ काम केल्यानंतर खूप विरक्ती आली आणि तो सर्व काही सोडून निघून गेला. "
बाप रे! हे विचित्रच होतं. " आणि तिसरे? "
" तिसरे पीटरला इतके वैतागले होते, की ते कायम त्याला टाळायला बघायचे. पीटर दिसला की ते अक्षरशः पळून जायचे. असं करता करता ते खूप छान पळू लागले, आणि प्रोफेशनल ॲथलीट बनले. मी अस ऐकलंय की अजूनही प्रत्येक शर्यतीच्या आधी पळण्यासाठी प्रेरणा म्हणून ते पीटरच्या फोटोवर एक नजर टाकतात. "

" ऐकावं ते नवलच होतं. मी विचारलं, " मग त्याचा डिफेन्स आज करण्याचं कारण? "

" गेले सहा महिने पीटर आजारी होता,आणि मागच्या आठवड्यामध्ये त्याची तब्येत खूपच खालावली होती. काल तो गेला, पण मृत्यूशय्येवर असताना त्यानं आपल्या मुलाला बोलावून सांगितलं की जिवंत असताना नाही तर मरणानंतर तरी त्याची डॉक्टर पीटर ग्लास म्हणवून घ्यायची इछा पूर्ण व्हावी. ही त्याची अंतिम इच्छा पूर्ण करणं हे त्याच्या मुलाचं आणि माझं कर्तव्य होतं. पीटरची अशीही इछा होती की त्याच्या पी. एच. डी. डिफेन्सच्या वेळी त्याचे सर्व गाईड उपस्थित असावेत. त्याच्या गाईडपैकी एकजण तर हयात नाही, हिमालयात गेलेल्याला नक्की काँटॅक्ट कसं करायचं हा प्रश्न होता आणि ॲथलीट बनलेल्या गाईडची नेमकी आजच एक महत्वाची शर्यत होती. पण त्याच्या बाकीच्या चार गाईडना पीटर च्या मुलानं सगळा प्रवासखर्च देऊन इकडं बोलावून घेतलं, आणि आज हा त्याचा मरणोत्तर डिफेन्स घडवून आणला. "

अजबच गोष्ट होती. तो गाईड मला म्हणाला, " मी पीटरचं अभिनंदन करुन येतो . . . " आणि तो खोलीच्या एका कोपऱ्यात गेला. मी तिथं पाहिल तर पीटरचा मृतदेह तिथं एका पांढ्‌या कपड्यात गुंडाळून ठेवला होता. मीही तिकडं गेलो. तो गाईड पुटपुटला, " काँग्रॅच्युलेशन्स डॉक्टर पीटर ग्लास, मे युवर सोल रेस्ट इन पीस. " आणि तो बाहेर निघून गेला. मी पीटरच्या चेहऱ्याकडं पाहिलं. बिचाऱ्याला मरणानंतर का होइना, पण पी. एच. डी. मिळाली होती. त्याच्या आत्म्याला आणि त्याच्या गाईडसच्या जिवांना आता खरोखरच शांती मिळणार होती.

मी पीटरच्या चेहऱ्याकडं पहात होतो आणि एकदम एक चमत्कार झाला. त्याचा चेहरा नाहीसा होऊन त्या ठिकाणी मला माझा चेहरा दिसू लागला. त्याच्या जागी मी झोपलो होतो. मी ऐंशी वर्षांचा होउन पी. एच. डी. न मिळवताच खपलो होतो. पंचावन्न वर्षंन काम करुनही मला पी. एच. डी. मिळाली नव्हती, कारण मी मंद होतो. मी घावरून ओरडू लागलो, " नाही, नाही,प्लीज मला इतकी वर्षं थांबायचं नाही, मी खूप काम करेन, दिवसरात्र एक करेन, पण मला लवकर डिग्री देऊन सोडा, मला म्हातारं होऊन डिग्री न घेताच मरायचं नाही, मला पी. एच. डी. हवी, मला पी.एच. डी. हवी . . . "

कोणीतरी मला हलवून जागं करत होतां. मी खडबडून जागा झालो आणि डोळे उघडून पाहिलं तर माझा (एकमेव) गाईड लॅबमध्ये आला होता. तो पेपर वाचताना माझी खरोखरच डुलकी लागली होती आणि मी हे स्वप्न पाहिलं होतं.

" पी. एच. डी हवी म्हणून ओरडतोयस काय? जर पी. एच. डी हवी असेल तर लॅबमध्ये झोपा काढू नको आणि काम कर " असं गुरकावून गाईड निघून गेला.

मी निमूटपणानं मान हलवली आणि त्या भयानक स्वप्नाची आठवण झटकून टाकायचा प्रयत्न करत पुढ्यातला पेपर वाचायला सुरुवात केली.

**- गौतम पंगू**

## मूर्खता - एक अभ्यास!

आपल्याला आपल्या रोजच्या आयुष्यात अनेक मूर्ख माणसं भेटत असतात. घरामध्ये, रस्त्यावर, ऑफीसात, बसमध्ये, स्टेशनवर, सरकारी कचेरीत, मित्रांच्या कट्ट्यावर . . . जिथे जाउ तिथे वेगवेगळ्या रूपातले मूर्ख त्यांच्यातल्या मूर्खतेसह आपल्या समोर येत रहातात. त्यांच्या वागण्या बोलण्याचा आपल्याला भरपूर त्रास होत असतो. आपण काहीही केलं कसंही वागलं तरी मूर्ख भेटतच रहातात आणि आपल्याला छळतच रहातात!

हे मूर्ख आपल्याला भेटूच नयेत असं तुम्हाला वाटतं का? निदान त्यांच्यामुळे होणारा त्रास नाहीसा व्हावा असं तरी वाटतं का? किंवा त्याही पुढे जाउन मुळात जगात एवढे मूर्ख आहेतच का असा प्रश्न तुम्हाला कधी पडतो का? मला पडतो! गेली अनेक वर्षे पडतो आहे. या प्रश्नावर विचार करताना माझ्या असं लक्षात आलं की जगात मूर्खांची फक्त संख्याच जास्त नसून त्यांच्या मूर्खतेत वैविध्यही बरंच आहे! म्हणजे जगात एकाच प्रकारचे मूर्ख नसून हे जग विविध प्रकारच्या मूर्खांनी भरलेलं आहे. या विविध प्रकारच्या मूर्खांची वर्गवारी करायचा प्रयत्न केल्यावर माझ्या असं लक्षात आलं की जगात एकूण **12** प्रकारचे मूर्ख आहेत. मला जे प्रकार सापडले त्याच प्रकारचे मूर्ख तुम्हालाही सापडतात का हे तुम्हाला तपासून बघता यावं म्हणून ते प्रकार इथे थोडक्यात मांडतो आहे.

हे प्रकार आपल्या समोर मांडताना मी कोणतही 'शहाणपणाचं' कृत्य करतो आहे असा माझा बिलकुल दावा नाही आणि मांडलेल्या या प्रकारांमधली कोणतीही लक्षणं माझ्यात नाहीत असंही मला सांगायचं नाही. मला वेडाच्या भरात जे सुचलं ते माझ्या मूर्खतेच्या ओघात आपल्याला सांगण्याचा हा एक वेडसर प्रयत्न आहे! हा लेख आणि यातले विचार वाचून आपल्या आयुष्यात कोणताही गुणात्मक बदल होईल असं मला वाटत नाही . . . आणि समजा झालाच तर तो एक निव्वळ योगायोग समजावा!

मूर्खांचे मला समजलेले प्रकार आपल्या समोर मांडताना मी प्रत्येक प्रकाराचं नाव, त्याच्या लक्षणांचं वर्णन करणारा एक छोटा श्लोक आणि त्या प्रकाराची एका वाक्यातली माहिती एवढंच दिलं आहे. मी मुद्दामच सविस्तर वर्णन आणि उदाहरणं दिलेली नाहीत! याचं मुख्य कारण असं की आपल्या सभोवताली आपल्याला हे सर्वच प्रकार नेहमी पहायला मिळतात! चाणाक्ष वाचकांना आपल्याला भेटलेली कोणती व्यक्ती कोणत्या प्रकारची आहे हे नक्कीच कळू शकेल.

आणखी एक गंमत अशी आहे की कोणतीही व्यक्ती ही केवळ एकाच मूर्खांच्या प्रकारामधे असते असं नाही. . . अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्खतांचं सुरेख मिश्रण प्रत्येक मूर्खामधे असतं! आणि वेगवेगळ्या प्रसंगांमधे आपापल्या भात्यांमधून वेगवेगळे बाण काढून वापरायची क्षमता त्यांच्या जवळ असते!

तर मला वाटणारे मूर्खांचे **12** प्रकार असे

**1. पढत मूर्ख**
सूर्याशिवाय उन | वाद्याशिवाय धून |
सदसदविवेकहीन | तो पढत मूर्ख |

अर्थात् : पुस्तकी पंडित, नियम, पॉलिसीज इत्यादीवर सतत बोट ठेवून वागणारे, अजिबात साधा कॉमन सेन्स (!) नसलेले. .

**2. चढत मूर्ख**
बुद्धी शिवाय शक्ती | भावाशिवाय भक्ती |
आहे 'सलामसक्ती' | तो चढत मूर्ख |

अर्थात् : पंत मेले राव चढले टाईपचे, कुठलेही qualification अथवा गुणवत्ता नसताना सत्तास्थानी असलेले

**3. कढत मूर्ख**
पारा थरारलेला | झारा उगारलेला |
आत्मा पिसाळलेला | तो कढत मूर्ख |

अर्थात् : सदैव भडकलेले, भडकणारे . . . अंगाचा तीळपापड, तळपायाची आग मस्तकात इत्यादी इत्यादी

**4. अडत मूर्ख**
ओठी सदैव 'नाही' | पूर्णात न्यून पाही |
करतो न काम काही | तो अडत मूर्ख |

अर्थात् : जमेल तिथे, जमेल तशी, जमेल त्याची अडवणूक करणारे . . . 'अडवा आणि जिरवा' मधे सुख मिळवणारे

**5. गढत मूर्ख**
कामास वाहिलेला | कामास बांधलेला |
कामात संपलेला | तो गढत मूर्ख |

अर्थात् : रात्रंदिवस फक्त काम करणारे . . . कामाशिवाय दुसरं काहीही सुचत नाही असे . . . workoholics . . .

**6. मढत मूर्ख**
पैशात पोहणारा | सोन्यात नाहणारा |
'श्रीमंत' भासणारा | तो मढत मूर्ख |

अर्थात् : सतत पैसा पैसा करणारे . . . आपली श्रीमंती मिरवणारे . . . त्यातच सगळा आनंद शोधणारे

**7 . लढत मूर्ख**
कोठेही 'खुट्ट' काही | संताप यास येई |
आंदोलनास जाई | तो लढत मूर्ख |

अर्थात् : सदैव कुठल्याही लढाईला तत्पर असलेले . . . काही झालं की घसा ताणून बोलणारे, बाह्या सरसावणारे . . . मारामारीला तयार असणारे . . .

**8 . रडत मूर्ख**
डोळा सदैव पाणी | प्यॅ प्यॅ सदैव वाणी |
गाणी उदासवाणी | तो रडत मूर्ख |

अर्थात् : गुळुमुळु मुळुमुळु प्रकारचे . . . . सतत फक्त रडणारे

**9 . जडत मूर्ख**
आवेग घे दुज्यांचा | आवेशही दुज्यांचा |
नाहीच जो स्वत:चा | तो जडत मूर्ख |

अर्थात् : मूर्खपणाही स्वत:चा नसून दुसऱ्याचा मूर्खपणा जडलेले!

**10 . पडत मूर्ख**
भासे सदैव दीन | बोली सदैव न्यून |
म्हणतो स्वत:स हीन | तो पडत मूर्ख |

अर्थात् : पडखाउ, पडेल वृत्तीचे . . . सतत स्वत:ला कमी लेखणारे

**11 . गिळत मूर्ख**
जो की उगाच चरतो | जे जे दिसेल भरतो |
'खा खा' सदैव करतो | तो गिळत मूर्ख |

अर्थात् : खाण्यासाठी जगणारे!

**12 . पिळत मूर्ख**
तोंडी भिजे न तीळ | मारे अफाट पीळ |
ऐकून 'दातखीळ' | तो पिळत मूर्ख|

अर्थात् : दिसेल त्याला पकडून सुचेल त्या विषयावर थकेपर्यंत पीळ मारणारे

(यातील सर्व अथवा आपल्याला लागू पडणाऱ्या श्लोकांचं दररोज सकाळ संध्याकाळ नियमित पठण केलं तर मूर्खांपासून आपल्याला होणाऱ्या त्रासाचं एका आठवड्यात निराकरण होतं असा काही भाविकांचा दावा आहे!)

**मूर्खतेचं मूळ**

मूर्खांचे एवढे नमुने पाहिल्या नंतर मला प्रश्न पडतो की जगात एवढे, एवढ्या प्रकारचे मूर्ख आहेत तरी कशामुळे? या एवढ्या मूर्खतेचं मूळ काय?

प्रत्येक व्यक्ती ही जन्मते, जगते आणि मरण पावते . गेल्या **30 - 40** हजार वर्षांमधे या क्रमामधे काहीएक बदल झालेला नाही . कुठेही जन्म झाला, कशाही प्रकारे जीवन व्यतित केलं तरी एक ना एक दिवस प्रत्येकजण निश्चितपणे मरण पावतो . या विश्वामधे हजारो

आकाशगंगा आहेत. प्रत्येक आकाशगंगेत लाखो तारे आणि कोट्यावधी ग्रहमंडलं! या अफाट पसाऱ्यातल्या कुठल्यातरी एका पृथ्वी नावाच्या चिमुरड्या ग्रहावरती, कुठल्याशा चिमुटभर गावात जन्माला येउन आपण काही फार मोठा तीर मारत नाही! आपल्या जगण्यानी या अफाट विश्वामधे काहीएक फरक पडत नाही आणि मरणानी तर नाहीच नाही. . . असं असूनही आपण स्वत:ला या विश्वाच्या केंद्रस्थानी मानतो. आपली अनंत स्वप्नं, इच्छा, आकांक्षा, ध्येयं, ईर्षा आणि हव्यास आपण हृदयाशी बाळगून जगत रहातो. आणि आपलं संपूर्ण आयुष्य या हव्यासांच्या मागे धावण्यात घालवतो.

पैसा, प्रसिद्धी, सत्ता, मालमत्ता. . . जे जे काही मिळवण्यासाठी आपण आयुष्यभर धावत रहातो ते सारं सारं आपल्याला इथेच ठेवून जावं लागणार असतं. आणि हे असं इथेच सोडावं लागणार आहे हे माहीत असूनही ते मिळवण्यासाठी आपण आयुष्यभर झटत रहातो. हेच साऱ्या मूर्खतेचं मूळ! पढतमूर्खापासून ते पिळतमूर्खापर्यंत सर्वच मूर्ख काही ना काही मिळवण्याच्या हव्यासापोटीच आपल्यातल्या मूर्खतेचा आविष्कार होवू देत असतात. साऱ्यांच्या वागण्या बोलण्या मधे या मूलभूत मानवी मूर्खतेची वेगवेगळी रूपं आविषकृत होत असतात.

आपल्या आजुबाजूला आणि मुख्य म्हणजे आपल्या स्वत:मधे असलेली मूर्खता जर इतकी मूलभूत आणि सर्वव्यापी असेल तर त्यावर उपाय काय? या मूर्खतेतून मुक्त होण्यासाठी मार्ग कोणता?

हे उपाय आणि मार्ग शोधण्याचे माझे प्रयत्न चालू आहेत. सापडलेच तर आपल्याला निश्चित कळवेन! जर तुम्हाला सापडले तर मला कळवायला विसरू नका! ते सापडे पर्यंत स्वत:मधल्या मूर्खतेची संपूर्ण ओळख करून घ्यायची आणि तिच्याशी मैत्री करून आनंदानं रहायची माझी धडपड सुरू आहे. . .

**- प्रसाद शिरगांवकर**


## थकले गे, बिल आता, थकले गे

थकले गे, बिल आता, थकले गे
शॉपिंगने, सोन्याच्या शॉपिंगने, थकले गे, बिल आता, थकले गे

जावून, घेऊन आली महागातली वीस तोळी फुले
येणाऱ्या बीलाची, जाणीव होऊन, भांबावले मन खुळे
सोन्याचे, सोन्याचे, दर सोन्याचे, आधीच लाडावले
शॉपिंगने, तुझ्या शॉपिंगने, थकले गे, बिल आता, थकले गे

रीत ही, रीत ही, समजेना
पडला का मोह तुझा उमजेना
कसा सांगू मी, सांगू मी
माझ्या मनीची व्यथा ही
शॉपिंगने, तुझ्या शॉपिंगने, थकले गे, बिल आता, थकले गे

**- सुवर्णमयी**






- अजय पाटील

# मनातले


- भय इथले संपत नाही - सुमती वानखेडे
- मनातली दिवाळी - झेलम
- आग्रह - आर्च
- **26 जुलै 2005** पॅरिस !! ... - चंपक
- ग्रॅन्ड कॅन्यन : प्रवासवर्णन ... - सुवर्णमयी

# भय इथले संपत नाही . . .

‘का शब्द शब्द होऊनी मनमोर खुळा नाचावा
ह्या धूसर झांजरवेळी . . . डाव पुन्हा मांडावा
प्रेमाचे फसवे गाणे . . . का यावे त्याच्या ओठी
अन माझाच भावडा जीव मी युगे युगे जाळावा !’

‘परत ये!’ अशी आर्त हाक घालत तुझं माझ्यासमोर पडलेलं हे पत्र ! इतक्या दिवसांचं शांत असलेलं अन आता नव्यानं पुन्हा उफाळलेलं वादळ . . . माझी झोप पार उडवून देणारं . . . एकाचवेळी कितीतरी विचार विकारांचं मनात उठलेलं काहूर . . .एकीकडे तुझं माझ्यावर असलेलं अमर्याद प्रेम . . . तर दुसरीकडे कालांतरानं तू माझ्या अस्तित्वाला दिलेला नकार . . . आणि हे दु:ख माझं एकटीचंच तरी कसं म्हणू यश ? कितीतरीजणींची आयुष्यं ही अशीच आरपार ढवळून निघालेली आहेत . सीता . . गीता . . सुमन . . कमल . . किती म्हणून नावं घ्यायचीत !सुशिक्षित असो की अशिक्षित, प्रत्येकीच्या दु:खाचा पोत तर एकच ना ! हल्ली जसजशी खोलात जाते तसतशी कितीतरी कडवट सत्यं नागडी होऊन पुढ्यात येऊन उभी राहतात . खरंच कुणी कुणाला फसवलं मुळात !

**1 .**

राज्यसरकारच जेव्हा लाखो रुपये घेऊन खुलेआम दारूचे परवाने वितरित करते, तेव्हा दोषही नेमका कुणाला द्यायचा ? ह्या सत्तालोलुप, अनिर्बंध आदिम प्रवृत्तीला . . . की त्या क्षणिक सुखाच्या लालसेनं दिवसेंदिवस अध:पतनाच्या मार्गाला लागलेल्या, किड्या मुंग्यांचं जिणं जगणाऱ्या मानवी प्रवृत्तीला ? स्वर्गातले अमृत विषाच्या रूपात भूलोकावर उतरले अन त्या पाठोपाठच उतरल्या स्वर्गसंसकृतीतल्या अप्सरा . . . अधिक मोहक, अधिक मादक रूपातल्या . . . पण इतरांचे संसारसुख नासवून टाकणाऱ्या . ‘डान्सबार’ ही संकृती उदयास आणणाऱ्या, पुरुषातच मुळातच असलेल्या कामूक प्रवृत्तीला अधिकच झिंग आणणाऱ्या ह्या मदिराक्षी ! आधीही गणिका होत्याच ना ! ह्या आधुनिक बारबालामुळे फक्त व्यवसायाचं स्वरूप बदललं, पण त्याची पाळंमुळं मात्र अगदी चिवटपणे घट्ट घट्ट जिथल्या तिथेच कायम राहिली . पुरुषांनी आपल्या दैनंदिन दिनचर्येतल्या तणावापासून सुटका मिळविण्यासाठी अवलंबलेला हा मार्ग . . . स्त्रीने आपले ताणतणाव हलके करण्यासाठी कुठे जायचं ?

**2 .**

अपुऱ्या प्रकाशात, धुंद वातावरणात, थिरकत्या संगीताच्या तालावर . . . आपल्याच घरातली आई, बहीण, बायको अशी नात्यातली बाईमाणसं पुरुषानं एकदा तरी नजरेसमोर आणून उभी करावी ! तिच्या देहावर आदळणाऱ्या इतरांच्या कामूक, वासनायुक्त नजरा कुठला सत्पुरूष सहन करू शकेल ? पण अखेरीस . . . ‘सत्पुरूष’ ह्या शब्दातला ‘सत’ हा शब्द तरी त्याच्या अर्थासह प्रत्यक्षात आहे का, हा ही सद्यपरिस्थितीत चिंतनाचाच विषय ! तसे असते तर आज आपल्याच पोटच्या गोळ्याला बाजारात विकणारे, आपल्याच रक्ताच्या वा नातेसंबंधातल्या मुलींना बाजारात उभे करणारे आई वडील, काका मामा अशा विविध रूपातले ‘दानव’ जागोजागी नजरेस पडले नसते ! आमचा पांढरपेशा समाज आज फक्त ‘माझी मुलगी, बायको, किंवा बहीण त्या जागी नाही ना !’ एवढाच स्वार्थी विचार करताना दिसतो अन डोळे बंद करून गप्प बसतो . सांग मला, युद्ध असो की जिद्द . . प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक वेळी स्त्रीच अशी का वापरली जावी रे ! ‘सोन्याचं अंडं देणारी कोंबडी’ ही दृष्टी अद्यापही विवाहाच्या बाजारात कायम आहे, आणि ह्या ‘देहबाजारा’चाच विचार केला तर ! बेसुमार उधळला जाणारा पैसाच नजरेस पडतो . हा पैसा काळा नसतो, गोराही नसतो . पैसा फक्त पैसा असतो . कुठल्या कुणाचं तरी सुख ओरबाडून तो कुठल्या कुणाला तरी सुखावत असतो . कायद्याचं बुजगावणंही उभं आहे, ते फक्त सामान्य माणसाला घाबरविण्यासाठी . सत्तालोलुप माणसं त्या बुजगावण्याचा योग्य वापर करायचा तो करतातच ! राज्याच्या उत्पादनशुल्क खात्याकडून ‘बार’ला परवाना मिळतो आणि सांसकृतिक खात्याकडून ‘नृत्य, गाणे, लोककला, नाच’ यांसारख्या कला सादर करण्याचा परवाना दिला जातो . मात्र असे परवाने देताना लेडीज बार, डान्स बार असा उल्लेखही त्यात नसतो, हे ही तेवढेच खरे ना !

**3 .**

पुरुषाला आयुष्यात नाविन्य हवं असतं . . . स्त्रीनंही असाच नाविन्याचा सोस बाळगला तर ! कसं व्हायचं मग आमच्या संसकृतीचं ! कदाचित हेच पुढचे धोके ओळखून ‘मनू’ नावाच्या नरजातीने आधीच स्त्रीसाठी काही ‘लक्ष्मणरेषा’ आखून दिल्यात का, जेणेकरून तराजूचा समतोल साधला जाईल . . . तो ही फक्त ‘स्त्री’कडूनच ! ‘सकाळी लग्न आणि संध्याकाळी घटस्फोट’ ह्या पश्चिमी संसकृतीवर टिका करणारे अन कुत्सितपणे हसणारे आम्ही . . . नैतिक अध:पतनाच्या बाबतीत, त्या रांगेत जगात कितव्या क्रमांकावर उभे आहोत, ह्याचा कुणीतरी विचार करेल का ? उगाच डोळ्यांवर पट्टी बांधून चाचपडणं कितपत योग्य ? एका बाजूने ‘बौद्धिक’ रूप धारण करून स्त्रिया

शिक्षणाच्या क्षेत्रात शालेय शिक्षण, उच्च शिक्षण प्रशिक्षण, तंत्रशिक्षण अशा यशाच्या कितीतरी पायऱ्या ओलांडून अनेक क्षेत्रात आज धडाडीने कार्य करताना दिसतात. कार्यक्षमता, नैपुण्य मिळवतात, तर दुसऱ्या बाजूने अल्पशिक्षणातच 'दैहिक' होऊन बऱ्यापैकी रूप, अल्पवय ह्या जमेच्या (?) बाजूंवर अध:पतनाच्या मार्गाला लागलेल्या दिसतात. माझ्यासारख्या सुशिक्षित, संस्कारशील, मर्यादाशील स्त्रियांनी तक्रार तरी कुणाविरुद्ध करायची ? कायदा साक्ष मागतो, पुरावा मागतो. घरातली अब्रू चव्हाट्यावर तरी कशी आणायची ?

**4**.

'आमच्या वैवाहिक आयुष्यात पंचवीस वर्षात माझ्याशी कधीही उद्धटपणेसुद्धा न बोलणारा नवरा मला मारहाण करण्यापर्यंत कशी मजल मारतो, हे माझ्या आकलनापलिकडचे होते. पोर्ट ट्रस्टमध्ये वरिष्ठ पदावरची नोकरी असतानाही त्याने केवळ लेडीज सर्विस बारमधल्या तरुणीच्या नादात पैसा उडवला. अवघ्या पाच वर्षात तेरा लाख रुपये कमाई त्यांनी अशी उडवली. ज्या बारवालांनी आमची घरे लुबाडली, त्यांची चिंता कशाला वाहायची ? या बारवालांना पर्यायी जॉबच काय, घरगुती कामंही सरकारने देऊ नयेत...' असं पोटतिडकीनं व्यक्त होणारं दु:ख हे केवळ एकाच स्त्रीचं नव्हे, तर ह्या दु:खाची कितीतरी वेगवेगळे पोत आज नजरेसमोर लक्तरलेल्या अवस्थेत जागोजागी दिसून येतात. कुठे मुलांच्या शिक्षणाला नवरा पैसे देत नाही, तर कुठे बारवालेलाच घरात आणून वेळप्रसंगी पत्नीला तो मारहाण करतो. कितीतरीजणींचं संसारसुख असं उद्ध्वस्त झाल्यानंतर सरकारने घेतलेला हा निर्णय. गुटखाबंदी, मटकाबंदी, विषारी दारूबंदी अन त्या पाठोपाठ आता ही 'डान्सबार बंदी'. पण... यंत्रणेची सहजासहजी उपलब्ध होणारी पैसे खाण्याची नशा जोपर्यन्त नसानसात भिनलेली आहे, अन अद्यापही आवेगानं सळसळता रक्तप्रवाह होऊन वाहते आहे, तोपर्यन्त ह्या सर्व बाबी खरंच प्रत्यक्षात उतरणार की केवळ कागदावरच राहणार ? प्रत्यक्षात कारवाई होत असली तरी ती खरीखुरी की समाजाच्या नजरेत धूळफेक करत आडवाटेचा मार्ग अवलंबणारी !

**5**.

अखेर सरकारनेच घेतलेल्या ह्या निर्णयाचे दूरगामी परिणामही होतीलच. वेश्यांच्या संख्येत वाढ, त्यांचे दर मात्र कमी, रात्रपाळीत चालणाऱ्या रिक्षा, टॅक्सी, उपाहारगृहे, पानवाले, टपरीवाले, बारमध्ये काम करणारी छोटी छोटी मुलं... ह्या सर्वांना बसणारा आर्थिक फटका... पण त्यासोबतच वापस येईल, ते घराघरातून हरवलेलं सुख... संस्कार... पण ढासळलेली मनाची बुरूजं पुन्हा नव्यानं उभारी घेतील ? फिनिक्स पक्ष्यासारखी राख झाडून नव्यानं झेप घेण्याची जिद्द इथल्या ढासळलेल्या जीवनसंसकृतीत नव्या रुपानं निर्माण होईल ? की... विद्ध झालेली मध्यमवर्गीय संस्कारात रुजलेली, पिचलेली, खचलेली मनं कटू शब्दांचा भडिमार करत पुन्हा एकदा नव्या दु:खाला जन्म देतील ! अस्वछ झालेलं तन एकदाचं घासून पुसून स्वछ करताही येतं रे... पण मन... त्या वर धरलेली घृणेची, तिरस्काराची, अगतिकतेची, झिडकारल्याची असंख्य जळमटं कुठंवर साफ करत न्यायची ? माझ्यासारख्या समंजस, कमावत्या स्त्रीची ही दुर्दशा... तर परावलंबी बायकांबाबत काय बोलायचं रे ? खरंच सांग... कसं अन कुणाचं चुकतं नेमकं ? 'संसारात रमेसारखी वाग' असं पदोपदी आम्हाला बजावणारी आई... 'शयनेषु रंभा' हा कानमंत्र द्यायला विसरते (की जाणूनबुजून टाळते ?) म्हणून हे सारं घडतं रे ? तसं पाहिलं तर... कुणाचं दु:ख खरं मानायचं अन कुणाचं खोटं ?

**6**.

भय इथले संपत नाही....

परवा डिस्पेन्सरीत माझ्याकडे दोन मुली आल्या होत्या. काहीश्या दुखावलेल्या... भांबावलेल्या... त्यातल्या एकीच्या पाठीवर असंख्य जखमा... कसल्या ते न विचारताच कळू शकणाऱ्या... पण... 'बाई म्हटलं की जखम व्हायचीच' हे सत्य निरगाठीसारखं मानून ती मला विचारतेय, 'कितने दिन में रिकव्हर हो जायेगा ?' नंतर मैत्रीणीकडे वळून, कितने दिन ऐसेही घर में बैठी रहूंगी ? रोजका कितना नुकसान होता है !' असं बोलली तेव्हा तिला विचारावंसं वाटलं होतं... 'तुझं नुकसान नेमकं कशाचं झालंय, ते तुझं तुला तरी कळतंय का ?' नाव विचारलं तर नाव सांगायला नकार... जखमा लवकर भरून यायला हव्यात, म्हणून हवी तेवढी इंजेक्शन्स घ्यायला तयार... स्त्री नेमकी कुठल्या मातीची बनली असते रे ! 'बार में जल्दी से जल्दी नही जाउंगी तो पप्पू की इंजिनिअरिंग की फीस कौन भरेगा ?' मैत्रीणीसोबत फुसफुसताच तिचा व्यवसाय आणि तिच्या मनातलं दु:ख एकाचवेळी बाहेर पडलं. मी खरंच काय करायला हवं होतं रे तेव्हा ! माझंही संसारसुख अशाच एका निगरगट्ट बारवालेनं ओरबाडून घेतलेलं आहे, ह्या कडवट व्यथेनं मी त्या दोघींना हाकलून द्यायला हवं होतं ? पण खरं तर... त्या वेळी माझ्या नजरेसमोरची ती धूसर... धूसर झाली आणि त्या जागी चेहरा उमटला तो तिच्या भावाचा... त्याच्या उज्वल भवितव्याचा ! तुला खोटं वाटेल... पण मग मी माझ्यातल्या 'पत्नी'ला मारून टाकलं अन उपचार करेस्तोवर केवळ माझ्यातल्या 'डॉक्टर'लाच रसरशीतपणे जिवंत ठेवलं. त्या मुलीवर उपचार करताना कळत नकळत मी 'ती'चा अंतर्वेध घेऊ लागले अन त्या पाठोपाठ स्वत:लाही शोधत राहिले. 'तिच्या'त खरंच काय असावं असं की जे माझ्यात नाही ! लहानपणापासून

'अनाथ' म्हणून वाढलेल्या तुझ्यावर मी 'आई' आणि 'बायको' ह्या दोन्हीही नात्याने मायेची पाखर घालण्यात खरंच कमी पडले का रे ?

**7 .**

लग्न करताना पुरुषाला स्त्री हवी असते, ती बहुतांशी आपल्याच धर्माची . . . जातीची . . चांगल्या घरातली . . . उच्च कुळातली . . . उत्तम संस्कारातली . . . अन भोगताना . . . कुठे आडवी येते रे जात पात ? ती हवी तशी रसरशीत शरीरसौष्ठव लाभलेली मादी असली म्हणजे झालं, होय ना ? 'मला बायकोपासून पुरेसं सुख मिळत नाही, म्हणून . . .' अशी तक्रार करत कितीतरी पुरुष बायकांपासून कित्येक वर्षांचा संसार झाल्यानंतर अलग होताना अन नव्यानं संसार थाटताना दिसतात . . . बायकांचीही अशी तक्रार नसू शकते ? बोलतं कधी कुणी या विषयावर ? करतं का कुणी विचार अन तसं पाहिलं तर हे दु:ख वाट्याला आलेलं असलं तरी किती स्त्रियांच्या ओठांमधून ते चारचौघात उमटतं ? कृती तर फार दूरची गोष्ट झाली . हाच आरोप मी तुझ्यावर केला असता तर ! एवढा शिकलेला तू . . . पण कुणा पुरुषाशी मी साधं फोनवरही . . . ते ही तुझ्यादेखत जरा जास्त वेळ बोलले की . . . तुझा होणारा जळफळाट . . . त्या नंतरचा तळतळाट . . . कसा विसरायचा मी ! ह्या एवढ्या तेवढ्या गोष्टींनंही बाई पार विटाळून जाते का रे ! आणि सुरुवातीला तू अधून मधून . . . अन हळू हळू अख्खा दिवस रात्रच तिच्या सहवासात घालवायला लागल्यावर मी तुझ्याबाबत नेमकं काय बोलायचं ? कपड्यांवर डाग पडलेत तर काढायला ते ड्रायक्लीनला देता येतात . . . माणसाच्या मनाचं ड्रायक्लीन कसं करायचं ? गहन प्रश्नच नाहिये का हा ?

**8 .**

. . . . किती स्वप्नं बघितली होती रे आपण लग्नापूर्वी ! आपलं घर . . . आपली डिस्पेन्सरी . . . आपली मुलं . . . कितीतरी स्वप्नं बघितली होती आपण दोघांनी मिळून . सगळंच तर सुरळीत सुरू होतं . . . अन अचानक . . . आता ती सारी नव्हाळी संपल्यावर . . . अन तुझ्याजवळचा पैसा सरल्यावर . . . 'परत ये !' अशी कशी रे हाक तू घालू शकतोस ! आणि मी पुन्हा . . . त्याच रंगलेल्या मेंदीच्या हातांनी अन हळदीच्या पावलांनी कसं परतायचं तुझ्या संसारात ! सांग ना . . . तूच सांग, कसं परत यायचं मी तुझ्याकडे आणि पुन्हा नव्यानं कसं रुजायचं तुझ्यात ? यश . . . एकदा मनं दुरावलीत ना . . . की सगळं तुटून गेल्यातच जमा असतं बघ ! फक्त कागदावरच काळ्या शाईने जखमी शब्दांचे अवघ्या तनामनावर गोंदलेले ओरखडे तेवढे उमटलेले नसतात . म्हणूनच आज . . . कुणाच्यातरी लेखणीतून उतरलेले हे शब्द मला खूप जिवलग वाटताहेत . . . अन तू मात्र . . . फार फार परका . . .

'होती तिथे रांगोळी, मेंदीची पाने काही
नात्याचे बेसूर जिथे, वाजत गाणे राही
नावाची लौकीक ओळख, जिथे केवळ उरली
विटल्या वस्त्रांसाठी, त्या घरी जाणे नाही !'

## - सुमती वानखेडे

## मनातली दिवाळी

वघतावघता ही दिवाळी आली . खरं तर इथे परदेशात काहीच नवीन घडलं नाही . मीच मनाला समजावत होते, ' अग आज दिवाळी आहे, आनंदाचा सण, come on cheer up!'

दरवर्षी इथे दिवाळी साजरी करताना हे feeling येतं . खूप काही miss करतोय असं वाटतं . office मध्ये काम करताना निदान मला तरी जाणवतं की अरे दिवाळी आहे आणि आपण काम काय करतोय? हे तर सणासुदीचे दिवस . फराळ करण्याचे, खाण्याचे, खाऊ घालण्याचे दिवस . आप्तमित्रांनी एकत्र येण्याचे दिवस, आनंदी राहायचे दिवस . खूप nostalgic व्हायला होतं . भारतातल्या दिवाळ्यांची धूम आठवत राहाते . भाऊबीजेची ओवाळणी, नव्या dress चं सगळ्यांनी केलेलं कौतुक आठवतं . सकाळी **4 .30** पासून सगळ्यांच्या घरात लागणारे कंदिल, दिवे - त्या पार्श्वभूमीवर मला मी घरात लावलेली माळ फार एकाकी वाटू लागते .

का कुणास ठाऊक, भारतात जितकं मन मोहरायचं दिवाळीत, तितकं मोहरत नाही आता . घरी दिवे लावतो, फराळ करतो, लक्ष्मीपूजन, पाडवा सारं काही साजिरेपणी साजरं करतो; तरी आपण आता भारतात नाही हा सल असतोच . उत्सवी वातावरण फार miss होतं हे खरं . किती गरज आहे ना या सण, उत्सवांची? त्या निमित्ताने माणसं एकत्र येतात, एकाकीपण विसरतात . आपल्या मूलभूत गरजांसारखीच भावनिक भूक भागणं पण किती जरूरीचं आहे हे जाणवतं आणि हे सण आपल्याला छान संधी देतात express करण्याची .

महिनाभर मी internet वर दिवाळीच्या पूर्वतयारीच्या बातम्या वाचत असते . **5000** कोटींची दिवाळी, ढिगभर नव्या offers , फराळ कसा करायचा, सुंदर कसं दिसायचं अश्या टिप्स, सगळं दिवाळीमय . त्याच घर करून असतात मनात . एकदम काटा लागवा तशी दिल्ली च्या बॉंबस्फोटांची बातमी येते . मग हळूहळू आठवायला लागतात यावर्षीच्या आपत्तींच्या बातम्या . सुनामी, भयानक पाऊस, आता हा स्फोट, दरवर्षी वाढणारी संख्या . का आपण दु:ख करतोय एवढं? असे किती लोक असतील की ज्यांच्या घरी दिवाळी साजरी होत नसेल? कितिक असतील ज्यांना दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत, मग कसला फराळ आणि काय? मला नुसती दिवाळीची रोषणाई आठवतेय पण अंधारातले अश्रू का दिसत नाहीयेत? मी इथे राहून भारतात दिवाळी साजरी करू शकेन जर एकातरी घरी मी अगदी झगमगाट नाही, पण साधी पणती जरी लावू शकले तरी, माझ्यातली माणुसकीची दिवली विझू न द्यायचा निश्चय मी करते आणि आनंदाने office चे काम करायला लागते .

**- झेलम**

# आग्रह

लहानपणी लावलेली सवय असेल किंवा खाण्याच्या बाबतीतला संकोची स्वभाव असेल पण मला कोणी " चहा घेणार का? " असं विचारल्यावर पटकन " हो " म्हणता येत नाही . तसंच कोणाकडे गेलं आणि त्यांनी coffee table वर फराळाच्या गोष्टी आणून ठेवल्यावर " घे ना! " असं म्हणेपर्यंत माझा हात त्या वस्तूंकडे वळत नाही . म्हणजे मला आग्रह लागतो असं नाही पण कोणी आपलेपणाने घे म्हणावं असं मात्र नक्की वाटतं .

मी त्यावेळी नुकताच माझा US मधला पहिला जॉब सुरु केला होता . मी आणि Janet एकच ऑफीस वापरत असू . ती थोडी स्वत:मध्येच मग्न असे . हळूहळू आमची मैत्री होत गेली . ती south मधल्या छोट्याश्या गावातून आलेली . त्यामुळे ती भारताविषयी जाणून घ्यायला खूप उत्सुक असायची . बरेचदा आम्ही दुपारी एकत्र खात असू . एकत्र म्हणजे ती तिच्या टेबलवर आणि मी माझ्या . एकत्र म्हणण्यापेक्षा एकावेळी म्हणणं जास्त योग्य होईल . असंच एकदा तिने KFC मधून 3 piece chicken dinner आणलं होतं . स्वत:चं खाउन झाल्यावर मला म्हणाली, " Arch, would you like this piece? " मी अवाक् होऊन बघत राहिले . म्हटलं " Janet, are you offering this because you do not want it?" . ती लगेच म्हणाली " Of course! Otherwise why would I ask you? " मी लगेचच नको म्हटलं . Cultural difference चा हा मला बसलेला पहिला धक्का . आपल्याला नको म्हणून दुसऱ्याला देणं आणि आपण खाण्याआधी दुसऱ्याला offer करणं केवढा फ़रक आहे ना!

Office मधल्या एका group ची party झाली आणि ते party food उरलं असलं तर ते general coffee area त आणून ठेवलं जातं आणि मग इतर लोक, ज्यांना कोणी ते तिथे आणून ठेवलं आहे हे माहित नसलं तरी ते तिथे जाउन खात राहातात . हे ही मला पहिल्यांदा नवीन होतं . मग वाटायला लागलं इथे अन्न हे खरंच पूर्णब्रह्म म्हणून मानलं जातं . खाण्याचा पदार्थ हा खाण्यासाठी आहे . त्यात आग्रह करायची गरज नाही . मला भूक लागली आहे आणि नसली लागली तरीही . हा पदार्थ मला आवडतो आणि इथे खाण्यासाठी ठेवला आहे . मग इथे अन्नाचा अपमान होण्याचा प्रश्नच नाही . नाही का?

इथे प्रत्येकजण आपल्याला हवं तेव्हा, हवं तेवढं खात असतो . खाताना इतरांना विचारायची इथे पध्दत दिसून येत नाही . असेच एकदा माझ्याकडे पाहुणे आले होते आपलेच भारतीय . आम्ही सगळे मुलांसोबत जेवायला बसलो होतो . माझा " हे घ्या ना . ते घ्या ना . " असा mild आग्रह चालला होता . दोनदा - चारदा तसं झाल्यावर माझा मुलगा मला म्हणाला " Mom, why are you pushing food on them? If they like it and want it they will take it. " माझा चेहराच पडला . मनात आलं, पाहुण्यांना काय वाटल असेल! एक तर आग्रहाच भाषांतर pushing food मध्ये झालं होतं आणि इथली मुलं आपले विचार लगेच मोठ्यांपुढे मांडतात ह्याचं पाहुण्यांना काय वाटलं असेल ह्याचीही नाही म्हटली तरी थोडी लाज वाटली .

एकदा John , माझा सहकारी काहीतरी कामासाठी घरी आला होता . आपल्या पध्दतीनुसार माझ्या नवऱ्याने drinks विचारली . तो विचारलेल्या प्रत्येक drink ला नको म्हणत होता . नंतर माझा नवरा तिथून गेल्यावर John ने मला विचारलं, "Arch, why your husband was so insistant (pushing?) that I drink something? " मी म्हटलं, " अरे बाबा, ती आमची पध्दत आहे . घरी आलेल्या पाहुण्याला खायला प्यायला दिल्याशिवाय जाऊ द्यायचं नाही . पाहुणचार म्हणतात त्याला . "

पूर्वीसारखे लोक पानात टाकेपर्यंत वाढत राहाणं मला कधीच आवडलं नाही . आमच्या घरात पध्दत होती, पानात काही टाकायचं नाही . कुठेही गेलं तरी हवं तेवढंच घ्यायचं आणि हो, आवडत नसलं तरी पान स्वच्छ झालंच पाहिजे . ही सवय मी मुलांनापण लावली . लहानपणी plate clean झाल्यावर मी त्यांना म्हणायचे, " ही बघा happy plate झाली " . अजूनही मला restaurant मध्ये गेल्यावरही कोणी टाकलं की राग येतो .

कोणाकडे गेलं किंवा कोणी माझ्याकडे आलं की मला प्रेमळ आग्रह केलेला किंवा करायला मनापासून आवडतं . मग इथे casual party ला गेल्यावर " There is a lot of food. Go ahead and dig in" असं म्हणतात, हा इथला प्रेमळ आग्रहच म्हणायचा का?

**- आर्च**

## 26 जुलै 2005 पॅरिस !!

मुंबईत 26 जुलै 2005 ला जो पाऊस झाला त्यामुळे परदेशातून देशात येताना लोकांना जो त्रास झाला त्याचे प्रातिनिधिक वर्णन . मुंबईत लोक जर पाण्यात होते तर हे प्रवासी ना धड हवेत ना धड हॉटेलात अश्या विचित्र स्थितीत अडकले होते! लंडन, पॅरिस, झुरिच, मिलान, ई transit airport / point वर अडकलेले शेकडो, हजारो प्रवाश्यांनी साधारण हाच अनुभव घेतला असेल . ! तो शब्दबद्ध करण्याचा हा अल्पसा प्रयत्न!!!

तब्बल दोन वर्षा (वर्ष = Year )च्या विरहानंतर देशात जायला मिळत होते . त्यामुळे जवळपास सहा महिने अगोदर पासून च गुडघ्याला बाशिंग बांधलेल्या नवरदेवा प्रमाणे उतावळा झालो होतो . अखेर 28 जुलै चे तिकिट बुक केले अन स्वप्नांच्या (स्वप्न = dream ) दुनियेत रमून गेलो . कुटुंबातील छोट्यांसाठी काही टी सदरे, चड्ड्या, टोप्या, काही खेळणी, अन खुप चॉकलेट्स घेऊन धोपट्या अन पोतड्या बांधल्या . काही खास मित्रांसाठी स्पेन ची प्रसिद्धा La Rioja Brand’s Red wine च्या 3 बाटल्या ही पोतडीत टाकायला विसरलो नव्हतो

28 ला सॅन सेबास्टियन हून निघालेलो मी इथून 100 कि .मी . वरील बिलबाव ( Bilbao )विमानतळावर पोचलो तेंव्हा मला पहिला धक्का बसला . check in साठी काउंटर वर गेलो तो तिने मला कागदपत्रे अपूर्ण असल्याने बोर्डिंग पास च नाकारला . तरी मी आधी परवानगी चा कागद आणलेला होताच . मग त्या बाईला सगळे नियम वगैरे समजावत एकदाचा बोर्डिंग पास मिळवला . पण त्यात तिने फ़क्त बिलबाव ते पॅरिस चा च पास दिला, पॅरिस ते मुंबई चा पास पॅरिस ला मिळेल असे स्मित हास्य करून सांगितले . (ते जीवघेणे स्मित हास्य पुढच्या नाट्यमय घटनांची नांदी ठरले . . ! ) मग आला तो वजन काट्या चा प्रसंग . मित्र परिवाराने सुचवलेला सर्व माल मसाला एकत्र केलेल्या पोतडी चे वजन तब्बल 40 किलो भरले . ( allowed : 32 kg ) मग स्मित हास्य करायची वेळ माझी होती! ☺ मग तिने ही स्मित हास्याला प्रतिसाद देत माझ्या हॅन्ड बॅगेतील महत्वाची कागदपत्रे अन तीन बाटल्या अन एक टॉवेल (हा च टॉवेल पुढे लै कामेई आला! ) एका कॅरी बॅग मध्ये टाकून माझ्या हाती दिले अन दोन्ही बॅग आता थेट मुंबई ला मिळतील असे सांगितले . मी खुष ! कटकट गेली ती एकदाची . मस्त पैकी इकडे तिकडे पहात मी विमानाकडे घेऊन जाणाऱ्या बस मध्ये बसलो . अन विमानाजवळ उतरलो तर ते तिकिटात उल्लेखलेले Brit air चे विमान British airways चे नसून अश्याच एका BRIT AIR ह्या air france च्या सहयोगी कंपनी चे होते . तो दुसरा धक्का होता . तरीच मला शंका होती कि Air france अन British Airways असे एकत्र सेवा कशी काय पुरवु लागले . साधारणत: युरोपातून भारतात जाताना ज्या कंपनी चे तिकिट घ्याल त्या कंपनी च्या मुख्यालय ( Eg. Air France – Paris, Alitalia- Milan, Itali. Swiss Air – Zurich, Switzerland, British airways – London ) ते इतर युरोपीय देशातील ठिकाणे ही हवाई सेवा अश्या च सहयोगी कंपन्या चालवतात अन मग मुख्यालय ते मुंबई , दिल्ली व ईतर शहरे ही सेवा ह्या मुख्य कंपनी द्वारे चालवल्या जातात . BRIT कंपनी नी बऱ्यापैकी सेवा पुरवली (एका ऐवजी दोन दोन सॅन्ड्विच दिले, बळे बळे ! ) . पॅरिस ला पोचलो रात्री चे 10:30 वाजले होते .

नाटकाचा पहिला अंक इथे सुरु होत आहे ...............

माझी पुढची जी फ़्लाईट होती, ती दुसऱ्या दिवशी सकाळी होती त्यामुळे रात्रभर विमानतळावर बसण्यापेक्षा रात्री जर आयफ़ेल टावर पहाता आला तर बरे असे मनात असल्याने, जेंव्हा तिकिटे बुक केली तेंव्हा एका मित्राकडून त्याच्या पॅरिस ला राहणाऱ्या एका मित्रा चा ई मेल पत्ता घेतला होता . अन त्याच्या शी मेला मेली करून त्या रात्री आयफ़ेल टॉवर पहावा अशी योजना केली होती . ( Man proposes, god disposes! ) त्या मित्रा च्या मित्राने त्याचा मोबाईल फ़ोन नंबर मला दिला होता . पण निघायच्या दिवशी सकाळी त्याने मेल करून तो आजारी असून विमानतळावर मला घ्यायला येऊ शकत नाही असे कळवले . उलट टपाली त्याला लवकर बरा हो असे म्हणून मी स्वत: च तिकडे येतो असे सांगितले अन त्याचा राहत्या ठिकाणाचा पत्ता घेतला होता . पॅरिस विमानतळावर उतरलो तो फ़ोन करायची पंचाईत, कारण सगळे फ़ोन फ़क्त क्रेडिट कार्ड वर च ऑपरेट होतात . स्पेन मध्ये coin box ची सवय असल्याने मला काही ते वापरता येइना . 11 वाजून गेले . आसपास कुणी भारतीय, पक्षी तो मित्राचा मित्र दिसतोय का ह्याचा शोध घेतला . पण तो दिसला नाही . मग air france च्या काउंटर वर गेलो . तिथल्या कृष्णाकाकू (हा शब्द श्री विनय देसाई यांचे कडून साभार !) ला अडचण सांगितली . पण फ्रेंचाचे इंग्रजी हे स्पॅनिश लोकांपेक्षा दिव्य! अन त्यात फ्रेंच च बोलण्याचा दुराग्रह . (अन इकडे मुंबई विमानतळावर मराठी त बोललो तर तिथला पोलिस मला धन्यवाद देतो, कि बाबा लोक जे ही येतात ते हिन्दी अथवा इंग्रजी च बोलतात म्हणे, तुझ्यासारखा एखादा च असतो मराठी बोलणारा! मराठी बाणा जिंदाबाद !) शेवटी तिचा एक सहकारी मदतीला आला अन त्याने पत्ता व फ़ोन नंबरवरून त्या मित्राला फ़ोन लावून दिला . आमचे बोलून झाल्यावर तो स्वत: त्या मित्राशी बोलला अन बस व मेट्रो मधील मार्गाचा फ़रक समजावून सांगत मेट्रो ने जाण्याचा नकाशा काढून दिला . एक पॅरिस चा वाहतूक व्यवस्थे चा नकाशा ही दिला . बस सेवा रात्री 9.00 ला बंद होतात हे ही सांगितले . मग मेट्रो कडे, खाली जमिनीखाली 2 मजले असावेत, जावून तिकिट काढले अन 11: 15 pm ची मेट्रो ने शहराकडे निघालो . मेट्रो स्टेशन अन मेट्रो मध्ये कृष्णवर्णीयांचे प्रमाण 90% पेक्षा जास्त च होते . त्या धिप्पड लोकांना पाहून माझे पार चिप्पाड

झाले . पण अनेक फ्रेंच ही मजेत जा ये करित होते . अन तरुण पोरे पोरी बिनधास्त वावरताना दिसले त्यामुळे कायदा सुव्यवस्था ठीक असावी असा अंदाज घेत मी प्रवास सुरू केला . विमानतळ ते ईप्सित थांबा हे अंतर **45** मिनिटांचे होते . अन मध्यरात्री **12** ला मेट्रो बंद होते . त्यामुळे पत्ता सापडला नाही तर तिकडे च फ़ुटपाथ वर थांबा! टॅक्सी **150** युरो घेणार . अन खिशात फ़क्त **141** एउरो . म्हणायला क्रेडिट कार्ड होते, नशीब! मेट्रोत बसलेल्या एका वयस्कर बाईला थोडे इंग्रजी येते हे जाणून मग नकाशा अन पत्ता दाखवून माहीती घेण्याचा प्रयत्न केला पण तिला ही फ़ारशी माहीती नव्हती .

मग एकदाचे इप्सित स्थळी उतरलो . रात्री चे **12** वाजले होते . तो मेट्रो चा शेवटचा थांबा होता . मग बाहेर पडण्याचे मार्ग शोधू लागलो तो **2** पेक्षा जास्त exit मार्ग होते . नेमके कुठल्या बाजूला जायचे हे मित्रा ने न संगितल्या मुळे मी गोंधळलो . मग एका सहप्रवाश्याला पत्ता दाखवून एका exit मधून बाहेर आलो . तिथे टॅक्सींचा दुष्काळ . रस्ते शांत झालेले . रहदारी फ़ार कमी! एक दोन टॅक्सी वाल्यांना हात केला पण ते काही थांबेनात . हातात महत्वाचे जवळ जवळ **4** किलो पेपर अन **3** बाटल्या असे किमान **8** ते **10** किलो वजन घेऊन मग मी आजूबाजूच्या चौकातून रस्तो रस्ती टॅक्सी ला हात देउ लागलो . एकही थांबेना . एक थांबला तो फ्रेंच भाषा मला बोलता येत नाही अन इंग्रजी त्याला समजत नाही म्हणून निघून गेला! बोंबला . मग शेवटी पून्हा मेट्रो च्या थांब्या जवळ येऊन उभा राहीलो . फ़ोन करणे तर शक्य होईना अन एखाद्याला क्रेडिट कार्ड दिले अन फ़ोन कर म्हणले तर काय होईल सांगता येणार नाही अशी भिती . मग एक तरूण जोडपे तिथून मोबाईल वर काही खेळ खेळत डुलत डुलत चाललेले दिसले . त्याना पत्ता दाखवून कसे जावू विचारले . आश्चर्य म्हणजे त्यांना इंग्रजी येत होते . पोरगा फ्रेंच होता अन पोरगी ईटलियन होती . student exchange prograame द्वारे ती तिथे आली होती . कर्मधर्मसंयोगाने त्यांना ही मी जात होतो तिकडे च जायचे होते . आपण एक च टॅक्सी शेअर करू कारण खूप महाग आहे असे सुचवून मग त्यांनी एक टॅक्सी पकडून आणली . ह्या टॅक्सीवाल्याला इंग्रजी येत होते! सगळे मनाप्रमाणे चालले होते . मग आम्ही मला हवे त्या इमारतीजवळ उतरलो . पैसे मी च दिले . आधी ती जोडी टॅक्सी शेअर करु म्हणली पण टॅक्सी थांबताच उतरून लांब जावून उभी राहिली . शाणे युरोपीयन! येडा चंप्या . पण मला ऐनवेळी मदत करणारे असल्याने मी ही तो विषय जास्त ताणला नाही!

इमारती जवळ गेलो तर ते म्हणे हा फ़क्त इमारतीचा पत्ता आहे, फ़्लॅट नंबर काय आहे! म्हणले मला काय माहीती भौ . मला फ़क्त एक फ़ोन नंबर माहीत आहे . मग त्या पोरीने च , चल तु शेअर टॅक्सी चे पैसे दिले तर मी तुला फ़ोन करून देते म्हणुन तिच्या मोबाएल वरून मित्रा चा नंबर लावला . बंद! मित्रा चा मोबाईल switched off ऐकवत होता . मी तर गारठलो च! इतके आत येऊन हा भावु झोपला की काय! **4** ते **5** वेळा फ़ोन केले पण एक च बंद ची टेप . **5** ते **10** मिनिटे विचार करून मग आम्ही अंदाजे च एखाद्या फ़्लॅट नंबर वर बेल द्यायचे ठरवले अन कुठे इंडियन राहतो का हे विचारायचे ठरवले . इतक्या रात्री **1** वाजता कुणाला झोपेतून उठवणे पण सभ्य पणाचे लक्षण नाही पण अडळा हरी . . . . . . . . . . . ! पण तेवढ्यात त्या पोरीच्या मोबाईल वर त्या च मित्रा ने फ़ोन केला, त्याला मी इथे आलो हे सांगितले . अन तो खाली आला . माझा जीव भांड्यात पडला!!!

नाटकाचा मुख्य अंक इथे सुरू होत आहे

रात्रभर त्याच्या रुम वर थांबून सकाळी **9** वाजता विमानतळावर पोचलो . खूप भारतीय चेहरे दिसले . मला बरे वाटले . दोन वर्षानंतर इतके सारे भारतीय मी पहात होतो . पण त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत नव्हता . मला वाटले कि बहुतेक अमेरिकन भारतीय जनता आहे ( transit वाले), अन तिथे खूप भारतीय असल्याने त्यांना काय गम ना खुषी! मग कागद अन बाटल्या सांभाळत मी air france च्या डेस्क वर गेलो अन गेट नंबर कुठे आहे ते विचारत होतो . बोर्डिंग पास नव्हता त्यामुळे जर घाईत होतो . पण तिथे त्या माणसाने चक्क You are too late sir, Flight is already full!!! मी गोंधळलो . म्हणले अरे बाबा, **10** ची फ़्लाईट आहे, अन अशी बुक कशी होईल . माझे confirm ticket आहे . पण त्याने " **26** जुलै चा मुंबई चा ऐतिहासिक पाऊस अन त्यामुळे **27** अन **28** चे विमाने रद्द झाल्याने खुप लोक अडकले आहेत अन first come first serve अश्या बेसिस वर विमान भरायचे काम चालू आहे " असे समजले ..... मग मला इतके भारतीय विमानतळावर का ते अन चेहरे त्रासिक का ह्याचा उलगडा झाला! नसतो गेलो त्या पोराच्या रुम वर तर मी च पहिला असतो ना रांगेत असा क्षणभर विचार आला . घरी जायल कधी मिळणार हे तो सांगू शकत नसल्याने मला थोडे रडु यायला लागले . साला, **2** वर्षातून एकदा निघालो तर त्यात हे विघ्नं ! अन मग डोक्यात प्रकाश पडला कि बिलबाव ला पुढील प्रवासाचा बोर्डिंग पास का नाही मिळाला ते! अरे चोरांनो! air france ने सगळे बोर्डिंग च सस्पेंड केलेले होते . अन त्यामुळे काही माझ्यासारखे Transit / Connection flight वाले पॅरिस ला येऊन अडकले होते . हे जर त्यांनी बिलबाव ला सांगितले असते तर तिकडून इकडे आलो च नसतो ना बे! ....... पण Past is cancelled cheque असे मनाला बजावत त्याने दिलेला हेल्प लाईन चा नंबर घेऊन कुणी समदु:खी दिसतो का ते शोधू लागलो .

सगळे च समदु:खी होते . मग त्यातल्या त्यात कोणी मराठी दिसते क ते पाहू लागलो . अश्या संकट समयी भारतीय लोक एकत्र येतील तर ते भारतीय कसले! जो तो आपापले एक एक तिकिट घेऊन हिंडत होता . . एक दोन जणांना खेटलो पण कुणी काय दाद देइना . क्रेडिट कार्ड वापरणारे फ़ोन कसे करावे हे समजेना अन हातात **10** किलो बोजा, बाटल्या जपून हाताळाव्या लागत होत्या त्याने वैताग आला! एक

पंजाबी तरुण जोडी दिसली . बोललो तर ते मुंबई चे च होते अन हनीमून साठी आले होते . त्या पोरीचा भाऊ पॅरिस ला MBA करित होता . अन तो आता ह्या प्रॉब्लेम सोडवायला मदत करणार होता . . त्यांना, मला नाही . त्याने हाय फ़ाय स्टाईल ने हेल्प लाईन ला फ़ोन केला होता पण डाळ शिजली नव्हती . ती पोरगी जाम वैतागली होती . मग त्यांना एकीचे बळ चा धडा शिकवला . पण त्या MBA वाल्याला काय एकत्रित प्रयत्न करायचे आवडले नाही अन तो मग third देऊन निघून गेला . चलो . . कुणी विचारवंताने म्हणून च थेवल आहे . . हा माझा मार्ग एकला . . मग मी ही एकटा च air france च्या एका डेस्क वर जावून विचारपूस करू लागलो . तो शेजारी एक जणाने स्मित हास्य केले . थोडे बोललो . ते Bhabha Atmoc Research Centre , Mumbai चे शास्त्रज्ञ होते अन समदु:खी होते . त्यांचे ही आज चे च तिकिट होते . मग आम्ही एकत्र काही जमते का, किमान उद्या चा बोर्डिंग पास अन रात्री चे हॉटेल चे . हॉटेल नाही मिळाले तरी चालेल पण बोर्डिंग पास महत्वाचा . ( One important thing, If u have a Boarding Pass, its of no use until there is SEAT NO. mentioned on it. There were many people who had connection flight from Paris, like me, who were having Boarding Passes but without any SEAT NO. mentioned on them !! So clever / smart Air France staff !!! They were just making fool of us by these technical loop-holes. ) तितक्यात एक मराठी उंचेपुरे सद्गृहस्था ने स्मित केले . ते बेळगावचे होते . श्री . पाटील . इटालीतील एका कंपनीत मॅनेजर होते अन बायको अन मुलीला (वय 2 महिने, अजून प्रत्यक्ष मुलीला पाहिले पण नव्हते) आणायला चालले होते . तीन जमले . मग आम्ही काय करावे असे विचार करीत असताना, आम्हाला एक अजून वल्ली मिळाली . ती व्यक्ती मुंबई च्या siemens मध्ये मॅनेजर होती . टूर वर होते . ठाण्या चे होते मुळचे . असे चार जण जमळ्यावर आम्हाला जरा हुरूप आला . 4 मराठी माणसे एकत्र येऊन , इतरांना एकत्र न येण्याबद्दल शिव्या देण्या चा कार्यक्रम केला . अन Terminal A च्या डेस्क शी वाद घालू लागलो . तीथली स्मार्ट पोरगी काय जमू देइना . ति प्रत्येकाला दुसऱ्या एका terminal ला पाठ्वून देते आहे असे लक्षात आले . तिने आम्हाला ही terminal C ला जा म्हणले . ज्यांनी CDG airport, paris पाहिलेला आहे, त्यांना तो भूल भुलैया माहीते असेल . A,B,C,D,E,F समोरा समोर 3 – 3 terminals अन त्यांना एक मेकांना जोडलेले जमिनीवरील अन खालून चे जाळे ! आम्ही मग terminal C ला गेलो . तिथली बाई तर काही ऐकून च घेइना . . आम्हाला काही माहीती च नाही , अन आम्ही काही करु शकत नाही असे कानावर तिने हात ठेवले . बरीच मोठी लाईन होती . तिथे सिमेन्स वाला वैतागला . आधी air france ला जाम तत्वज्ञान अन management ethics शिकवले . पण त्याने काही झाले नाही . इकडे भारतीयांची लै मोठी लाईन असून कामाचे नव्हती . एकता नहती न! (कपूर न्हाई, युनिटी हो! ) भारतीयांचे एक वैसिष्ठ्य, देशाबाहेर गेले कि झाले शहाणे! विमानतळावर अन विमानात एकमेकांशी बोलणार नाहीत, आम्ही लै मोठ्ठे असा आव आणणार अन आपल्या च तोऱ्यात रहाणार . अभिमान, अहंकार अन गर्व ह्यातील सीमारेषा समजत च नाहीत जनतेला! मग siemens च्या मॅनेजर ने जो पट्टा चालू केला . अगदी मोठ्याने, आसपास च्या भारतीयांना ऐकू जाईल असे, शेलकी विषेशणे वापरून ह्या प्रवृत्ती वर भाषण करू लागला . मराठी, हिंदी, इंग्रजी चा अस्खलित वापर होत असल्याने आजू बाजू चे लोक जरा चमकले . पण काय दाद न्हाई . शेवटी दोन लंडन हून आलेल्या पोरी , उत्तर भारतीय, आमच्या कंपूत सामील झाल्या . त्या terminal C वरल्या पोरीने तिथून आम्हाला पुन्हा terminal A ला जा असा सल्ला दिला . . पुन्हा आम्ही 6 जण ही वरात घेऊन, त्या लंडन वाल्या पोरें अन मी सामानाच्या बॅगा ( main luggage ) ही ताब्यात घेतले होते . अन terminal C to terminal A दरम्यान जिथे जिथे cosmetic duty free दुकान दिसले तिथे त्यातलि एक आत जायची अन दुसरी सावकाश चला असे आम्हाल सांगाअय्ची . पोरींना कुठे ही cosmetics दिसले कि दुसरे काही सुचत नाही का भौ??? शेवटी लिफ़्ट, पायऱ्या अशी सर्कस करीत आम्ही terminal A ला पोचलो, तिथे पुन्हा तेच , आमचे आज चे तिकिट आहे, मग आम्हाला आता उद्या चे तरी द्या, किंवा कधी चे पण द्या अन तोवर रहायला हॉटेल द्या ......... बाकीच्यांकडे थोडे फ़ार कपडे तरी होते, माझ्याकडे त फ़क्त एक टॉवेल होता . लै अडचण ! त्या बाई ने पुन्हा आम्हाला terminal D ला जा असे सुनावले . अन खुप घोळ घातल्यावर एक फ़्रेंच भाषेत चिठ्ठी लिहून दिली मग आम्ही पुन्हा वरात घेऊन terminal D ला गेलो . अधून मधून अनेक भारतीय दिसत पण ते बोल त च नसत . आप आपल्या च तोऱ्यात . terminal D ला गेलो तर तिने पुन्हा कानावर हात ठेवले . ती म्हणे असे काही बोर्डिंग पास आम्ही देऊ शकत नाही . तुम्ही terminal F ला जा !!!! बोम्बला!!!!!!!!

आता पावेतो A, C, A, D फ़िरून झाले होते . आमचा संयम सुटत चालला होता . तेच तेच प्रश्न अन ती च ती च उत्तरे, कंटाळा आला होता . शेवटी सिमेन्स वाला तर म्हणे, मी हॉटेल बुकींग केलेले आहे माझे, मी जावून झोपतो अन उद्या पाहू . 1 वाजला होता, भूक पण लागली होती . पण मी कसे वसे शेवटचा प्रयत्न करून पाहू असे सुचवले ....... शेवटी चिकाटी महत्वाची! मग आम्ही terminal F ला गेलो . त्या सुंदर पोरीने हसून स्वागत केले . सकाळपासून आमच्याकडे पाहून हसलेली एकमेव पोरगी . बाकी पोरी जाम वैतागलेल्या होत्या ..... तिला पुन्हा एकदा समजावून सांगितले . तिने आमची तिकिटे पाहिली , passport, tickets घेतली . B.A.R.C. scientist चा diplomat visa पाहून परत वर मान करून sorry for inconvinience ही म्हणले . मग ती म्हणे, Only two things are possible with these tickets. One, you was supposed to be in the plane already and second, if not , due to problem of collapsed airlines shedules, you should be allotted with hotel till you get next confirmed boarding passes. And now, as you cant board the flight today I will arrange for your hotel bookings and will issue you tomorrows boarding passes WITH SEAT NUMBERS नाचो s s s !! आमच्या चेहऱ्यावर समाधान पसरले . चिकाटी अन एकजुटी ने आम्हा 6 जणांना हॉटेल अन पुढील दिवसाचे तिकिट

मिळाले होते . तिने तिकिटे अन हॉटेल ची व्हाउचर्स बनवे पर्यन्त आमचा गप्पंचा अड्डा जमला . मग सिमेन्स च्या मॅनेजर ने air france अन अन्य airlines ची अश्या वेळची पॉलीसी कशी असते ते सांगितले . भारतासारख्या देशांसाठी जर हा प्रॉब्लेम आला तर ही लोक शक्यतो जबाबदारी टाळणार . western countries चे लोक असतील तर सगळे कसे सुरळीत करून देणार . मग भारतीय वा अविकसित देशांतील लोकांना जितके कमी सुविधा देता येतील तसे बघतील . इथे हे ज्या लोकांना 5 ते 6 डेस्क फ़िरणे शक्य नव्हते ते बिचारे गेले आपपल्या परीने सोय लावायला, अन जे जास्त शाणे एक एकटे गेले त्यांना काहींना मिळाले अन काहींना पुन्हा वाटाण्या च्या अक्षता लावल्या ....... अन त्याचे हे बोल खरे ठरले जेंव्हा आम्ही हॉटेल वर गेलो , तिथे 2 जण अजून आमच्या ग्रुप मधे सामिल झाले, ज्यांनी हे च अनुभव सांगितले .

त्या पोरी ला तिकिटे बनवे स्तोवर 2 वाजून गेलेले . तिने तिकिटे दिल्यावर, तुमच्यासाठी मी आज एक तास जादा काम केले आहे असे आवर्जून सांगितले . खरे तर मी, एक रात्री थांबायला मिळणार आहे, तर आयफ़ेल टावर चा प्लॅन मनात आखत होतो . त्या पोरीला खरे तर शुक्रवार असल्याने विचारावेसे पण वाटले होते कि बाई आज संध्याकाळे जावू आयफ़ेल टावर वर, पण म्हणले नको, पोरीने इतके काम केलेय तर कश्याला उगाच अवलक्षण दाखवा! अन मग मी एकटाच जायचा बेत केला . . 2 नंतर बस ने विमानतळ परिसरातील हॉटेला त गेलो . त्या दोन लंडन हून आलेल्या पोरींनी आम्हाला तिथे कलटी दिली अन तिकिटे मिळताच त्या गायब झाल्या . दुसर्या दिवशी विमानात होत्या पण हाय पण न्हाई म्हणल्या! पोरी लै वंगाळ रे भौ ???कामापुरता मामा करत्यात रे भौ!

आम्हाला तिकिटे मिळाल्यावर बस स्टॉप कडे जाताना अनेक भारतीय ह्या terminal वरून त्या terminal कडे जाताना , फ़ेऱ्या मारत असताना दिसले . त्यांना सरळ Terminal F ला जा म्हणून सांगितले . ते पंजाबी जोडपे कुठे दिसले नाही . कदाचित काही लोकांना दुपारी 2:30 च्या Air India ने पाठवणार होते असे समजले . ती एक मोठी गंमत . आम्ही जेंव्हा पुढच्या दिवसाचा बोर्डिंग पास मागायचो तर काही लोकांना त्यांनी Air India च्या त्या च दिवशी च्या 2:30 च्या flight चे waiting list चे गाजर दाखवलेले दिसले! म्हणजे Air India ची waiting list वेगळीच अन त्यात air france ने स्वत: एक Air India waiting list बनवली! सगळे उल्लू बनवायचे कामे चालू होते ......... सिमेन्स चा हिंडफ़िऱ्या मॅनेजर सोबत असल्याने आम्ही फ़क्त बोर्डिंग पास अन हॉटेल द्यावर च insist केले ...... अनेक , किमान दोन चार दिवस जादा अडकण्या पासून वाचलो !

जरा जेवण, विश्रांती झाल्यावर घरी फ़ोन केला अन एक दिवस उशीरा येत असल्याचे कळवले . सुरेंद्र हरकल जो कि 1 ऑगस्ट ला जर्मनी ला जाणार होता त्याल हे असे झाले असे सांगा म्हणून भावाला सांगितले . अन मग आयफ़ेल टावर कडे प्रस्थान केले . इतर 3 मराठी जनते ने आयफ़ेल टावर पाहिलेला असल्याने त्यांनी झोपणे पसंद केले . मी मग बस ने army memorial पर्यन्त गेलो . दिल्ली ला जसे इंडिया गेट आहे, तसे पॅरिस ला हे महायुद्धातील जवानांना श्रद्धांजली म्हणून एक इंडिया गेट च्या 4 पट मोठे असे गेट अन एक अमर जवान ज्योती पण आहे, जी सतत तेवत असते . तिथे खूप पर्यटक होते . तिथे थोडा वेळ थांबलो . मग तिथून आयफ़ेल टावर ला जायला मधल्या मार्गे पायी निघालो . पॅरिस मध्ये कुठे ही असलो तरी टॉवर दिसतो अशी आख्यायिका आहे पण मला तर तो त्या रस्त्याने जाताना 2 वेळा रस्ता हुकला पण टॉवर दिसला नाही . अगदी जवळ गेलो तेंव्हा दिसला एकदाचा .................. विस्तीर्ण हिरव्या गार गालिच्या च्या पार्श्वभुमी वर प्रथम पाहिला . खूप पर्यटक होते . मग एक्दम खाली जावून, नदी ओलांडून टॉवर च्या एकदम केंद्रस्थानी , मध्यभागी एक लोखांडी चौकोन रोवलेला आहे, त्यावर उभा राहून 180 डेग्री मध्ये मान अन डोके अन डोळे लावून तो टॉवर पाहीला . आजू बाजू ला लै हिरवळ होती . अनेक जोडपी बसलेली होती . एकटा उगाच आलो असे क्षणभर वाटले . साला आपलं नशीब च फ़ुट्टड ना !!! हो, पण माझ्या चेहऱ्याकडे पाहून एका लहान पोरांच्या टोळक्याने मला सलाम वालेकुम म्हणायला सुरुवात केली . मे हसलो, मग ते म्हणे पाकिस्तान, पाकिस्तान! म्हणले, No, I am from India मग ते जरा वरमले, अन म्हणे welcome to france sir, enjoy your trip!! . पोरांच्या वागण्याचे आश्चर्य वाटले . (फ़्रान्स मधे लै मुस्लिम हेत . उत्तर आफ़्रिकेत त्यांची राजवट होती तिथून हे सगळे मुस्लिम अन कृष्णवर्णिय लोक फ़्रान्स मधे दाखल झालेले आहेत . भारतीय जसे लंडन ला जातात तसे आफ़्रिकन तिथे येतात अन दक्षिण अमेरिकन माद्रिद अथवा बार्सिलोना ला येतात ) डोळे भरून टॉवर पाहिला अन परतीला लागलो . 7 वाजत आले होते अन बस सेवा 9 ला संपते त्यामुळे मी तिथून निघालो . ट्रेन ने उशीरा ने गेलो असतो तरी पुढे हॉटेल ची बस सेवा बंद झाली असती त्यामुळे थांबलो नाही . अन दिवसभर च्या हेलपाट्या ने ही दमवले होते इच्छा असून ही Tower चे lighting पहता आलं नाही! आता पुढील वेळेस !!

दुसऱ्या दिवशी विमानतळावर गेलो तो जेंव्हा आम्ही लाईन ला लगलो तेंव्हा तिथे एक announcement सुरु होती . एक प्रवासी जर एक दिवसा साथी मागे थांबू शकत असेल तर त्याला 600 युरो अन उद्या चे तिकिट देऊ ! कुणी ही तयार होत नव्हते . मी अन सिमेन्स चा मॅनेजर ने जरा डोके खाजवले . अन त्याल म्हणले, एक तर मराठी माणूस असे फ़ायदे घेण्यात मागे पडतो, आपण दोघा पैकी एकाने हा चानस घेऊ च! मग तो तयार झाला . अन त्याने 600 युरो घेतले अन बाजूला झाला . . मे 2 वर्षातून चाललेलो असल्याने मला 600 युरो पेक्षा 1 दिवस जास्त महत्वाचा वाटला ....... अन शेवटी मराठी माणसाला च 600 येउरो मिळाले . जय मराठी बाणा!!!

आत बसलो तर एकाने खबर आणली, कि बंगलोर हून जर्मनी कडे जाणारे एक विमान मुंबई ला विमान तळावर घसरले ........ झाले! लोक हवालदिल! चांगले खुशीत होते, पण कोणा मोबाईल वाल्याने ही बातमी दिली अन काही स्त्रिया तर चक्क रडायला लागल्या . पुन्हा मग विमान मुंबई ला न जाता दिल्ली ला जाईल असे जाहीर झाले अन अनेक लोकांना हायसे वाटले, मला सोडून, कारण दिल्ली हून मुंबई ला कसे नेणार हा प्रश्न च होता ना .......... पण ती घोषणा फ़क्त तात्कालिक होती हे नंतर समजले! विमान मुंबई ला च उतरवले गेले ! so smart air france staff, again !!! तितक्यात सिमेन्स चा मॅनेजर दिसला, अरे हा तर 600 युरो घेऊन थांबलेला ना? मग तो म्हणे, अरे ज्याच्या साठी एक सिट रिसर्व केली तो आला च नाही मग मला पुन्हा येउ दिले . म्हणजे त्या ने 30 मिनिटात 30 हजार कमावले होते! ( smart maharashtrian !!! Good! ) मग विमान अगदी व्यवस्थित हवेत झेपावले . सर्व सेवा टाप टिप दिल्या जात होत्या! मुंबई अर्धा तास राहिली असेल तो घोषणा झाली कि, landing permission मिळत नाहीये . अन हवेत च चकरा मारायच्या आहेत . मग आम्ही जवळपास दीड तास, मुंबई ला 50 किमि च्या त्रिज्ये च्या वर्तुळाकृती मार्गात चकरा मारत होतो . लोकांची हवा गुल झाली . दीड तास पुर्ण मुंबई ला प्रदक्षिणा मारून, ईक्लुडिंग सिद्धिविनायक, मुंबादेवी आणि इतर देव देवता, आम्ही सुरक्षित खाली उतरलो . खाली उतरताना बऱ्याच भगातील पाणी चमकले . विमानतळावर तर समुद्र च होता! window seat मुळे बरे दिसत होते . टाळ्यांच्या कडकडाटात landing झाले . गणपती बाप्पा मोरया पासून वंदे मातरम पर्यंत आवाज आले! काय पण तीर मारला होता !!!

विमानात माझ्या मागल्या कोपऱ्यातल्या सिट वर एक हैद्राबादी तरुण अन एक कन्नडी 45 एकवर्षा चा डॉक्टर बसले होते . त्यांचा मोठ्या आवाजातील संभाषणामुळे हे समजले . विमान पॅरिस हून उडाल्या पासून त्यांचे मुंबई अन भारताला नावे ठेवायला सुरुवात झाली . पावसामुळे दुरवस्था झालेल्या मुंबई ची वेब वर पाहिलेली चित्रे अन tv वरिल बातम्या मुळे दिसलेली दुरावस्था अन इ इ सुरू होते . तो तरुण लङ्ग्या पोरगा तर अमेरिकन ॲक्सेंट मद्ये त्याला मुंबई आवडत नाही अन देशात किती घाण आहे , हे सगळे शाहण्या सारखे संभाषण सुरु झाले . मी दोन चार वेळा मान वर करून त्याकडे पाहिले . (असभ्य वाटत असेल ना हे माझे हे मागे वळून पाहणे ! ) ....... . ते त्यांच्या लक्षात आले असावे कारण आवाज कमी झाला . पण अमेरिकन फ़ुशारक्या काय संपल्या नाहीत . मग 2 तासांनी पाणी प्यायला मागे गेलो तेव्हा येताना, त्या दोघांना विचारले, कि बाबानो किती सालापासून तिकडे हायेसा . तर ते लङ्ग पोरगे 3 वर्षे अन तो डॉटर 10 वर्षापासून तिकडे होता . मग त्यांना म्हटले, की त्या आधी ची इतकी वर्षे देशात राहिलेले आहात म्हणून तरी बरे! अन एक जळजळीत कटाक्ष त्यांच्याकडे टाकून मी जागेवर जावून बसलो ....... मग त्यांचे बोलणे काही मला उतरेस्तोवर कानावर आले नाही .

विमानतळावर दुसराच गोंधळ, सगळे चेक झाल्यावर बाहेर पडायला लागलो तर मराठीत बोललो म्हणून एका पोलिसाने मला शाबासकी दिली म्हणले शाबास, तिथे फ्रेंच बोलता येइना तर टॅक्सी मिळेणा अन इथे आपली च बोली बोलला म्हणून बक्षिस!! ........ बाहेर, पाउस सुरू च होता ........ पुणे मुंबई मार्ग सुरू आहे का? विचारले पण कुणाला काही फ़र्म माहिती नव्हती ...... फ़ोन करायला गेलो तर तळमजल्यावरील समदे STD booh पाण्याखाली जावून जळाले म्हणे! बुक केलेल्या बस कडे गेलो तेंव्हा त्याच्या कडून एक STD वर च्या मजल्यावर आहे असे समजले . मग तिथून घरी फ़ोन केला . तिथे च, काही विमाने नुकतीच इथे land न करता दिल्ली ला divert केल्या चे समजले . . . . . . . . . . आपण कित्ती लकी हे असे समजून स्वत:शी च हसलो अन मस्त पैकी एक कॉफ़ी घेऊन गाडीत जावून बसलो ............ थेट पुणे!!!!!!!

दोन दिवस ते च कपडे, कागद अन ओझ्या ने फ़ाटलेली प्लास्टिक ची कॅरी बॅग, अन दाढी न केलेला चेहरा .......... चुकून पण कोनी मला युरोपातून येतोय असे म्हणले नसते . गल्लीतल्या दुकानातून सामान घेऊन आला असा च माझा वेष होता ......... विमान उतरायाला थोडा अवधी असताना, एक भारतीय सुंदर पोरगी ने असे काही माझ्या कडे पाहीले, कि जसे मी बुजगावणं होतो !

तर अशी साठा उत्तराची कहाणी सुफ़ळ संपूर्ण झाली अन आम्ही देशात अवतीर्ण झालो . !!!

**- चंपक**

# ग्रॅन्ड कॅनियन व मॉन्युमेंट व्हॅली भेट

ग्रॅन्ड कॅनियन

आईवडिलांबरोबर यावेळी जमेल तेवढे अमेरिका दर्शन करायचे असा बेत होता . आम्ही आमच्या गावातून लास वेगासला विनामाने जायचे व पुढे ग्रॅन्ड कॅनियन, मॉन्युमेंट व्हॅली आणि ब्राईस कॅनियनला भेट द्यायची असे ठरले .

विमानाने लास वेगासला पोहोचलो . लास वेगासहून आम्ही ग्रॅन्ड कॅनियनकडे निघालो . तेथून गाडीने आम्ही आमचा प्रवास हूवर धरणाकडे सुरू केला . तास दीडतासाने हूवर धरण आले . हूवर धरण पाहून तिथे थोडी विश्रांती घेतली . पुढील चार तासाचा प्रवास वैराण भागातूनच होता . विविध आकारांचे पर्वत, दिसणाऱ्या खुरट्या झुडपातील व कॅक्टसमधील वैविध्य हाच काय तो विरंगुळा होता . मातीचा रंग तांबडा पिवळा असा होता . मध्ये काही अंतरावर इंडियन विलेज किंवा इंडियन वस्तू मिळण्याची दुकाने रस्त्यालगत दिसायची . हे इंडियन म्हणजे अमेरिकेतील रेड इंडियन जमातीचे लोक . त्यांनी कलाकुसर करुन विणलेल्या टोप्या, मण्यांच्या माळा आणि विविध प्रकारच्या काठ्या, प्राण्याच्या कातडीच्या शोभिवंत वस्तू व काही फळे अशांची दुकाने त्यांनी रस्त्यालगत थाटली होती . एकही पेट्रोल पंप, बर्गर किंग, मॅक्डोनल्डस ही उपहारगृहे वा नेहमी आढळणारे वॉलमार्ट हे दुकान दिसले नाही . तीन तास गेल्यावर खूप दूरवर काही निळ्या जांभळ्या पर्वतरांगा दिसू लागल्या . मावळत्या सूर्याची किरणे त्या पर्वतशिखरांवर पडल्याने रंगांची होणारी उधळण मनमोहक होती .

'ग्रॅन्ड कॅनियन अमुक अमुक दिशेला आणि किती मैलांवर आहे' अशी माहिती देणारे फलक दिसू लागले . जवळच्या गावात असणारी हॉटेल्स व उपहारगृहे यांच्या जाहिराती मोठ्या फलकांवर होत्या . तेथे जाणाऱ्या प्रवाश्यांना राहण्याची सोय करता यावी यासाठी त्यांचा उपयोग होतो . बाहेर अंधारू लागले होते . आम्ही आमच्या खोलीवर पोहोचलो . आंघोळ करुन गावात पायी फिरायला गेलो .

मॅक्सिकन जेवणात मक्याची पोळी, एखादी चवळीसारखी उसळ, कांदा, ढोबळी मिरची, कोथिंबीर, दही, परतलेल्या इतर भाज्या व भात असा समावेश असतो . जेवणाआधी मक्याच्या पापडांवरोबर झणझणीत अशी टोमॅटो, कोथिंबीर, लसूण आणि कांद्याची चटणी असते . त्याला 'सालसा' असे म्हणतात . भारतीय जेवणाच्या जवळचे आणि त्या गावातील खास नावाजलेले म्हणून एका मॅक्सिकन उपहारगृहात त्या रात्री जेवण केले . गावातील हौशी कलाकारांचा एक ताफा तिथे होता . त्यांचे संगीत कितीतरी वेळ कानात रेंगाळत होते . मॅक्सिकन उपहारगृहात मिळणारे 'मार्गारिटा' हे खास शौकिनांचे आवडते मद्य आहे . संगीताच्या तालावर कित्येक अमेरिकन युगुले देहभान हरपून जेवणाचा आणि मद्याचा आस्वाद घेत होती .

पहाटे उठून ग्रॅन्ड कॅनियनला सूर्योदय पाहण्याची इच्छा होती . ते शक्य झाले नाही तरी लवकर उठून आवरून तयार झालो . न्याहरी केली . जवळच असणाऱ्या एका दुकानात काही फळे, ब्रेड, जॅम आणि पाणी अशा जिनसा घेतल्या . आम्ही पुढचा प्रवास सुरू केला . अर्ध्या तासात आम्ही ग्रॅन्ड कॅनियनच्या दक्षिणी भागाचा (साऊथ रीम) टप्पा गाठणार होतो . हा प्रवासमार्ग खूप प्रेक्षणीय आहे . अशा रस्त्यांना 'सिनीक ड्राइव्ह' असेच नाव अमेरिकेत आढळते .

वळणदार नागमोडी रस्ते, काही घाट होते . तुरळक प्रमाणावर आढळणाऱ्या फळवागा होत्या . काही वेळा शेजारी येणारे पर्वत होते तर कधी दूर दिसणाऱ्या निळ्या जांभळ्या तांबड्या डोंगर रांगा पूर्ण रस्ताभर आमचा पाठलाग करीत होत्या . ह्याच ग्रॅन्ड कॅनियनच्या रांगा . ग्रॅन्ड कॅनियन राष्ट्रीय उद्यान अरिझोना राज्यातील कोलोरॅडो पठारावर (प्लॅटूवर) आहे . अमेरिकेच्या त्या भागाचे वैशिष्ट्य असलेल्या उंचवटे व घळ्यांनी हा प्रदेश सजला आहे . पाण्याच्या प्रवाहानी दगडांचे सुळके तयार झाले आहेत . खूप उंचीवरील प्रदेशात जंगले आहेत . कमी उंचीवरील प्रदेशात वाळवंटी घळईच्या रांगाच रांगा आहेत . ग्रॅन्ड कॅनियनमधील सर्वात खोल भागाची खोली साधारण **6000** फूट आहे .

अमेरिकेतल्या सर्व राष्ट्रीय उद्यानात काही प्रवेश शुल्क आकारतात . सर्व उद्यानात वर्षभर उपयोगात आणता येईल असा एक 'पास' मिळतो . वाहनचालकाची माहिती दाखवून त्याच्या कुटुंबियांना वापरता येईल असे त्याचे स्वरूप असते . आम्ही तो पास आणि उद्यानाची माहितीपत्रके घेतली . ग्रॅन्ड कॅनियनचा सर्व परिसर गजबजला होता . सगळीकडे निळ्या, जांभळ्या, तांबड्या रंगांच्या पर्वत रांगा दिसत होत्या . सूर्यकिरणे त्यांच्यावर पडून विविध रंग चहूबाजूला फेकीत होती . डोंगरांचे विविध आकार दिसत होते . त्या आकारांवरुन त्यांना नावे दिली होती . त्यातील काही नावे 'ब्रह्मा टेंपल', 'विष्णू टेंपल' आणि 'शिवा टेंपल' अशी आहेत . ठिकठिकाणि कठड्यांची सोय करून छायाचित्रीकरण करता येईल अशी बांधणी होती . मोठे माहितीफलक होते . त्यावर विविध शिखरांची उंची, घळईच्या भागाची खोली, पर्व तात सापडणारी खनिजे, दगडांचे प्रकार या सर्वांची शास्त्रीय महिती दिली होती .

ग्रॅन्ड कॅनियनचा दक्षिण भाग समुद्रसपाटीपासून साधारण **7000** फूट उंचीवर आहे . दुर्बिणीने दूरवर डोंगरातून घळ्या दिसत होत्या . त्यांच्या

कडेने जाणारा एक पाण्याचा प्रवाह वाहत होता. तो प्रवाह म्हणजे कोलोरॅडो नदी. ही नदी ग्रॅन्ड कॅनियनच्या काही भागातूनच दिसते. कॅनियनच्या वरच्या भागापासून थेट नदीपर्यंत जाऊन व तसेच वर चढून येण्यास साधारण दोन दिवस लागतात. तसे करणारी अगदी तरवेज मंडळी पहाटेच खाली उतरण्यास सुरुवात करतात. नदीकाठी रात्री मुक्काम करण्यास पूर्वपरवाना लागतो अशी माहिती आम्हाला मिळाली.

आम्ही 'डेसर्ट विह्यू ड्राईव्ह', 'रीम ट्रेल' नावाच्या पायवाटांनी जवळ जवळ सर्व दक्षिण भाग बघितला. तसेच काही भाग गाडीने प्रवास करुन आणि ठराविक पॉईटचे दर्शन घेऊन आम्ही बघितला. दुपारी सूर्यप्रकाशात कॅनियनचे रंग थोडे फिकट दिसतात. सकाळी आणि संध्याकाळी ते खूप चमकदार असतात. डोक्यावर व दूर समोर निळ्या रंगाच्या विविध छटा दाखवणारे आकाश दिसते. त्याच्या पुढे नारिंगी, तांबडे, निळे, हिरवे अशा विविध रंग्छटांची वळ्यावळ्यांची मखमल पांघरून उभ्या पर्वतशिखरांच्या रांगाच रांगा! या सर्वांमध्ये डोकावणारी काही तुरळक झुडपे आणि चिमुकली कॅक्टसची फुले! हे दृश्य पुन्हा पुन्हा पाहूनही मनाचे समाधान होत नचते. सगळे छायाचित्राच्या व फितीच्या स्वरूपात साठवले तरी कमीच होते.

दुर्बिणीतून कोलोरॅडो नदीचा प्रवाह आणि डोंगरातील पायवाटा दिसत होत्या. तिथेच बराच वेळ रहावे असे वाटत होते. ग्रॅन्ड कॅनियनला डोळ्यांत साठवून आम्ही पुढील प्रवासास निघालो. वाटेतून एका बाजुने एक दीड तास त्याच तांबड्या, जांभळ्या पर्वतरांगा आणि दूरवर खोल वाहणारी नदी दिसत होती. आता आम्हाला वेध लागले होते 'मॉन्युमेंट व्हॅलीचे'.

मॉन्युमेंट व्हॅली

अरिझोना आणि यूटा या राज्यांच्या सीमेवर मॉन्युमेंट व्हॅली आहे. हा प्रदेश नवाहो इंडियन जमातीच्या अधिकारात आहे. वालुकाश्माने एके काळी हा प्रदेश व्यापला होता. त्यांच्या हजारो फूट उंच विविध आकाराच्या अवशेषांनी ही मॉन्युमेंट व्हॅली तयार झाली आहे. लाल तांबड्या एकमेकांपसून दूर उभ्या विविध आकृत्या वाळवंटी प्रदेशात आपले लक्ष वेधतात. चित्रपट, जाहिराती, पर्यटन व सहलींच्या पुस्तकात ही निसर्गनिर्मित शिल्पे कित्येकांनी बघितली असतील. प्रत्यक्षात त्यांचे रंग तसेच चमकदार आहेत.

वाहेरच्या मोठ्या रस्त्याने (हायवे यूएस 163 AZ आणि युएस 183 UT ) जाताना बरीच शिल्पे बघता येतात. साधारण 17 मैल कच्च्या रस्त्याने 'नवाहो' जमातीच्या ह्या आरक्षित जागेतून फिरताना त्यांचे जवळून निरीक्षण करता येते. त्या शिल्पांच्या आकारावरून त्यांना नावे दिली आहेत. उन्हाचा चटका खूप जाणवत होता. रखरखीत वाळवंटात वाऱ्याने तांबड्या धुळीचे लोट उडत होते. काही आकार एवढे मोठे आहेत की त्यांची छायाचित्र 'पॅनोरॅमिक व्ह्यू' शिवाय घेता येणे शक्य नाही.

एकमेकांपसून काही अंतरावर उभे पण संलग्न असे तीन सुळके दिसतात. त्यांचे नाव 'थ्री सिस्टर्स ' असे आहे. थोरली आणि मधली साधारण सारख्या उंचीच्या बहिणी असाव्यात. त्यांची धाकटी बहीण रुसून जरा दूर उभी आहे असे त्यांच्याकडे पाहिले की भासते. दोघीजणी आता धाकटीची कशी समजूत घालावी याची सल्लामसलत करत आहे अशा विचारात दिसतात!

काही आकारांना दिलेली नावे मजेशीर आहेत. अर्थात ही नावे खूप पूर्वी संशोधकांना जसे आकार दिसले त्यानुसार दिली आहेत. माहिती केंद्राजवळ दिसणारा एक भला मोठा उंचवटा म्हणजे 'एलिफंटस् ब्यूट'! हा आकार अजस्त्र व उंच आहे. एखादी शेपटी असावी असाही भास होतो त्यामुळे त्याला असे नाव दिले असावे. असेच 'कॅमल ब्यूट' सुद्धा आम्ही पाहिले.

माहिती केंद्राजवळून 'इस्ट आणि वेस्ट मिटन ब्यूटस' असे दोन आकार लक्ष वेधतात. कच्च्या रस्त्यावरून गाडीने जाऊन आम्ही प्रत्येक आकार पाहत होतो आणि त्यांचे छायाचित्रण करत होतो.

निळ्या आकाशात काही पांढरे ढग रेंगाळताना दिसत होते. उन्हाची चमकती किरणे त्यावर पडत होती. ह्या आकृत्यांचे लाल तांबडे रंग अधिकच उठावदार होत होते. या प्रदेशात तांबडी लाल भुसभुशीत माती आहे. सर्व दूर काही अंतरावर पसरलेले असे उंच पसरट आकार आणि त्यांच्या जवळची खुरटी हिरवळ असे दृश्य वारंवार दिअसत होते. आम्ही प्रत्येक आकाराकडे पाहून याचे नाव काय असावे असा अंदाज करत होतो.

बरेच दूरवर 'ईगल मेसा' असा खूप पसरट आकार दिसला. त्याची भव्यता पाहून डोळे दिपले. गेली कित्येक वर्षे वातावरणाचा परिणाम होत असूनही ह्या आकृत्या फारशी पडझड न होता टिकून आहेत. काही ठिकाणी आकाराच्या पायथ्याशी थोडे घरंगळलेले दगड व भुसभुशीत माती दिसते. पायथ्याशी साठू लागलेला दगडमातीचा थर कालांतराने वाढून नवीन आकार निर्माण करतील असेही मनात आले.

प्रत्येक वेळी गाडीतून चढ उतार करत होतो . त्यावेळी इतर गाड्यांमुळे उडणाऱ्या धुळीने आम्हाला तांबड्या रंगाने माखले होते . इतर प्रवाश्यांची अशीच अवस्था होती . 'ऑर्गन'च्या आकाराचा एक मोठा उंच दगड ह्या व्हॅलीत आहे . त्याचे नावच आहे 'ऑर्गन रॉक' .

'मॉन्युमेंट व्हॅली' सारखीच शिल्पे पुढे बराच काळ रस्त्यावर दिसतात . पण जी भव्यता आणि विविधता ह्यांमध्ये आहे तेवढी इतर ठिकाणि दिसली नाही . त्यापैकी 'मॅक्सिकन हॅट' अशा नावाचे शिल्प खरच आश्चर्य वाटावे असे आहे . एखाद्या माणसाणे एक मोठी टेक्सास स्टाइल टोपी (हॅट) घातली आहे, अशी एक आकृती वाळवंटात तयार झाली आहे . माणसाचे डोके असावे असा एक गोलाकार दगड आणि त्यावर मोठा आडवा गोलाकार दगड अशी त्याची रचना आहे . हवामानाचा परिणाम किंवा मोठे वादळ अशा कोणत्याही कारणांमुळे डोक्याच्या आकाराचा दगड पडू शकतो . असे झाले तर ते शिल्प काळाच्या पडद्याआड जाण्यास वेळ लागणार नाही .

साधारण तासाच्या अंतरावर आणखी काही आकार / शिल्पे आहेत . त्या भागाला 'व्हॅली ऑफ गॉड्स' असे नाव आहे . त्या भागात काही आकृत्यांना मंदिरासारखा आकार दिसला . एक आकृती ध्यानस्थ माणसासारखी दिसत होती . विविध आकृत्या बघत असताना वातावरण ढगाळ झाले होते . आम्ही ब्राईस कॅनियनकडे जायला सुरूवात केली, परतीचा रस्ता मॉन्युमेंट व्हॅलीहूनच होता . तेव्हा मॉन्युमेंट व्हॅलीचे ओझरते दर्शन घेऊ असा विचार मनात आला .

दुपारचे चार वाजत होते . आम्ही मॉन्युमेंट व्हॅलीजवळ येत असतानाच जोरात वारा वाहू लागला . लाल तांबड्या मातीचे लोट रस्त्यावर दिसू लागले . त्या निर्जन भागात रस्त्यावर एखादीच गाडी होती . हे नक्की कोणते वादळ आहे हे कळण्यास मार्ग नव्हता . वाऱ्याचा जोर एवढा होता की गाडी हालत होती . समोरचे अंधुक दिसत होते त्यामुळे गाडी चालवणे अशक्य होते . अंधारून आले होते . काही मिनीटातच जोराच्या पावसास सुरूवात झाली .

साधारण पंधरा वीस मिनीटाच्या त्या निसर्गाच्या रौद्र रूपाने आम्ही नि:शब्द झालो होतो . पावसामुळे धुळीचे लोट मावळले . त्यामिळे गाडी चालवण्यास सुरूवात केली, काही तासांतच आम्ही रणरणते ऊन, जोराचे वादळ, मुसळधार पाऊस असे विविध अनुभव घेतले होते . हवेत छान गारवा आला होता . विविध आकार अन् शिल्पे मनात साठवून आम्ही ब्राईस कॅनियनच्या दिशेने वाटचाल सुरू केली .

**- सुवर्णमयी**

# इंद्रधनू

परिचय - The Bridges Of Madison County... - अश्विनी
ही गाथा यत्नांची - विद्या हर्डीकर
आत्मचरित्रांच्या गोष्टी - सई कोडोलीकर
पालकनीती परिवाराचे खेळघर ... - शुभदा जोशी
आपले विश्व आणि आपण ... - आशिष महावळ

## परिचय - The Bridges Of Madison County

साउथ आयोवामधल्या, डोंगरात वसलेल्या खेडेगावात आपल्या शैशवातील मधुर स्वप्नांच्या आठवणी जपणाऱ्या एका शेतकऱ्याच्या पत्नीची आणि वॉशिंग्टनहून आलेल्या, व्यवसायाने प्रोफेशनल फोटोग्राफर असलेल्या एकांड्या शिलेदाराची ही भावुक, हळवी प्रेमकथा. हे पुस्तक वाचायला घेतलं आणि जणू काही त्याने झपाटून टाकलं.

रॉबर्ट किनकेड, नॅशनल जिऑग्राफिक मासिकासाठी फोटोग्राफी करणारा, आशियातील वाळवंटं, दूरदूरच्या नद्या, प्राचीन शहरं पालथी घातलेला बावन्न वर्षांचा मुक्त, मनस्वी कलावंत. फ्रान्चेस्का जॉन्सन, युद्धानंतर इटलीहून आलेली, दोन मुलं, पती, मक्याची शेती यांत आयुष्य कंठणारी पंचेचाळीस वर्षांची साधीसुधी स्त्री. दोघेही आपापल्या आयुष्यात समाधानी होते; पण ऑगस्टच्या उन्हाळ्यातल्या एका तप्त दिवशी रॉबर्ट किनकेड रस्ता विचारायला तिच्या रानातल्या घराच्या वाटेपाशी आला अन् त्या क्षणी त्या दोघांची आयुष्ये कायमची बदलून गेली.

संपूर्ण कादंबरीत फ्लॅशबॅकचे तंत्र वापरले आहे. सुरूवात होते ती, ऑगस्ट 1965 मध्ये, किनकेडच्या वॉशिंग्टन ते मॅडीसन काउंटी, आयोवा ह्या प्रवासाने. रॉबर्ट किनकेडला नॅशनल जिऑग्राफिकसाठी मॅडीसन काउंटीमधल्या कव्हर्ड ब्रिजेसवर एक प्रोजेक्ट करायचा होता. ह्या प्रवासात त्याला आपल्या एकाकीपणाची, ह्या भटकेपणामुळे गमावलेल्या बायकोची, लहानपणापासून त्याला भूल घालणाऱ्या विचित्र शब्दांची तीव्र जाणीव झाली. हा मुलगा काहीतरी निराळाच आहे हे त्याच्या आई वडिलांनाही माहीत होतं. जणू काही तो या जगातला नव्हताच, दूर कुठूनतरी परग्रहावरून आला होता. पैसा, यश या गोष्टींची त्याला कदर नव्हती. कलेसाठी जगणारा स्वच्छंद वृत्तीचा माणूस होता तो.

मॅडीसन काउंटीमध्ये एकंदर सात ब्रिजेस होते. त्यातले सहा त्याला लगेच सापडले. सातवा ' रोझमन ब्रिज ' मात्र त्याला काही केल्या सापडत नव्हता. अंगाची लाही लाही करणाऱ्या आयोवाच्या उन्हात तो आपला जुना पिकप ट्रक घेऊन पुन्हा पुन्हा चकरा मारत होता. अचानक त्याला एक मेलबॉक्स दिसली. रॉबर्टला हायसं वाटलं आणि तो त्या वाटेकडे वळला. जेव्हा त्याने आपला ट्रक त्या घराच्या अंगणापाशी थांबवला तेव्हा त्याला घराच्या पुढच्या सोप्यात बसलेल्या एका स्त्रीची आकृती दिसली. ती स्त्री खाली उतरून त्याच्याच दिशेने येऊ लागली. तो ट्रकमधून बाहेर आला आणि त्याने तिच्याकडे पाहिले, परत आणि परत एकदा पाहिले. ती सुंदर होती यात शंकाच नव्हती. आणि अचानकपणे एक विलक्षण बेचैनीची जाणीव त्याच्या सर्वांगातून थरथरत गेली.

इथे कथानकाला एकदम कलाटणी मिळते आणि कथासूत्र फ्रान्चेस्काच्या सदुसष्ठाव्या वाढदिवसापाशी जाऊन पोहोचते. गेली आठ वर्षे, रिचर्ड - तिचा नवरा वारल्यानंतर आणि पिल्ले आपापल्या घरी उडून गेल्यानंतर येणारा प्रत्येक वाढदिवस ती रॉबर्टचं एकुलतं एक पत्र, त्याने तिचा काढलेला फोटो आणि नॅशनल जिऑग्राफिकची काही कात्रणं यांच्या सोबतीने साजरा करत होती. त्याचं पत्र, तिच्यावरच्या अतोनात प्रेमानं भरलेलं त्याचं पत्र, ज्याचा शब्द न् शब्द तिच्याविषयीची अनिवार ओढ व्यक्त करत होता. त्या फोटोत ती अतिशय सुंदर दिसत होती. त्या फोटोतल्या आपल्याच चेहऱ्याकडे ती टक लावून पहात होती. तो चेहरा अश्या स्त्रीचा होता जी फोटो काढणाऱ्या पुरुषाच्या प्रेमात आकंठ बुडालेली होती.

फोटोकडे पहाता पहाता फ्रान्चेस्का परत भूतकाळात जाऊन पोहोचली.

ऑगस्ट 1965 मधल्या त्या सोमवारी, जेव्हा रॉबर्ट किनकेड तिच्या अंगणापाशी पोहोचला, फ्रान्चेस्का त्या दिवशी एकटीच घरी होती. रिचर्ड आणि मुले कुठल्यातरी काउंटी फेअरसाठी घोडा घेऊन बाहेरगावी गेले होते आणि आठवड्यानंतर परतणार होते. फ्रान्चेस्का अगदी एकटी होती. सोप्यातल्या झोपाळ्यावर बसून, आरामात आईस टीचा घोट घेत ती कच्च्या रस्त्यावरून येणाऱ्या एका पिकप ट्रकचा उडणारा धुरळा सहज निरखत होती. ट्रक अतिशय हळू येत होता; जणू काही त्याचा चालक कशाचातरी शोध घेत असावा. ट्रक तिच्या रस्त्यापाशी थांबला आणि तिच्या घराकडेच वळला. 'अरे देवा, कोण असेल?' ती म्हणाली. पायात चप्पलही न घालता ती तशीच पायऱ्या उतरून खाली आली. आणि त्या ट्रकमधून रॉबर्ट किनकेड बाहेर आला, जणू एखादा देवदूत बाहेर यावा तसा. तो हसला, त्याने तिला तसदी दिल्याबद्दल तिची माफी मागितली आणि अतिशय अदबीने तिला कव्हर्ड ब्रिजचा पत्ता विचारला. त्याचे डोळे एकटक तिच्याकडे पाहात होते आणि तिला आत खोलवर काहीतरी उचंबळून आलं. ते डोळे, तो चेहरा, तो आवाज, ज्या सहज गतीने तो हालचाल करत होता ती रीत, या सगळ्यांनी जणू तिला गारूड घातलं होतं. एक कार जोरात हॉर्न वाजवून गेली आणि फ्रान्चेस्का भानावर आली. 'तू जवळच आला आहेस. ब्रिज इथून फक्त दोन मैलावर आहे.' आणि यानंतर ती जे काही बोलली त्यावर तिचा स्वत:चाच विश्वास बसत नव्हता. 'तुला हवं असेल तर मी तुला तो ब्रिज दाखवू शकेन.' ती तसं का म्हटली ते ती कधीच समजू शकली नाही. ती एकच निष्कर्ष काढू शकली की, केवळ काही क्षण त्याच्याकडे पाहिलं आणि रॉबर्ट किनकेडने तिच्यावर जादू केली होती.

तो कुठलातरी जादूगारच होता जणू . भारल्यासारखी ती त्याच्याबरोबर गेली . रॉबर्ट किनकेडने ब्रिजचे खूप फोटो काढले . त्याचं काम संपेपर्यंत ती त्याला निरखत राहिली . परत येताना जेव्हा त्याने तिला घरापाशी सोडलं तेव्हा परत एकदा सगळं धैर्य एकवटून तिने त्याला आईस टी प्यायचं आमंत्रण दिलं . हे तिला काय होत होतं तिचं तिलाच कळत नव्हतं . अशी ती कधीच वागली नव्हती . जणू काही इतकी वर्षे दबलेल्या भावना आता उफाळून बाहेर आल्या होत्या . तिला शाळकरी मुलगी असल्यासारखंच वाटत होतं . रॉबर्ट किनकेड सुरूवातीचा बुजरेपणा कमी झाल्यावर मोकळेपणाने बोलू लागला आणि ती सगळे प्राण कानात आणून त्याचे बोलणे ऐकत राहिली . तो जे बोलत होता ते वेगळंच होतं . त्यांच्या छोट्या गावात असं कुणीच बोलत नसे . मुलंबाळं, पीकपाणी, सरकारी कार्यक्रम आणि खाणंपिणं एव्हढेच विषय त्यांच्या चर्चेत असत . रॉबर्ट किनकेड काव्य, संगीत, आणि कला या तिला रुची असलेल्या विषयांवर भरभरून बोलत होता आणि फ्रान्चेस्का त्याचा प्रत्येक शब्द मन लावून ऐकत होती . ' तुला आयोवा कसं वाटतं? ' या वरवर साध्या वाटणाऱ्या प्रश्नाचं उत्तर देताना तिची तारांबळ उडाली . गावाच्या आणि माणसांच्या सगळ्या चांगल्या गोष्टी सांगून टाकल्यावर एक क्षणभर ती घुटमळली आणि म्हणाली, ' . . . पण तरूण मुलगी असताना मी स्वप्नं पाहिली होती तसं हे नाहीये . ' जे सत्य मनाच्या खोल कप्प्यात तिने आतापर्यंत दडवून ठेवलं होतं, ते नुकतीच ओळख झालेल्या एका परक्या माणसाला तिने सहज सांगून टाकलं .

आईस टीच्या आमंत्रणाने सुरू झालेली ती संध्याकाळ मग रात्रीचे जेवण, गवताळ कुरणावर मारलेली चांदण्यातली चक्कर, पुन्हा ब्रँडी आणि कॉफीचा आग्रह यात कशी संपून गेली फ्रान्चेस्काला कळलेच नाही . हे सारंच तिला अनोखं होतं .

रिचर्ड साधा सरळ माणूस होता . तिची तरलता, तिची भावुकता समजून घेणं त्याच्या आवाक्याबाहेरचं काम होतं . दोन महिन्यातून एकदा संबंधापुरतं एकत्र येणं हीच त्याची प्रणयाची कल्पना होती . ते सुद्धा इतकं झटपट, इतकं रूक्ष, इतकं नीरस की त्यात काही चैतन्यच नसे .

त्या रात्री विचार करता करता ती एकदम उठली आणि रोझमन ब्रिजवर जाऊन रॉबर्टसाठी एक चिठ्ठी ठेवून आली . पहाटे ब्रिजचे फोटो काढायला तो गेला की सगळ्यात पहिली ती चिठ्ठी त्याला दिसणार होती . ती चिठ्ठी त्याला दिसली . त्यात परत एकदा रात्रीच्या जेवणाचे आमंत्रण होते . त्याने ते स्वीकारले . त्याचे काम संपून सपरसाठी यायला उशीर होणार होता म्हणून त्याने तिला आपले काम पाहाण्यासाठी बोलावले . ती सगळी संध्याकाळ त्यांनी सीडर ब्रिजचे फोटो घेण्यात एकत्र घालवली . त्या दिवशी त्याच्याबरोबर वावरताना, त्याला शूटींगसाठी मदत करताना, ज्या कौशल्याने तो हात चालवत होता ते न्याहाळताना फ्रान्चेस्का स्वत:लाच विसरून गेली .

आणि मग मंगळवारची ती रात्र आली . संपूर्ण दिवस ती फक्त त्याचा विचार करत होती . तो उंच होता, पण त्याची चण बारीक होती . त्याचा बांधा भक्कम होता व हालचालीत चित्त्याची चपळता आणि सफाई होती . आणि असं काहीतरी त्याच्यात होतं की जे तिला त्याच्याकडे खेचून नेत होतं . त्या रात्री न्हाऊन, काळजीपूर्वक प्रसाधन करून आणि खास त्याच्यासाठी सकाळी जाऊन आणलेला नवा फिक्या गुलाबी रंगाचा ड्रेस घालून फ्रान्चेस्का खाली आली तेव्हा रॉबर्ट किनकेड श्वास घ्यायचेच विसरून गेला . तिच्याकडे एकटक पाहात असताना त्याला जाणवलं की लहानपणापासून आपल्याला भूल घालणाऱ्या त्या स्वप्नातल्या देवतेचा शोध आता संपला आहे . त्या क्षणी रॉबर्ट किनकेड आणि फ्रान्चेस्का जॉन्सन एकमेकांच्या प्रेमात पडले . त्या रात्री, स्त्री असणं म्हणजे काय हे फ्रान्चेस्काला पहिल्यांदा उमगलं . रॉबर्ट किनकेडने तिला तिच्या स्त्रीत्वाची जाणीव करून दिली . त्या रात्री, पिवळा फोरमायका लावलेल्या किचन टेबलवर दोन पांढऱ्या मेणबत्त्या तेवत होत्या . ते जुनं, छोटं किचन इतकं देखणं कधीच दिसलं नव्हतं . मेणबत्त्यांच्या मंद प्रकाशात आणि " आउतुम्न ळेअवेस " च्या धुंद सुरांवर त्या दोघांनी नृत्य केलं . ती रात्र फ्रान्चेस्का जॉन्सन कधीही विसरू शकणार नव्हती .

आता आयुष्याच्या सदुसष्ठाव्या वर्षीसुद्धा यातली प्रत्येक आठवण स्पष्ट होती, खरी होती आणि जिवंत होती . पुढचे तीन दिवस फ्रान्चेस्का जणू काही दुसऱ्याच कुठल्यातरी जगात वावरत होती . त्या विश्वात बाकी कुणालाच स्थान नव्हते, फक्त ती आणि युगानुयुगे ज्याची वाट पाहात होती तो तिचा प्रियकर . त्याच्याशी प्रेम करणं म्हणजे एक झंझावात होता . त्याच्यात ती स्वत:ला पूर्णपणे हरवून गेली .

अखेर गुरुवारच्या दुपारी ज्या प्रश्नाला तोंड द्यायचं दोघेही टाळत होते तो प्रश्न रॉबर्टने विचारला, ' आता पुढे काय? '
या प्रश्नाचं उत्तर देणं तिच्यासाठी खूप कठीण होतं . सगळं सोडून आपल्याबरोबर येण्याची त्याने तिला गळ घातली . तिच्यासाठी प्रवास सोडून देण्याची त्याची तयारी होती . त्याच्यावरोबर निघून जाण्याची कल्पना इतकी अद्‌भुत आणि रोमांचकारी होती की तो आणखी थोडा वेळ असंच बोलत राहिला असता तर फ्रान्चेस्काला त्या मोहातून सुटका करून घेणं अशक्य बनलं असतं . पण रॉबर्ट किनकेडच्या प्रेमात कितीही तिने स्वत:ला बंदी करून घेतलं असलं, त्याचं आपल्यावरचं स्वामित्व मान्य केलं असलं तरीही फ्रान्चेस्का जॉन्सन विसरली नव्हती की ती मायकेल आणि कॅरोलाइन या दोन मुलांची आई आहे आणि रिचर्ड नावाच्या माणसाची पत्नी आहे . ज्याच्या बाहूंत तिचं सर्वस्व सामावलं होतं असा पुरुष तिला त्याच्यासह, त्याच्या जगात येण्यासाठी विनवत होता पण कर्तव्याचे पाश तिला तसं करण्यापासून रोखत होते . त्या छोट्या गावात अश्या गोष्टीची किती चर्चा होईल, मुलं आणि नवऱ्याचे आयुष्य कसं उध्वस्त होईल या विचारानेच तिचा थरकाप उडाला .

रॉबर्ट थोडा वेळ शांत राहिला आणि मग कमालीच्या समंजसपणानं त्यानं ते स्वीकारलं .

दुसऱ्या दिवशी रॉबर्ट किनकेड निघून गेला . तो जाताना आपल्या शरीराचाच एक भाग दूर जातोय असं फ्रान्चेस्काला वाटत होतं . तो विरह सहन करणं तिच्यासाठी अशक्य होतं . एक पत्र आणि फोटो पाठवण्याची फक्त त्याने तिच्याकडे परवानगी मागितली आणि पुढच्या आयुष्यात त्याने आपला शब्द अक्षरश: पाळला . जागेपणीचा प्रत्येक क्षण त्याने फ्रान्चेस्काच्या आठवणीवर काढला पण परत कधीही तिच्या आयुष्यात डोकावून पाहिले नाही . तसं करण्याची ऊर्मी त्याला कधी कधी उफाळून यायची पण तिच्या भावनांचा आदर करण्याइतकी सभ्यता त्याच्यात होती . त्याचा भटकेपणा वाढला आणि त्याच्याबरोबर एकाकीपणाही . फ्रान्चेस्काच्या नावाचे एक पदक करून त्याने आपल्या लॉकेटमध्ये घातले .

**1979** मध्ये रिचर्डचा मृत्यू झाल्यावर, जेव्हा फ्रान्चेस्का **59** वर्षांची होती, तिने रॉबर्ट किनकेडचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण त्याला यश आले नाही . मग तिने तो नाद सोडून दिला, कदाचित काय ऐकावे लागेल या भीतीने असेल .
**1982** च्या फेब्रुवारीमध्ये फ्रान्चेस्काच्या नावाने एक पार्सल आले . त्यात रॉबर्ट किनकेडचे पत्र, त्याचे लॉकेट, त्याचे तीन कॅमेरे आणि रोझमन ब्रिजवर तिने त्याच्यासाठी लावलेली चिठ्ठी होती . त्याच्या शेवटच्या इच्छेनुसार त्याच्या लॉ फर्मने ते सामान तिच्याकडे पाठवले होते . त्याच्याच शब्दात सांगायचं तर शेवटच्या काऊबॉयचा अंत झाला होता . त्याच्या इच्छेनुसार त्याचा अग्निसंस्कार केला होता आणि त्याची राख रोझमन ब्रिजवर पसरवण्यात आली होती .

फ्रान्चेस्का त्यानंतर सात वर्षे जगली . दर वाढदिवसाला ह्या सगळ्या गोष्टी उघडून पाहाणे, त्याच्या पत्रांची पारायणे करणे आणि रोझमन ब्रिजवर चक्कर मारणे हा तिच्या नित्याचा भाग झाला होता . हे सगळं करताना त्याच्या आणि तिच्या सहवासाचा त्या चार दिवसातला प्रत्येक क्षण ती पुन्हा एकदा अनुभवत असे . एक क्षणभरही तो तिच्या मनातून दूर गेला नव्हता, त्याचं अस्तित्वसुद्धा तिला आपल्या अवती भोवती जाणवत असे .

**1989** च्या जानेवारीमध्ये फ्रान्चेस्का जॉन्सनने अखेरचा श्वास घेतला . तिच्या मृत्युनंतर तिने लिहिलेली डायरी, आणि मुलांच्या नावाचं पत्र मिळालं . आपली प्रेमकहाणी कुठलाही आडपडदा न ठेवता तिने त्यात सांगितली होती . तिच्या इच्छेप्रमाणे तिचाही अग्निसंस्कार करण्यात आला आणि तिची राख रोझमन ब्रिजवर पसरवण्यात आली . आपल्या आईने मृत्यूनंतर वडिलांच्या शेजारी पुरणे का पसंत केले नाही याचे उत्तर मुलांना त्या पत्रात मिळाले . तिने लिहिले होते, ' अवघं आयुष्य मी तुमच्यासाठी आणि तुमच्या वडिलांसाठी दिलं . त्यातून जे काही माझं उरलं होतं ते मी रॉबर्ट किनकेडला दिलं . '

**- अश्विनी**

## ही गाथा यत्नांची

उत्तर अमेरिकेत बृहन्महाराष्ट्र मंडळ स्थापन होऊन **25** वर्षे झाली . या रौप्य महोत्सवी वर्षी अटलांटा येथे सुमारे **2500** लोकांचे अधिवेशन साजरे होत आहे . . त्यानिमित्त मराठी समाजातील विविध उपक्रमांचा हा आढावा! अधिवेशनाचे बोधवाक्य आहे : " तयाचा वेलू गेला गगनावरी " !

मराठी लोक उत्तर अमेरिकेत येऊन स्थायिक होऊ लागले त्याला खरं म्हणजे **25**हून जास्त वर्षे उलटून गेली . सुमारे **1968** नंतर येणाऱ्या लोकांत मराठी लोकांची संख्या जाणवू लागली आणि गावोगावी मराठी मंडळे दिसू लागली . या सर्वांना एका छत्राखाली आणणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाला यंदा पंचवीस वर्षे होत आहेत . " तयाचा वेलू गेला गगनावरी " असं ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगणाऱ्या इथल्या मराठी समाजानं परक्या मातीत रुजण्याची केलेली धडपड आणि भटकंती तशी सोपी नव्हती . पण मागे वळून पहाताना " मराठी पाऊल पडते पुढे " ची झुळूक अमेरिकेतल्या मराठी माणसाला सुखावणारी निश्चितच आहे .

मराठी म्हणून रुजताना मराठी भाषेचे अंकुर पालवणं हे स्वाभाविकच होतं. मुलांसाठी जागोजागी सुरू असलेले बालविहार ही त्याची पहिली निशाणी. डॉ. माधव देशपांडे आणि डॉ. अशोक अकलूजकर यांनी संगणकावर मराठी अक्षरमुद्रा (फॉँट) निर्माण केले ते " विंडोज " निर्माण होण्याच्याही आधी, म्हणजे आजच्या घरगुती संगणकाच्या (ज्याला आपण पर्सनल कॉम्प्युटर किंवा पी. सी. म्हणतो) दृष्टीने ते अश्मयुगच म्हणावं लागेल. त्यानंतर श्रीकृष्ण पाटील यांनी मराठीच नव्हे तर सर्वच भारतीय लिपींसाठी आणि हिब्रू लिपीसाठीही अक्षरमुद्रा निर्माण करून नवी पाऊलवाटच निर्माण केली. आज महाराष्ट्रात विपुलपणे उपलब्ध असलेल्या अक्षरमुद्रांची गंगोत्री अमेरिकेतल्या मराठी समाजात आहे!

त्यानंतर मुलांसाठी बोबडकांदा बोबडकांदा किंवा मराठीचा श्रीगणेशा (सुषमा येरवडेकर) अशी पुस्तके लिहिली गेली. कॉम्पॅक्ट डिस्कवर पंचतंत्रातल्या गोष्टी (स्वाती नवरे), मायमराठी (हेमांगी जोशी - देवधर), परीची शाळा (अनुराधा गानू), अशी मराठी शिकवण्याची तंत्रे काहींनी सुरू केली. येथील रहिवाश्यांनी मराठी साहित्यातून मराठी भाषेवरचं प्रेम व्यक्त करण्यास सुरूवात केली ती मराठी मंडळांच्या नियतकालिकांच्या माध्यमातून! कॅनडातून प्रसिद्ध होणाऱ्या एकतासारख्या नियतकालिकांनी त्या अभिव्यक्तीला व्यासपीठ दिलं. त्यानंतरचा जमाना महाजालाचा. आज मराठी साहित्याला आणि साहित्यचर्चेला वाहिलेलं मायबोली सारखं संकेतस्थळ महाजालावर उपलब्ध आहे ( www.maayboli.com ). अंतराळ आणि सावली सारखी मराठी " इ - नियतकालिकं " निघतात ( www.savali.org आणि www.antaraal.org ). त्याशिवाय प्रत्येक मराठी मंडळाच्या संकेतस्थळावर मराठी साहित्याचे वारे वहात असतात! महाराष्ट्रातून स्वेच्छेने अनिवासी झालेल्या या अमेरिकानिवासी मराठी लोकांनी लेखक म्हणून तर मराठी साहित्यात स्वत:चं असं स्वतंत्र निवासस्थान निर्माण केलंच आहे; पण गेल्या पंचवीस वर्षात मराठी साहित्याचा एक वेगळा प्रवाह निर्माण केला आहे. साठ - सत्तर मराठी पुस्तके आजपर्यंत प्रसिद्ध झाली आहेत. काहींना महाराष्ट्रात पुरस्कार मिळाले आहेत. मराठी साहित्यिकांचे मेळावे गावोगावी होतात. अमेरिकेत मराठी ग्रंथालये चालवली जातात. पुस्तकजत्रांचे कार्यक्रम होतात. त्याही पुढे एक पाऊल म्हणजे लाभसेटवार प्रतिष्ठान न्यास आणि महाराष्ट्र फाउंडेशन न्यास. महाराष्ट्रातील मराठी साहित्याच्या पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नातील एक छोटा प्रयत्न म्हणून साहित्यिकांना पुरस्कार देण्यासाठी हे न्यास निर्माण केले आहेत.

मराठी भाषा आणि साहित्य याबरोबरच मराठीपणाचे - मराठी संस्कृतीचे धुमारे मराठी नाटकांतून दिसतात. गावोगावच्या मराठी मंडळातून चांगली मराठी नाटके होतात. टोरांटोच्या मराठी मंडळाने पहिला मराठी नाट्य महोत्सव केला. मराठी नाटक आणि कलांसाठी गेल्या पंचवीस वर्षात काही चांगल्या संस्था स्थापन केल्या गेल्या. महाराष्ट्रातून उत्तम मराठी नाटके आणून उत्तर अमेरिकेत दौरे करण्याची प्रथा प्रथम अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्यावरील " पश्चिमा " या संस्थेने सुरू केली. त्यांनी " घाशीराम कोतवाल " चा दौरा घडवून आणला. त्यानंतर एल. ए. ड्रॅमॅटिक्स या अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या संस्थेने एकावेळी दोन ते चार नाटके आणून नाट्यमहोत्सवांचे दौरे घडवून आणले. मराठी साहित्य, नाट्य आणि अन्य कलांच्या संवर्धनार्थ स्थापन झालेली " कला " ही संस्था ( www.calaaonline.com ) सॅन फ्रॅन्सिस्को - बे एरियात मराठी नाट्यशिबिरे, साहित्यचर्चा, मराठी दूरदर्शनचे प्रयोग करत आहे. 'कला'च्या मराठी नाटकानं उत्तर अमेरिकेत नुसतंच पहिलं पाऊल टाकलं नाही तर नॉन स्टॉप पु. ल. सारखे **11** तासांचे दर्जेदार कार्यक्रम करून 'पुढचं पाऊल' टाकलं आहे. अन्य गावातील कलाकार त्याला अपवाद नाहीत. न्यूजर्सीच्या कलाकारांनी सादर केलेली " ती फुलराणी " , फिलाडेल्फिया - साऊथ जर्सी भागातल्या कलाकारांनी रंगवलेली " वाऱ्यावरची वरात " आणि " सख्खे शेजारी " , लॉस एंजेलिसच्या भागातल्या लोकांनी गाजवलेलं महेश एलकुंचवारांचं " पार्टी " , डेट्रॉईट भागातल्या कलाकारांनी सादर केलेलं तेंडुलकरांचं " शांतता कोर्ट चालू आहे " , वास्तुपुरूष, वाडा चिरेबंदी, कमला अशी बे एरियातली नाटकं ही उदाहरणं " हौशी " कलाकारांची नाहीत तर सादरीकरणाचे ते अत्यंत दर्जेदार आविष्कार आहेत.

त्याही पुढे जाऊन कलानिर्मितीचे काही चांगले प्रयोग गेल्या पंचवीस वर्षात झाले. कार्यक्रमाची संकल्पना, संहिता लेखनापासून रंगमंचावरील आविष्करणापर्यंतचे असे प्रयोग अमेरिकेत ठिकठिकाणी झाले आहेत. शिकागोच्या अनुपमा धारकरांचं " मीरा मधुरा " हे नृत्यनाट्य, लॉस एंजेलिसच्या डॉ. गोपाळ मराठे यांचं पंचतंत्रावर आधारलेलं आणि दीडशे बाळगोपाळांना घेऊन सादर केलेलं " सफारी " ही त्या अनेक प्रयोगांतली दोन उदाहरणे! अमेरिकावासी मराठी लोकांच्या जीवनानुभवांवर भाष्य करणारे काही प्रयोग झाले. अनुराधा गानू यांनी लिहिलेलं " हरवले ते गवसेल का? " , न्यू जर्सीच्या डॉ. प्रकाश लोथे यांचं " वाटचाल " आणि दिलीप चित्रे यांचं " अलिबाबाची हीच गुहा " हे काही ठळक प्रयोग. चित्रे यांच्या " अलिबाबाच्या गुहे " चा दौरा महाराष्ट्रात झाला आणि त्याचे आठ प्रयोग झाले. त्या " पुढचे पाऊल पुढेच टाका " चा प्रत्यय कलाभवन (डॉ. मीना नेरूरकर)ने " सुंदरा मनामध्ये भरली " या वगनाट्याचे महाराष्ट्रात शंभराच्या वर प्रयोग करून आणून दिला.

अमेरिकेत महाराष्ट्रातून आणलेल्या मराठी चित्रपटांचा दौरा तर यशस्वी झालाच, पण त्यापुढे जाऊन आता अमेरिकेतले कलाकार मराठी चित्रपट निर्मिती करत आहेत. मराठी गीतांच्या ध्वनिमुद्रिका, ध्वनिफीती (कॅसेटस) आणि सी. डी. प्रसिद्ध झाल्या आहेत.

अश्या तऱ्हेने मराठीपण जपून आणि जोपासून उत्तर अमेरिकेत रहाणाऱ्या मराठी माणसाच्या उत्तरायुष्याचा विचार करणारी दोन दिवसांची

परिषद घेऊन लॉस एंजेलिसच्या डॉ . अशोक सप्रे यांनी आणखी एक मैलाचा दगड रोवला आहे .

अर्थातच अमेरिकेतला मराठी समाज नुसता पत्त्यापुरताच अमेरिकेत रहात नाही . जन्मभूमीसारखीच कर्मभूमीही त्याला आव्हाने देत असते . अमेरिकेतल्या उद्योग, संगणक, वैद्यकीय, संशोधन, पत्रकारिता, राजकारण अश्या अनेक क्षेत्रात मराठी नावे झळकताना दिसतात . केवळ पहिल्या पिढीचीच नव्हेत तर दुसऱ्या पिढीचीही! कोणताच इतिहास घडवताना मराठे मागेपुढे पहात नाहीत, हे इतिहासानंच वेळोवेळी सिद्ध केलं आहे . अमेरिकेच्या इतिहासाची काही पानं मराठी लोकांनी लिहिली आहेत आणि लिहिली जात आहेत .

शेवटी मराठी म्हणजे कोण? महाराष्ट्रात राहाणारा? मराठी बोलणारा? या दोन्ही व्याख्यांत न बसणारे मराठी आहेत (आणि या व्याख्यांत बसूनही काहींना मराठी म्हणणे जड जाते!) . तेव्हा मराठी माणसाची सर्वात चांगली व्याख्या आहे: " ज्याला मराठी लोकांबद्दल जिव्हाळा वाटतो आणि जो महाराष्ट्राच्या हिताचा विचार करतो तो मराठी! " महाराष्ट्रातल्या सेवासंस्थांशी दुवा जोडून आर्थिक किंवा सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकांना आत्मनिर्भर होण्यासाठी मदत करण्याच्या हेतूने काही चांगले उपक्रम अमेरिकेतल्या मराठी समाजाने केले आहेत . दुवा जोडा आणि दुवा घ्या असा हा दुहेरी दुवा! महाराष्ट्र फाउंडेशन, महाराष्ट्र सेवा समिती या सारख्या संस्थांनी अमेरिकेतून पैसे तर पाठवले आहेतच, पण काही चांगले प्रकल्पही राबवले आहेत .

डॉ . मधुकर व पुष्पा देशपांडे यांनी आयुष्याच्या उत्तररंगात पुण्यात जाऊन विज्ञानवाहिनी ही संस्था सुरू करून महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांपर्यंत फिरती प्रयोगशाळा आणि वैज्ञानिक दृष्टीकोन पोहोचवला आहे . डॉ . गंगाधर मद्दिवार आणि डॉ . उदय देवासकर हे अमेरिकेतून तज्ज्ञांचे ताफे महाराष्ट्रात नेऊन अनेक लहान मोठी शल्यक्रियाशिबिरे घडवून आणत आहेत . डॉ . बालसुब्रह्मण्यम् यांनी " इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टिम " ची संकल्पना पुण्यात पोचवली आणि अमेरिकेतल्या " डायल **911** " धर्तीवर आता पुण्यात " डायल **0105** " चा प्रयोग यशस्वी होत आहे . आता युवा पिढीतली मुलेही महाराष्ट्रातल्या सेवासंस्थांच्या बरोबर काम करतात .

लातूर भूकंपासाठी अमेरिकेतल्या मराठी समाजाने सढळ हाताने मदत केली . त्यातून भूकंपातली पडझड तर सावरलीच, पण कायम स्वरूपाचे विकसनाचे कार्य महाराष्ट्राच्या मागास भागात उभे राहिले . सोलापूरजवळील हराळी गावाचे झालेले नंदनवन त्याची साक्ष आज देते आहे .

मराठी समाजाच्या मदतीतून गेल्या पंचवीस वर्षात तीन खेड्यांच्या दत्तक योजनेचे म्हणजे ग्रामविकसनाचे काम उभे राहिले आहे :
**1989** मध्ये न्यूजर्सीच्या मराठी समाजाच्या मदतीने पुण्याजवळील नरवीर तानाजी नगर (सणसवाडी) या गावाचा कायापालट सुरू झाला . महाराष्ट्र फाउंडेशन आणि पुण्यातील ज्ञानप्रबोधिनी ही संस्था यांचा हा संयुक्त प्रकल्प .
**1993** मध्ये कॅलिफोर्नियातील बे एरिया मराठी समाजातर्फे चिखलगाव या गावाचे विकसन प्रकल्प सुरू झाले . दापोलीच्या लोकमान्य टिळक न्यासातर्फे हा प्रकल्प आजही यशस्वीपणे वाटचाल करत आहे .
**1995** मध्ये सिंधुदुर्ग तालुक्यातील मांगवली गावाने विकसनप्रकल्पात भाग घेतला . लॉस एंजेलिसमधील मराठी समाज आणि कोकण विद्या प्रसारक मंडळ ही मांगवलीकरांची संस्था यांचा हा संयुक्त उपक्रम वेगाने वाटचाल करीत आहे .

अमेरिकेत मराठी म्हणून जगताना, अमेरिकन म्हणून जगताना आणि महाराष्ट्राबद्दल जिव्हाळा वाटणारा मराठी म्हणून जगताना केलेल्या यत्नांची ही यत्नगाथा तशी यशोगाथाही आहे . अर्थातच हे खरे की " यश " म्हणजे अपयशावर मात! तेव्हा धडपड तशी सोपी नव्हती, पण " पुढे चला पुढे चला " म्हणत मराठी माणसांनी पावले टाकली, प्रसंगी पाऊलवाटाही निर्माण केल्या आणि " आहे तितुके जतन करावे, पुढे आणिक मेळवावे " हा मंत्र जोपासला म्हणूनच " तयाचा वेलू गगनावरी " गेला!

**- विद्या हर्डीकर, कॅलिफोर्निया**

**आत्मचरित्रांच्या गोष्टी**

सध्या दर रविवारी ' लोकरंग ' मध्ये पाऊलो कोएल्होच्या ' अल्केमिस्ट ' चा मराठी अनुवाद क्रमाने प्रकाशित होतोय . त्यावरुन मला मराठीतली कितीतरी आत्मचरित्रे आठवली, अनुवादितही . आत्मचरित्रे वाचणे मला आवडते . यात कुणाच्याही खाजगी आयुष्यात जिभल्या चाटत डोकावणे हा उद्देश नसतो . आपापल्या हयातीतल्या चढ - उतारांकडे कोण कसं बघतं, पेला अर्धा भरलेला की रिकामा ठरवण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन, त्याच्याकडे आपण त्रयस्थ म्हणून कसे पहातो, हे वेगवेगळे चांगले अनुभव असतात . दर वेळेस खड्ड्यात पडूनच शहाणपण यावं असं काही जरुरीचं नाही, त्यामुळे पुढच्यास ठेच मागचा शहाणा अशीही मदत या आत्मकथांतून होतेच . यातून आपली विचार करण्याची किंवा लोकांबद्दलची मते बनवण्याची पध्दतही तपासून बघता येते . ऐकून, वाचून किंवा त्यांना बघून आपण जे ठरवतो ते यातून पडताळता येतं . एखादा माणूस / बाई आपल्याला खूप आवडत असते पण तिचं अंतरंग कळल्यावर आवडेनाशीच होते, याउलट न आवडणारे आवडू लागतात . आणि आधीपासून आवडणारे आणखीच पटायला लागतात, त्या पुस्तकातून त्यासाठी आपल्याला समर्थन मिळत जातं किंवा न पटणारे पूर्णच आवडेनासे होतात . हा खूप मजेदार अनुभव असतो . हेच प्रसंग आपल्यावर आले तर आपण कशी प्रतिक्रिया देऊ याचाही आपल्याकडून नकळत विचार होतो . मित्र - मैत्रिणींशी चर्चा केली की पुन्हा त्यातूनही नवीन नवीन बाजू समोर येत रहातात . गंगाधर गाडगीळांनी म्हटल्याप्रमाणे ही ज्याची त्याची महाभारतंच असतात . या नायक - नायिकांची औपचारीक आणि अनौपचारीक शिक्षणं, कोण कोण कसे वाढले, त्यांचे स्वभाव, कौटुंबिक पार्श्वभूमी, कर्तबगारी, यशापयशाचे आलेख वगैरे? . . बहुदा ही माणसं समाजमान्यता मिळवलेली किंवा लोकांना कोणत्याही कारणामुळे माहीत असतात . कोणी प्रांजळपणे आपल्या आयुष्यातल्या घटना निवेदन करतं, कुणी चलाखीनं फक्त उजळ बाजूच दाखवतं, कुणी चक्क खोटंसुध्दा लिहितात . अर्थात हा शेवटी ज्याचा त्याचा प्रश्न आहे . पण ' अल्केमिस्ट ' च्या निमित्ताने माझ्या मनात झालेली ही उजळणी मांडण्याचा हा एक प्रयत्न .

सगळ्यात पहिल्यांदा मला आठवलं कवयित्री इंदिरा संतांचं ' मृद्‌गंध ' . पद्याइतक्याच सहजतेनं लिहिलेलं आणि ओघवतं . त्या माझ्या अत्यंत आवडत्या कवयित्री आहेत, कविता जश्या त्या अगदी सुगम लिहीतात, अगदी तसंच हे लिखाणही आहे . कोल्हापुर ते बेळगावमधल्या पट्ट्यातली भाषा, बालपण आणि त्या वातावरणाचं वर्णन, संसाराची समर्थपणे निभावलेली जबाबदारी, मुलांवरचे संस्कार, समाजातल्या सर्व स्तरातल्या लोकांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध, साहित्यिकांबद्दलची आपुलकी, साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्यावेळचे विचित्र अनुभव, एकीकडे सुरू असलेलं काव्यलेखन? . . अगदी रंगून जातो आपण त्यांच्यात . पुस्तकाचं नावही किती ओढून घेणारं! अगदी त्यांच्यासारखंच . घरासमोरच्या माळरानावरचं प्राणी - पक्षीजीवनाचं त्यांचं निरीक्षण दाद देण्याजोगं . आयुष्याला पूर्ण अर्थ मिळवून देणारं त्यांचं जगणं होतं . त्यांच्या एखाद्या फोटोकडेही आपण पाहिलं तरी आपल्याला कसं शांत वाटतं, पुस्तकही तोच अनुभव देतं . विशेषत: बा . भ . बोरकरांच्याबरोबरचे प्रसंग तर आपण जगतो .

गोनिदांची ' स्मरणगाथा ' देखील काहीशी अशीच . अहो, काय विलक्षण माणूस होता हा! आणि काय काय केलं नाही त्याने! चौदाव्या वर्षी घर सोडलं तेव्हापासून ते तिशीच्या जवळपास संघकार्यात ते गुंतले, फक्त इतक्याच वर्षांचा हा वृत्तांत आहे . पण तुम्ही वाचताना जागचे हलतही नाही, कारण पुस्तक हातातून खाली ठेववतच नाही . यथेच्छ भटकंती, उद्या काय याची आज खबर / पर्वा नाही, कोणी पुढे नाही, मागे तर त्याहून नाही, गाडगेबाबांचा सहवास, नर्मदेची वेळोवेळी मिळालेली पाखर, नाना तऱ्हेचे चांगले - वाईट भेटलेले लोक, स्वत:च्या मनाशी आणि शरीराशीही शब्दश: केलेले खेळ, जीवनाच्या हर एक अंगाचं चहुबाजूंनी घडलेलं दर्शन? . केवळ हाच मनुष्य असं जगू जाणे! त्यांच्या ' त्रिपदी ' या स्फुटसंग्रहातही त्यांनी काही व्यक्तीचित्रे रेखाटली आहेत, त्यात त्यांची पत्नी, त्यांच्या आयुष्यात आलेले आणि प्रभाव पाडलेले लोक यांच्या बद्दल वाचतानाही गोनिदांचं आयुष्य आपल्याला कळत जातं . एका मनस्वी माणसाची ही गोष्ट सहजपणे आपल्याला सतत आश्चर्यात डुंबवत रहाते .

गंगाधर गाडगीळांच्या ' एका मुंगीचे महाभारत ' या आत्मचरित्राचा मी खरंतर फक्त दुसराच भाग वाचलाय . पहिला भाग मी खूप प्रयत्न केले तरी मला अजून मिळालेला नाही . पण त्यांचं कर्तृत्व हे दुसऱ्याच भागात वाचायला मिळतं त्यामुळे मला फार काही विसंगती वाटली नाही वाचताना . उत्तम लेखक, समीक्षक, जागतिक स्तरावरचा अर्थतज्ज्ञ, स्तंभलेखक, नाटककार, व्याख्याता आणि मला दिसलेला उत्तम संघटकही . त्यांची लिखाणाची शैली आपल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्वाची जबरदस्त छाप पाडते . प्रत्येक बाबतीतल्या त्यांच्या concepts एकदम clear असतात, आणि त्या दुसऱ्याला ठामपणे पोचवण्याची त्यांची हातोटी कौतुकास्पदच . साहित्य सहवासची गोष्ट, नरसी मोनजी कॉलेजची गोष्ट, वालचंद समूहातल्या आठवणी, साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या वेळचे त्यांचेही चित्रविचित्र अनुभव, साहित्यिकांतल्या चांगल्या - वाईट मनोवृत्तींचं वेळोवेळी घडलेलं दर्शन, विनोदी धाटणीत त्याचं केलेलं निवेदन, साहित्याच्या प्रत्येक प्रांतात केलेली स्वच्छंद आणि यशस्वी मुशाफिरी . या माणसाचं आत्मकथन वाचताना मला व्यावहारीक जगात आवश्यक असणाऱ्या खूप गोष्टी शिकायला मिळाल्या . हा अनुभव देण्याची कुवत माझ्या मते फार कमी लोकांमधे असते . गाडगीळ सर्वच बाबतीत तारतम्याला अधिक महत्व देताना दिसतात आणि calculated risk ही तर त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे . एकाच क्षेत्रात फार काळ रमणे त्यांना मान्य नाही . सतत नाविन्याची ओढ, आव्हाने स्वीकारणे, माणसे वाचणे हे त्यांचे छंद आहेत . सध्या मी याचा पहिला भाग मिळवण्याच्या प्रयत्नात आहे .

यानंतर आवर्जुन उल्लेख करावा लागेल तो डॉ. हरीवंशराय बच्चन यांच्या आत्मचरित्राचा. चार वेगवेगळ्या भागात त्यांनी आपली आत्मकथा सांगितली आहे. मी मधुशाला वाचलेली नाही. मी आजवर वाचलेलं हे त्यांचं एकमेव लेखन. मी हे वाचून आता जवळपास 7 - 8 वर्षे झाली. त्यामुळे क्रम आठवत नाही, पण ' दशद्वार से सोपान तक ' , ' नींव का निर्माण फिर ' , ' क्या भुलूं क्या याद करूं ' , ' बसेरे से दूर ' अशी त्यांची नावं आहेत. एक संपन्न आयुष्य आपल्यासमोर उलगडत रहातं आणि चारही पुस्तकं स्वतंत्रपणेही वाचनीय आहेत (किंवहुना मी मिळतील तशी वाचत गेले), पण क्रमानं वाचली तर संदर्भाच्या सलगतेमुळे गोडी वाढेल. अत्यंत संवेदनशील मन, उत्तम विद्यापीठांमधून शिक्षण, समृध्द साहित्याची निर्मिती, पहिली बायको श्यामावरचं प्रेम, तेजीबाईची शब्दश: खंबीर आणि समर्थ साथ, अलाहाबादेतलं वास्तव्य, भारत सरकारच्या वेगवेगळ्या उपक्रमांतला सहभाग, देशापरदेशातुन मिळालेले अनेक सन्मान आणि बहुमान, गांधी परिवाराचा शेजार, अमिताभच्या आजारपणात कुटुंबाकडून अपरिहार्यपणे झालेली उपेक्षा, सुनांशी असलेली आदरयुक्त जवळीक, आपल्याला खूप खूप काही विस्तारानं समजत रहातं. अमिताभच्या सुसंस्कृत वर्तनाचं आपण कौतुक करतो, पण ही पार्श्वभूमी कळल्यावर त्याच्याजागी कुणीही असता तरी असंच वागता असं आपण म्हणायला लागतो. किंवहुना हे पुस्तक वाचल्यावर माझा त्याच्याकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलला असं मी म्हणेन. मला ही पुस्तकं वाचल्यावर खूप समाधान मिळालं.

शंकरराव खरातांचं ' तराळ अंतराळ ' , लक्ष्मण मानेंचं ' उपरा ' आणि डॉ. नरेंद्र जाधवांचं ' आमचा बाप आणि आम्ही ' ही तर विलक्षण कहाण्या सांगणारी आणि पूर्णपणेच निराळ्या वातावरणाचं चित्रण करणारी पुस्तकं. ही पुस्तकं वाचताना प्रत्येक क्षणी आपण किती भाग्यवान, सुरक्षित आणि अनुकूल वातावरणात वाढलो याची जाणीव होत रहाते. आपल्याला या तिघांसारख्या कोणत्याही परिस्थितीला तोंड द्यावं लागलेलं नाही आणि संघर्ष, धडपड हे शब्द तर (काही अपवाद असतीलच, पण अगदी काहीच आणि आपले संघर्षही प्रतिष्ठितच असतात पुन्हा! त्यामुळे त्या शब्दाची धारच बोथट होते.) ऐकावेही लागलेले नाहीत. तरी त्यातल्या त्यात वडील दूरदृष्टीचे असल्यामुळे जाधवांना बरी परिस्थिती म्हणजे काय हे तरी माहिती होतं. पण उरलेल्या दोघांच्या कथा अक्षरश: वाचवत नाहीत. एकेक प्रसंग वाचताना अंगावर काटा येतो. आणि अशा भयानक संकटांना आणि समाजाला तोंड देत देत मोठं होऊन त्या लोकांनी आपापल्या आयुष्यात गाठलेल्या उंचीचं प्रचंड कौतुक वाटतं. खरात आणि माने तर अजूनही आपल्याला काही लोकांकडून पूर्वीसारखीच वागणूक मिळत असल्याचा धक्कादायक उल्लेख करतात. ज़ाधवांना तर त्यासाठी अमेरिकेतून परत येण्याची वेळ आली होती! किती लाजिरवाणी गोष्ट आहे ही! खरात तर आता नाहीत पण आपल्या इतर उत्कृष्ट पुस्तकांबरोबरच या आत्मचरित्रासाठीही त्यांची आठवण काढली जाईल. माने आजही आपल्या समाजाच्या उध्दारासाठी प्राणपणाने झगडतायत.

शांता शेळकेंचं ' धूळपाटी ' सुध्दा सुंदर आहे. अगदी साधंसोपं. मंचरला त्यांचं बालपण गेलं. पुढे वडील गेल्यावर पुण्याला स्थलांतर, हुजुरपागेतलं शिक्षण, तिथल्या वाचनालयात झपाटल्यासारखं केलेलं वाचन, स. प. तले समृध्द अनुभव, पुढच्या आयुष्यात त्यांच्याइतकेच नावारुपाला आलेले सहाध्यायी, माटेंच्या आणि रविकिरण मंडळातल्या कवींच्या आठवणी, त्यांच्यापासून मिळालेली प्रेरणा आणि त्या प्रेरणेचं केलेलं चीज, हे सगळं वाचताना आपणही त्यांच्याबरोबर त्या विश्वात भटकून येतो. हाच अनुभव डॉ. सरोजिनी बाबरांच्या ' माझ्या खुणा माझ्या मला ' मधून येतो. काळाच्या कितीतरी पुढे असलेले कर्तबगार वडील, मुलीवरचा विश्वास आणि तिला सतत दिलेलं विधायक प्रोत्साहन, तत्कालीन राजकीय वर्तुळातला त्यांचा आमदार म्हणून (आणि नऊवारीतला हं!) समर्थ वावर, आघाडीच्या राजकीय नेत्यांबरोबरचे कौटुंबिक संबंध, साहित्यिकांतली ऊठवस, लोकजीवन, लोककथा, लोकगीते, तमाशा आणि तत्सम पारंपारिक कलांचा गाढा अभ्यास, या सगळ्यातच पोलिओमुळे अधू असलेल्या पायाचं दुखणं, त्यांच्या पुढाकारातून साकारलेला आणि शांताबाईंच्या सहभागामुळे उत्कृष्ट ठरलेला दूरदर्शनचा ' रानजाई' हा लोकप्रिय कार्यक्रम. विविध पैलू असलेल्या या कवयित्री. मला तर त्यांनी काय काय केलंय माहितीच नव्हतं. जशी वाचत गेले तसे डोळे सतत विस्फारत गेले. कारण या सर्व घटना स्वातंत्र्याच्या आधीपासून घडायला लागतात ते थेट 80 च्या दशकापर्यंत. कर्मवीर ते म.मो. दत्तो वामन पोतदार ते यशवंतराव चव्हाण ते इंदिरा गांधी, असा सर्व थरातल्या थोरामोठ्यांचा सहवास त्यांना लाभला. हा एक अपूर्व योगच म्हटला पाहिजे.

' आहे मनोहर तरी ' बद्दलही आवर्जून बोलायला हवं. मला ते आवडलं तर नक्कीच पण त्याहूनही जास्त ते पटलं. बायकांनी आत्मसन्मान आणि जबाबदाऱ्या यांचा घरपण सांभाळून कसा ताळमेळ ठेवला पाहिजे हे शिकण्यासारखं आहे. खुद्द पु. ल. जसे म्हणाले, आणि ते अगदी खरं आहे, की ते माणूस आहेत आणि माणसासारख्याच चुकाही करतात हे त्यांनी प्रत्येक दाखल्यातून आपल्याला दाखवून दिलं. माझ्या बाबांना सुनिताबाईंचा फार राग आला होता. म्हणे, एवढा मोठा कर्तृत्ववान माणूस नवरा म्हणून मिळालाय तर ह्या बाईला त्याचं काही कौतुक आहे का? म्हणे जेवायलाच थांबला नाही आणि आळशीच आहे. एवढं तर अशा माणसासाठी कुणीही सहन करेल. ही बहुतेक पुलंच्या भक्तगणांची प्रातिनिधिक प्रतिक्रिया म्हणता येईल. पण प्रत्यक्षात तसं नाही. त्याही तितक्याच ताकदीच्या कलावंत होत्या पण ती सगळी ताकद त्यांनी पु.लंसाठीच वापरली हा केवढा मोठेपणा! आणि ते क्षणोक्षणी आपण वाचत रहातोच. त्यांची आणि गंगाधर गाडगीळांची आयुष्य जगण्याची philosophy ही जवळजवळ सारखीच आहे. (गंमत म्हणजे प्रत्यक्षात या दोघांचे विचार फारसे जुळत नाहीत.) असाच चांगला अनुभव मला माधवी देसाईच्या ' नाच गं घुमा ' नं दिला. फारच सुरेख लिहिलंय त्यांनी हे पुस्तक. कोवाडच्या तर प्रेमातच पडायला होतं. देसाईचं कुटुंब, माधवीताईंनी जुळवून घेतलेली जीवनशैली अगदी साध्या पध्दतीने मांडलीय. कसलाही आविर्भाव नाही. आज त्या एक उत्तम लेखिका म्हणूनही परिचित आहेत पण त्यांचा हा प्रवास आपल्याला या पुस्तकातून दिसतो.

' सुवासिनी ' हे एक बाळबोध आत्मकथन मी वाचलं . सीमा देवांचं हे पुस्तक . जे जसं घडलं तसं त्यांनी लिहिलं . कोणतीही लपवाछपवी नाही, कसलाही आवेश नाही, हातून घडलेल्या चुकाही अगदी निर्व्याजपणे सांगितल्या आहेत . या बाळबोध आत्मकथनाच्या यादीत ' श्यामची आई ' सुध्दा समाविष्ट होतं . तेही खरंतर साने गुरुजींचं आत्मचरित्रच आहे की! जसं घडलं तसं निवेदन ते करतात, गोष्टीरूप असल्यामुळे आत्मचरित्र हा शब्द बोजड वाटेल पण एका विशिष्ट काळापर्यंत त्यांच्या आयुष्यातल्या घटना क्रमानेच येतात त्यात . आपण प्रत्येकाने लहानपणी अग्रक्रमाने वाचलेल्या पुस्तकात खूप वरच्या क्रमांकावर या पुस्तकाला स्थान आहे . सुधीर फडक्यांचं अर्धवटच लिहीलं गेलेलं आणि तसंच प्रकाशित केलं गेलेलं ' जगाच्या पाठीवर ' हे एक चुटपुट लावणारं आत्मचरित्र . अतोनात हाल कशाला म्हणतात त्याचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना पदोपदी येतो आणि एवढं करुन त्यांचे चांगले दिवस आलेले आपल्याला पहायला मिळत नाहीत ते नाहीतच . आतातरी या माणसाच्या अपेष्टा संपतील असं म्हणत म्हणतच आपण पानंच्या पानं उलगडत जातो पण हुरहुर तशीच ठेवून पुस्तक मिटवावं लागतं . कारण प्रत्यक्षात ते संपतच नाही!

असेच आत्मचरित्रात्मक संदर्भ नेहमीच व्यंकटेश माडगुळकरांच्या बऱ्याच पुस्तकांमधून सतत भेटत रहातात . माडगूळ आणि माणकडचे, त्यांच्या भावंडांचे, शेतामाळांवरचं मनसोक्त हुंदडणं, गुराखी, पारधी, रामोशी अश्या विविध जीवनपध्दतींचं आपल्याला घडवलेलं मनोरम दर्शन . आपण भान हरपून ते सगळं वाचत रहातो . ' बाप लेकी ' या पुस्तकातही कितीतरी जणांच्या आयुष्यातले खूप वेगवेगळे पैलू आणि त्यांची जडणघडण समजते . हा वृत्तांत लेकींबरोबरच पित्यांकडूनही सांगितला गेलाय त्यामुळे दोघांच्याही आयुष्यातल्या घडामोडी आणि त्यांचा दोन्ही बाजूंकडून केला गेलेला विचार आपल्याला वाचायला मिळतो . हे अश्या प्रकारचं मराठीतलं बहुदा पहिलंच पुस्तक आहे . खूप चांगला प्रयत्न केला गेलाय हा . यात लेकी म्हणुन आपल्याला दुर्गा भागवत, डॉ . लीला पाटील, रजिया पटेल, पद्मजा फाटक, प्रिया तेंडुलकर, दीपा गोवारीकर, जाई निंबकर आणि गौरी देशपांडे या भगिनी अश्या अनेकजणी भेटतात तर वडिलांचे मनोगत वसंतराव गोवारीकर, विजय तेंडुलकर, मुकुंद टांकसाळे यांच्यासारख्यांकडून कळतं . जरी ही प्रत्यक्ष आत्मचरित्रे म्हणता येत नसली तरी त्याच अनुषंगाने लिहीली गेली आहेत . आणि मुख्य म्हणजे यात नकारात्मक लेखनही झालेलं आहे . मुलींनी कोणत्या प्रकारे आयुष्याकडे किंवा आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींकडे पाहिलंय ते अगदी वाचण्यासारखं आहे .

सुमा करंदीकरांचंही (विंदांच्या पत्नी) आत्मकथन, " रास " प्रसिध्द झालेलं आहे . त्याचं . खूप सोज्वळ आणि प्रामाणिक लेखन आहे ते . गाडगीळांच्या साहित्य सहवासातल्या आठवणी यात आपल्याला पुन्हा नव्याने भेटतात . डॉ . अब्दुल कलामांचं ' अग्निपंख ' हे एक आणखीच वेगळं निवेदन . तांत्रिक तपशिलांमुळे काही गोष्टी माझ्या डोक्यावरुन गेल्या पण ते क्षेत्रच तसं आहे त्याला त्यांचाही इलाज नाही . पण सहकाऱ्यांशी असलेले संबंध, कार्यमग्नता, एखाद्या कृतीत झोकून देण्याची वृत्ती, प्रसंगांचा सर्वांगीण विचार या सगळ्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत . अशीच गोष्ट विठ्ठल कामतांच्या ' इडली, ऑर्किड आणि मी ' ची . प्रामाणिक आत्मकथन आहे हे . पडेल ते कष्ट उचलणे, कष्टांची लाज न बाळगणे, दूरदृष्टी आणि धाडस या पायामुळे माणूस कुठल्या कुठे पोचू शकतो याचं हे जिवंत उदाहरण . अत्र्यांचं ' कऱ्हेचे पाणी ' , कमल पाध्येंचं ' बंध अनुबंध ' हीदेखील चांगली आत्मकथने आहेत . ' कऱ्हे? ' चे भाग तर वाचता वाचताच मी दमून गेले, पण आवर्जून वाचण्यासारखं आहे ते . मुख्यत: आपल्या पिढीने, ज्यांनी अत्र्यांना पाहिलेलं नाही, त्यांना अत्रे फार छान समजून घेता येतात त्यातून .

विश्राम बेडेकरांचं ' एक झाड दोन पक्षी ' मात्र मला नाही आवडलं, झेपलंच नाही म्हटलं तरी चालेल . मुळात हा माणूस फार किचकट वाटायचा मला (चेहऱ्यावरुनच), पुस्तक वाचताना हे मत दृढ होत गेलं . साहित्य अकादमीनं गौरवलेली कलाकृती आहे ही, पण ती शैली मला वाचताना, समजून घेताना फारच जड गेली . हा माणूस तऱ्हेवाईक होता बहुदा . पण मालतीबाईंबद्दलचे संदर्भ आणि इतर तत्कालीन समाजाचे आणि लोकांबद्दलचे अनुभव खरंच वाचण्याजोगे आहेत . आणखी एक अजिबात न आवडलेलं आत्मकथन म्हणजे ' नाथ हा माझा ' ! कांचन घाणेकरांनी लिहिलेलं आहे हे . केवळ लक्ष वेधून घेण्यासाठी हे पुस्तक त्यांनी लिहिलं का, असा मला नेहमी प्रश्न पडतो . कारण वाचण्यासारखं, जाणून घेण्यासारखं किंवा लोकांना पटण्यासारखंही या पुस्तकात फारसं काही नाहीच . त्यांना कोणता परिणाम अपेक्षित आहे कळत नाही . त्यांचा थोडासा खटकणारा पोरकटपणा, त्यामुळे सुलोचनाबाईंना सहन करावा लागलेला मनस्ताप, डॉक्टरांची दिवसेंदिवस होत गेलेली अधोगती हे वाचताना मन सुन्न होऊन जातं . आणि या खटाटोपातून त्यांना आपण सहानुभूती बहाल करू शकत नाहीच .

अजून मला आवर्जून वाचायची आहेत अशी कथनं म्हणजे लक्ष्मीबाई टिळकांचं ' स्मृतीचित्रे ' , ह . मो . मराठेंचं ' बालकांड ' , मारुती चितमपल्लींचं ' चकवाचांदणं ' वगैरे? . . ही यादी बरीच मोठी आहे . शिवाय अजून न प्रकाशित झालेलं आणि होईल की नाही हेही माहित नसलेलं आशा भोसलेचं आत्मचरित्र . माझी ती अत्यंत आवडती गायिका आहे, तिची गोष्ट वाचायची मला उत्सुकता आहे . अतोनात कष्ट, मान - अपमान, एकाकीपणा, आर्थिक हलाखी, भरमसाठ यश, हेवा वाटण्याइतकी प्रसिध्दी आणि सन्मान, तरीही पाठ न सोडणारं दुर्दैव, तरीही रसरशीतपणे आयुष्य उपभोगण्याचा स्वभाव, तिच्यावर आणि तिच्याकडूनही झालेले अन्याय . . . . कशी जगली असेल ती हे वाचायचं आहे मला? . बघू कधी हातात पडतंय ते .

तर!!!!! अशा या एकेकांच्या गोष्टींच्या गोष्टी . हे काही समीक्षणात्मक विवेचन नव्हे . मी माझ्या दृष्टीकोनातून त्यांना कसं पाहिलं ते तुमच्याशी संवादलं . माझं म्हणणं तपासून पहाण्यासाठी, खोडूनही काढण्यासाठी, अगदी दुजोरा देण्यासाठीसुध्दा तुम्हालाही ही पुस्तकं वाचून पहावीशी वाटली तर फारच छान . तुमच्या प्रतिक्रिया मला कळवल्यात तर दुधात साखरच .

**1** . मृद्‌गंध - इंदिरा संत
**2** . स्मरणगाथा - गोनिदा
**3** . एका मुंगीचे महाभारत - गंगाधर गाडगीळ
**4** . दशद्वार से सोपान तक, नींव का निर्माण फिर, क्या भूलूँ क्या याद करूँ, बसेरे से दूर (**4** खंड) - डॉ . हरीवंशराय बच्चन
**5** . तराळ अंतराळ - शंकरराव खरात
**6** . उपरा - लक्ष्मण माने
**7** . आमचा बाप आणि आम्ही - डॉ . नरेंद्र जाधव
**8** . धूळपाटी - शांता शेळके
**9** . माझ्या खुणा माझ्या मला - डॉ . सरोजिनी बावर
**10** . आहे मनोहर तरी - सुनिता देशपांडे
**11** . नाच गं घुमा - माधवी देसाई
**12** . गावाकडच्या गोष्टी, बनगरवाडी वगैरे - व्यंकटेश माडगुळकर
**13** . बाप लेकी - पद्‌मजा फटक, दीपा गोवारीकर
**14** . सुवासिनी - सीमा देव
**15** . श्यामची आई - साने गुरुजी
**16** . जगाच्या पाठीवर - सुधीर फडके
**17** . रास - सुमा करंदीकर
**18** . अग्निपंख - डॉ . अब्दुल कलाम
**19** . इडली, ऑर्किड आणि मी - विठ्ठल कामत
**20** . कऱ्हेचे पाणी - आचार्य अत्रे
**21** . बंध अनुबंध - कमल पाध्ये
**22** . एक झाड दोन पक्षी - विश्राम बेडेकर
**23** . नाथ हा माझा - कांचन घाणेकर
**24** . स्मृतीचित्रे – लक्ष्मीबाई टिळक
**25** . बालकांड - ह . मो . मराठे
**26** . चकवाचांदणं - मारुती चितमपल्ली .

## - सई कोडोलीकर

# पालकनीती परिवाराचे खेळघर

**कामाची सुरूवात -**

आठ वर्षापूर्वीची गोष्ट . नव्यानं वसत जाणाऱ्या आमच्या कर्वेनगर या उपनगरात नवनवीन इमारतींबरोबरच, बांधकाम कामगारांच्या, दुष्काळी जिल्ह्यातून रोजगाराच्या शोधात पुण्यात दाखल होणाऱ्या कुटुंबांचीही भर पडते आहे . मिळेल त्या जागेवर खोपटाला लागून खोपट उभारून ही कुटुंबे रहात आहेत . म्हटलं तर आम्ही शेजारीच . माझ्या मुलाचे मित्र म्हणून, यातली मुलं आमच्या घरी यायची आणि पुस्तकं, चित्र, रंग, कागद, खेळ बघतांना, खेळतांना रंगून जायची . माझ्यासाठी ही मुलं त्यांच्या कपडे, वावर, शब्दांतून जाणवणारा त्यांचा परिवेश नवीनच होता . ह्या मुलांची अस्वच्छता, वेगळी भाषा, दबलेपणा ह्यांना पार करून मी त्यांच्यात ओढली गेले ती त्यांच्यातल्या बाल - सुलभ उत्सुकतेनं भारलेल्या नजरांमुळे, त्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांमुळे, उत्साहामुळे . त्याच वेळी जाणवलं की या सृजनाच्या, शिकण्याच्या ओढीला संधीची साथ मिळत नाही . घराकडून, समाजाकडून मदतीचा हात मिळत नाही . यातली काही मुले शाळेत जातात पण फुलण्या - विकसण्यासाठी त्याही भागातून काही घडताना दिसत नाही . ही परिस्थिती बदलण्याचा काहीतरी विचार मला केलाच पाहीजे असं वाटलं . माझं स्वत:चं काम या प्रकारच्या कामाहून आजवर वेगळं असलं तरी त्यामागच्या विचारांच्या दृष्टीनं एकच होतं . पालकनीती या मासिकाची मी एक संपादक होते, संस्थेची विश्वस्तही होते . या वस्तीतल्या मुलांच्या विकसनासाठी, सिक्षणासाठी मला माझ्या संस्थेतर्फेच काही करता येईल का? असा विचार मला सुचला .

**पालकनीती -**

बदलत्या सामाजिक - राजकीय वास्तवात एक माणूस म्हणून जगण्याची - वाढण्याची संधी निदान मुलामुलींना मिळू शकते का? हे शोधत जाण्याच्या इच्छेतून संजीवनी कुलकर्णी यांनी 'पालकनीती' नावाच्या छोट्याशाच मासिकपत्रिकेची सुरूवात केली . हे काम आवडून, त्याच्या मुळाशी असलेल्या विचारांनी ओढले जाऊन वेगवेगळ्या शिक्षण - व्यवसायांच्या वाटेवरची आम्ही काहीजण त्यांत सामील झालो . मासिकपत्रिका काढण्याचं काम तसं वरवर पाहता सोपं, एखाद्याला साधेल एवढंच परंतु जर एकेरी व्हायला नको असेल, आवाका वाढायला हवा असेल तर त्यांत अनेकांचा सहभाग हवा . विचारांचा मोकळेपणा, वैविध्य हवं, तरीही एक नितळपणा हवा असं त्यावेळीच संजीवनीचं म्हणणं . म्हणजे मासिक चालवणं एवढंच न राहता याच विचारांची काही प्रत्यक्ष कामंही उभी रहावीत, तशी सोय, सवड, सहकार्य एकमेकांना देता यावं, या इच्छेनं पालकनीती परिवार ही संस्था आम्ही रजिस्टर केली . शिक्षण आणि पालकत्वाबद्दलच्या पुस्तकं संशोधन - माहितीचे संग्रहण करणारं माहितीघर, पालकांसाठी समुपदेशन केंद्र, सामाजिक पालकत्व पुरस्कार असे उपक्रम सुरू केले .

**वस्तीतल्या मुलांसाठीचं खेळघर -**

शिक्षणाच्या वाटेवर अडथळे असलेल्यांच्या मदतीसाठी काही करावं असं जे माझ्या मनात होतं, त्यातून प्रथम 'खेळघर' ही कल्पना प्रत्यक्षात आली . वस्तीतल्या मुलांसाठी खेळघर आठवड्यातून एक दिवस **3 - 4** तासांसाठी मुलं माझ्या राहत्या घरी जमतात . शाळेत शिकवल्या जाणाऱ्या औपचारिक अभ्यासात मदत असं खेळघराच्या कामाचं स्वरूप नाही तर मुलांना शिकण्यात रस वाटेल, शिकण्यातून आनंद मिळेल असं काही करून बघण्याचा खेळघरात प्रयत्न असतो . मुलं इथं रमतील, उत्सुकतेनं पाहतील - वाचतील, प्रश्न विचारतील, स्वत:ला व्यक्त करण्याचा प्रयत्न करतील असं वातावरण जोपासण्याचा प्रयत्न असतो . मुलांबरोबर करून पाहताना अनेक कल्पना सुचतात . मुलांना त्यांच्या जीवनव्यवहारात उपयोगी पडतील अशा काही मूलभूत क्षमता त्यांच्यात वाढीला लागायला हव्या यासाठी प्रयत्न होतात . भाषेशी मैत्री, गणितवृत्तीचा विकास, आरोग्य विचार, परिसर जिज्ञासा, एक चांगली व्यक्ती म्हणून आवश्यक असणाऱ्या सहकार्य - समानता यासारख्या मुल्यांचा विचार, ह्या मुख्य विषयांना समोर ठेऊन खेळघरांची आखणी होते . सुमारे **350** पुस्तकांचं वाचनालय, विविध खेळणी, रंग - चित्र साहित्य, माती यासारखी साधनेही खेळघरात आहेत .

**वस्तीमधील कामाची सुरूवात -**

या मुलांना मोकळं करताना, त्यांच्या मनातले प्रश्न, अडचणीचा विचार करताना, त्यांच्या पालकांशी - शिक्षकांशी संवाद होणं गरजेचं वाटतं . वस्तीवरील काही गंभीर संकटांच्या काळात येथील मोठ्यांशीही ओळखी झाल्या . त्यातून आपल्या वस्तीसाठी काही करायला हवं असं मनापासून वाटणाऱ्या काही कार्यकर्त्यांचा गट बनला . गेल्या वर्षभरात चर्चा - संवाद - एकत्र वाचन, मुलांचे दाखले काढून देण्यासाठी प्रयत्न, सहली अशा कारणांनी अनेकदा एकत्र आलो . खेळघरात जेमतेम **20** ते **30** मुलं येवू शकतात . बाकीच्या मुलांसाठीही खेळघर हवं . मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीनं आणखीही खूप करण्याची गरज आहे, असं सतत वाटत होतं .

येथील शिक्षणाचा प्रश्न साकल्यानं समजावून घेण्यासाठी मे महिन्यात एक पाहणी केली . सुमारे **700** मुला - मुलींच्या ह्या शिक्षणविषयक

माहितीतून अनेक मुद्दे पुढे आले. ह्या वस्तीतील मुलांमध्ये 0 ते 6 वयोगटातल्या मुला - मुलींची संख्या मोठी आहे. त्यामानानं माध्यमिक शाळांत जाणारी मुलं थोडी आहेत. मुलांपेक्षा मुलींचं प्रमाण बरंच कमी आहे. वस्तीत लमाणी, वडारी, तेलगू, हिन्दी अशा मोठ्या संख्येनं परभाषिक मुलं आहेत. छोट्यांसाठी बालवाडीची - आंगणवाडीची मात्र जवळपास सोयच नाही. मराठी माध्यमाच्या पहिलीत ह्या मुलांचे काय होत असेल याची कल्पना केलेली बरी. मूल जन्मल्यावर जन्माची नोंद करून त्याचा वयाचा दाखला घ्यायचा असतो हे इथे माहीतच नाही. दाखल्याचा प्रश्न येतो तो पहिलीत शाळेत घालतांना. तो कुठे मिळतो, कसा काढायचा आणि मुख्य म्हणजे काम बुडवून जायचं! दाखल्याच्या, गरिबीच्या आणि लहान भावडांना सांभाळण्याच्या गरजेखातर अनेकांना शाळेत जायची संधीच मिळत नाही. शाळांमधून मिळणाऱ्या रसविहीन, चाकोरीबद्ध शिक्षणामुळे शाळेत जाणाऱ्यांच्याही पदरात फार काही पडतं असं नाही. या पाहणीनंतर शिक्षणासंदर्भात करण्यायोग्य गोष्टींची मोठी यादीच आमच्यापुढे उभी राहिली.

मुलांना शिकावंसं वाटायला लागलं की पुढची वाट सोपी करून देण्यासाठी अनेक पातळ्यांवर मदत करायला हवी या जाणीवेतून आनंद संकुलाच्या कामाची सुरूवात झाली. मुलं जिथं राहतात त्या वस्तीतच कोथरुडमधील लक्ष्मीनगर येथे पालकांच्या मदतीनं एक छोटं घर बांधलं आणि तिथे काम सुरू झालं. या कामात अनेक स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा सहभाग आहे. गेल्या चार वर्षात आनंदसंकुलच्या माध्यमातून कामांची एक साखळीच उभी राहिली आहे. सुरुवातीला एक - दोन कार्यकर्त्यांचा उत्साह, धडपड आणि प्रयत्न एवढ्या आधारावर काम चालू होतं. गेल्या 2 / 3 वर्षात हळूहळू कामाला आकार येत आहे. गेल्या वर्षभरातली एक महत्त्वाची कमाई म्हणजे . . . प्रयत्नांना एक दिशा लाभली.

**खेळघरात . . .**

खेळघरात तुम्ही नक्की काय करता? हे जाणून घेण्याची उत्सुकता अनेकजणांनी व्यक्त केली आहे. ह्या प्रश्नाचं उत्तर थोडक्यात देणं अवघड आहे. नमुन्यादाखल एका दिवसाची रूपरेषा इथे देत आहोत.

16 जुलै 2003 पावसाळी दिवस, नुकतीच गुरुपौर्णिमा होऊन गेली होती. त्यादिवशी मुलांसमोर तीन पर्याय ठेवले होते -

- वंदना मावशी जवळ बसून एक आदिवासी तरुण डॉक्टर कसा बनला याची गोष्ट ऐकणे व नंतर त्यावर चर्चा करणे. वेळ 4 ते 5.

- पावसाचा थेंब आपल्याला, जमिनीला, झाडं - पानं - फुलं - प्राणी यांना साऱ्यांना किती हवा हवासा आहे याचे चित्र काढणे व मंजिरीताई व शुभदाताईशी बोलणे. वेळ 5 ते 6.

- 'गुरू' म्हणजे काय? तुमच्या मते गुरू कसा असावा याबद्दल शुभदाताईशी चर्चा करणे. वेळ 6 ते 7.

वरीलपैकी कमीत कमी एक तरी गोष्ट मुलांनी मनापासून करायची आहे. निवड त्यांची राहील. सर्व activities मध्ये भाग घेतला तर उत्तमच. अशी सूचना खेळघरात लावली होती. त्याप्रमाणे मुलांनी निवड केली. यातली 'गुरू'बद्दलची चर्चा नंतर पुढे खूपच रंगली - मुलं मोठ्या माणसांना गुरूंच्या रुपात पहात होती. अर्थातच त्यांच्या मोठ्यांकडून काही अपेक्षा होत्या. विशेषत: शाळांत तर त्या अपेक्षा कुठेच पुऱ्या होत नव्हत्या. मुलांच्या मनात असंतोष होता. राग होता. त्यातून कळीचा प्रश्न पुढे आला. आपण सहन तरी किती करायचं? विरोध कसा करायचा? त्याचा उपयोग होईल की तोटाच? या चर्चेतून नाटकाची एक थीम पुढे आली. हेही लक्षात आलं की गटानं मिळून संघर्ष केला तर बदल होऊ शकतील. नाटकात आधी निषेधाच्या मार्गानं मुलं सरांसमोर प्रश्न मांडतात. परंतु त्याचा उलटाच परिणाम झाल्याने मुलं वर्गात गुरूजींशी अबोला धरून सत्याग्रह करतात. अखेर गुरुजी मुलांचं म्हणणं ऐकायला तयार होतात. मुलांनीच पुढाकार घेऊन नाटक बसवायचं ठरवलं. लेखन, दिग्दर्शन, भूमिका सर्व काही मुलांनीच केलं. नाटक बसवताना . . . एकत्र काम करताना येणारे प्रश्न,पाळावी लागणारी नीती अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. खेळघरात गणेशोत्सवात, पाहुण्यांसमोर असे नाटकाचे अनेक प्रयोग झाले.

खेळघरात अनेक गोष्टी चालतात. खेळ, वाचन, विविध विषयांवर चर्चा, पाहुण्यांकडून शिकणं, सहली, चित्रांतून - लिखाणांतून अभिव्यक्ती इ. त्यावर एक स्वतंत्र लेख लिहायला हवा. या वर्षी नीला जोशी व मंजिरी मुरुगकर यांच्या सहभागानं arts and crafts च्या गोष्टींना गती आली, स्मॉकिंग, ब्रेडच्या लगद्यापासून फुलं, कागदी फुलं आणि चित्रकलेतल्या अनेक गोष्टी मुलं शिकली.

खेळघराच्या कामात अनेक आव्हाने आहेत.

1. विविध वयाच्या - गटांना गरजेनुसार वेगवेगळा वेळ देऊ शकणे.

**2** . उत्स्फुर्तता, स्वातंत्र्य आणि शिस्त यांत समन्वय .

**3** . सतत नवीन गोष्टींचा शोध .

**4** . कुमारवयीन भाव - भावनांना पुरं पडणं .

आमच्या परीनं यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहोत .

**वस्तीतील सामाजिक प्रश्नांची दखल**

काम करता करता मुलं ज्या परिस्थितीत जगतात, शिकतात ते समजावून घेण्याच्या आमच्या प्रयत्नांतून प्रश्नांचं अक्राळ विक्राळ स्वरुप आमच्यासमोर येत गेलं . गरिबी - निरक्षरता, त्यातून येणारं दबलेपण - पिचून जाणं, मनानं आणि शरीरानं ही . रोजचा दिवस भागवण्याच्या चिंतेतून, अडीअडचणीला काढलेल्या कर्जांच्या भाराखाली, कष्टांचा डोंगर उचलताना - शरीरं पोखरून जातात, रोगांनी जर्जर होतात . संवेदनक्षमता, त्यातून येणारी अस्वस्थता परवडत नाही . या सगळ्याला उतारा म्हणून नशा जवळ केली जाते - दारू - तंबाखूची, पैसे खेळण्याची, कर्कश्य संगीताची आणि अभिरुचीहीन सिनेमा - टिव्हीचीही . ह्या सगळ्यात विचार - विवेक वाढू शकत नाही . भावनांवर ताबा राहत नाही . . . सहज सहज प्रकरणं लाठ्या - काठ्यांवर येतात . मनांवर ठसलेल्या चुकीच्या समजुती, रुढींचा हातभार असतोच . प्रेमप्रकरणं, वैयक्तिक हेवेदावे, फसवणूक, मत्सर, अशी अनेक कारणं . . . गटागटांमधली भांडणं - माऱ्यामाऱ्या - तुरुंगवाऱ्या सातत्याने चालू असतात . अर्थात हा प्रश्न मुलगे आणि पुरुषांमध्ये अधिक प्रकर्षाने जाणवतो .

मुली आणि स्त्रियांची परिस्थिती याहूनही विकट आहे . पुरुषप्रधानतेच्या पारंपारिक मानसिकतेमुळे बायका आणि मुलींवर प्रमाणाबाहेर अन्याय होतो . मुलगे आणि मुली यांना वाढवताना केल्या जाणाऱ्या फरकामुळे मुली कामांच्या - जबाबदाऱ्यांच्या - आज्ञाधारकपणाच्या ओझ्याखाली दबलेल्या नि त्यामुळे सतत मागे - मागे राहणाऱ्या, चटकन मोकळ्या न होणाऱ्या आहेत, तर मुलगे लाड आणि मोकळेपणामुळे बिनधास्त, टगेपणाकडे झुकणारे .

त्यामुळे घरकामासाठी मुलींची शाळा थांबवली जाणं, प्रेमप्रकरणांची शिक्षा मोठ्या प्रमाणात भोगायला लागणं, लहान वयात लग्नं, बाळंतपणं, छळ, सततचे कष्ट आणि परस्वाधीनता या गोष्टी घराघरात दिसतात .

सुरुवातीला जरी आनंदसंकुलच्या कामाचा भर शैक्षणिक, त्यातही औपचारिक शिक्षणावर राहिला, तरी तो पुरेसा नाही हे आमच्या हळू हळू लक्षात आले . दुसऱ्या बाजूनं फक्त तेवढंच काम करत राहणं शक्यही नव्हतं . संकटांच्या प्रसंगी मुलं, पालक मोठ्या विश्वासानं आमच्याकडे मदत मागायला येत . आम्हीही ती करत असू . पण प्रसंग निभावल्यावर ते मागे टाकणं आम्हाला शक्य होत नसे . हे थांबायचं कसं ? किमान कमी कसं होईल ? त्यासाठी आपण काय करायला हवं ? काय केलं असता ते अधिक परिणामकारक होईल असे अनेक प्रश्न आम्हाला सतत भेडसावतात . खेरीज या प्रश्नांत जेवढं करावं तेवढं कमीच आहे . आपण कुठे कुठे पुरे पडणार ? आपल्या वैयक्तिक आयुष्याचं - गरजांचं काय ? हेही मुद्दे आहेतच . तिढा अजून सुटलेला नसला तरी काही प्रमाणात आम्ही त्यातून मार्ग काढायचा प्रयत्न केला .

आनंदसंकुलचं काम शिक्षणाचं आहे . . . कबूल ! पण कसलं शिक्षण ? काय अपेक्षित आहे आपल्याला शिक्षणातून ? परिस्थिती विकट आहे हे तर खरंच, पण परिस्थितीचा सामना करुन त्यातून वाट काढणं हे ही शिकावंच लागतं ना ? मग त्यासाठी कोणत्या क्षमता विकसित व्हायला हव्यात ? विचार करणं (स्वत:चा आणि त्याबरोबर इतरांचाही), सर्वांच्या हितातच आपलं हित सामावलं आहे ह्या शहाणपणापर्यंत पोचणं, विचार व्यक्त करण्याचं धाडस आणि भाषिक क्षमता लाभणं, आपल्याला मनापासून पटलेल्या गोष्टीसंदर्भात ठाम राहणं, त्या प्रत्यक्षात याव्यात म्हणून - परिस्थिती बदलासाठी संघर्ष करणं - ज्या मार्गाने कमीत कमी नुकसान आहे अशा मार्गाने संघर्ष करणं - हे जर मुलं - मुली आत्मसात करु शकली तर ? हे सारं फक्त चर्चेतून - संवादातून - वाचनातून होणार नाही . यासाठी प्रत्यक्ष अनुभवांची जोड हवी . वस्तीत घडणाऱ्या घटनांमध्ये (भांडणं, माऱ्यामाऱ्या, दादागिरी इ . ) मुलांच्या पालकांच्याबरोबर उभं राहणं हे त्यातलं पहिलं पाउल . शक्य तेवढ्या एकत्रित प्रयत्नांनी संकटातून बाहेर आल्यानंतर त्यातल्या बारीक - सारीक गोष्टींबद्दल, परिणामांबद्दल मुलांना समजावून घेत चर्चा होतात . त्यांचं काय चुकलं, आपलं काय चुकलं, काय केलं असता कमीत कमी नुकसान होईल अशा चर्चांच्या फेऱ्या होतात . मुलांबरोबरच संबंधित विरुद्ध बाजूचे लोक, पालक, युवक गट, महिला मंडळ, वस्तीत काम करणाऱ्या इतर सामाजिक संस्था, पोलीस अशा अनेकांबरोबर बोलणं होतं . प्रश्नांच्या कारणांपर्यंत पोचायला मदत केल्यावर मुलांकडून विवेकपूर्ण उत्तरंही मिळतात .

## मुलींची लवकर लग्ने

पण हे झालं आणीबाणीच्या परिस्थितीबाबत. काही आम्हाला जाणवणाऱ्या प्रश्नांवरही मुलं - पालक यांच्या मदतीनं काम होणं आम्हाला महत्वाचं वाटलं. उदा. **13 - 14** व्या वर्षी होणारी मुलींची लग्नं. अगदी सुरुवातीच्या काळात खेळघरात येणाऱ्या **5 - 6** मुलींची लग्नं झाली आहेत. त्यांची होरपळ आम्ही डोळ्यांनी पाहिलेली आहे. त्यातल्या दोघी सासरी होणाऱ्या छळाला कंटाळून घरी आल्या आहेत. **2 - 3** मुलांसह निभावणाऱ्या पार निपटून गेलेल्या माहेरवाशीणीही समोर आहेत. मुलींची टिंगल टवाळी - छेडछाड - प्रेमप्रकरणं याला घाबरून इज्जतीच्या भीतीनं लवकर लग्नं होतात.

आम्ही या प्रश्नावर वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करायचं ठरवलं. मुलींबरोबर, त्यांना खंबीरपणे उभं रहायला मदत करेल असं काम मुलींच्या वर्गात होत होतंच, त्याचबरोबर मुलांशीही याबद्दल बोलणं सुरु केलं. त्यांना त्यातला अन्याय दिसत होता पण त्याविरुद्ध जाणं शक्य वाटत नव्हतं. मात्र किमान स्वत:च्या बहिणीच्या पाठीशी उभं राहायची तयारी वाढत होती. पालकगटाकडून संमिश्र प्रतिसाद होता. त्यांच्या मते त्या - त्या समाजाच्या रुढी - परंपरांमध्ये आपण पडलो तर ते योग्य ठरणार नाही. गणपती मंडळाच्या तरूण गटाशीही बोलणं केलं. **1 - 2** लग्नं थांबवण्यात यशही मिळालं. या प्रयत्नांतून या संदर्भात विचारांची सुरुवात झाली.

## आरोग्याचा प्रश्न

आरोग्याचा प्रश्न शिक्षणाशी खूपच जवळचा. डॉ. संगीता महाजन यांच्या पुढाकाराने खेळघरात आरोग्य शिबिर झालं. डोळे आणि कान यांच्यातील व्यंगाचा शिकण्यावर तातडीनं परिणाम घडतो. त्यामुळे शिबिरात डोळे - नाक - कान - घसा आणि एकंदरीत आरोग्य यांची तपासणी झाली. शिबिरात डॉ. मेधा परांजपे यांनी सर्व मुला - मुलींचे डोळे तपासले. त्यातील नंबर असणाऱ्या मुलींना चष्मा मिळेपर्यंत मेधाताईनी सहकार्य केले. पुढील काळात त्यांच्या दवाखान्यात मोफत उपचारांसाठी पासेसही दिले. नाक - कान - घसा यांची तपासणी डॉ. समीर कुलकर्णी यांनी केली. डॉ. वैशाली देशमुख यांनी एकंदरीत तपासणी केली, उपचारांचे मार्गदर्शनही केले. संगीता महाजन आणि आहारतज्ञ योगिनी चिपळूणकर यांनी पालकांना आहाराबद्दल मार्गदर्शन केले. त्यात उपलब्ध असलेल्या गोष्टींतून पोषकमूल्ये वाढवण्यावर भर होता.

## आणखी एक घटना

खेळघरातल्या एका मुलीची बहिण बाळंतपणात वारली. चौकशी केली असता लक्षात आले की वस्तीतील एका डॉक्टरच्या चुकीच्या उपचारांचा यात मोठा भाग होता. अधिक खोलात शिरल्यावर लक्षात आलं की ह्या डॉक्टर महाशयांकडे कोणतीही डिग्री नाही. हे समजल्यावर मुलांना - पालकांना ह्या संदर्भात काही करयला हवे असे जोरदारपणे वाटायला लागले. डॉक्टरला धमक्या, हाकलणे, धडा शिकवणे अशा उपायांवरून . . . चर्चेची गाडी पोलीसात कंप्लेंटपर्यंत आली. ती कुणी करायची ? अर्थातच सर्वांनी मिळून ! मग एक अर्ज तयार करुन त्यावर अनेकांच्या सह्या घेतल्या नि गटानं पोलीसात तक्रार नोंदवली.

प्रत्यक्षात या प्रयत्नांचं फलित काय ? तर डॉक्टर महाशय महिनाभर परागंदा झाले. महिन्यानं परत येउन पुन्हा जोमानं प्रॅक्टीस चालू केली. पोलीसांना इतर 'अर्जंट मॅटर्स' पुढे कधीच वस्तीत यायला जमलं नाही. महिनाभराच्या काळात लोकं शांत झाली. आपापल्या कामांना लागली. हलके हलके दु:ख - संताप बोथट होत गेला. त्यानंतर असं लक्षात आलं की वस्तीत अशा प्रकारे काम करणारे **10 - 12** डॉक्टर्स आहेत. या एका डॉक्टरला शिक्षा होउन प्रश्न सुटणार नाहीये. लोकांमधील जाणीव जागृतीचं काम व्हायला हवंय. अशा प्रकारे आरोग्याच्या संदर्भातलं व्यापक काम हातात घ्यायची गटाची ताकद नाही तसंच अनेक गोष्टींत हात घालून मूळ उद्देशच हरवून जाण्याची भीती आहे.

जरी या प्रश्नाचा छडा लावणं शक्य झालं नाही तरी यातून खूप काही साधलं. आमच्या मुलांना, पालकांना मुद्दा समजला. विधायक मार्गानं प्रश्न कसा हाताळायचा, त्यासाठी एकत्रित प्रयत्नांची, चिकाटीची कशी गरज असते हे समजलं. आज घडीला अशी आपल्या गटाची ताकद नाही, ती तयार व्हायला हवी हेही समजलं.

अशा सगळ्या अनुभवांतून आम्हीही शिकतो आहोत. आमच्या मर्यादांतून बाहेर पडायचा प्रयत्न करतो आहोत. या प्रयत्नांचा निश्चित

उपयोग जाणवतो. मुलांमधील भांडणं - माऱ्यामाऱ्या कमी झाल्या आहेत. मुली अधिक धीट झाल्या आहेत. त्यांचा हक्क मागू लागल्यात. अभ्यासवर्गातली उपस्थिती - सातत्य वाढतंय. वस्तीतलं समाजजीवन आम्हाला अधिक खोलवर समजतंय. मुलं - पालकांशी समजुतीचं नातं बांधलं जातंय.

अर्थात सगळंच जमतय असं अजिबातच नाही. पालक - मुलांचा चर्चांना आतून विरोध आहे. कधी कधी ते त्यामुळे आमच्यापासून दूरही जातात. चर्चेव्यतिरिक्त इतर माध्यमांचा शोध घ्यायला हवाय. अनेकदा आनंदसंकुलचं काम ही आमचीच गरज आहे अस आम्हाला वाटतं. पालकांचा, मुलांचा पुढाकार वाढायला हवा हे जाणवतं. ह्यासाठी अधिक नेटानं नि सर्जकतेनं पालकांबरोबर काम व्हायला हवंय हेही जाणवतंय. पुढील काळात दर आठवड्यात पालक भेटींसाठी काही वेळ राखून ठेवायचा ठरला आहे. पालकांनी त्यांचे व त्यांच्या मुलांचे प्रश्न सोडवण्यासाठी एकत्र येणं, योग्य मार्गाचा शोध घेणं, एकत्रित विवेकपूर्ण कृतीतून प्रश्न सोडवणं या टप्प्यापर्यंत येण्यासाठी अजून खूप वाट चालून जायची आहे. आम्ही पुढील वर्षातील हे एक महत्वाचे आव्हान मानले आहे.

**मुलग्यांबरोबरच्या कामाची गरज**

वस्तीमध्ये मुलींना आणि मुलांना मिळणारी वागणूक वेगवेगळी असते. मुलांना मिळणारं झुकतं माप आणि मुलींचं किमान गोष्टींपासूनही वंचित असणं हे अस्वस्थ करणारं होतं. त्यामुळे साहजिकच आम्ही मुलींबरोबरच्या कामाला प्राधान्य दिलं. त्याचवेळी मुलांबरोबरही स्वतंत्र काम व्हायला हवं ही गरज जाणवत होती. खेळघरातली मुला - मुलींची चिडवाचिडवी, त्यातून भांडणं, मुलांची दादागिरी, खेळघरातल्या मोकळेपणाचा फायदा घेणं या संदर्भात मुलांशी बोलणंही गरजेचं झालं होतं.

मुलग्यांशी बोलताना आमच्याकडून खूपच अडचणी येत होत्या. कळत - नकळत मुला - मुलींच्यात मुलींची बाजू घेतली जात होती. मुलांवर चिडायला होत होतं. त्यांचा चेष्टेखोरपणा, चंचलपणा, जबाबदारी न घेणं, कुमारवयातला आक्रमकपणा हे आम्हाला सहन होत नव्हतं. मुलांबरोबर काम करणं अधिक अवघड आहे हे लक्षात आलं. या संदर्भात नक्की काय करावं याचा शोध सुरु आहे. संगीता गंधे व वीणा कुलकर्णी यांनी या कामाची जबाबदारी घेतली आहे. पुढील काळात कदाचित दिशा स्पष्ट होतील.

चुकत - माकत, धक्के खात, त्यातून शिकत हे काम करताना परिस्थिती बदलाच्या दृष्टीनं हा एक छोटासा प्रयत्न आहे, याची आम्हाला जाणीव आहे. आजही अनेक मुलांना शिक्षणाच्या संधीच उपलब्ध नसणं, शिक्षणाचा दर्जा अत्यंत खालावलेला असणं, ह्या व्यापक परिस्थितीची आव्हानं आपल्या समोर आहेतच. या सगळ्यांच्या मुळाशी असणारे - प्रचंड आर्थिक विषमता, जागतिकीकरणासारखे घटक, वाढता मूलतत्ववाद हे मुद्दे आहेतच नि त्यांचे प्रभाव - परिणाम कमालीचे तीव्र आणि सर्वव्यापीही आहेत. आमच्या प्रयत्नांनी काय साधेल - कितपत साधेल हे निश्चित सांगता येणार नाही . . .

कैसे आकाश में सुराख नही होता . . .
कोई पत्थर तो तबियत से उछालों यारो !

या विश्वासावर आधारित मन:पूर्वक प्रयत्न करत आहोत.

## -- सौ. शुभदा जोशी

ख़ेळघर - आनंदसंकुलचं काम पहायला, मुलांशी गप्पा मारायला आपल्याला आवर्जून आमंत्रण.

खेळघर - आनंदसंकुलच्या कामात आपल्यालाही सहभागी होता येईल -
-- दरवर्षी काही रक्कम आपण देणगीदाखल दिल्यास रोजच्या खर्चाची आमची चिंता कमी व्हायला मदत होईल.
-- आपल्याला मुलांसमवेत काही उपक्रम सुरु करावेत असं वाटलं तर तसं बोलणं करता येईल.
-- एखाद्या अगदी कठीण परिस्थितीतल्या मुलाच्या / मुलीच्या शैक्षणिक खर्चाची वर्षभराची जबाबदारी घेता येईल (रु. **1500 /-** ).
-- खेळणी, रंग, कागद, शैक्षणिक साहित्य अशी वस्तूरुप मदत करता येईल.
-- हे काम इतर अनेकांपर्यंत पोहचावं यासाठी आपल्यापरीनं प्रयत्न करता येतील.

**- शुभदा जोशी**

**संपर्कासाठी पत्ता -**

पालकनीती परिवार
अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, संभाजीपुलाजवळ, कर्वे रोड, पुणे - **411 004**
फोन - **2544 1230**
E-mail : abhay@prayaspune.org

खेळघर
शुभदा जोशी, गुरुप्रसाद अपार्टमेंट, **23** आनंद निकेतन सोसायटी, कर्वेनगर, पुणे **411 052**
फोन - **2543 7119**

आनंदसंकुल
लक्ष्मीनगर, डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे **411 029**

## आपले विश्व आणि आपण

केवळ आकारमानाचा विचार करता आपण विश्वाचे तीन भाग करु शकतो आपली सूर्यमाला, आपली दीर्घिका आणि दीर्घिकोत्तर विश्व ( extragalactic universe ).

अनेक दिवस (वर्षे, शतके) आपले आपल्या ग्रहाबद्दलचे, आपल्या सूर्यमालेबद्दलचे ज्ञान खूपच तोकडे होते. काही उदाहरणे (**1**) पृथ्वीवर Helium असुन देखील (आणि विश्वातील तो Hydrogen खालोखाल सर्वात मुबलक घटक असूनदेखील) त्याचा शोध हा सूर्याच्या spectrum च्या पृथक्करणातून लागला. ( Helium == ' Of the Sun '). (**2**) ग्रहणे ही राहु, केतु या काल्पनिक ग्रहांनी सूर्य , चंद्र यांना गिळल्यामुळे होतात असा समज होता.

आजची स्थिती मात्र अर्थातच वेगळी आहे. आज मानव चंद्रावर पोचला आहे, skylabs स्थापित झाल्या आहेत, प्लूटोपलीकडील ग्रह सापडताहेत, आपली याने सूर्यमालिकेपलीकडे पोचताहेत, इतकेच काय तर आपण धूमकेतुंवर sensors आदळवून त्यांची माहिती गोळा करु शकतो आहोत.

आपल्या दीर्घिकेबद्दलसुद्धा भरपूर माहिती प्राप्त झाली आहे - दीर्घिकेच्या मध्यभागी असलेल्या कृष्णविवरापासून ते ताऱ्यांच्या सखोल वर्ग वारींपर्यंत. ही वर्गवारी तारकांच्या तापमानानुसार केली जाते. अत्यत्युष्ण O पासून B A F G K ते कमी उष्ण अश्या M ताऱ्यांपर्यंत. ही साखळी लक्षात ठेवण्यासाठी एक mnemonic वापरली जाते Oh, Be A Fine Girl/Guy Kiss Me. आपला सूर्य हा G प्रकारचा सामान्य पिवळा तारा आहे. केवळ आपल्या दीर्घिकेतच **100** कोटी तारे आहेत. आणि अश्या कोट्यवधी दीर्घिका या विश्वात आहेत.

सध्या शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत ते जीवनाला पोषक असे ग्रह इतर सूर्याभोवती शोधण्याचे. सुरुवातीचे यश हे गुरुच्या आकारमानाचे ग्रह शोधण्यात मिळाले. महाकाय असल्यामुळे ते सापडायला सोपे जातात. आता मात्र काही M वर्गाच्या ताऱ्यांभोवती पृथ्वीसदृश्य ग्रह सापडू लागले आहेत. कदाचित उद्या काही कारणामुळे पृथ्वी सोडावी लागली तर हे ग्रह उपयोगी पडू शकतील, पण महत्त्वाचे म्हणजे या ग्रहांवर जीवसृष्टी असल्यास जीवोत्पत्ती बद्दलच्या आपल्या ज्ञानात भर पडू शकेल.

दीर्घिकोत्तर खगोलशास्त्र तर अतिशयच सुरस आहे. दृश्य लहरींपेक्षा रेडीओलहरींद्वारे जास्त energy उत्सर्जित करणाऱ्या दीर्घिका, quasars , गामा किरणांचे स्फोट, Cosmic Microwave Background Radiation , आणि या सर्व विश्वाची सुरुवात म्हणजे Big Bang , एक ना अनेक असे नवलपूर्ण प्रकार अभ्यासता येतात. अनेक दीर्घिका व quasars इतके दूर आहेत की सर्वात वेगवान अश्या प्रकाशालादेखील आपल्यापर्यंत पोचायला अब्जावधी वर्षे लागतात. विश्वाचा हा पसारा आपल्याला इतर गोष्टींव्यतिरिक्त नम्रपणादेखील शिकवतो.

सध्या जे ज्ञान आपल्याला अवगत आहे ते काही रातोरात मिळालेले नाही तर अनेक शास्त्रज्ञांचे अनेक शतकांमधील परिश्रम त्यास कारणीभूत आहेत. त्या मागे आहे एक scientific attitude . प्रश्न विचारायचे, उत्तरे तोलूनमापून घ्यायची, कोणत्या परिस्थितीत कोणती उत्तरे लागू होत नाहीत ते तपासायचे आणि मगच पुढे सरकायचे. सिद्धांत प्रकाशनाची प्रक्रियादेखील peer review ने चालते. आजकाल कुणीही उठतो आणि web वर जावून हवे ते लिहू शकतो. वैज्ञानिकांना मात्र त्यांचे लिखाण journals ना सादर करावे लागते. इतर वैज्ञानिक मग त्या लिखाणात काही तथ्य वाटतंय का हे पाहतात आणि मगच ते प्रकाशित होऊ शकते. हा वैज्ञानिक दृष्टिकोन, चौकसपणा दैनंदिन ज़ीवनात रुजवला तर त्याचा फायदा आसपासच्या सर्वांना होऊ शकतो.

भारताची खगोलशास्त्रातील परंपरा अतिशय दीर्घ आणि उल्लेखनीय आहे. सुरुवातीची definitive माहिती मात्र तुटक आहे. वेदांग ज्योतिष्याचा काळ साधारण 3400 वर्षापूर्वीचा. लगध हा तेव्हाचा खगोलशास्त्रज्ञ. गर्ग हा त्यानंतर अंदाजे 1000 वर्षानंतरचा. त्या काळात मुख्यत: उत्तरसंपात, दक्षिणसंपात, उत्तरायण, दक्षिणायन, पृथ्वीचे मोजमाप, सूर्याचे परिभ्रमण इत्यादि गोष्टींवर भर असे. आणखी साधारण 1000 वर्षांनी भारतीय खगोलशात्रज्ञांचा संबंध आला तो Alexander च्या काळातील ग्रीक शास्त्रज्ञांशी. तो काळ सिध्दांतांचा (सिध्दांत = सिध्द + अंत == QED ). आर्यभट, ब्रम्हगुप्त, भास्कर I , आर्यभट II , भास्कर II असे अनेक मान्यवर इ. स. 500 ते 1100 या कालावधीत होऊन गेले. त्यांचे अनेक ग्रंथ या ना त्या रुपाने पुढची अनेक शतके शिकवले जात होते. दुर्दैवाने त्या सुमारास बरेचसे लोक ज्योतिर्विज्ञानाकडून फलज्योतिषाकडे वळू लागले होते. पुढील 7,8 शतके उल्लेखनीय अशी प्रगती भारतात घडली नाही. त्यानंतर जयसिंग सवाई यांनी Iran/Portugal यांच्याशी संधान बांधून भारतातील खगोलशास्त्र पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामुळेच जंतर - मंतर सारखी वास्तु उभी राहिली. पण त्याआधीच पूर्ण एक शतक युरोपियनांकडे दुर्बिणी होत्या आणि त्यांच्या सहाय्याने खगोलशास्त्र त्या भागात बरेच प्रगत झाले. गेल्या काही दशकांमध्ये मात्र या क्षेत्रात भारत पुन्हा आपला ठसा उमटवू पहात आहे. TIFR (Mumbai), IIA/RRI (Bangalore), IUCAA/NCRA (Pune), PRL (Ahmedabad) या व इतर संस्था, तसेच काही महाविद्यालयांमध्ये UGC ने चालविलेले उपक्रम याद्वारे अनेक विद्यार्थ्यांना या विषयात अभ्यास करण्यास मदत मिळते आहे. Virtual Observatory हा एक गेल्या काही वर्षांमधील एक नवा concept . National Virtual Observatory (NVO) या नावाने
याचा अमेरिकेत जन्म झाला आणि आता तो जगभर पसरलाय. VO मार्फत बराचसा astronomical data व तो वापरण्याच्या शास्त्रीय पध्दती ( algorithms ) हे internet connection असणाऱ्या कुणालाही उपलब्ध असतात. शाळकरी मुलेदेखील याचा उपयोग करुन घेऊ शकतात. छोटे projects म्हणुन VO चा वापर सहजसाध्य आहे. IUCAA, Pune येथे VO-I म्हणजेच VO-India चे मुख्यालय आहे.

या विश्वाच्या पसाऱ्यात आपले स्थान नेमके काय? Columbus/Vasco da Gama यांच्याप्रमाणेच आपणसुद्धा explorers आहोत. आंधळे जसे हत्ती चाचपतात तद्वतच आपण विश्वाचे विविध पैलू चाचपतो. फरक इतकाच की योग्य त्या माहितीच्या देवाणघेवाणीवरुन आपण ते जास्त डोळसपणे करु शकतो, विविध शोधांमधून मिळालेली माहिती एकत्रितरित्या वापरू शकतो. कधीतरी जीवनायोग्य इतर ग्रह सापडतील, आपण तिथे जाऊ शकू. पण जाऊन काय करणार हे महत्वाचे. To boldly go and kill the natives there? पृथ्वीवर जे आपण करतोय, काळा - गोरा, मायभूमी - परदेश, मित्र - शत्रू हेच? ते आपण पृथ्वीवरच सोडायला हवे. खगोलशास्त्र कुठे न्यायचे हे आपण डोळसपणे ठरवायला हवे. Hubble Space Telescope सारख्या उत्तम दुर्बिणीची आर्थिक मदत कमी करुन मंगळावर माणूस पाठवण्यासारख्या सध्या अतिखर्चिक अश्या उपक्रमामागे सध्याचे अमेरिकन शासन आहे. अशा गोष्टी समजावून घेऊन त्यांचा जमेल त्याप्रकारे आपण निषेध करायला हवा.

खगोलशास्त्र जरी directly आपण दैनंदिन आयुष्यात वापरत नसलो, तरी दळणवळणाची साधने, अद्ययावत् संगणक इ. च्या संशोधनात खगोलशास्त्राचा महत्त्वाचा वाटा आहे. या खगोलशास्त्राची आपण परतफेड कशी करू शकतो असे मला कुणी विचारल्यास मी म्हणेन :
(1) Open mind ने नवनवीन गोष्टींकडे पहायला शिकायचे,
(2) प्रश्न विचारत रहायचे, मिळालेली उत्तरे सत्यासत्यतेसाठी पडताळून पहायची, आणि
(3) कूपमंडुक वृत्ती ने न वागता जगाच्या छोट्यामोठ्या प्रश्नांना वैश्विक स्तरावर नेऊन विचार करायला शिकायचे.

## - आशिष महाबळ

Refs:

(1) http://www.us-vo.org
(2) Astronomy in India: Past, Present and Future - Rajesh Kochhar and Jayant Narlikar, 1993

# ★ आठवणी ★

जेलची हवा - गिरीश सोनार

तीर्थरूप बाबा - वी

## जेलची हवा

" नाव काय तुझं? " .
" गिरीश "
" वडील कुठे असतात? "
" जेलमध्ये " आणि त्यानंतर बाईचा किंवा सरांचा आ वासलेला आणि डोळे मोठे केलेला चेहरा .

नव्या शाळेत किंवा वर्गात गेल्यावर माझ्या बाबतीत घडणारा हा नेहमीचा प्रसंग . पुढे एका बाईनी " वडील जेल खात्यात कामाला आहेत", असं व्यवस्थित घोकून घेतलं तरीही वडील काय करतात किंवा कुठे असतात या प्रश्नाला पहिल्या झटक्यात " जेलमध्ये " असंच उत्तर येत राहिलं . कुणाचे वडील मामलेदार कचेरीत असतात, कुणाचे पोलिसात तर कुणाचे R.T.O मध्ये तसेच माझे वडील जेलमध्ये . त्यात काय ' आँ ' करण्यासारखं? पण हे सगळयांना कुठे समजतं? असो!

बात तशी फार जुनी आहे . काही कारणास्तव रेव्हेन्यू खात्यात असणाऱ्या माझ्या पिताश्रींना जेलखात्यात बदली मिळाली आणि त्याबरोबर आमचा जेलशी ऋणानुबंध जुळला तो थेट त्यांच्या निवृत्तीपर्यंत . बाहेरच्या माणसांना जेल आपल्या हिन्दी पिक्चरमध्ये पाहून तेच ते काय माहीत आहे . आणि त्यात खरेपणा नावालासुद्धा नाही . जेलचं एक वेगळंच विश्व असतं . आम्ही वडिलांच्या बदली दरम्यान पाच - सहा जेल अनुभवले . इतर बरेच पाहिले . सगळं जग कुठून कुठे चाललेलं असतांना त्या विश्वात फारच कमी बदल झाले . सात आठ वर्षांपासून त्यात वाढलेला भ्रष्टाचार अगदी शिगेला पोचला असला तरी तोही मोठया जेलबाबतच आहे की जेथे भाई मंडळी निवाऱ्याला आलेली आहेत . महाराष्ट्रातले बाकी जेल अगदीच निवांत आहेत . प्रत्येक जेलला एक सुप्रिंटेन्डन्ट, एखाद दोन सिनिअर जेलर, काही जेलर, काही क्लार्क आणि बरेच शिपाई असतात . त्याचबरोबर एखादा डोक्टर आणि एखादा नर्सिंग आडली (Nursing Orderly) ही असतात . जेल पोलिसांना शिपाईच म्हटले जाते . त्यात जमादार, सुभेदार, हजेरी मास्तर वगैरे वगैरे पोटभेद असतात . हे शिपाई बऱ्याचदा एकमेकांना ' मेजर ' म्हणून हाक मारत असतात . क्लार्क एकमेकांना ' दादा ' म्हणून हाक मारतात . जसे सोनार दादा, जोशी दादा आणि असे बरेच दादा! जेलचा मुख्य कलाकार म्हणजे कैदी . त्यातही आठ दहा कैद्यांवर असणारा ' वार्डर ' . कैद्यांमधलाच थोडा प्रामाणिक , काही वर्ष जेलमध्ये काढलेला आणि मोठी शिक्षा असलेला हा वार्डर त्यांचा बॉस असतो . मला लहानपणी वार्डर व्हायची ईच्छा होती . पण काही जमलं नाही अजून! बघूयात !

माझ्या आठवणींची सुरवात होते ती धुळे जेलपासून . खरं तर तिथल्या जुन्या आठवणी मला फारश्या आठवतच नाहीत . पण माझ्या जीवनाची की काय म्हणतात ती पहिली दोन अडीच वर्ष तिथे गेली आहेत . पुढे बऱ्याच वर्षांनी आमची बदली पुन्हा धुळयालाच झाली आणि आम्ही यावेळेस चांगला आठ नऊ वर्षांचा काळ तिथेच काढला . त्यामुळे मला हे जेल खूपच आवडतं . **1979** सालापासून **1989**

पर्यंत या जेलच्या एकूण परीसरात फारसा फरक पडलाच नव्हता . नाही म्हणायला जेलच्या आजुबाजूला भरपूर अतिक्रमण झालेलं . धुळयाचं जेल बस स्टँडच्या पाचच मिनिट अंतरावर आहे . खरं तर पेठेतल्या चौदा गल्ल्या, गावातल्या चौदा गल्ल्या आणि देवपुरातल्या चौदा गल्ल्यांच्या धुळयात हे जेल तसं बाहेरच्याच बाजूला होतं पण आता ते शहराच्या अगदी मध्यावर येऊन पोचलंय . जेलच्या प्रथेप्रमाणे जेलच्या आसपासच कर्मचारी निवासस्थाने आहेत . पण जेलच्या भाषेत त्याला ' जेल लाईन ' म्हणतात . जेलच्या उजव्या हाताला असणाऱ्या लाईनीत पाच सहा बैठया चाळी आहेत . त्यातली सर्वात आतली दहा घरांची लाईन ही त्यावेळी दादा लोकांसाठी होती . यातल्याच एका घरात आम्ही रहायचो, म्हणजे आजी, आत्या, आई, वडील आणि नंतर मी .

जेलच्या वातावरणात राहिल्याने कैदी हा प्रकार किंवा शिपाई हाही प्रकार भीतीदायक कधीच वाटला नाही . या कैद्यांना विविध कामं करावी लागतात . एखाद्याच्या कुवतीप्रमाणे आणि कौशल्य बघून स्वयंपाक, शेती, झाडलोट, बागकाम, विणकाम, भंगीकाम अशी कामं वाटली जातात . झाडलोट आणि शेती करणारे कैदी जेलच्या बाहेर येऊन कामं करतात . आठ दहा कैद्यांबरोबर एक वार्डर आणि एक शिपाई असतात . या कैद्यांबरोबर खेळणे किंवा ते कसे काम करतात हे बघत बसणे हाही एक बालपणीचा खेळ मी खेळायचो . त्यातही आमच्याच नात्यातले एक शिपाई होते त्यांची टोपी घालून दंडा हातात घेऊन मी शिपाई होत असे . झाडलोट करणाऱ्या कैद्यांना जेलमधील आणि बाहेरचा तसेच निवासी परिसर स्वच्छ करण्याचं काम असतं . त्यामुळे जेलचं विश्व नेहेमीच चकचकीत दिसतं .

आता जरा जेलच्या या विश्वात खोलात जाऊन पाहू . खोलात म्हटल्यावर इतकंही घाबरायची गरज नाही ! जेल हे गुन्हेगारांना शिक्षा भोगायला ठेवायची जागा नसावी तर या चुकल्या जीवांना सुधारण्याची एक शाळाच असावी हा विचार स्वातंत्र्योत्तर काळात पुढे आला आणि त्या प्रकारे जेलचे जीवन आकाराला आले . दिवसाची सुरवात होते जेल उघडण्याने . ऋतुमानाप्रमाणे साडेपाच ते सहा दरम्यान जेल उघडण्याची वेळ असते . त्या वेळेला घंटा होऊन कैद्यांना उठण्याची सूचना दिली जाते आणि रात्रभर कोठडीत असलेल्या कैद्यांना मोकळे केले जाते . असेही दर तासाला टोल वाजवले जातात . जितके वाजले असतील तितकेच वेळा घंटा वाजवून हे टोल दिले जातात . आसपासच्या परिसरातही अर्थातच त्यामुळे वेळ कळते आणि जेल लाईनीतल्या गप्पा मारणाऱ्या बायका " चला बाई पाण्याची वेळ झाली, चला बाई स्वयंपाकाची वेळ झाली " म्हणत गप्पांचा फड सोडू लागतात . हे टोल झाले नाहीत तर त्यांची पंचाईतच होईल हे नक्की ! तर या सकाळच्या टोल वाजण्याने जेलचा दिवस उजाडतो . पण त्याआधीच तीन वाजल्यापासून
आचारी कैदी उठून कामाला लागतात . धुळयासारख्या जेलमध्ये एका वेळी तीनेकशे तर नाशिकसारख्या मोठया जेलमध्ये एकाच वेळी दीड दोन हजार कैदी असतात . कैद्यांना सकाळी दहालाच जेवण दिलं जातं त्यामुळे या आचाऱ्यांना इतक्या सगळया लोकांचा स्वयंपाक वेळेत तयार करण्यासाठी पहाटे उठावंच लागतं . जेलच्या स्वयंपाकघराला " भटारखाना " म्हंटलं जातं . त्यात राक्षसी आकाराच्या भट्टीवर तितक्याच राक्षसी कढया आणि पातेले ठेवून काय काय शिजवलं जातं . तवा म्हणून मोठ्ठा पत्रा असतो . त्यावर एकाच वेळी बारा पंधरा तरी भाकरी किंवा पोळया भाजल्या जातात . त्या उलथण्यासाठी राक्षसी आकाराच्या उलथण्या वपरल्या जातात . हे सर्व मी लहान असतांना पाहिलं असल्याने ते जास्तच मोठ्ठं वाटायचं . पण एकूणच तिथला सगळा कारभार असा महानच असतो . जेलच्या शेतीत घेतलेल्या वेगवेगळया भाज्या किंवा त्या काळात मिळणाऱ्या स्वस्त भाज्या वापरल्या जातात . ज्वारीच्या भाकरी किंवा गव्हाच्या पोळया हे ही शेतातूनच मिळवलेले असतात . ज्या जेलला जी धान्ये मुबलक होतात तिथून ती दुसऱ्या जेललाही पोचवली जातात . जेलची शेती हा एक अवाढव्य प्रकार असतो . जेलच्या बाजुच्याच परीसरात ही शेती असते . नाशिकच्या Central Jail च्या चहूबाजूंनी अफाट पसरलेली शेती आहे . तशीच पुण्यातील येरवडा जेलचीही बरीच शेती आहे . आम्ही नाशिक जेलला असतांना तिथे द्राक्षाचंही उत्पादन घेतलं जायचं . या जेलची आणि पुण्याच्या जेलची बेकरीही आहे . त्याचे उत्पादन कर्मचाऱ्यांमध्ये विकण्यासाठी जाळी असलेली एक लोटगाडी नाशिकला होती . त्यात ही द्राक्षं आणि नानकटाई, टोस्ट, पाव असं काय काय विकायला यायचं . विक्रीला अर्थातच शिपाई आणि कैदीच यायचे . या जाळीच्या गाडीभोवती कोंडाळं करून आम्ही पोरं पूर्ण लाईनीत फिरायचो . सकाळच्या वेळी त्यातून पाव आणि ब्रेड विकायला यायचे त्याचा खरपूस आंबूस वास आजही तसाच आठवतो . द्राक्षं तर किती स्वस्त मिळायची . पण ही seedless
नसायची त्यामुळे ही द्राक्षं खातांना छानच टाईमपास व्हायचा . त्यातून कुणी त्या बिया चुकीने गिळल्या तर त्याला डोक्यातून झाड उगवणार म्हणून चिडवून वेगळाच टाईमपास व्हायचा . तर अश्या या आडव्यातिडव्या पसरलेल्या नाशिकच्या शेतीपलीकडून रेल्वे जायची . इथली गंमत अशी की जमिनीच्या लेव्हलला डब्यांचं छत यायचं . त्यावेळी ही रेल्वे कोळश्यावर चालणारी होती . त्यामुळे काही कैदी या सगळया प्रकाराचा फायदा घेऊन अलगद गाडीच्या टपावर उडी मारून निघून गेले आहेत . या मोठया शेतांमध्ये विहीरीही अवाढव्य असतात . प्रत्येक शेतात एक विहीर असतेच असते . त्यामुळे जेल एका अर्थाने बागायतदारच असतं . नाशिकच्या जेलची शेती गोरेवाडी नावाच्या आसपासच्या भागातही आहे . तिथेही अश्याच मोठया विहिरी आहेत . गणेशोत्सवाच्या माझ्या काही आठवणी या विहीरींशी निगडीत आहेत . लाईन म्हटले की सगळे उत्सव अगदी थाटामाटात केले जातात . गणपतीचा उत्साह तर काय वर्णावा ! नाशिकरोडच्या जेलच्या उजव्या बाजूला मोठी लाईन आहे तर डाव्या बाजूला रिझर्व गार्ड लाईन आहे .
सुरवातीला आम्ही या रिझर्व गार्डात रहायचो . नंतर मोठया लाईनीत गेलो . सुरवातीलाच तिथे मारुतीचे देऊळ आहे . त्यामुळे याला मंदिराची लाईन म्हटलं जातं . या प्रशस्त मंदिरातच सगळे धार्मिक उत्सव व्हायचे . गणपतीचे दहा दिवस अगदी धामधूम असायची . या मंदिरापासून आतपर्यंत जवळपास एकाध किलोमीटर आत लाईन पसरलेली आहे . समोरासमोर तोंड केलेल्या या दोन लाईनी म्हणजे अगदी समांतर चालणाऱ्या रेल्वेगाडया आहेत असंच वाटतं . एकीच्या मागे जेलची भिंत म्हणजे ' तट ' आहे तर दुसरीच्या मागच्या बाजूला

पाण्याचा पाट . तो खूप लांबून एकलहरा औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातून येतो . पण हे एकलहरा कुठे आहे तर डोंगरात; एवढंच आम्हाला माहीत होतं . त्याच्या काठाने जाऊन उगम शोधण्याची जबरदस्त इच्छा आईच्या धाकाने दडपावी लागायची . पाटामध्येच काही ठिकाणी डोह होते . त्यात बुडून एक दोन मुलं मेलेली . त्यामुळे पाण्याशी आमचा संबंध आंघोळीपुरताच असायचा . अजूनही काही असायचा पण न सांगितलेला बरा . या पाटातल्या पाण्यासारखाच मी वहात जातो आणि जे सांगायचं ते बाजूलाच राहतं . तर गोष्ट सांगत होतो ती मंदिरातल्या उत्सवांची! या सगळया उत्सवांत कैदीही उत्साहाने भाग घेतात . गणपती विसर्जनाची तर धमालच यायची . जेलच्या ट्रॅक्टरमध्ये ही सगळी मिरवणूक निघायची . जेलचा स्वत:चा ढोल ताशा होता . आम्ही पोरं गणपतीबरोबर बसायला मिळण्यासाठी भरपूर ओढाताणी करत जागा पटकवायचो . वाजत गाजत आणि गुलाल उधळत मिरवणूक गोरेवाडीच्या शेतात पोहोचायची . तिथे पट्टीचे पोहणारे गडी एकेक गणपती घेऊन धपाधप उडया मारायचे . एखादा खूप वेळ वर यायचाच नाही . त्यावेळी अगदी धस्स व्हायचं . मग थोडया वेळाने हळूच वर आला की जबरदस्त आरडाओरडी आणि टाळयांच्या स्वरात त्याचा गजर केला जायचा . आपल्यालाही असं पोहता आलं पाहिजे असं कायम वाटयचं . पण अजूनही मी कोरडाच आहे .

आपल्याला वाटतं की कैद्यांना अगदी वाईट अन्न दिलं जात असेल पण तसं काही नाही . सकाळी साडेसहापर्यंत चहा दिला जातो . पूर्वी तांदळाची कांजी म्हणजेच पेज दिली जात असे . पण आता नाश्ताही दिला जातो . किती माणसांचा स्वयंपाक करायचा आहे त्यानुसार आणि एका माणसाला किती अन्न लागते या (जेलच्या) नियमाप्रमाणे सामान सुमान मोजून दिले जाते . त्याला ' भत्ता ' असं म्हटलं जातं . एकूणच जेलची भाषाच विचित्र! कुणाच्या आडनावाने तो आहे का म्हणून विचारलं तर कोण हा म्हणून तुमच्याकडे पाहतील . कारण नाव आणि वडिलांचं नाव ,(जसे वसुदेव बळवंत) अश्या प्रकारे लिहायची आणि बोलायची प्रथा आहे . सकाळी दहाला जेवण दिलं जात असलं तरी ते तेव्हाच खायची काही जोर जबरदस्ती नाही . तुम्ही तुमच्या सोयीप्रमाणे केव्हाही जेऊ शकतात . सणावारानुसार गोडधोड केलं जातं . रविवारी सहसा शिरा दिला जातो . हा गुळाचा शिरा मला फार आवडतो . मी साधारणपणे तीन चार वर्षांचा असतांना आम्ही नाशिक येथील सध्या ' किशोर सुधारालय ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि तेव्हा ' सबजेल " असं म्हटल्या जाणाऱ्या जेलला राहत होतो . जेल आणि मी दोन्हीही लहानच असल्याने मला आत जाऊन खेळता येत असे . आतल्या कैद्यांबरोबर मी बराच वेळ आत खेळत बसायचो . तेव्हा मला ते जाडसर रव्याचा गुळाचा शिरा करून द्यायचे . तेव्हा डालडाचं अगदी रवेदार तूप येत असे . तो शिरा अजूनही माझ्या जीभेवर गोडवा देऊन आहे असं वाटत राहतं . तो अनुभव घेण्यासाठी तुम्हाला माझाच जन्म घ्यावा लागेल . पण ते शक्य नाही कारण मी तसं काही होऊ देणार नाही .
अशीच एक आठवण ज्वारीच्या गरम गरम भाकरींची! त्यावर येणारा पोपडा असाच खायला मस्त लागतो . आणि पोट फोडलेल्या त्या भाकरीवर डालडयाचं रवाळ तूप खात मी आतमध्ये भटकत रहायचो . आतमध्ये विरंगुळा म्हणून कैद्यांनी कितीतरी फुलझाडं लावलेली असतात . सगळया पायवाटेच्या कडेने मोगऱ्याची झुडपं असतात . कुठे कुठे गुलाब तर कुठे रातराणी, जास्वंद, झेंडू अशी मिळतील ती फुलझाडं अगदी बहरून आलेली असतात . ओंजळभर मोगरीच्या कळया घेऊन पळापळ करण्यात काय आनंद असतो हे तसं केल्यावरच कळेल .

लहान जेल असल्याने तिथे कर्मचारी वर्ग कमीच होता . त्यामुळे वडील रात्रीही जाऊन काम करायचे . घर आणि जेल यात फारतर साडेपंचवीस पावलांचं अंतर! त्यामुळे रात्री जाग आली आणि अण्णा बाजूला दिसले नाहीत की मी सरळ आतच पळायचो . जर शिपायांनी आत घेतलं नाही तर असा काही आरडाओरडा करायचो की ते कान बंद करून गेट उघडायचे . असाच एकदा दहा वाजायच्या सुमारास मी जाऊन वडिलांच्या ऑफ़िसात बसलो . ही फ़ाईल उचक, टाचण्या फ़ेक असले उद्योग चालू होते . पूर्वी टाचण्या ठेवणासाठी आताप्रमाणे मग्नेतिच होल्देर नव्हती तर एका कापसाच्या गुंडयाला छानसं खाकी आणि काळं कापड लाऊन डिझाईनचा एक बॉल असायचा आणि त्याला टाचण्या टोचून ठेवायचे . हा बॉल माझं अजून एक टारगेट !
असाच उद्योग चालू असतांना एका कपाटामागून एक मोठ्ठी घूस बाहेर आली . मी तिच्याकडे पाहिले आणि त्याचवेळी तिनेही पाहिले . झालं! मी जोरात आरडाओरडी सुरू केली . त्यामुळे घूसही गडबडीने पळून गेली . मी मात्र रडारडी सुरू केली ती काही बंदच होईना . मग घरी आणून वडिलांनी झोपवलं आणि त्यानंतर रात्रीच्या वेळी ऑफ़िसात जाणं मी बंदच केलं .

नाशिक रोडला असलेलं जेल हे सेन्ट्रल जेल म्हणून ओळखलं जातं . तसंच येरवडयाचं जेलही सेन्ट्रल जेल आहे . नाशिकचं जेल हे त्यामानाने अगदीच नवीन आहे . ठाण्याला असलेलं जेल खरं तर एक भुईकोट किल्ला आहे पण पुढे त्याचं रुपांतर जेलमध्ये केलं गेलं . त्यामुळे या जेलभोवती वीसेक फ़ूट रुंदीचा आणि दहा फ़ूट खोलीचा खंदक आहे . जेलच्या मुख्य गेटच्या उजव्या बाजूला थोडयाच अंतरावर जेलच्या मालकीचा एक छानसा तलावही आहे . या तलावाकाठी मस्तपैकी नारळांची रांग आहे आणि तिथेच बाकं ठेवलेली आहेत . तिथे असंच बसून राहणं आणि तलावातले साप बघणं हा माझा आवडता उद्योग होता . तर तलावातले रंगीबेरंगी छोटे मासे पकडून बाटलीत भरून ठेवणं हा भावाचा उद्योग! या आधी कधी इतक्या जवळून तळं बघायला मिळालं नव्हतं . ठाण्याची प्रसिद्ध तलावपाळीही तशीच आठवणीत आहे . याच जेलला आम्हाला थरारक अनुभव आले . इथे मुंबई टोळीयुद्धातले बरेचसे ' भाई ' ठेवले जातात . त्यामुळे कायम तंग वातावरण असते . (संजय दत्तलाही याच जेलमध्ये ठेवलं होतं . ) त्यामुळे नेहेमी काही ना काही भयानक प्रकार जेलच्या आसपास होतच राहतात . आमच्या ओळखीच्या एका जेलरवर झालेला चाकूहल्ला आमच्या घराच्या जवळच झाला होता .

पूर्वी जेलच्या समोरच R.T.O ऑफ़िस होतं. एव्हढया गजबजलेल्या परीसरात एका जेलरच्या घरात घुसून त्यांच्यावर बंदुकीने हल्ला केला गेला होता. त्यांच्या प्रसंगावधानामुळे ते बचावले. पुढे त्यांच्या घराच्या बाजूला महिनाभर तरी पोलिस पहारा होता. असे कितीतरी प्रसंग तिथे घडलेले आहेत. पण एक कायम लक्षात राहण्यासारखा एक प्रसंग म्हणजे आम्ही खेळायचो त्याच ठिकाणी आम्ही एकच मिनिटांपूर्वी निघून गेल्यावर झालेला गोळीबार! त्याचं असं झालं की एका टोळीचा एक गुंड त्या दिवशी सुटणार होता. हे आधीच दुसऱ्या पार्टीला माहीत होतं. त्यामुळे त्याचा गेम करण्याच्या उद्देश्याने हे तयारच होते. जेलच्या समोरच पुढे असलेल्या जागेत आम्ही खेळायचो. तेव्हढयात आईने बोलावले म्हणून आम्ही शाळेच्या तयारीसाठी निघून गेलो आणि इकडे
तो कैदी बाहेर पडला. त्याला थोडं पुढे येऊ देताच विरुद्ध टोळीच्या त्याच्या भाईबंदाने त्याच्यावर गोळया झाडल्या. तोही सावध असल्याने झटकन पळत जाऊन त्याने तळयात उडी घेतली आणि बाजूच्याच काठावर असलेले त्याचे साथीदार आल्याने पुढे काही जास्त प्रकार झाला नाही. पुढे काही दिवसांनी मग आम्हाला कळवा रस्त्याला लागून असलेल्या क्वार्टर मिळाल्या. या घराच्या समोरच केळी लावलेली होती. त्या गार गार बागेत बसून पुस्तक वाचायला आणि अभ्यास करायला फ़ार मजा वाटायची. आम्ही रहायचो ती लाईन संपल्यावर डाव्या बाजूला पुढे झाडीच झाडी होती. त्याच्याही पुढे पूर्वी फ़ाशी दिलेल्या कैद्यांना जाळायची जागा 'सात नळया' म्हणून होती. तिकडे आम्ही जायला घाबरायचो . पण मनात एक उत्सुकता असायची. आज फ़ाशीची शिक्षा सहसा दिली जात नाही. पण स्वातंत्र्यपूर्व काळात कित्येक क्रांतिकारकांना फ़ाशी दिले जात असे. त्या प्रसंगांचे साक्षीदार हे जेल आहेत. जवळजवळ प्रत्येक जेलला एक ' फ़ाशीगेट ' असते. तिथे फ़ाशी दिली जात असे. आम्ही नाशिकच्या सबजेलला असतांना आमच्या दोन घरं बाजूला एक शिपाई रहायचे. त्यांना सगळेजण 'शेलारबाप्पा ' म्हणूनच ओळखायचे. ते पूर्वी फ़ाशी देण्याचं काम करत असत. त्यामुळे त्यांच्या डोक्यावर थोडा परीणाम झालेला होता. अजूनही प्रत्येक जेलला शंभरेक किलो वजनाचे गोल गरगरीत दगड दिसतात. या गोल गोळयाला एक भोक असते. या भोकातून फ़ाशीचा दोर ओवून एखाद्या माणसाला फ़ाशी दिल्याप्रमाणे दगडाला फ़ाशी दिले जात असे. असे करून फ़ाशीच्या दोराची परीक्षा घेतली जात असे. सध्या अश्या दगडाच्या छिद्रात बांबू लावून असे दोन दगड काही अंतरावर ठेवून त्याला दोरी बांधून कपडे वाळवले जातात.

ठाण्याच्या जेलच्या बरोबर मागच्या बाजूला खाडी आहे. आता खाडी आणि जेलचा तट यात बरंच अंतर आहे. पण पूर्वी ते तसं नव्हतं. याच तटाला आता बंद केलेलं एक छोटसं गेट दिसतं. इथूनच सावरकरांना रात्रीच्या अंधारात बाहेर काढून खाडीतून पुढे अंदमानला पाठवलं गेलं होतं. धुळयाच्या जेलमध्येच विनोबा भाव्यांना ठेवलं होतं. त्या काळात त्यांनी ' गीताई ' ची रचना केली. साने गुरुजींनाही इथे ठेवलं होतं. तसेच जमनालाल बजाज हेसुद्धा या तुरुंगात होते. राष्ट्रीय सणांच्या दिवशी या महान नेत्यांना जिथे ठेवलं होतं त्या कोठडया बघण्यासाठी सामान्य नागरीकांना जाता येतं. मी जेव्हा या बराकी किंवा कोठडया पाहिल्या तेव्हा हे नेते थोर आहेत एव्हढंच मला कळायचं. ' श्यामची आई ' मुळे साने गुरुजी आपलेसे वाटायचे तरी या सगळयांचं कार्य किंवा त्यांची साधना पुरेशी कळायचं वय नव्हतं. मात्र या कोठडया पाहिल्यावर आपोआप भारावल्यागत झाल्याचं मला निश्चितच आठवतं. जेलच्या जुन्या रजिस्टरमध्ये अजूनही या नेत्यांची नावं आहेत. या गोष्टीचा जेललाही अभिमान वाटत असला पाहिजे.

जेलमध्ये कैद्यांना विविध कामं करावी लागतात हे आधी संगितलं आहेच. या कामाच्या मोबदल्यात त्यांना कामाच्या दर्जानुसार जेलच्या चलनामध्ये पैसे मिळतात. हे पैसे फ़क्त जेलमध्येच चालू शकतात. त्यातून कैदी साबण तेल वगैरे विकत घेऊ शकतात. कधी जेवणात मटण केलेलं असेल तर ते चलन देऊन विकत घ्यावं लागतं. सुटका झाल्यावर या चलनाप्रमाणे जमा झालेले पैसे त्यांना रुपयांत मिळतात जेणेकरून त्याचा उपयोग करून ते छोटासा उद्योग सुरू करू शकतील. त्याच दृष्टीने त्यांना सुतारकाम, यंत्रमाग किंवा हातमाग यांवर विणकाम, बेकरी उत्पादनांचं प्रशिक्षण आणि इतरही काही कौशल्ये शिकवली जातात. नाशिकच्या जेलमध्ये साबण आणि डिटर्जंट तयार करण्याचा कारखानाही आहे. प्रगती नावाचा साबण तिथे बनवला जातो. हे व्यावसायिक प्रशिक्षण देणारे शिक्षकही जेलमध्ये नोकरीला असतात. विसापूर, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, पैठण या जेलमध्ये तयार केल्या जाणाऱ्या चादरी, सतरंज्या उत्कृष्ट दर्जाच्या असतात. येरवडा कारागृहात तयार केल्या जाणाऱ्या वस्तू विकण्यासाठी एक दुकान आहे. पैठण येथील जेलच्या कैद्यांनी जायकवाडी प्रकल्पात सिंहाचा वाटा उचलला होता. तिथली बाग त्यांच्याच श्रमाने फुललेली आहे. प्रत्येक जिल्ह्यात जेल असल्याने तिथल्या जिल्हाधिकाऱ्याच्या नावाने जी शेती असते तीही हे कैदीच करत असतात. काही मोठया जेलची गोसंपत्तीही आहे. नाशिकला एका वेळी सत्तर ऐंशी तरी गुरं होती. त्यामुळे नाशिकच्या जेलचा बैलपोळा अगदी धामधुमीत व्हायचा. बैलांना नाना तऱ्हेने सजवून मग जोडया जोडयांनी त्यांची स्वारी निघत असे. जेल लाईनी बऱ्याच असल्याने दोन कैदी आणि एक शिपाई असं त्रिकूट एका जोडीला सांभाळत असे. दिवसभर घरोघर जाऊन नैवेद्य घ्यायचा आणि शिपायांनी वर्गणी घ्यायची असा प्रकार चालायचा. संध्याकाळी कोणत्या टीमने सगळयांत जास्त वर्गणी गोळा केली त्यावर त्या टीमचं कर्तृत्व ठरायचं. बैलांबरोबर आम्हीही उधळत फिरायचो. सगळीच मज्जा!

जेलमध्ये कैद्यांना शिक्षणाचीही सोय आहे. अगदीच निरक्षर कैदी असेल तर तो साक्षर होऊन दहावीपर्यंत शिकू शकतो. दहावीच्या परीक्षेसाठी त्याला शिपायाबरोबर बाहेरही जाता येऊ शकतं. काहींनी दहावीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचे पराक्रमही केले आहेत. आज जेल हे केवळ कैदखाने राहिले नाहीत. दिवसभर कैदी भिंतींच्या आत मोकळेच असतात. संध्याकाळी सहाच्या सुमारास जेव्हा जेलबंदी होते तेव्हाच त्यांना कोठडीत एकत्र ठेवण्यात येतं. या कोठडयांना बरॅक म्हंटलं जातं. एका खोलीला समोर लोखंडी गजांचा

दरवाजा असतो . आत आठ दहा कैदी एकत्र असतात . हिवाळयात त्यांना जाडसर कांबळ दिलं जातं . प्रत्येक बराकीत पंखे आहेत . तसंच त्यांच्या कॉमन रूममध्ये रंगीत
TV असतात आणि अर्थातच ' दूरदर्शन ' पहावे लागते . मुख्य दैनिक वर्तमानपत्रेही मिळतात पण ती एक दिवस उशीरा आणि संपादन करूनच! नकारात्मक बातम्या कापून घेतल्या जातात . काही प्रबोधनपर चित्रपटही दाखवले जातात . तिहार तुरुंगात राबवला गेलेला विपश्यनेचा प्रयोग आज महाराष्ट्रातील सर्वच तुरुंगात राबवला जातो . कर्मचाऱ्यांनाही विपश्यना शिबिराला पाठवले जाते . या उपक्रमाचे खूपच सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत . महान चित्रकर्मी श्री . व्ही . शांताराम यांच्या ' दो आँखे बारह हाथ ' या चित्रपटात असलेली संकल्पना महाराष्ट्र कारागृह विभागाने साठच्या दशकात प्रत्यक्षात अंमलात आणली आणि पैठण येथे ' खुले कारागृह ' किंवा Open Jail चा प्रयोग सुरू झाला . यात काही निवडक कैद्यांना शेतातच घर दिले जाते . तेथे ते आपल्या कुटुंबासह राहू शकतात . बाजारात जाऊन भाजी विकणे वगैरेही करू शकतात . मात्र या सगळयांवर जेलच्या काही नियमांचं बंधन असतं ते पाळवंच लागतं . पैठणचा हा प्रयोग इतका यश्स्वी झाला की पुण्यात येरवडा येथेही हा प्रयोग करण्यात आला . आज येथे खुल्या कारागृहातील कैदी शेतीबरोबरच मोटार सर्व्हिस स्टेशनही चालवतात . हा प्रयोगही यशस्वी झाला आहे . शेतीक्षेत्रातही विक्रमी उत्पादन घेण्याचे प्रयोग करण्यात आले आहेत . बावीस किलो वजनाचा मुळा घेण्यातही यश मिळवले आहे .

चित्रपटांत किंवा प्रत्यक्षातही जेलची हवा वाईट मानली गेली असेल पण मला ही हवा नेहेमीच ओळखू येते . याचा अनुभव मी नागपूरला घेतला . कोणत्याही जिल्ह्याच्या ठिकाणी गेले की प्रथम जेल कुठे आहे म्हणून विचारायची माझी सवय होती . (आज मी टेलिफोन एक्स्चेंज शोधतो . ) त्याप्रमाणे नागपूरलाही विचारले तर वर्धा रोडला आहे असं उत्तर मिळालं . सायकलवर भटकत त्या रस्त्याने निघालो आणि अचानक रस्त्याच्या परीसरात घडलेला बदल जाणवला . हवा थोडी थंड आणि शांत वाहू लागली तसा मी समजलो की हाच तो जेलचा परीसर . शेताला मातीत बांधलेल्या दगडी भींतीचे कुंपण, कडेला सुबाभूळ निंब, चिंच, पिपळ, वड अशी झाडं, मध्येच छोटासा पाण्याचा झुळझुळणारा पाट, शेतात डोलणारी पिकं आणि पांढऱ्या रंगाच्या कपडयांत डोईवर त्याच कापडाची टोपी अश्या अवतारातले कैदी दिसले आणि लगेच ओळख पटली जेलच्या हवेची . जन्मापासून वयाच्या पंचविशीपर्यंत छातीत भरून घेतलेल्या जेलच्या हवेची! वडील सेवानिवृत्त झाले आणि हा संबंध संपला . आता मी पूर्वीसारखा मोकळेपणाने जेलमध्ये जाऊ शकणार नाही . बंदिस्त फ़्लॅटमध्ये राहतांना तिथल्या प्रशस्त आणि मोकळया परीसराची अधिकच आठवण येते . शहरात असूनही शेती आणि निसर्गाशी माझी कायमच सोबत राहिली ती या जेलमुळेच . जेलच्या परीसरात राहतांना आमचे शेजारी असणाऱ्या सगळयांच्या घरी मी तिकडे गेलो की चक्कर मारतोच . प्रत्येकवेळी लहानसहान बदल सोडता तो ओळखीचा परिसर तसाच दिसतो . जेलची हवाही तशीच वाहत असते, बाहेरच्या हवेपेक्षा शांत आणि संथ! कुणी जेलच्या हवेत शिक्षा भोगत असतील पण मी मात्र या हवेत माझं बालपण भोगून येतो .

**- गिरीश सोनार**

## तीर्थरूप बाबा

. . . त्यांचे पाय चेपताना ते नेहमी एकच एक कोडे सांगायचे . " एकदा एका शेतकऱ्यानी लेकाला दिला बंदी रुपया, म्हणाला पोटासाठी अन्न आण, पिण्यासाठी पाणी आण, ढोरांसाठी चारा आणि भुईसाठी बीज आण " . पहिल्यांदा हे कोडे ऐकले तेव्हा अनेक महागडी उत्तरे आम्ही भावंडांनी मिळून दिलीत . व्यवहारानी बाबा 'किफ़ायती' होते, त्यांचे उत्तर असायचे 'कलिंगड' . कलिंगड हे बाबांचे आवडते फाळ . रणरणत्या उन्हात ते धापा टाकत यायचे आणि पाण्यानी भरलेल्या नितळ रांजणात कलिंगड सोडायचे की घरभर कुणीतरी बुडाल्याचा आवाज व्हायचा . मग बाबा आले हे कळायचे आणि रेफ़्रिजरेटर झालेल्या रांजणाभोवती आम्ही सगळे बहीण भाऊ गोलाकार जमायचो . सांजेला गार झालेला कलिंगड कापताना पुन्हा बाबांचे तेच कोडे . आपली सात अपत्यं असलेला परिवार ऐपतीप्रमाणे कसा सुखी नि नांदता ठेवायचा ह्याचे कसब बाबांना परिपूर्ण ठाऊक होते . त्यामुळे कधी अमुक मिळाले नाही अशी त्यांच्याविषयी घरात तक्रार नसे . शहरात शासनानी राबवलेली स्वस्त आणि उत्तम दर्जाची दुकाने आणि तिथे काम करणारी नोकरमाणसे बाबांचे सच्चे दोस्त झाले होते . त्यामुळे नवीन माल येताच बाबांना त्वरित खबर मिळे आणि मग त्यांची फालटन दुकानाकडे वळे . कधी बहिणींसाठी नागपूरच्या हातमागाचा प्रिन्टेड कापड, कधी गावरान धान्य, कधी फ़ळांच्या टोपल्या, कधी ताजा स्वच्छ भाजीपाला आणि अनेक चिल्लर वस्तूंचा संच असलेले हे एक भले मोठे गोदाम आमचे डिपार्टमेंटल स्टोअर झाले होते . आईपेक्षा बाबा अधिक संमजस आणि संसारिक होते . बाबांनी आईला घरकामात कधी मदत केली नसेल पण घरात आईने सांगण्यापूर्वीच लागणाऱ्या वस्तू येत . अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीन गोष्टींना त्यांच्या ठायी सर्वाधिक महत्त्व होते . पोलिस हा बाबांचा पेशा होता . त्यांचे भाऊ, अर्थात माझे तीन काका, हेही पोलिसच आणि पुढे त्यांचे मुलगेही पोलिसच . त्यामुळे राशनासाठी लागणारी प्रत्येक पिशवी ही खाकी रंगाची असे, उशांच्या खोळी खाकी रंगाच्या असत, आमची शाळेतली दप्तरे तीही

खाकी रंगाचीच असतं, त्यांच्या सुदैवाने शाळेच्या गणवेषातही खाकी रंग होताच. बाबांची ही खाकीशाही कित्येक वर्षे मी अनुभवली आहे. मन विटले पण खाकी रंग हटला नाही. अजूनही खाकी रंगाची जुनी पिशवी पाहिली की बाबांच्या आठवणी जाग्या होतात आणि गरीबीपुढे कधीही न वाकलेल्या माझ्या पित्यासाठी हृदय भरून येते. शाळेच्या तावडीतून सुटका झाल्यानंतर प्रथमच हौसेनी मला त्यांच्याकडून फुलपॅन्ट मिळाली तीही खाकी रंगाचीच निघाली. त्यावेळी लहानाचा मोठा झालेला मी आपला बाप सात अपत्यं आणि त्यांच्या अनेक गरजांना कसे तोंड देतो हे प्रथमच जाणले.

त्यावेळेसच्या त्यांच्या चार मित्रांप्रमाणे बाबांनाही एखादवेळी कंट्री वाईन चाखण्याची लहर येत असे आणि कुणालाही न जुमानता ते पिऊन येतं. घरी झोकंड्या खात येत तेंव्हा आईचा चेहरा पार उतरून जात असे. सुरवातीला तिने बरेच कांगावे केलेत पण आपला नवरा पिऊन गप्प पडतो एवढ्यावर समाधान मानून परत फारसा कधी विरोध केला नाही. नशेत त्यांनी कधी रानटीपणा केला नाही, धिंगाणे घातले नाहीत. त्यांच्या पिण्याचा घरात कधी उपद्रव निर्माण झाला नाही. आयुष्याच्या कुठल्यातरी वळणावर बाबांनी वारुणीशी मैत्री केली आणि कालांतराने आपणहूनच तिला सोडून दिले.

गणराज्य आणि प्रजासत्ताक दिनाच्या बाबांच्या काही खास आठवणी मनात रेंगाळतात. आठवडाभरापूर्वीच त्यांच्या खाकी कपड्यांना कलप लावण्याचे, पितळेच्या गुंड्या, खांद्यावरील म. पो. ( महाराष्ट्र पोलिस ) ची बटने, बक्कल क्रमांक **612** असलेला पट्टा, पोटरीपर्यंत उंच असलेला त्यांचा बुट ह्यांना घासून घासून चकचकीत करण्याचे काम आमच्याकडे येत असे. भाटे ग्राउंडवर पोलिसांची खास परेड निघे त्यात सामील झालेले बाबा पाहून हृदय अभिमानाने फुलून येत असे. त्यांची मुले शोभावीत म्हणून आम्हीही कडक गणवेषाचे चाहते झालो. त्यावेळेसची ती देवापुढल्या कळसाच्या तांब्यात निखारे घालून केलेली कपड्यांची इस्त्री आठवून जीवनातील निर्व्याज आणि निर्भेळ आनंद देणारे असे क्षण आज आयुष्यातून लुप्त झाल्यासारखे वाटतात.

कुठल्याच अक्षर शाळेत बाबा आणि आईही गेले नाहीत. शाळेतली मौजमस्ती त्यांच्या नशिबाला आली नाही. बाबांना वाचता येईल इतकी अक्षरओळख नंतर झाली, पण आईसाठी संसार हीच शाळा राहिली. पिठावरील रेघोट्या म्हणजे लिपी आणि कुंकवाचा पिंजर म्हणजे शून्याशी ओळख. अरे संसार संसार करत दोघेही ह्या जीवनाच्या शाळेत जगले. जगाच्या विद्यापीठात अनुभवाचे दालन प्रत्येकासाठी उघडे असते. माझ्या आईवडीलांना अज्ञात, अडाणी, निरक्षर असे कुठलेही संबोधन लावणे माझ्यासाठी अशिक्षितपणाचे लक्षण ठरेल. शहरात वाटचाल करून त्यांनी आम्हाला योग्य वेळी शाळेत दाखल केले, आमची विद्या केली, आमच्या शिक्षणावर दोन पैसे खर्च करण्याची त्यांना गरज वाटली ह्यातच त्यांची साक्षरता दिसून येते.

आपल्या पोलिसकीच्या नोकरीवर प्रेम करणारे बाबा अखेर निवृत्त झाले. येथून पुढे त्यांच्या आयुष्याचे अखेरचे दशक होते. त्यांच्या लाडक्या पंचकन्यांपैकी चौघी सासरी गेल्या होत्या. त्यांचा सहाफ़ुटी राकट देह वार्धक्याने हळूहळू सुरकुतायला लागला. कलिंगडासारखी गरगरीत ढेरी खोल होत गेली. शरीराचे वजन झपाट्याने उतरत गेले. ते गेले तेव्हा माझे अभियांत्रिकीचे शिक्षण नुकतेच निकाल लागून संपले होते. आज आईसाठी सुखाच्या दोन गोष्टी करताना बाबांची जीवनशैली समोर उभी राहते. आस्तिक असूनही त्यांनी कधी देवापुढे तेलातुपाचा दिवा लावणे पसंत केले नाही. आपले फ़ाटके जीर्ण कपडे ते रिक्षा वाहकाला देत. गरीब पामराला घरी बोलवून दोन घास जेवायला घालतं, तर कधी 'जय मारोती' म्हणून तेल मागणाऱ्या तरूण भिक्षुकाचा अपमान करून हाकलून लावत. दोन वर्षांनी थोरला असलेल्या भावापुढे नम्र असत, एकुलत्या एक बहिणीकडे रक्षाबंधनाला आवर्जून जात. अक्षय्य तृतीयेला तनमनधनाने पितरांना पुजत. त्या दिवसाला खास सुटी काढत. बाबांच्या अश्या आणि कैक आठवणी त्यांचा जीवनाकडे आनंदी वृत्तीने बघण्याचा इशारा करतात. त्यांनी जगलेलं सरळ साधं आयुष्य सरस लोभसवाणं वाटतं.

दोन दिवसांपूर्वी घरी दिवाळीची पत्रभेट पाठविताना आई, ताया, तायांच्या लेकी आणि लेकीची मुलेबाळे, भाऊजी आणि त्यांचे जावई अशी सगळ्यांची नामावली लिहिली. तेंव्हा बाबांनी निर्माण केलेल्या कुटुंबाचा वाढता विस्तार वटवृक्षासारखा चहूबाजूने पसरलेला वाटला. त्यांच्या हयातीनंतर, त्यांच्याच आशीर्वादाने एका अत्यंत दीन कुटुंबाची समृद्धी होत आहे. तीर्थरूप बाबांस आणि आईसही शिरसाष्टांग नमस्कार!

**- बी**